
DOMINVS
ILLVMINATIO
MEA
SIR M·MONIER-WILLIAMS KCIE
EX LIBRIS
EBR. 97.

THE LIFE AND ADVENTURES

OF

ROBINSON CRUSOE

TRANSLATED INTO MARÁṬHÍ

BY

RÁWJÍ SHÁSTRÍ GOḌBOLE

MARÁṬHÍ TRANSLATION EXHIBITIONER

(NOW REVISER TO THE DAKSHINÁ PRIZE COMMITTEE)

PART I.

PUBLISHED BY ORDER OF THE DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTION

(Registered under Government of India's Act XXV. of 1867.)

BOMBAY:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1871.

Price ten annas.

BOMBAY.

PRINTED AT GANPAT CRISHAJI'S PRESS

BY NARO KRISHNA DUNALE BY ORDER OF THE EXECUTORS.

राबिन्सन क्रूसो ह्याचें चरित्र.

भाग पहिला

इंग्रजी मूळ पुस्तकाचें हें भाषांतर

रावजी शास्त्री गोडबोले

मराठी ट्रान्स्लेशन एक्सिबिशनर

(हल्लीं दक्षिणा प्रैज कमिटीचे रिपोर्टर)

ह्यांनीं केलें

तें

मेहेरबान डैरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन् ह्यांच्या हुकुमावरून
छापून प्रसिद्ध केलें.

मुंबई.

गवर्नमेण्ट सेन्ट्रल बुक डिपो.

सन १८७१.

किम्मत दाहा आणे.

मुंबईंत.

गणपत कृष्णाजी ह्यांच्या छापखान्यांत एग्झिक्युटर्स ह्यांच्या हुकुमावरून

नारोकृष्ण डुमाळे ह्यांनीं छापिला.

प्रस्तावना.

राबिन्‌सन् क्रूसो ह्याचें चरित्र हें एका इंग्रेजी पुस्तकाचें भाषांतर आहे. इंग्रेजी पुस्तकांतील गोष्ट कल्पित आहे. तरी तिला कांहीं आधार आहे असें म्हणतात. तो असा. अलेक्‌जांदर सेलकर्क नांवाचा एक दर्यावर्दी होता, तो स्कात्‌लंद देशांत इ० स० १६८० ह्या सुमारास जन्मला. त्यानें समुद्रावर अनेक पर्यटनें केलीं; त्यांपैकीं एका पर्यटनाचे वेळेस त्याचें व त्याच्या जहाजावरील कप्तानाचें वांकडें पडलें. त्यामुळें त्या कप्तानानें त्याला जुंवा फर्नांदेज ह्या नांवाच्या बेटावर नेऊन सोडिलें. त्या वेळेस त्याजपाशीं एक बंदूक, कांहीं दारू गोळी, छरे, व कांहीं किरकोळ सामान त्यानें ठविलें. हा मनुष्य त्या बेटावर सुमारें तीन वर्षे एकटा राहिला. मग सन १७०९ ह्या वर्षी दुसऱ्या एका गलबतावरच्या कप्तानानें त्याला तेथून नेऊन मुक्त केलें. हा दर्यावर्दी इंग्लंदास गेल्यावर त्यानें आपला वृत्तांत दानियल दी फो नामक ग्रंथकार ह्यास कळविला. त्याच गोष्टीच्या आधारावरून दानियल दी फो ह्यानें राबिन्‌सन् क्रूसो ह्याची गोष्ट कल्पून लिहिली.

राबिन्‌सन् क्रूसो नांवाचा मनुष्य त्यानें असा कल्पिला कीं, तो स्वभावानें अत्यंत साहसप्रिय होता. त्यानें आपल्या मातापितरांच्या सदुपदेशाकडे दुर्लक्ष्य करून अंत:करणास रुचलीं तशीं समुद्रपर्यटनें केलीं. त्यांत त्यावर भयंकर संकटें गुदरलीं; तथापि तो धैर्यवान्, उद्योगी, व दृढनिश्चयाचा असल्यामुळें त्यास अनेक युक्ति सुचून तो त्या संकटांपासून मुक्त झाला. हा ह्या गोष्टीचा मुख्यविषय आहे.

मनुष्यास कशींही संकटें प्राप्त झालीं तथापि धैर्य न सोडितां ईश्वरावर आपला भार ठेवून त्यां पासून मुक्त होण्याविषयीं तो मनापासून झटेल तर परम दयाळू ईश्वर त्याचें रक्षण खचित करील. हें ह्या गोष्टीचें मुख्य तात्पर्य होय.

ही गोष्ट अत्यंत सुरस व सदुपदेशपर असल्यामुळें इंग्रेजलोक व इंग्रेजी भाषा जाणणारे इतर लोक मोठ्या आवडीनें वाचितात. परंतु

मराठी भाषेत हिचें भाषांतर न झाल्या कारणानें केवळ मराठी भाषा जाणणाऱ्यांस ह्या गोष्टीचा उपयोग होत नव्हता. हल्लीं सरकारांतून ह्या गोष्टीचें हें मराठी भाषांतर झाल्यामुळें त्यांसही हिचा मोठा उपयोग होईल.

इंग्रेजी भाषेत ह्या पुस्तकाचे अनेक प्रकार झाले आहेत. ते सर्व सारखेच नाहींत. कांहींत विस्तार फार आहे; व कांहींत ग्रंथाचा संक्षेप आहे. विस्ताराच्या पुस्तकांत मराठी वाचणाऱ्यांच्या मनास न रुचाया जोग्या बारीक बारीक गोष्टी लांब लचक आहेत; व नौकागमनशास्त्रसंबंधी शब्दांचा प्रयोग फारच आहे, ह्यास्तव वाचणाऱ्यांचें मनोरंजन न होतां उलटा कंटाळा मात्र येणार; ह्यामुळें तें विस्ताराचें पुस्तक सोडून संक्षिप्त पुस्तकाचें हें भाषांतर केलें आहे. ह्या पुस्तकाचे दोन भाग आहेत; पैकीं पहिल्या भागाचें हें पुढील भाषांतर छापून प्रसिद्ध केलें आहे.

हें भाषांतर करितेसमयीं मुळांतील अर्थ जितका आणवेल तितका आणण्याविषयीं व सुलभ असून व्यवहारांत नित्यशः येणाऱ्या शब्दांचा प्रयोग करण्याविषयीं यत्न केला आहे; त्यामुळें इंग्रेजी मूळ पुस्तक वाचणाऱ्यांसही ह्या भाषांतरापासून कांहीं उपयोग होईल अशी आशा आहे. आतां ह्या भाषांतरांत मूळ पुस्तकांतील रस कितपत उतरला आहे ह्याचा निर्णय करणें सुज्ञ वाचकांकडे आहे.

राबिन्सन् क्रूसो

नामक पुरुषाचें चरित्र व त्याचीं साहस कृत्यें.

इसवी सन १६३२ ह्या वर्षी यार्क शहरामध्यें माझा जन्म झाला. माझा बाप मूळचा ब्रेमेन येथील राहणारा होता. तो व्यापार करण्या करितां तेथून निघून प्रथम यार्क प्रांतांतील हल्ल नामक बंदरीं जाऊन राहिला; पुढें कांहीं काळानें व्यापार सोडून देऊन त्यानें त्याच प्रांताचें यार्क नामें मुख्यशहर आहे तेथें वस्ती केली. ह्या ठिकाणीं त्यानें त्या प्रांतांत मोठें सभ्य अशा राबिन्सन्नामक घराण्यांतील एका कन्येशीं आपलें लग्न केलें. तिच्याच पोटीं पुढें मी जन्मलों. माझ्याआईच्या उपनांवावरून माझेंही नांव प्रथमतः राबिन्सन् क्रौत्सूनेर असें पडलें होतें; परंतु इंग्लंदांत नेहमीं शब्दांचे अपभ्रंश होतात; तसा ह्याचाही अपभ्रंश होतां होतां लोक आम्हांस क्रूसो म्हणूं लागले, आणि आम्हीही आपणांस क्रूसो असेंच म्हणवितों, व सहीसुद्धां अशीच करितों. तेव्हां अर्थात् माझे इष्ट मित्रही मला क्रूसो ह्याच नांवानें म्हणवीत.

मी आम्हा भावंडांपैकीं तिसरा. मला कोणता एखादा धंदा शिकविला नसल्यामुळें लहानपणींच माझ्या चित्तामध्यें देशाटन करण्या विषयींच्या कल्पना येऊं लागल्या. माझ्या बापानें मजकडून बराच विद्याभ्यास करविला होता, व पुढें मजकडून कायद्यांचा अभ्यास करवावा असा त्याचा संकेत होता; परंतु समुद्र पर्यटन करणें ह्या खेरीज दुसरें कोणतेंच काम मला रुचेना. ह्या भरीस तूं पडूं नको, म्हणून बापानें युक्तीच्या वाटेनें मला पुष्कळ सांगून पाहिलें, व वडिलाच्या नात्यानें आज्ञाही केली; तसेंच आईनें व इष्टमित्रांनींही मी हा नाद सोडावा म्हणून माझी पुष्कळ विनवणी केली; परंतु माझ्या मनाचा कलच तिकडे पडला; त्यामुळें कोणाचेंच बोलणें माझ्या मनांत बिंबलें नाहीं.

माझा बाप वृद्ध असून मोठा सुज्ञ व गंभीर मनाचा होता; त्यास जेव्हां देशाटण करण्याकडे माझ्या अंतःकरणाचा फारच कल आहे असें

दिसून आलें, तेव्हां तो वृध्दाच्या व्यथेनें आपल्या खोलींत पडून राहि-
ला असतां एके दिवशीं सकाळीं त्यानें मला जवळ बोलावून हा माझा
हेतु फार अनुचित आहे अशाविषयीं मला पुष्कळ उपदेश केला. त्या-
नें मला विचारिलें, तूं उद्योग केला असतां स्वदेशामध्येंच तुला संपत्ति
मिळण्याचा संभव असून स्वदेश व आपलें घरदार सोडून, आणि आप-
ल्या वृद्ध पित्याचा त्याग करून, देशांतरास जाण्याचें तुला प्रयोजन
काय? पक्त तुझ्या मनाला आवेसें वाटतें एवढेंच, किंवा दुसरें कांहीं
कारण आहे? तुला म्हणजे आपल्या उपजीविकेकरितां यत्न केला पा-
हिजे असें नाहीं; तुझें सर्व यथास्थित करण्यापुरतें मजमध्यें सामर्थ्य
आहे; असें असतां जर प्रपंचांत तुला सुख होणार नाहीं, तर हा तुझाच
दोष होईल. माझ्या इच्छेप्रमाणें तूं घरीं राहून एखादा उद्योग करशी-
ल, तर तुझ्या कल्याणार्थ मी होईल तितका यत्न करीन; परंतु देशांत-
रास जाण्यास आज मी तुला अनुमोदन देणार नाहीं; तें दिलें असतां
पुढें तुजवर अनर्थ गुदरल्यास त्याबद्दलचें अपयश माझ्या माथ्यावर ये
ईल तें मला नको. शेवटीं तो म्हणाला, तूं आपल्या वडील भावाची
गोष्ट मनांत आण बरें; त्यानें नेदर्लंदांत लढाईस जाऊंनये म्हणून मीं अ-
सेंच व्हावें तितकें त्यास सांगितलें, परंतु तो तारुण्याच्या भरांत होता
त्या योगानें सैन्यांत शिरण्याची त्यास अत्यंत उत्कंठा झाल्यामुळें माझें
कांहींच चालेना; शेवटीं तो तिकडे जाऊन प्राणास मुकला; म्हणून तुला
सांगतों कीं, माझा पितृधर्मच पडला म्हणून मी तुझ्या कल्याणार्थ नेह-
मीं ईश्वराची प्रार्थना करीन हें खरें, तरीं एवढें पक्कें लक्षांत ठेव कीं, तूं
असा मूर्खपणा केला, तर तूं मोठ्या विपत्तींत पडशील, व पुढें कोणीच
साह्य करावयास नाहींसें झालें म्हणजे मग माझा उपदेश न ऐकल्याब-
द्दल तुला मोठा पश्चात्ताप होईल.

हे शेवटील शब्द भविष्य म्हणून समजून तो बोलला, असें नाहीं,
तथापि वस्तुतः भविष्यवाद्यानें सांगितलेल्या प्रमाणेंच पुढें घडून आलें.-
असो, पण तें बोलत असतां, व विशेषेंकरून माझ्या वडील भावाच्या
मृत्यूविषयीं सांगत असतां, त्याच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा चालल्या
होत्या; आणि, पुढें तुला मोठा पश्चात्ताप होईल, व साह्य करावयास
कोणी नाहींसें होईल, हे शब्द म्हणतेवेळेस त्यास इतका गहिंवर आला

र्की, त्यानें तें संभाषण बंद केलें; आणि तो मला म्हणाला, बाबारे, मा-
झें ह्रदय दुःखानें इतकें दाटून गेलें आहे कीं आतां माझ्यानें अक्षर सु-
द्धां बोलवत नाहीं.

हें बापाचें भाषण ऐकून माझा कंठ भरून आला; आणि अशा प्र-
कारचें भाषण ऐकून कोणाचा बरें कंठ भरून येणार नाहीं ! आतां पु-
ढें देशाटन करण्याची कल्पना सुद्धां मनांत न आणितां बापाच्या इच्छे
प्रमाणें घरीं राहून तो सांगेल तो धंदा करावयाचा, असा मीं निश्चय के-
ला. परंतु तो व्यर्थ. थोडक्याच दिवसांत तो निश्चय सर्वथा नाहींसा
झाला; आणि पुनः बाप उपदेश करीत बसेल तो प्रसंग टाळण्याकरितां
येथून पळूनच जावें म्हणजे झालें, असा थोडक्याच दिवसांनीं मीं निश्चय
केला. तथापि ही गोष्ट मनांत भरतांच त्या आवेशामध्यें विचार न क-
रितां मी पळून गेलों असें नाहीं. माझी आई नेहमींपेक्षां अधिक आ-
नंद वृत्तींत आहे अशी संधी पाहून मी तिजजवळ गेलों, आणि तिला-
म्हणालों, आई, माझें अंतःकरण पृथ्वीवरील दूरदूरचे देश पाहण्याकं-
रितां इतकें उत्कंठित झालें आहे कीं घरीं बसून कोणताच उद्योग करणें
मला सुचत नाहीं. तर मी बाबाची आज्ञा घेतल्यावांचून निघून जाई-
न त्यापेक्षां त्यांनींच मला आज्ञा देऊन जाऊं द्यावें हें चांगलें नव्हे का-
य ? पहा बरें ! माझे वयाला आज अठरा वर्षें लोटलीं; आतां ह्यापुढें
एखाद्या दुकानदाराजवळ कांहीं कामाची माहिती करून घेण्यासाठीं
कांहीं नियत काळ पर्यंत त्याचा अंकित होऊन राहणें किंवा एखादे
वकिलाचा कारकून होऊन राहणें हीं कृत्यें करण्याचा का समय उर-
ला आहे ? त्यांतून मी आलेंबलें कोणा एखाद्या जवळ राहिलोंच तर
करारांतील मुदत पुरी होई तोंपर्यंत त्याजपाशीं टिकेन असें मला वाटत
नाहीं; मध्येंच समुद्रपर्यटन करावयास पळून जाईन असें पक्कें वाटतें;
म्हणून म्हणतों कीं, फक्त एकच सफर करण्याकरितां बाबांनीं मला
आज्ञा द्यावी अशी तूं त्यांजवळ रदबदली कर; म्हणजे मी माघारा आ-
लों, आणि समुद्रपर्यटन करणें मला आवडलें नाहीं, तरमी पुनः कधीं
जाणार नाहीं, आणि पर्यटनांत व्यर्थ काळ घालविल्यामुळें जें माझें
नुकसान होईल त्याबद्दल दुप्पट मेहनत करीन.

हें माझें बोलणें ऐकून आईचें अंतःकरण फार सद्गदित झालें. ती

म्हणालो, बाळा, असली गोष्ट त्यांच्या जवळ काढून कांहीं उपयोग ना-हीं. आणि मला हें ठाऊक आहे कीं, त्यांनीं फार ममतेचीं भाषणें बो-लून तुला नको जाऊं म्हणून सांगितलें आहे; पण असें असतांही तुझ्या मनांत जाण्याचीच गोष्ट येते, हें मला मोठें नवल वाटतें. असो, फार बो-लून उपयोग काय; तुला जर आपला सर्वथैव नाशच करून घ्यावयाचा असेल, तर निरुपाय आहे; परंतु ह्या गोष्टीस आम्हा दोघांचें अनुमोदन म्हणून तुला मिळावयाचें नाहीं, हें पक्कें लक्ष्यांत ठेव. . . . .

हें संभाषण झाल्यानंतर सुमारें एक वर्षभर माझ्या अंतःकरणानें फारशी उचल घेतली नाहीं; तथापि तितक्या काळामध्यें आईबाप, कां-हीं एखादा धंदा कर, म्हणून सांगत तें मीं मुळींच मनास आणलें नाहीं. पुढें कांहीं निमित्तानें मी हल्ल बंदरीं गेलों; तेथें एके दिवशीं माझा एक मित्र आपल्या बापाच्या जहाजांत बसून लंदन शहरास जावयाकरितां निघणार होता, तो मला भेटला; आणि सामान्यतः असें आहे कीं गल-बताचें भाडें पडत नसलें तर सफर करण्याला मनुष्यास मोह पडतो, त-सा त्यानें ही, तुला भाडें पडणार नाहीं, असें सांगून मला आपणाबरो-बर निघण्याविषयीं मोह पाडला. तेव्हां आपल्या स्थितीचा विचार न करितां, व आपण जी गोष्ट करणार तिचा परिणाम काय होईल, हें यत्किंचित् सुद्धां मनांत न आणितां, सन १६५१ ह्या वर्षीं सेप्टेंबर महिन्या-चे पहिले तारखेस त्या लंदनास जाणाऱ्या गलबतांत मी बसलों. जाते समयीं आईबापांचें अनुमोदन घेणें तर एकीकडेच राहिलें, पण त्यांस गेलों म्हणून नुसता निरोप सुद्धां मीं पाठविला नाहीं. त्यांस आपो-आप कळेल तेव्हां कळो, असें म्हणून परमेश्वराची अभयवर देण्याबि-षयीं प्रार्थना न करितां, व आपल्या पित्याचा आशीर्वाद न घेतां, मी चालता झालों. . . . .

गलबत हंबर नदीच्या मुखांतून बाहेर पडतें आहे तोंच वादळ सुट-ण्याला आरंभ झाला, आणि मोठमोठाल्या भयंकर लाटा उठूं लागल्या. गलबतांत बसून समुद्रांतून जाणें मला पूर्वीं कधींच ठाऊक नसल्यामुळें मला गलबत लागलें, व जीव अगदीं भिऊन गेला. आणि ह्या प्रसंगीं माझ्या दुर्वृत्त आचरणाविषयींचे विचार माझ्या मनांत येऊं लागले. मातापितरांनीं केलेले सदुपदेश, बापाच्या नेत्रांतून निघालेले अश्रु, व

आईची विनवणी, ह्या सर्व गोष्टी एकदम अंतःकरणांत उभ्या राहिल्या; आणि त्यांच्या उपदेशाचा धिक्कार केला, आणि ईश्वर व आपला बाप ह्यांच्या संबंधानें वर्तावें तसें वर्तलों नाहीं, म्हणून माझें मन मला खाऊं लागलें.

ह्याप्रमाणें माझा विचार चालला असतां इकडे तें वादळ अधिकाधिकच वाढत चाललें होतें, व लाटा उंच उसळूं लागल्या होत्या. आतां हें वादळ तरी, त्यापुढें जीं वादळें मीं पाहिलीं त्यांच्याशीं लावून पाहिलें असतां कांहींच नव्हतें; तथापि मला गलबतांत बसण्याचा पहिला प्रसंग हाच होता, व वादळ म्हणजे काय असतें, हें मला बिलकुल माहीत नव्हतें, त्यामुळें माझ्या मनांत भीति उत्पन्न करण्याला तें वादळ पुरे होतें. एक एक लाट येई ती आम्हा सर्वांस गट्टच करिते कीं काय, असें मला वाटे, व प्रत्येक वेळेस लाटा येऊं लागल्यामुळें पाण्याला खळगा पडे त्यांत गलबत बुडून जाऊन वर कधींच येणार नाहीं, असें मला भय पडे. ह्याप्रमाणें भयानें अगदीं चूर होऊन गेलों, तेव्हां देवाला मीं पुष्कळ नवस केले; आणि असा दृढ संकल्प केला कीं, परमेश्वरानें करुणा करून जर मला एकवार ह्या संकटांतून वांचविलें, व पुनः एकदां मीं जमिनीवर पाय ठेवले, तर तत्काळ मी थेट घरचा रस्ता धरीन; आणि जीवांत जीव आहे तों पर्यंत पुनः गलबतांत म्हणून पाऊल सुद्धां ठेवणार नाहीं.

हे सर्व विचार वादळ होतें तों पर्यंत, व तें बंद झाल्यावरही कांहीं वेळ पर्यंत चालले होते; परंतु दुसरे दिवशीं वादळ कमी होऊन समुद्र बराच स्थिर झाला, व मला ओकारी लागली होती तीही बंद झाली, तेव्हां अंतःकरणांतली भीति जाऊं लागून हुशारी वाटूं लागली; व जो समुद्र आदले दिवशीं पराकाष्ठेचा खवळून भयंकर दिसत होता, तो आतां अगदीं शांत व रमणीय दिसूं लागला, हें पाहून मी मोठें आश्चर्य करीत आहें, ह्या संधींत मीं (परत घरीं जाण्याविषयीं) जो उत्तम प्रकारचा निश्चय केला होता, तो कदाचित् माझ्या मनांत तसाच दृढ राहील तो काढून टाकावा म्हणूनच कीं काय, ज्यानें मला मोह पाडून गलबतांत बसविलें होतें तो मजकडे आला; आणि माझी पाठ थोपटून म्हणाला, कां राव कसें काय आहे ? काल रात्रीं वाऱ्याची झुळूक सुटली त्या वे-

ळेस तुम्ही घाबरलां होतां, खरेंना! हें ऐकून मी त्यास म्हणालों, काय, तुम्ही त्याला क्षुल्लक म्हणतां? तें तर मोठें भयंकर तुफान होतें! त्यानें उत्तर केलें, तुफान? तूं वेडा तर नाहींसना? ह्याला का तूं तुफान म्हणतोस? छेः ह्यांत काय आहे? एक चांगलें मजबूत गलबत व अफाट दर्या इतकीं आम्हांला असलीं म्हणजे झालें, मग तुफान येवो किंवा तुफानाचा बाप येवो, आम्ही त्यास मुळींच जुमानीत नाहीं. असो, तूं समुद्र पर्यटनाच्या कामांत अगदीं नवखा आहेस, त्यामुळें तुला इतकें भय वाटलें. तर चल आतां आपण दारूची एकेक बाटली झोंकूं, म्हणजे आपणास त्यागोष्टीचा विसर पडेल; ह्या वेळेस हवा कशी पसंत सुटली आहे पहा! ह्या प्रमाणें माझ्या मित्राचें भाषण झाल्यावर, सर्व खलाशी लोक ज्याप्रमाणें दारू झोंकीत असतात, त्याप्रमाणें आम्हीं ही दारूची एकेक बाटली झोंकिली. तेव्हां पूर्वींच्या माझ्या दुराचरणाविषयीं मला झालेला पश्चात्ताप, व पुढें वागावयाचें कसें त्याविषयीं केलेला निश्चय, ह्यांचा त्या दारूच्या अमलामुळें त्या रात्रींत मला विसर पडला.

गलबत हकारिल्यापासून सहाव्या दिवशीं यारमौथरोडसनामक बंदरीं आम्ही येऊन पोहोंचलों, तेव्हां वारा प्रतिकूल म्हणजे नैर्ऋत्य दिशेकडचा वाहूं लागल्यामुळें, ह्या ठिकाणीं नांगर टाकून सुमारें सात आठ दिवस आम्हांस राहणें भाग पडलें.

आठवे दिवशीं सकाळीं वाऱ्याचा जोर वाढत चालला, तेव्हां गलबताला नांगर टाकल्यावर तरंगण्याला वाऱ्यापासून अडचण पडूं नये म्हणून आम्ही सर्वजण लागून शिडें पाडण्यास आरंभ केला, व त्यावरील सर्व जिन्नस नीट नेटके व आटोपसार असे रचून ठेवूं लागलों.

हें वादळ तर वास्तविकच फार भयंकर होतें; कारण खलाशी लोक सुद्धां अगदीं घाबरून त्यांचीं तोंडें उतरून गेलीं; तसाच नाखवा हा तें जहाज बचावण्याच्या कामांत फार हुशारी राखीत होता खरें, तथापि तोसुद्धां भिऊन गेला होता असें मला दिसलें; कारण तो आपल्या कोठडींतून आंत बाहेर येत जात असतां त्याच्या तोंडांतून परमेश्वरा आम्हांवर करुणा कर, आम्ही सर्व आतां बुडतोंरे बुडतों, अशा प्रकारचीं वाक्यें निघालेलीं माझ्या कानावर आलीं. तेव्हां माझी तर केवळ पां

चांवर धारण बसली. मीं आपल्या कोठडीच्या बाहेरच्या बाजूस येऊन समुद्राकडे पाहिलें, त्यावेळेस जो कांहीं भयंकर प्रकार माझ्या दृष्टीस पडला तसा मीं कधींच पाहिला नव्हता. समुद्राच्या पर्वतप्राय उंच लाटा उसळून तीन तीन चार चार मिन्यटांच्या अंतरानें आमच्या गलबतावर येऊन आदळत. ह्या प्रमाणें जिकडे पहावें तिकडे मोठा अनर्थ दृष्टीस पडे. आमच्या जहाजाबरोबर जीं दोन जहाजें चालली होतीं, त्यांमध्यें ओझें फार असल्यामुळें त्यांतील लोकांनीं त्यांच्या डोलकाठ्या बोरदापर्यंत कापून काढिल्या. आणि त्याच वेळेस आम्हांपुढें सुमारें अर्ध कोसावर जें जहाज चाललें होतें तें बुडालें रे बुडालें म्हणून आमचे लोक ओरडले.

संध्याकाळचे सुमारास आमच्या जहाजांतील बोसन व नाखव्याच्या हाताखालचा कामगार हे नाखव्याकडे येऊन म्हणाले, आम्हांला आघाडीची डोलकाठी कापण्याला परवानगी असावी. पण नाखव्याच्या मनांत ती कापण्याचें नव्हतें; तथापि बोसन ह्यानें जेव्हां प्रतिज्ञेनें सांगितलें कीं, ती डोलकाठी तुम्ही कापूं न द्याल, तर जहाज खचीत बुडून जाईल, तेव्हां त्यानें ती कापण्यास परवानगी दिली. मग त्यांनीं ती आघाडीची डोलकाठी कापून टाकिली; पण त्यामुळें मुख्य डोलकाठी फार ढिली पडली, त्या योगानें जहाज अतिशयितच डळमळूं लागलें; त्यामुळें ती मुख्य डोलकाठीही कापून टाकून जहाज भुंडें करून ठेवणें त्यांना भाग पडलें.

आतां मी तर नवीनच असून मला असलें भय पूर्वीं कधींही प्राप्त झालें नव्हतें, त्यामुळें ह्या दुर्घट प्रसंगीं माझी अवस्था कशी काय झाली असेल, हें कोणाच्याही लक्षांत सहज येईल. पण एवढ्यानेंच झालें नाहीं. तुफानाचा जोर इतका वाढला कीं, प्रत्यक्ष खलाशी लोक सुद्धां म्हणाले कीं, तुफानाची शिकस्त झाली, असलें तुफान आम्हीं जन्मांत पाहिलें नव्हतें. आणि खरोखर तें मोठेंच तुफान होतें; कारण नाखवा व बोसन वगैरे लोक उगेच एकाएकीं धीर सोडावयाचे नाहींत, परंतु त्यांना सुद्धां प्रतिक्षणीं जहाज बुडून तळाशीं जातेंसें वाटून ते ईश्वराची प्रार्थना करीत बसले. मध्यरात्रीच्या सुमारास खलाशांपैकीं एकजण, जहाजाला चीर पडलीरे, चीर पडली, म्हणून ओरडला; इतक्यां-

त दुसरा म्हणाला, कोठींत चार फूट पाणी आलें, तेव्हां पाणी उपसाव-या करितां त्यांनीं सर्व लोकांना बंबाकडे बोलाविलें. तें ऐकतांच भीती मुळें माझें वर काळीज पोळून गेलें, आणि मी आपल्या कोठडींत बिछान्यावर बसलों. होतों तेथेंच त्याच्या बाजूवर मागें पडलों. तथापि त्या लोकांनीं मला सावध करून उठविलें, आणि ते म्हणाले, अरे तूं पूर्वीं दुसरे कोणतेच कामाच्या उपयोगी नव्हतास, परंतु आतां इतरांप्र-माणें तुला बंबानें पाणी काढतां येईल, तर चल ऊठ. हें ऐकतांच मी उठून उभा राहिलों, आणि त्यांच्या बरोबर बंबाकडे चालता झालों.

बंबानें पाणी काढण्याचें आमचें काम चाललेंच होतें; पण कोठींत (गमतडींत) पाणी जास्ती वाढत चाललें. त्यावरून गलबत बुडणार असें स्पष्ट दिसून आलें. ह्या संधीस तुफान थोडें थोडें कमी होत चाललें खरें, परंतु एखाद्या बंदरास जाऊन पोहोंचे पर्यंत हें गलबत टिकेल असा नाखव्यास भरंवसा येईना; म्हणून मदतीस कोणास बोलावण्याकरितां तो तोफा सोडूं लागला. तेव्हां आमच्यापुढें जवळच एक जहाज होतें त्यांतील लोकांनीं हिंम्या करून आम्हांस मदत करण्याकरितां एक होडी सोडिली. ती त्यांनीं परम संकटानें आमच्या गलबताजवळ आणिली; परंतु आम्हांस तीवर जातां येईना, व तिलाही आमच्या गलबताच्या बाजूजवळ त्यांना आणितां येईना. शेवटीं होडींतील लोकांनीं होईल तितक्या जोरानें वल्हीं मारण्याचा सपाटा चालविला, आणि आमच्या लोकांनीं वरामावरून त्यांच्याकडे एक दोर फेंकिला; तो मोठ्या प्रयासानें आपल्या जिवावर उदार होऊन त्यांनीं धरिला. तेव्हां आम्हीं त्यांना ओढून वरामाखालीं आणिलें, आणि सर्व त्यांच्या होडींत शिरलों. ती होडी त्यांच्या गलबताकडे पुन्हा नेणें अगदीं असंभाव्य दिसलें; तेव्हां तिला ओढून नेववेल तितकी किनाऱ्याजवळ न्यावी, असा आमचा सर्वांचा विचार ठरला. आणि, होडी किनाऱ्यावर आपटून फुटली, तर मी तुमच्या धन्यास भरून देईन, असें होडींतल्या लोकांस आमच्या नाखव्यानें वचन दिलें. तेव्हां एकदा वल्हीं मारावीं, एकदा होडी नुसती पुढें जाऊं द्यावी, असें आम्हीं करीत करीत उत्तरेच्या बाजूस उतरतें पाणी होतें तिकडे ती होडी नेत नेत विंतर्तननेसनामक बंदराच्या बहुतेक जवळ जवळ नेली.

आम्ही जहाजांतून निघाल्यावर सुमारें अर्ध्या तासाचे आंतंच तें बुडतांना आमच्या दृष्टीस पडलें. जहाज बुडत आहे असें जेव्हां खला-शी लोकांनीं मला सांगितलें, तेव्हां खरोखर माझ्यानें डोळे उघडून वर सुद्धां पाहवेना. कारण भीतीमुळें, व पुढें आपणांस कोणतीं संकटें प्राप्त होणार आहेत कोण जाणे, ह्या धास्तीमुळें माझ्या जिवांत जीव राहिला नव्हता.

असो, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें होडी किनाऱ्या नजीक आणण्याकरि-तां आमचीं माणसें मोठ्या जोरानें वल्हीं मारीत असतां, होडी किना-ऱ्यापाशीं पोहोंचेल तेव्हां आम्हांस साह्य करावें ह्या हेतूनें पुष्कळ लोक किनाऱ्यावरून धांवून येत आहेत, असें आमच्या दृष्टीस पडलें. परंतु आमच्यानें किनाऱ्याकडे जलदीनें जाऊन पोहोंचवेना. कारण आमची होडी वाऱ्याच्या योगानें जात जात विंतर्तन एथील दीपगृहाच्या* पली-कडे गेली; व पश्चिमेस क्रोमर नामक गांवाकडे किनारा थोडा आंत गे-ला आहे, तेथें वाऱ्याचा जोरअंमळ कमी असतो, त्या ठिकाणीं जाई तों पर्यंत होडी किनाऱ्यास लागली नाहीं. तेथें तरी जमिनीवर उतर-ण्याला आम्हांस महाप्रयास पडले; तथापि सारेजण सुरक्षितपणें जमिनी-वर येऊन पोहोंचलों. नंतर तेथून आम्ही पायींच यारमौथ बंदरीं आलों. आमची दीनदशा पाहून तेथील लोकांस फार दया आली, आणि त्यांनीं आमचा चांगला समाचार घेतला; मग लंदन किंवा हल्ल ह्या दोहोंतून पाहिजे त्या ठिकाणीं जाण्यापुरता पैसाही आम्हांस दिला.

मजजवळ मूळचाच थोडासा पैसा होता तेवढ्यावर मी खुष्कीच्या रस्त्यानें लंदन शहरास गेलों. वाटेनें, व तेथें गेल्यावर ही, आपण आ-तां काय करावें, घरीं परत जावें किंवा पुनः समुद्रपर्यटन करण्यास जा-वें, ह्या विषयीं मीं आपणाशीं पुष्कळ भवति न भवति केली.

घरीं परत जाण्याविषयीं तर माझ्या मनानें जी पराकाष्ठेची खंत घे-तली होती ती घालवितां येईना, व समुद्रामध्यें पूर्वीं जीं संकटें मीं भो-

---

* समुद्रांतून येणाऱ्या जाणाऱ्या गलबतांतील लोकांस रात्रीच्या वेळेस खडक वगैरे धोक्याचीं ठिकाणें असतील तीं समजून त्यांपासून त्यांचा बचाव व्हावा म्हणून ज्याठि-काणीं मोठा दिवा पेटवितात त्यांस दीपगृह म्हणतात.

गेलों होतों त्याचें कांहीं वेळाने जेव्हां विस्मरण पडलें, तेव्हां तर घरीं परत जाण्याविषयीं यत्किंचितही इच्छा न राहिल्यामुळें मी दुसरी सफर करण्याचा मनसुबा करूं लागलों.

माझें नशीब सबल म्हणूनच लंडन शहरांत गेल्यावर मला चांगल्याची संगति लागली. मजसारिख्या बहकलेल्या तरुण पुरुषांस असली संगत लागणें कठीण असतें; कारण ते बहुधा अशा बाईच्या फेऱ्यांत येऊन भलत्याच छंदांत पडतात. परंतु माझें तसें झालें नाहीं. प्रथमतः एका नाखव्याची आणि माझी ओळख पडली. हा गृहस्थ आफ्रिकेंत गिनी-प्रांताच्या किनाऱ्यावर गलबत घेऊन गेला होता. त्या सफरींत त्यास पुष्कळ फायदा झाल्यामुळें पुनः तेथेंच जाण्याचा त्यानें निश्चय केला होता. त्या मनुष्याचे मनांत मजविषयीं अकृत्रिम प्रेमभाव उत्पन्न झाला होता. त्यापाशीं मी एकदा असें बोललों होतों कीं, पृथ्वीवरील दूरदूरचे देश पाहण्याचें माझे मनांत फार आहे; त्या वरून तो मला म्हणाला, जर तूं मजबरोबर सफर करावयास येशील, तर मी तुला कोणताच खर्च पडूं देणार नाहीं; व जेवण खाण वगैरेची तुझी सर्व प्रकारची तजवीज मी आपल्या बरोबर ठेवीन. इतकेंच नाहीं, जर तूं कांहीं एखादा माल आपणा बरोबर घेशील, तर तो विकून जो नफा होईल तोही सर्व तुझा. आणि कोण जाणे, कदाचित् तुझें नशीब उघडून तुला फायदा होईल.

हें त्या नाखव्याचें म्हणणें मीं तत्काल कबूल केलें. तो गृहस्थही फार प्रामाणिक आणि सरल स्वभावाचा होता, म्हणून त्याच्याशीं माझा निष्कपट स्नेह जमला. मी थोडासा माल घेऊन त्याबरोबर सफर करावयास निघालों. त्या मालावर त्या नाखव्याच्या अकृत्रिम स्नेहामुळें व प्रामाणिकपणामुळें मला बराच नफा झाला. तो असा, मीं सुमारें ४०० रुपये खर्चून त्या मित्रानें सांगितल्याप्रमाणें खेळाचे जिन्नस व दुसरे कांहीं बारीक सारीक पदार्थ विकत घेतले; तेवढ्या मालावर मीं अडीच शेरांहून ज्यास्त सोन्याचे रज लंडनास आणिले, आणि तेथें त्यांचे मला ३००० रुपये आले. हे ४०० रुपये ज्या नातलगांशीं मीं पत्रव्यवहार ठेविला होता त्यांपैकीं कांहींनीं माझ्या आईबापांला सांगून त्यांपासून माझ्या पहिल्या सफरी करितां जमा केलेले होते.

आतां मी गिनी येथचा व्यापारी बनून गेलों. आम्हीं पहिली सफर करून परत येऊन पोहोंचल्या नंतर थोड्याच दिवसांनीं माझा मित्र जो मालवा तो मृत्यु पावला. हें माझें मोठें दुर्दैवच समजलें पाहिजे. अस्तु, तथापि पुनः तिकडे सफर करावी असा मीं निश्चय केला. आणि पूर्वींच्या सफरीमध्यें माझ्या मित्राचा जो दुय्यम अधिकारी (मेट) होता, व जो ह्या प्रसंगीं जहाजाचा मुख्य अधिकारी झाला होता, त्याच्या बरोबर त्याच्या जहाजांत मी गेलों. ह्या सफरींत मला मनस्वी दुःखें भोगावीं लागलीं. पैशाच्या संबंधानें मी फारसा बुडालों असें नाहीं. कारण, त्या तीन हजार रुपयांपैकीं फक्त एक हजारच मीं आपणाबरोबर घेतले होते, व दोन हजार आपल्या मयत मित्राच्या बायकोजवळ ठेविले होते. तथापि दुसरेच भयंकर अनर्थ मजवर गुदरले.

प्रथम अनर्थ हा कीं, एके दिवशीं प्रातःकाळीं अरुणोदयाचे सुमारास आमचें जहाज आफ्रिकेचा किनारा व कानेरी बेटें ह्यांच्या मधल्या रस्त्यानें जात असतां, साली येथील चांचे तुर्कलोकांच्या एका जहाजाची आणि आमची एकाएकीं गांठ पडली. तेव्हां जितकीं शिडें चढवलीं तितकीं चढवून ते मोठ्या झपाट्यानें आमच्या पाठीस लागले. सबब आम्हींही त्यांच्या तावडींतून सुटण्याकरितां तशींच पुष्कळ शिडें चढवून वेगानें जहाज हाकारिलें. परंतु तें चांचे लोकांचें जहाज आम्हांस भिडण्याच्या लागांत आलें, व कांहीं वेळानें तर तें अगदीं आम्हांजवळ येऊन ठेपणार, असें पाहून आम्हीं लढाईची तयारी केली. सुमारें बारांवर तीन वाजतां त्या जहाजानें आम्हांस गांठिलें. ते आमच्या गलबताच्या वरामावर हल्ला करण्याच्या विचारांत होते; परंतु तें संधान चुकून ते एका बाजूवर येऊन पडले; तेव्हां आम्हीं आपल्या आठ तोफा त्याबाजूस नेऊन त्यांवर एकदम भडिमार केला. त्यांच्या जहाजावरही सुमारें २०० असामी होते, त्यांनीं आम्हांवर लहान लहान गोळ्यांचा वर्षाव केला; परंतु आमच्या भडिमारामुळें त्यांस एकीकडे वळून दूर मागें हटावें लागलें. आमचे लोक लपून दडून बसले होते, त्यामुळें त्यांच्या गोळ्यांपासून एकासही इजा झाली नाहीं. त्यांनीं पुनः आम्हांवर हल्ला करण्याची तयारी केली, व आम्हीही आपला बचाव करण्याकरितां सिद्ध झालों. परंतु ह्याप्रमाणें झटापट चालली

असतां शेवटीं आमचें जहाज निरुपयोगी होऊन आम्हांपैकीं तीन असामी पडले, व आठ जखमी झाले. ह्यामुळें आम्हांस शत्रूंचे हस्तगत व्हावें लागलें. तेव्हां त्यांनीं आम्हा सर्वांस बंदिवान करून मूर (मुसलमान) लोकांचें सालीनामक बंदर आहे तिकडे नेलें.

ते लोक माझे फार हाल करितील असें मला पहिल्यानें वाटलें होतें; परंतु तसें झालें नाहीं. आमच्या बाकीच्या सर्व लोकांस त्यांनीं ज्या ठिकाणीं बादशाहाचें दरबार होतें तेथें नेलें; पण माझी ज्वानी व चापल्य पाहून त्या लुटारू जहाजाच्या नाखव्यानें मला आपलाच खुद्द गुलाम करून ठेविलें.

माझ्या नव्या धन्यानें मला आपल्या घरीं नेल्यावरून मला अशी आशा उत्पन्न झाली कीं, हा जेव्हां पुनः कधीं सफर करावयास निघेल तेंव्हां मलाही आपणाबरोबर नेईल; व तो कधीं ना कधीं तरी स्पानिश किंवा पोर्टुगीज लोकांच्या लढाऊ गलबताच्या तावडीस सांपडून माझी ह्या मनुष्याच्या हातून सुटका होईल. पण ही माझी आशा लवकरच नाहींशी झाली. कारण तो सफर करायाला गेला तेव्हां त्यानें मला आपल्या बागेची देखरेख करण्याकरितां व घरचे काबाडकष्ट करण्याकरितां घरीं ठेविलें; आणि सफर करून परत आल्यावर मला जहाजाचे कोठडींत राहून जहाजाचें संरक्षण करावयास सांगितलें.

मी जहाजावर असतां आपली सुटका करून घेण्याचा निजध्यास मला लागला होता; परंतु माझा हेतु सिद्धीस जाण्याला कोणतीच वाट दिसेना. कारण आपल्या मनांतील गोष्ट एखाद्यास सांगितली असतां तो आपणाबरोबर त्या जहाजांत बसून येईल असा त्या ठिकाणीं कोणीच माणूस नव्हता. त्यामुळें जरी सुटकेविषयींच्या कल्पना वारंवार मनांत आणल्यानें मला समाधान वाटे, तरी दोन वर्षें पर्यंत त्यासारखें घडून येण्याचा लाग तितक्या काळांत मुळींच आला नाहीं.

पुढें सुमारें दोन वर्षांनीं पुनः माझ्या मनांत पळून जाण्याची कल्पना येण्याला एक प्रसंग आला. तो असा, एकदा माझा धनी चालीप्रमाणें जहाज तयार करून स्वारीस जावयाचें तें न जातां, कांहीं कारणानें नेहमींपेक्षां जास्त दिवस घरीं राहिला. तेव्हां तो आपल्या जहाजावरील होडी घेऊन आठवड्यांतून एकदा दोनदा नांगर वाड्यावर मासे

धरावयास जात असे; आणि आम्हांना मी व एक मारेस्को ह्या जातीचा मुलगा अशा दोघांस होडी हाकारण्याकरितां आपणाबरोबर नेत असे. मासे धरण्याचे कामांत मी मोठा हुशार आहें असें पाहून माझा धनी कधीं कधीं आपला संबंधी एक मूर व तो मारेस्को ह्यांस बरोबर देऊन मलाच मासे धरावयास पाठवी.

एके दिवशीं असें झालें कीं, माझ्या धन्यानें तेथील दोन तीन नामांकित मूर लोकांसहित मौजेनें समुद्रा वर फिरावयास (किंवा मासे धरावयास) जाण्याचा संकेत केला. आणि त्या हेतूनें त्यानें पूर्व दिवशीं रात्रीं होडीवर नेहमींपेक्षां जास्तसामग्री पाठवून देऊन, त्यांना मासे धरावयाचे असून पांखरेंही मारावयाचीं होतीं म्हणून, मला दोन तीन चापाच्या बंदुकी दारू गोळ्या भरून होडींत तयार ठेवावयास सांगितलें होतें.

धन्याचे हुकुमाप्रमाणें मीं सर्व तयारी केली; आणि दुसरे दिवशीं सकाळीं होडी स्वच्छ धुवून तिचीं निशाणें उभारिलीं; व तीमध्यें पाहुण्यांस लागणाऱ्या सर्व प्रकारच्या पदार्थांची तजवीज यथास्थित करून ठेवून मी वाट पाहत बसलों. तेव्हां कांहीं वेळानें माझा धनी एकटाच जहाजावर आला, आणि मला म्हणाला, आज पाहुण्यांनीं फिरावयास जाण्याचा बेत रहीत केला आहे; पण आज रात्रीं ते आमचे घरीं जेवावयास यावयाचे आहेत, तेव्हां कांहीं मासे लागतील. तर तूंच नेहमींप्रमाणें तो मूर व मुलगा ह्यांस बरोबर घेऊन मासे धरावयास जा. ह्या त्याच्या हुकुमाप्रमाणें मी जाण्यास सिद्ध झालों.

आतां मी लहानशा जहाजाचाच अधिकारी होणार होतों, त्यामुळें ह्यावेळेस होईल तर आपली सुटका करून घ्यावी अशी कल्पना एकदम माझ्या अंतःकरणांत आली. तेव्हां धनी मला हुकूम करून गेल्यावर, आपण पळून कोणीकडे जावें हें मला ठाऊक नव्हतें, तरी मासे धरावयास जाण्याची तयारी करावयाची ती एकीकडे ठेवून मी जलपर्यटनाची तयारी करावयास लागलों.

पहिल्यानें मीं अशी युक्ति केली कीं, त्या मूरास म्हटलें, आपणास खावयाकरितां होडीवर कांहीं सामग्री आणली पाहिजे, कारण धन्याकरितां ठेविलेले पदार्थ खाणें आपणांस योग्य नाहीं. हें ऐकून तूं म्हणतोस हें खरें आहे, असें तो बोलला, आणि पावांचा एक मो-

डा फेंदारा व मोठ्या पाण्याच्या तीन सुरया होडीवर घेऊन आला. धन्याची बाटल्यांची पेटी ही कोठें होती तें मला माहीत होतें; त्या पेटीच्या आकारावरून ती कोणा इंग्लिश मनुष्यास लुटून त्यापासून ह्यानें घेतली असावी असें दिसलें; म्हणून जशी काय धन्याकरितां ती पेटी पूर्वींच होडींत ठेविली होती, असें वाटावें ह्या हेतूनें तो मूर किनाऱ्यावर असतां मीं ती पेटी होडींत आणून ठेविली. ह्याखेरीज सुमारें २८ शेरांवर वजनाचा एक मेणाचा गोळा, एक कुऱ्हाड, एक करवत, आणि एक हातवडा, इतके जिन्नस मीं होडीवर नेऊन ठेविले; हे सर्व जिन्नस पुढें मला फार उपयोगीं पडले. त्या मुराला फसविण्याची दुसरी एक कृप्ति मीं काढिली, तीही त्या बिचाऱ्यास समजली नाहीं. ती अशीः— त्याचें नांव इस्मायल असें होतें, पण त्याला मूर्ली अथवा मोली ह्या नांवानें हाक मारीत. मी त्यास हाक मारून म्हणालों, कायरे मोली, आपल्या धन्याच्या बंदुकी होडीवर आहेत; तूं थोडी बाराची दारू व कांहीं छर्रे आणिशील तर पहा, म्हणजे आपणाला आपल्या स्वतःच्या उपयोगाकरितां कांहीं आल्कर्मी (हे पक्षी इंग्लदांतील बदकाप्रमाणें असतात) मारून आणितां येतील. हें ऐकून, होय, मी आणितों, असें म्हणून त्यानें सुमारें पाऊणशेर दारूनें भरलेली एक कातड्याची मोठी पिशवी, व अडीच तीन शेर छऱ्यांनीं भरलेली दुसरी एक पिशवी, अशा दोन आणून होडींत ठेविल्या. इकडे मलाही जहाजाच्या थोरल्या कोठडींत धन्याची दारू सांपडली; ती मीं पेटींत ज्या मोठमोठ्या बाटल्या होत्या त्यांपैकीं एका बाटलींत भरून घेतली. ह्याप्रमाणें सर्व सामग्री घेऊन आम्हीं होडी हाकारिली. बंदर सोडून सुमारें अर्धकोस गेल्यावर आम्हीं अवजारें अटपून होडी थांबविली, आणि मासे धरण्याची सिद्धता केली. ह्यावेळेस वारा उत्तर व ईशान्य ह्या दोन दिशांच्या मधून वाहत होता. तसा तो मला नको होता; कारण जर तो दक्षिणेकडचा वाहता, तर मी स्पेन देशाच्या कांठास खचीत गेलों असतों; निदान केडिज अखातापर्यंत तरी पोहोंचलों असतों. तथापि वारा कोणीकडचाही वाहो, होईल तितकें करून ह्या भयंकर स्थलापासून सुटून जावें असा मीं निश्चय केला होता.

कांहीं वेळपर्यंत मासे धरण्यासाठीं आम्ही गळ टाकीत होतों; परंतु

एकही मासा हातीं लागला नाहीं; (ह्याचें कारण असें होतें कीं, जेव्हां जेव्हां गळाला मासे लागत तेव्हां तेव्हां मी ते वर ओढून घेतच नसें) तेव्हां मी त्या मुरास म्हटलें, हें ठीक नव्हेरे ठीक नव्हे; अशानें आपल्या धन्याची चाकरी बरोबर बजावली जाणार नाहीं. तर आपणास अंमळ पुढें जाणें भाग आहे. पुढें जाण्यास कांहीं हरकत नाहीं, असें त्यास वाटून त्यानें तें कबूल केलें, आणि होडींत पुढच्या बाजूस तो होता तेथून त्यानें लागलेंच अवजार चढविलें. माझ्या हातांत सुकाणूं होतें, म्हणून मीं होडी भली दीड कोस पुढें नेली, आणि तेथें मासे धरण्याच्या मिषानें ती थांबविली. नंतर त्या मुलाच्या हातीं सुकाणूं देऊन मी त्या मुराजवळ गेलों, आणि त्याच्या मागल्या बाजूची कांहीं वस्तु घ्यावया करितांच कीं काय मी ओणवलों आहें, असें दाखवून तो गैरसावध असतां एकाएकीं त्यास उचलून होडीवरून त्याला मीं लांब झुगारून दिलें. मग लांकडाचा बूच पाण्यांत तरंगतो त्याप्रमाणें त्याला तरंगतां येत होतें, म्हणून आंत पडतांच उसळी मारून तो वर आला, आणि माझी विनवणी करून मला म्हणाला, मला वर घेशील तर तूं मला ह्या दुनियेंत ज्हावें तिकडे ने, तिकडे मी येईन. असें बोलत बोलत तो होडीमागें फार जलदीनें पोहोत येऊं लागला; आणि वारा प्रायः अगदीं वाहात नसल्या कारणानें होडी मंद गतीनेंच चालली होती; त्यामुळें तो होडीजवळ येऊन ठेपला असता, परंतु तितक्यांत मीं कोठडींत जाऊन एक बंदूक आणिली, आणि तिचें निशाण त्यावर धरून त्याला सांगितलें कीं, तुला मजपासून कांहीं एक अपाय घडला नाहीं, व गमजा न करिशील तर ह्या पुढें ही घडणार नाहीं. तुला पोहोंतां ही चांगलें येतें, व आतां समुद्रही फार शांत आहे, म्हणून तुला पोहून सहज किनाऱ्यावर जातां येईल. तर मुकाट्यानें तूं आपली किनाऱ्याची वाट धर, म्हणजे मी तुला अगदीं इजा देणार नाहीं. पण जर होडीजवळ येऊं लागशील तर गोळी घालून तुझ्या डोक्याचे तुकडे तुकडे करून टाकीन. ह्याप्रमाणें माझें बोलणें ऐकतांच तो तोंड फिरवून मुकाट्यानें किनाऱ्याकडे पोहोत चालला. तो पोहोण्याचे कामांत फार हुशार होता, त्यामुळें किनाऱ्यास सहज पोहोंचला असेल, असें मला वाटतें.

त्या मुराला मीं मोठ्या आनंदानें आपणाबरोबर नेलें असतें, परंतु

मला त्याचा विश्वास येईना. असो, तो गेल्यावर ज्या मुलाचें नांव जूरी असें होतें, त्याकडे वळून मी त्याला म्हणालों, जूरी, तूं मजशीं विश्वासूक पणानें वागशील तर मी तुला मोठ्या योग्यतेस चढवीन. पण मजशीं विश्वासूकपणानें वागण्याबद्दल तूं जर आपल्या धर्माप्रमाणें आपल्या तोंडाला हात लावून (पैगंबराच्या दाढीची) शपथ न घेशील तर तुलाही समुद्रांत फेंकून देणें मला भाग पडेल. हें ऐकतांच हास्यमुखानें मजकडे पाहून त्यानें अशी शपथ घेतली कीं, मी तुम्हांशीं इमानानें वागेन व जिकडे न्याल तिकडे येईन. हे शब्द बोलतांना त्याचें सौजन्य व निष्कपटपणा हीं इतकीं दिसून आलीं कीं त्याच्या हातून विश्वासघात होईल असें मला वाटण्याला बिलकूल जागा राहिली नाहीं.

त्या पोंहोत जाणाऱ्या मुराच्या दृष्टीच्या टप्यांत जोंपर्यंत मी होतों तों पर्यंत, जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीच्या मुखाकडेच मी गेलों आहें, असें किनाऱ्यावरीललोकांस वाटावें, म्हणून मीं आपल्या होडीचा रोंख ज्या दिशेकडचा वारा होता त्या दिशेकडेच नीट ठेविला होता. आणि शुद्धीवर असणाऱ्या मनुष्यास मी तिकडे गेलों असेंच वाटेल, ह्यांत कांहीं संदेह नाहीं. कारणकीं, आम्हीं दक्षिणेस रानटी लोकांच्या देशाच्या किनाऱ्याकडे होडी हाकारिली असावी, असें कोणाच्या मनांत आलें असतें ? कारण ह्या किनाऱ्यावर कोणी गेलें असतां त्यास हिंसक पशु अथवा त्यांच्याही पेक्षां अधिक क्रूर व हिंसक जे रानटी लोक ते फाडून खातात, असें त्या लोकांस पक्कें ठाऊक होतें.

परंतु अंधार होतांच मी होडीचा रोंख बदलून ती थेट आग्नेयी दिशेकडे चालविली; व किनाऱ्या पासून होडी फार दूर जाऊंनये, म्हणून तिचा कल थोडासा पूर्वेच्या बाजूस ठेविला. ह्या वेळेस वारा पाठीचा असून समुद्रही शांत होता, त्यामुळें होडी इतकी वेगानें चालली कीं, दुसरे दिवशीं बारावर तीन वाजतां, निघाल्यापासून पहिल्यानेंच जमीन लागली, त्यावेळेस मी सालीच्या दक्षिणेस सुमारें १५० मैल गेलों असावा असें मला वाटतें. म्हणजे अर्थात् मोरोको एथील बादशाहाच्या व त्याच्या आसपासच्या कोणत्याही राजाच्या मुलखाच्या सरहद्दींत होतों असें मला वाटत नाहीं; कारण तेथें एकही मनुष्य आमच्या दृष्टीस पडला नाहीं.

तथापि त्या क्रूर लोकांची आणि त्यांच्या हातीं लागण्याची माझ्या मनांत इतकी पराकाष्ठेची दहशत बसली होती कीं, त्या किनाऱ्यावर उतरण्याचें किंवा नांगर टाकून होडी थांबविण्याचें मला मनांत सुद्धां आणितां येईना. तेव्हां वारा अनुकूल होता त्यामुळें पांच दिवस पर्यंत मी एकसारिखा होडी हाकीत होतों. नंतर मीं थोडी दक्षिणेकडे होडी फिरविली; तेव्हां जरी कदाचित् एखादें गलबत माझ्या पाठीस लागलें असलें तरी तेंही आतां ह्याच्या पुढें म्हणजे येईल, असें होणार नाहीं, अशी मी अटकळ बांधून किनाऱ्यावर जाण्याविषयीं मनाचा धडा केला; आणि एका लहानशा नदीच्या मुखांत होडी नेऊन नांगर टाकिला. आतां ही नदी कोणती व कोणत्या ठिकाणीं आहे हें कांहींच मला कळलें नाहीं. एथें कोणी लोक माझ्या दृष्टीस पडले नाहींत, व ते दृष्टीस पडावे अशी माझी इच्छाही नव्हती. ह्यावेळेस मला मुख्यत्वें करून गोड्या पाण्याची जरूरी फार होती. असो, संध्याकाळीं आम्ही त्या नदीच्या मुखांत गेल्यावर तेथून पोहून किनाऱ्यावर जावें व तो प्रदेश कसा काय आहे हें पहावें, असा आम्हीं निश्चय केला. परंतु गुडुप अंधार पडतांच तेथील श्वापदांचें भोकणें, डरोकणें, गुरगुरणें, वगैरे शब्द इतके भयंकर ऐकूं येऊं लागले कीं, भीतीनें त्या बिचाऱ्या मुलाची मरणप्राय अवस्था झाली, आणि, उजेडे तों पर्यंत किनाऱ्यावर जावयाचें करूंनका, अशी तो माझी विनवणी करूं लागला. तेव्हां मी म्हणालों, बरें तर जूरी, मी आतां जात नाहीं; परंतु दिवसास कदाचित् क्रूर रानटी लोकांची आपली येथें गांठ पडली तर आगींतून निघून फोपाळ्यांत पडावें, ह्याप्रमाणें आपली अवस्था होण्याचा संभव आहे, ह्याचा विचार कर. हें ऐकून जूरी हासून म्हणाला, मग त्यांना आपण बंदूक उडवून देऊं, आणि त्यांना पळण्याला करूं. (म्हणजे गोळ्या घालून त्यांना पळवून लावूं.) हें त्याचें हुशारीचें बोलणें ऐकून मला फार आनंद झाला, आणि त्याचें म्हणणेंही सुयुक्तिक दिसल्यामुळें मीं तें कबूल केलें. नंतर चिमुकला नांगर टाकून आम्ही रात्रभर तेथें स्वस्थ बसलों. परंतु त्या साऱ्या रात्रींत आम्हांस झोंप मुळींच आली नाहीं; कारण सुमारें पांच सात घटकांनीं नानाप्रकारचीं प्रचंड जनावरें (तीं कोण असतील

कोण जाणे) पाण्यामध्यें येऊन गडबडां लोळूं लागलीं व कुस्त्या मारूं लागलीं. त्यांनीं अशा कांहीं भयंकर आरोळ्या फोडिल्या कीं, मीं तसल्या जन्मांत ऐकिल्या नव्हत्या.

जूरी फारच भ्याला, आणि मलाही खरोखर फार भय वाटलें, तथापि ह्या जनावरांपैकीं एक आम्हांकडे पोहोन येत असतां त्याचा ध्वनी आमच्या कानीं पडला, तेव्हांतर दोघांचीही अतिशयच गाळण झाली. तो प्राणी आम्हांस दिसत नव्हता, परंतु त्याच्या गर्जनेवरून तो कोणी फार प्रचंड प्राणी आहे असें समजलें. जूरी म्हणाला, सिंह हो सिंह! आणि तो नसेल म्हणून तरी कशावरून म्हणावें. परंतु बिचारा जूरी घाबरून म्हणाला, नांगर ओढून घ्या, आणि होडी लवकर हांका! तेव्हां मीं म्हटलें, घाबरूं नको बाबा, प्रसंग पडल्यास आपण दोरखंडाला भोंपळा बांधून त्यास धरून समुद्रांत पोहत जाऊं, म्हणजे झालें; त्या जनावरांना आपल्यामागें फारसें लांब येतां येणार नाहीं. इतकें मी बोलतों आहें तोंच तो प्राणी होडीपासून एक दोन वल्ल्यांच्या अंतरावर आला, त्या मुळें मी कांहींसा घाबरलों; तथापि झटकन कोठडीच्या दाराजवळ जाऊन मीं आपली बंदूक घेऊन त्यावर गोळी घातली, तेव्हां तो लागलाच उलटा फिरून किनाऱ्याकडे पोहत चालला.

मला वाटतें कीं, बंदुकीचा आवाज त्या प्राण्याच्या कानीं पूर्वीं कधींच पडला नव्हता; कारण मी बंदुकीचा बार काढितांच किनाऱ्यावर व वरच्या प्रदेशांत. ते प्राणी असे कांहीं अक्राळ विक्राळ ओरडूं लागले कीं, त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. त्यांच्या त्या ओरडण्यावरून माझी खात्री झाली कीं रात्रीं त्या किनाऱ्यावर जाणें अगदीं उपयोगी नाहीं; आणि दिवसास तरी तेथें जावें किंवा नाहीं ह्याचा विचारच होता; कारण तेव्हां रानटी लोकांचे हातीं पडण्याचें भय होतें, व ते लोक हिंसक पशूंसारिखेच क्रूर व दुष्ट होते.

तथापि होडींत एक पंचपात्रीभरही गोडें पाणी शिल्लक नव्हतें, म्हणून किनाऱ्यावर जाऊन कोठून तरी पाणी मिळवून आणणें आम्हांस भाग होतें. सबब जूरी म्हणाला, मला जर एक सुरई घेऊन किनाऱ्यावर जाऊं द्याल, तर मी कोठून तरी पाणी शोधून घेऊन येईन. तेव्हां मीं त्यास विचारिलें, तूं कां जातोस? मला जाऊं देऊन तूं होडींत कां

राहीनास ? हें ऐकून त्यानें उत्तर केलें, रानटी लोक आले तर मलाच खातील, तुम्ही पळून जा. हे शब्द बोलतांना त्यानें मजविषयीं इतकी भक्ति दर्शविली कीं, ह्यापुढें त्यावर माझें एकसारिखें प्रेम जडलें. तेव्हां मी म्हणालों, बरें बाबा जूरी, तर आपण दोघेही जाऊं, आणि रानटी लोक आलेच तर त्यांस आपण मारून टाकूं, म्हणजे ते आपणांतून एकालाही खाणार नाहींत. ह्याप्रमाणें बोलणें झाल्यावर आम्ही होडींतून उतरून नेट करून ती ओढीत ओढीत किनाऱ्याजवळ नेली, आणि किनाऱ्यावर गेलों, व पाणी भरण्याला दोन सुरया आणि बंदुका ह्यांखेरीज दुसरें कांहीं बरोबर नेलें नाहीं.

रानटी लोकांच्या होड्या नदींतून येतील ह्या भीतीनें दृष्टीच्या टप्याच्या पलीकडे आपली होडी सोडून दूर जाण्यास मला धैर्य होईना; परंतु किनाऱ्यापासून पलीकडे सुमारें पाव कोसावर एक खोलगट प्रदेश आहे असें पाहून तो मुलगा तिकडे चालता झाला; आणि कांहीं वेळानें तो पुनः मजकडे धांवत येत आहे असें माझ्या दृष्टीस पडलें. तेव्हां, कोणी त्याच्या पाठीस लागलें आहे, असें मला वाटून त्याला मदत करण्याकरितां मी पुढें धांवलों; परंतु त्याच्या जवळ जवळ गेल्यावर पाहतों तों, त्यानें मारून आणिलेलें एक जनावर त्याच्या खांद्यावर लोंबत आहे, असें दृष्टीस पडलें. हें जनावर सशा सारिखें होतें, परंतु त्याचा रंग सशाच्या रंगापेक्षां निराळा असून त्याच्या तंगड्याही किंचित् लांब होत्या. असो, तें मिळाल्यानें आम्हांस मोठा आनंद झाला; कारण त्याचें मांस फारच चांगलें होतें. पण जूरीनें एक आनंदाचें वर्तमान आणिलें होतें कीं, पाणी सांपडलें असून रानटी लोक कोठें ही दृष्टीस पडले नाहींत. तें ऐकतांच आम्हीं पाण्याजवळ जाऊन दोन्ही सुरया भरून घेतल्या, आणि त्या जनावराचें मांस खाऊन परत यावयास निघालों. इतक्या सर्व प्रदेशामध्यें मनुष्यांचीं पाउलें उमटलेलीं आमच्या दृष्टीस पडलीं नाहींत.

पूर्वीं मीं एकदा ह्या किनाऱ्याच्या जवळून जलपर्यटन केलें होतें, त्यावरून मला खचीत ठाऊक होतें कीं, कान्हेरी व केपवेर्द हीं बेटें ह्या किनाऱ्यापासून फार दूर नाहींत. परंतु आम्ही किती अक्षांशांवर आलों हें समजावयाचें कांहीं साधन त्यावेळीं मजपाशीं नसल्यामुळें तीं बेटें

कोठें असतील हें, अथवा त्यांकडे जाण्याकरितां समुद्रांत केव्हां वळाव-याचें हें लक्षांत येईना. जर तसें कांहीं साधन असतें तर मला त्यांपैकीं कांहीं बेटें सहज सांपडतीं. परंतु हल्लीं मला ही आशा होती कीं, ह्या किनाऱ्यावर ज्या ठिकाणीं इंग्लिश लोक व्यापार करितात तेथपर्यंत जर मी असाच कांठा कांठानें गेलों, तर एखादें त्यांचें जहाज भेटून त्यांतील लोक आम्हांस आंत घेऊन ह्या संकटापासून आमची मुक्तता करितील.

मला हें ठाऊक होतें कीं, यूरोपांतून गिनी अथवा ब्राजिल ह्या देशाचे किनाऱ्यास किंवा ईस्तइंदीस् बेटांकडे जाणारीं सर्व जहाजें नेहमीं त्या भूशिरावरून किंवा त्या बेटावरून जातात. सारांश, आतां मीं आपला सर्व भरंवसा एका गोष्टीवर ठेवून राहिलों; तो असा कीं, एखादें जहाज तरी मला भेटेल, नाहींतर माणासतरी मुकेन.

ह्याप्रमाणें निश्चय करून सुमारें दहा दिवसपर्यंत होडी हाकिल्यानंतर जमिनीवर वस्ती आहे असें दिसूं लागलें. आणि दोन तीन ठिकाणीं तर आमची होडी कांठा कांठानें जात असतां, कांहीं काळे लोक आम्हांस पहावयाकरितां किनाऱ्यावर आले आहेत असें माझ्या दृष्टीस पडलें. मला एकवेळ त्यांजकडे किनाऱ्यावर जावेंसें वाटलें होतें; परंतु जूरीनें मला चांगली मसलत दिली. तो म्हणाला, नका जाऊं, नका जाऊं. तथापि त्यांच्याशीं कांहीं बोलावें ह्या हेतूनें मीं होडी बरीच किनाऱ्याजवळून चालविली, आणि तेही होडी बरोबर बरेच लांबपर्यंत किनाऱ्यावरून धांवत होते. त्या लोकांपैकीं एकाच्या हातांत मात्र एक लांब व बारीक काठी होती. बाकी कोणाच्या हातांत कसलेंच शस्त्र नव्हतें. जूरी म्हणाला, ती काठी त्यांचा एका प्रकारचा भाला आहे; व तो त्यांस नेमका फार लांबवर फेंकितां येतो. हें ऐकून मीं होडी त्यांच्या पासून कांहीं अंतरावरून चालविली. परंतु आम्हांस त्यांनीं कांहीं खावयास द्यावें म्हणून मला करवल्या तितक्या मीं त्यांस खुणा केल्या. तेव्हां त्यांनीं ही माझा भाव समजून खुणांनीं दर्शविलें कीं, होडी खोळंबवा, म्हणजे तुम्हांस खावयास कांहीं आणून देऊं. ती त्यांची खूण पाहून मीं शीड पाडून होडी खोळंबविली. तेव्हां त्या लोकांपैकीं दोन असामी पळत किनाऱ्यापासून दूर गेले, आणि सुमारें दीड घटकेच्या आंत वाळ-

लेल्या मांसाचे दोन तुकडे व कांहीं धान्य घेऊन परत आले. आतां जरी तें मांस कोणाचें होतें व तें धान्य कोणतें होतें हें आम्हांस ठाऊक नव्हतें, तथापि त्यांचा आम्हीं मोठ्या आनंदानें स्वीकार केला. परंतु ते पदार्थ त्यांजपासून घ्यावे कसे, ह्याविषयींच प्रथम मोठी पंचाईत पडली. कारण किनाऱ्यावर त्यांजवळ जाण्यास मला धीर होईना; आणि त्यांनाही आमचें भय होतें, म्हणून त्यांनाही आम्हांपाशीं येण्याचा धीर होईना. परंतु जीपासून दोहोंपक्षांसही भीति नाहीं अशी त्यांनीं एक युक्ति काढिली. ती अशी, त्यांनीं ते पदार्थ आणून किनाऱ्यावर ठेविले, आणि आपण लांब जाऊन उभे राहिले. नंतर आम्ही ते घेऊन होडींत गेलों. तेव्हां पुनः ते आम्हांजवळ येऊन उभे राहिले.

त्यांनीं दिलेल्या पदार्थांबद्दल त्यांस देण्यासारिखें आम्हांपाशीं कांहीं नसल्यामुळें, आम्ही तुमचे फार आभारी आहों, असें आम्हीं त्यांस खुणांनीं दर्शविलें. ह्याप्रमाणें आम्हांशीं स्नेहभावानें वागणाऱ्या त्या काळे लोकांस सोडून देऊन सुमारें ११ दिवसपर्यंत मीं होडी पुढें हाकारिली, व किनाऱ्याजवळ जाण्याचें कधींही मनांत आणिलें नाहीं. पुढें एके दिवशीं जूरी अकस्मात् ओरडून म्हणाला, धनीसाहेब, धनीसाहेब, तें एक शिडाचें जहाज येत आहे पहा! असें बोलून तो मूर्ख बेटा भीतीनें अगदीं वेडा झाला. कारण त्याला निभ्रांत वाटलें कीं, धन्यानें आम्हांस पकडण्याकरितां तें जहाज पाठविलें आहे. पण आम्ही आतां मूर लोकांच्या हद्दीपासून फार दूर आलों होतों असें मला माहीत होतें. त्याचें बोलणें ऐकून तत्काळ मी कोठडीच्या (केबिनीच्या) बाहेर आलों तों तें जहाज माझ्या दृष्टीस पडलें, व तें कोठचें होतें ह्याविषयीं मीं तत्काळ तर्क बांधिला. तें जहाज पोर्तुगीज लोकांचें असून गिनी प्रांताच्या किनाऱ्यास जाणारें होतें.

त्या जहाजावरच्या लोकांनीं दुर्बिनीच्या योगानें आम्हांस पाहिलें असावें, असें दिसतें. कारण चुकलेल्या एखाद्या युरोपियन जहाजाची ही होडी आहे असें त्यांस वाटून, आम्हांस जवळ येऊं देण्याकरितां त्यांनीं शिडें कमी करून आपलें जहाज मंदगतीनें चालविलें. हें पाहून मला धीर आला; आणि आम्ही संकटांत आहों हें त्यांस सुचविण्याकरितां माझ्या माजी धन्याचें निशाण होडींत होतें तें मीं उभा-

रिलें, व बंदुकीचा एक बार केला. तो बार ऐकून ते आपलें जहाज उभें करून आमची वाट पाहत राहिले. तेव्हां सुमारें सात आठ घटकांत आम्ही जहाजापाशीं जाऊन पोहोंचलों.

तुम्ही कोण आहांरे असें त्यांनीं मला पोर्तुगीज, स्पानिश, व फ्रेंच ह्या तीनही भाषांमध्यें विचारिलें. परंतु त्यांपैकीं मला कोणतीच भाषा समजत नव्हती म्हणून मीं कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. शेवटीं त्या जहाजावर एक स्काच खलाशी होता त्यानें मला आपल्या भाषेंत विचारिलें; तेव्हां मीं त्यास उत्तर दिलें कीं, मी जातीचा इंग्रेज आहें, व मूर लोकांच्या गुलामगिरींतून सुटून इकडे पळून आलों आहें. तेव्हां त्यांनीं मला जहाजावर येण्यास सांगून मोठ्या ममतेनें मला व त्या मुलाला वर घेतलें, व माझें सामानही वर चढविलें.

जीमधून निघण्याची मला यत्किंचित् ही आशा नव्हती, अशा अत्यंत दु:खप्रद अवस्थेंतून मी मुक्त झालों, हें पाहून मला अनिर्वाच्य आनंद झाला, आणि त्या गलबताच्या नाखव्यानें मजवर हा उपकार केल्या बद्दल तत्काल मजजवळ काय होतें नव्हतें तें सर्व मीं त्यास देऊं लागलों. परंतु तो गृहस्थ मोठ्या उदार बुद्धीनें मला म्हणाला, मी तुम्हांपासून कांहीं न घेतां ब्रेजिल एथें पोहोंचल्यावर तुमचें सर्व सामान तुम्हांस सुरक्षितपणें परत देईन. कारण स्वत: मीच अशा एकाद्या संकटांत असून मला कोणीं वांचविलें असतें तर जसा मला आनंद झाला असता तसाच तुम्हांला व्हावा, एवढ्याच हेतूनें मीं तुम्हांस वांचविलें. आणि कोणजाणे, अशा संकटांत पडणें माझ्याच कपाळीं येणार नाहीं असें कशावरून? दुसरें कारण असें आहे कीं, तुमच्या देशापासून फारच दूर अशा ब्राजिल देशांत मी तुम्हांस नेऊन सोडणार, आणि जर तुम्हांजवळ काय असेल नसेल तें मीं घेतलें तर तेथें तुम्ही उपाशीं मराल. तर तसें केल्यानें एकदां जो तुमचा जीव वांचविला तोच जीव पुन: घेतल्यासारिखें होईल. सबब तसें मी कदापि करणार नाहीं, इतकेंच नाहीं; तर मी तुम्हांस तेथपर्यंत फुकट नेईन. नंतर तेथें आपलें सामान विकून त्यावर त्याठिकाणीं तुम्ही रहाल तोंपर्यंत तुम्हांला आपली उपजीविका करितां येईल, व परत स्वदेशीं जाण्याच्या खर्चाचीही तजवीज करितां येईल.

ह्याप्रमाणें उदारपणाचें बोलणें बोलूनच तो राहिला नाहीं; तो जसें

बोलला तसें करण्यांत काडीमात्रही ढळला नाहीं. ह्याच्या सामानास कोणीं बोट सुद्धां लावूं नये, अशी त्यानें सर्व खलाशांस ताकीद दिली, आणि माझें सर्व सामान त्यानें आपल्या ताब्यांत घेतलें; व तें मला परत देतेसमयीं त्यानें मला इतका चोख हिशेब दिला कीं, माझ्या सामानाच्या यादींत मातीच्या तीन घागरी लागल्या होत्या, त्या सुद्धां माझ्या परत स्वाधीन केल्या.

माझी होडी फार मजबूद आहे असें पाहून नाखवा मला म्हणाला, आपल्या जहाजाच्या उपयोगाकरितां तुमची होडी विकत घ्यावी अशी माझी इच्छा आहे; तर तुम्ही तिची किम्मत काय घ्याल तें सांगा. मीं उत्तर केलें, तुमचें इतकें मोठें औदार्य पाहून माझ्यानें तुम्हांला तिची कांहींच किम्मत सांगवत नाहीं. मी तो विचार सर्वस्वीं तुम्हांवरच टाकितों. हें ऐकून तो म्हणाला, सध्यां मी तुम्हाला ब्रेजिल एथील पीसेस* आफ एट् नांवाच्या ९० नाण्यांची हुंडी देतों. नंतर तेथें पोहोंचल्यावर जर कोणी तुम्हांला होडीची किम्मत जास्त देऊं लागेल तर तितका पसा मी पुरा करून देईन. त्याच प्रकारचीं आणखी साठ नाणीं तो माझ्या जवळचा मुलगा जूरी ह्यास विकत घेण्याकरितां मला देऊं लागला. हीं घेणें मला प्रशस्त दिसलें नाहीं. आतां त्या मुलास नाखव्याचे स्वाधीन करण्याची माझी इच्छा नव्हती असें नाहीं; तर स्वतः मलाच गुलामगिरींतून सोडविण्याचे कामांत ज्यानें मला मोठ्या इमानानें मदत केली, त्यालाच आपण गुलामगिरींत टाकणें हें मला वाईट वाटलें. तथापि मुलगा विकत न देण्याचें हें कारण जेव्हां मीं नाखव्यास सांगितलें तेव्हां तें त्यास रास्त वाटून, ह्या मुलानें ख्रिस्ती धर्म स्वीकारिला तर १० वर्षांनीं त्यास गुलामगिरींतून मुक्त करण्याविषयीं मी त्यास करार लिहून देतों, असें त्यानें कबूल केलें. ह्याप्रमाणें तो बोलल्यावरून व तो मुलगाही, मी त्याजवळ राहण्यास खुशी आहें, असें म्हणाल्यावरून मीं तो मुलगा त्या नाखव्याच्या स्वाधीन केला.

आमचें जहाज ब्रेजिल प्रांताकडे जात असतां मध्यें कांहीं विघ्न

---

* स्पेन व अमेरिकेंतील युनै तेदस्तेतूस् ह्यांत चालणाऱ्या ह्या नाण्याची किंमत सुमारें ४ शिलिंग ४ पेन्स म्हणजे २ रु० २ आ० ८ पै आहे.

आल्या वांचून सुमारें २२ वे दिवशीं तें आल्सेंतस् बे ह्या बंदरांत जाऊन पोहोंचलें. त्या नाखव्यानें मजवर जे उपकार केले ते किती होते म्हणून सांगूं; ते पूर्णपणें ध्यानांत आणण्याला स्मरणशक्तिही थकेल. तेथें गेल्यावर तो मजपासून कांहीं गलबताचें भाडें घेईना; आणि जहाजांतील माझें झाडून सर्व सामान त्यानें माझ्या स्वाधीन केलें; व त्यापैकीं ज्या वस्तू विकण्याची माझी इच्छा होती त्या त्यानें विकतही घेतल्या. ह्याप्रमाणें मीं जितका माल विकला तितक्याचीं मला २२० पीसेस् आफ् एट् हीं नाणीं आलीं. तेव्हां तो सगळा पैसा घेऊन मी ब्राजिल देशाच्या किनाऱ्यावर उतरलों.

नाखव्यानें आपणासारिख्याच एका प्रामाणिक गृहस्थापाशीं मजविषयीं शिफारस करून मला त्याचे घरीं रहावयास जागा देवविली. ह्या गृहस्थाचे घरीं उंसाचा मळा व साखर तयार करण्याचा कारखाना होता. सबब मीं कांहीं दिवस त्याचे घरीं राहून ऊंस लावणें, साखर तयार करणें, वगैरे सर्व कामें यथास्थित शिकलों. तेथील उंसाची लागवड करणारे शेतकरी लोक फार लवकर संपत्तिवान् होतात, हें पाहून मीही परवाना मिळाल्यास तेथें राहून शेतकरी होण्याचा निश्चय केला; आणि लंडन शहरांत जो माझा पैसा राहिला होता तोही तेथें नेण्याची कांहीं तजवीज पहावी, असा माझा विचार ठरला. सबब तेथें राहण्याविषयीं परवाना मिळवून मी आपणाजवळच्या सर्व पैशाची आली तितकी जमीन विकत घेतली; आणि इंग्लंदांतून माझा जेवढा पैसा येण्याची मला आशा होती, तेवढ्या पैशावर आणखी किती जमीन घेऊन लागवडीस लावितां येईल त्याचा सर्व बेतबात मीं करून ठेविला.

माझा शेजारी लिस्बन एथील राहणारा एक वेल्स नांवाचा गृहस्थ होता. हा पोर्तुगाल देशांतला रहिवासी होता खरा, परंतु त्याचे आईबाप इंग्रेज होते. त्याची स्थितिही बहुतेक माझ्या सारिखीच होती. त्याला मीं आपला शेजारी म्हटलें ह्याचें कारण हें कीं त्याच्या शेतास माझें शेत अगदीं लागून होतें; आणि त्याचें माझें सख्य बरेंच जमलें होतें. मजसारिखें त्यापाशींही भांडवल थोडेंच होतें, त्यामुळें सुमारें दोन वर्षेपर्यंत ह्या शेतकीपासून आमचा फक्त उदर निर्वाह मात्र झाला, दुसरा कांहीं विशेष फायदा झाला नाहीं. तथापि आमचें भांडवल

थोडें थोडें वाढत चाललें, आणि जमीन ही सुधरत गेली; त्यामुळें तिसरे वर्षीं आम्हीं थोडीशी तमाखू लाविली, आणि चवथे वर्षीं ऊंस लावण्याच्या इरादानें प्रत्येकानें एक एक मोठी जमिनीची पट्टी तयार करून ठेविली. परंतु आम्हा दोघांसही मदत करावयास मुळींच कोणी नव्हतें. मीं जूरी ह्यास आपणापासून जाऊं दिलें हा फार मूर्खपणा केला, असें पूर्वीपेक्षां ह्या प्रसंगीं माझ्या विशेष अनुभवास आलें.

असो, पण झालें त्याला उपाय नाहीं, सबब आल्या प्रसंगास डोकें देऊन उद्योग करणें मला भाग होतें. मला जो उद्योग मनापासून आवडत होता, व ज्याकरितां मीं घर दार सोडिलें व पित्यानें केलेल्या सदुप देशास लाथ मारिली, त्याला माझा सांप्रतचा धंदा तर अगदीं विरुद्ध होता; म्हणून मी वारंवार आपणाशीं म्हणें कीं, मी स्वदेशापासून २००० कोसांपेक्षांही जास्त अंतरावर असून अरण्यांत व अनोळखोच्या लोकांमध्यें राहिलों आहें, व पृथ्वीवर कोठें ज्यांना ज्यांना माझी माहिती आहे, त्यांचें वर्तमान सुद्धां ज्या ठिकाणीं मला कळण्याचा संभव नाहीं, अशा स्थळीं राहून मी हा धंदा करीत बसलों आहें, त्यापेक्षां इंग्लंदांतच आपल्या इष्टमित्रांमध्यें राहून मला हा धंदा करितां आला नसता असें नाहीं. परंतु मीं वर सांगितलेंच आहे कीं झाल्या गोष्टीस उपाय नाहीं; म्हणून, “ आलिया भोगासी असावें सादर ” हें वाक्य मनांत आणून मी प्राप्त झालेल्या स्थितींत संतुष्ट राहीं.

माझा कृपाळू मित्र जो नाखवा तो परत जावयास निघाला त्या पूर्वींच कसकसें चालावयाचें तें मीं बहुतेक सिद्ध करून ठेविलें होतें; कारण त्याला आपले जहाजांत माल भरून परत जाण्याची तयारी करावयास सुमारें तीन महिने लागले. नंतर तो जाऊं लागला तेव्हां लंदन शहरांत माझें जें काय भांडवल राहिलें होतें तें मीं त्यास कळविलें. तेव्हां त्यानें मलाही पुढील माझ्या कल्याणाची मसलत सांगितली. तो म्हणाला, ज्यापाशीं तुमचा पैसा आहे त्या मनुष्यास तुम्ही मजजवळ असें पत्र द्या कीं, तुम्हीं आमच्या ऐवजाचा ह्या देशांत खपेल अशा तऱ्हेचा माल विकत घेऊन लिस्बन शहरामध्यें हें पत्र पोहोंचविणारे गृहस्थ सांगतील त्या मनुष्याकडे तो पाठवावा, आणि ह्याप्रमाणें त्यांनीं माल पाठविला म्हणजे परमेश्वर कृपेनें मी परत इकडे आलों तर त्याचें

उत्पन्न इकडे घेऊन येईन. परंतु मानवी प्राण्याच्या कोणत्याच स्थितीचा भरवसा नाहीं; सबब तुमचा एकंदर ऐवज २००० रुपये आहेत म्हणून तुम्हीं सांगितलें, त्याचे निमे म्हणजे १००० रुपयांचाच माल पाठविण्याविषयीं तुम्हीं पत्र लिहावें हें मला बरें दिसतें. कारण तेवढा ऐवज जर सुरक्षितपणें तुम्हांस येऊन पोहोंचला, तर बाकीचाही त्याच रीतीनें आणितां येईल; पण तोच जर गमावला, तर बाकीचे हजार रुपयांचा तरी तुम्हांला आधार राहील.

त्यानें सांगितलेली ही अत्यंत शहाणपणाची व हिताची मसलत ऐकून, ही निःसंदेह उत्तम मसलत आहे अशी माझी खात्री होऊन, ज्या बाईजवळ मीं आपला पैसा ठेविला होता तिला मीं त्या नाखव्यानें सांगि- ल्याप्रमाणें पत्रें लिहून तयार केलीं.

मीं निघाल्यापासून साहस कर्में कोणकोणतीं केलीं, मी गुलामगिरींत कसा सांपडलों, व तींतून सुटलों कसा, तशीच समुद्रामध्यें ह्या नाखव्याची माझी गांठ पडली कशी, व त्यानें मजवर किती दया केली, इत्यादि सर्व गोष्टींची व माझ्या सांप्रतच्या स्थितीची कच्ची हकीकत त्या मयत इंग्रेजी नाखव्याच्या बायकोस लिहून तिनें मला ह्या ठिकाणीं कोणकोणते जिन्नस पाठवावे ह्याविषयीं मीं खुलासेवार पत्र लिहून दिलें; आणि तो माझा मित्र लिस्बोन येथें पोहोंचल्यावर त्यानें तीं पत्रें कांहीं व्यापारी इंग्रज लोकांबरोबर लंदनांतील एका व्यापाऱ्याकडे पाठविलीं. तेव्हां माझें पत्र पाहतांच त्या बाईनें मीं लिहिल्याप्रमाणें पैसा त्या लंदनांतील व्यापाऱ्याच्या स्वाधीन केला, इतकेंच नाहीं, तर माझ्या त्या पोर्तुगीज मित्रानें मजवर फार उपकार केल्याबद्दल आपल्या पदरचें उत्तम प्रकारचें बक्षीस त्यास देण्याकरितां तिनें त्या व्यापाऱ्यापाशीं दिलें.

लंदनांतील व्यापाऱ्यानें त्या हजार रुपयांचें इंग्रेजी सामान घेऊन थेट माझ्या मित्राकडे लिस्बोनास रवाना केलें. तें त्यानें सुरक्षितपणें ब्राजिल येथें आणून माझ्या स्वाधीन केलें. त्या सामानामध्यें मीं सांगितलें नसतांही, (व मी नुकताच शेतकीच्या कामांत पडल्यामुळें शेतकीस कोणतें सामान लागतें हें माझ्या लक्ष्यांत येण्या सारिखें नव्हतें) त्यानें शेतकीच्या कामास जीं हत्यारें व दुसरें लोखंडी सामान आणि भांडीं मडकीं वगैरे लागावयाचें तें सर्व आणिलें होतें.

माझा माल घेऊन पोहोंचल्यावर मीं पाहिलें तों सर्व सामान इंग्रेजी तऱ्हेचें होतें; व त्यांत बारीक कापड, जाडें कापड, व तसेच दुसरे किरकोळ जिन्नस असे होते कीं, एथील लोकांस ते मोठे किमतीचे वाटून फार आवडणारे होते, त्यामुळें ते जिन्नस विकून त्यांवर मला पुष्कळ नफा झाला; म्हणजे माझ्या मालाला पूर्वीं जितका पैसा पडला होता त्याच्या चौपटीपेक्षां जास्त पैसा उत्पन्न झाला; त्यामुळें अर्थात माझी शेतकी माझ्या शेजाऱ्याच्या शेतकीपेक्षां फारच वाढली; कारण प्रथमतः मीं एक सिद्दीजातीचा गुलाम विकत घेतला, व माझ्या मित्रानें लिस्बन शहराहून मजकरितां एक चाकर आणिलाच होता, त्या खेरीज दुसरा एक युरोपियन माणूस मीं चाकरीस ठेविला.

ह्यावेळीं माझी संपत्ति वाढून कारखानाही पुष्कळ फैलावला होता; त्यामुळें माझ्या सामर्थ्या बाहेर असणारीं अशीं साहस कृत्यें करण्याचे विचार माझ्या डोक्यांत भरूं लागले. तीं कृत्यें म्हणजे अशीं होतीं कीं व्यवहारांत मोठे हुशार असे लोक सुद्धां ज्यांच्या योगानें अनेक प्रसंगीं धुळीस मिळतात.

आतां मी आपला ह्या वेळचा सविस्तर वृत्तांत सांगतों; तो येणेंप्रमाणें. ब्राजिलदेशामध्यें मी राहिल्यास हल्लीं सुमारें चार वर्षें होत आलीं होतीं; व शेतकीच्या कामांत मला बरीच बरकत येऊन माझें दास्तानही फुगत चाललें होतें; त्यामुळें मला त्या देशाची भाषा चांगली येऊं लागली, व तेथील शेतकरी लोकांशीं व आमचें मुख्य बंदर सेंट्साल्वादोर एथील व्यापारी लोकांशीं माझा फार चांगला परिचय झाला. त्या शेतकरी व व्यापारी लोकांशीं संभाषण करीत असतां अनेक प्रसंगीं मीं त्यांस गिनी प्रांताच्या किनाऱ्यावर स्वतः केलेल्या दोन जलपर्यटनांची हकीकत सांगितली होती, आणि त्या प्रांतांतील लोकांस मणी, खेळण्याचे पदार्थ, सुऱ्या, कुऱ्हाडी, वगैरे किरकोळ जिन्नस दिले असतां त्यांजपासून सुवर्ण मृत्तिका, गिनी प्रांतांतील धान्यें, हस्तिदंत इत्यादि पदार्थ मिळतात इतकेंच नाहीं, परंतु पाहिजेत तितक सिद्दीलोकही चाकर करून ब्राजिल देशास आणावयास सांपडतात, हेंही मीं त्यांस सांगितलें होतें.

एके दिवशीं ह्याच गोष्टीवर मोठ्या औत्सुक्यानें संभाषण चाललें असतां, माझ्या स्नेह्यांपैकीं तिघेजण मला म्हणाले, तुम्हीं अनेक वेळां सां-

गितलेल्या गोष्टींचा आम्हीं पूर्ण विचार केल्यावरून, गिनी प्रांतास जाण्याकरितां एक जहाज तयार करावें असें आमच्या मनांत फार आलें आहे. तुमच्याप्रमाणें आम्हा सर्वांचींही शेतें आहेत, पण चाकर नाहींत, ह्यामुळें आमची पराकाष्ठेची अडचण होते. आतां हें खरें आहे कीं, सिद्दी लोकांना गुलाम करून आणण्याचा व्यापार आम्हांस उघडपणें करितां येत नाहीं. सबब पक्त एक सफर करून कोणास न कळवितां त्यांस पकडून हिकडे आणावें, आणि आपणांमध्यें ते वांटून घ्यावे, अशी आमची मनीषा आहे. परंतु ह्या सर्व कृत्याची व्यवस्था लावण्याकरितां तुम्ही आम्हांबरोबर याल किंवा नाहीं एवढी मात्र शंका राहिली. जर येत असलां तर तुम्हांपासून भांडवलाचा हिस्सा मुळींच न घेतां गुलामांपैकीं वांटा सर्वांच्या बरोबरीनें तुम्हांस देण्यास आम्ही राजी आहों.

प्रथम मी आपल्या बापाच्या घरून निघालों त्या वेळेस पृथ्वीपर्यटन करण्याविषयीं माझ्या मनांत उत्पन्न झालेली उत्कंठा ज्याप्रमाणें मला आवरून धरवली नाहीं, त्याप्रमाणेंच ह्या वेळेस मजपासून भांडवलाचा हिस्सा न घेतां सर्वांच्या बरोबरीनें गुलामांचा वांटा देऊं केला, हें पाहून मला मोह पडून माझ्यानें त्यांचें बोलणें नाकबूल करवेना. तेव्हां मीं त्यांस सांगितलें कीं, मी जाऊन परत येईन तोंपर्यंत माझ्या शेतवाडीची यथास्थित व्यवस्था ठेवण्याविषयीं, व कदाचित् माझें परत येणें न झाल्यास मी सांगून ठेवीन त्याचे स्वाधीन ती शेतवाडी करण्याविषयीं तुम्ही पतकर घेत असाल, तर तुमचें म्हणणें मी मोठ्या खुशीनें कबूल करितों. हें माझें म्हणणें त्या सर्वांनीं तत्काळ मान्य केलें; आणि त्याबद्दल त्यांनीं मला एक करारनामाही लिहून दिला. त्याचेप्रमाणें मींही आपणास कदाचित् मृत्यु प्राप्त झाला असतां आपलें शेत व मालमत्ता ह्यांची योग्य व्यवस्था झाली पाहिजे, म्हणून कायद्याबरहुकूम एक व्यवस्थापत्रक करून ठेविलें. त्यांत मीं असें लिहिलें कीं, ज्या नाखव्यानें माझा जीव वांचविला म्हणून मीं पूर्वीं सांगितलें आहे, तो माझ्यामागें माझा वारस होय, सबब माझी सर्व मालमत्ता त्याचे स्वाधीन व्हावी; आणि त्यानेंही त्या मालमत्तेवर जो पैसा उत्पन्न होईल, त्यापैकीं निमे पैसा त्यानें आपण घ्यावा, व बाकीचा इंग्लंदास रवाना करावा, ह्याप्रमाणें तजवीज केली पाहिजे.

आमचें जहाज सुमारें २०० खंडींचें होतें, आणि त्यावर ६ तोफा असून चवदा असामी होते; त्यांखेरीज गलबताचा नाखवा, त्याचा कुज-न्या, व मी इतकीं मनुष्यें होतीं. मी सेप्टेंबर महिन्याचे पहिले तारखेस जहाजावर चढलों. आठ वर्षांपूर्वीं ह्याच महिन्याच्या ह्याच तारखेस मी हल्ल एथें आपल्या आईबापांस सोडून निघालों होतों, आणि त्याच दिवशीं आम्हीं गलबत एथून हाकारिलें; व ब्राजिल प्रांताच्याच किनाऱ्यानें उत्तर दिशेकडे चाललों. असें करण्यांत आमचा हेतु, सुमारें १० १२ उत्तर अक्षांशांवर आम्ही आलों म्हणजे मग आफ्रिकेच्या किनाऱ्याकडे वळावें, असा होता. आणि अशाच रीतीनें आफ्रिकेच्या किनाऱ्यास जाण्याचा त्या काळच्या लोकींचा संप्रदाय होता. आमचें जहाज सेंत आगस्तीनो ह्या भूशिरानजिक येई तोंपर्यंत आम्हांस हवा फार चांगली लागली. एक मात्र कीं तिजमध्यें उष्णता फार होती. ह्या भूशिरापुढें गेल्यावर आम्हीं समुद्रांत किनाऱ्यापासून दूर जहाज हांकारिलें, त्यामुळें जमीन अगदीं दिसेनाशी झाली. जहाजाचा रोंख उत्तर व ईशान्य ह्या दोन दिशांच्या मधल्या बाजूस ठेवून जसे कांहीं आम्ही फरनांद दि नोरोना ह्या बेटाकडेच चाललों आहों असें दाखविलें. अशा रीतीनें तें जहाज चालविलें. पुढें सुमारें १२ दिवसांत आम्ही विषुववृत्त ओलांडून उत्तर अक्षांशाच्या ७ अंश २२ कलांवर येऊन पोहोंचलों, असें नुकताच वेध घेतला होता त्यावरून कळलें. तेव्हां आमच्या ध्यानीं मनींही नसतां एकाएकीं मोठें भयंकर तुफान झालें. हें तुफान पहिल्यानें आग्नेयी दिशेस सुरू झालें, नंतर तेथून फिरत फिरत वायव्य दिशेकडून ईशान्येस येऊन तेथें त्यानें आपलें ठाणें दिलें; आणि मग तेथपासून त्याला इतका जोर आला कीं, सतत १२ दिवस पर्यंत आम्हांला जहाज मुळींच आटपेना. वाऱ्याच्या झपाट्याबरोबर तें जाईल तिकडे जाऊं देणें आम्हांला भाग पडलें; आणि, आज गलबत पाण्यांत गडप होतें, असें आम्हांस नित्य वाटत असे. शेवटीं वादळ थोडें मंदावलें तेव्हां जहाजाच्या नाखव्यानें वेध घेऊन पाहिलें तों, सुमारें ११ उत्तर अक्षांशांवर आमचें जहाज आहे, परंतु सेंत आगस्तीनो ह्या भूशिराचे पश्चिमेस २२ रेखांशांचे अंतरावर झुकलें आहे, असें त्यास दिसून आलें. त्यावरून आम्ही ब्राजिल प्रांताच्या उत्तरेस अमेझोन नदीच्या पलीकडे

मेक्सिको देशाच्या किनाऱ्यास येऊन पोहोंचलों आहों, व ओरिनोको नदीच्या ज्या भागास " दी ग्रेत रिवर " (महानदी) असें म्हणतात तो एथून जवळच आहे, असा त्यानें अजमास केला. तेव्हां तो म्हणाला; काय हो बाबा, आतां कोणीकडे चलावयाचें ? पुढं किंवा मागें ? कारण जहाज तर शतशः भोंकें पडून अगदीं निरुपयोगी झालें आहे, ह्यासाठीं थेट ब्राजिल प्रांतास परत न्यावें हें मला बरें दिसतें.

हें त्याचं म्हणणें मला मुळींच रुचलें नाहीं. माझें मत तर त्याच्या अगदीं विरुद्ध होतें. तेव्हां आम्हीं उभयतांनीं त्या किनाऱ्याचा नकाशा पाहिला तों, कारिब्बी बेटांच्यानजीक आमचें जहाज जाई तोंपर्यंत मध्यें उतरावयास वस्तीची जागा कोठेंच नाहीं, असें दिसून आलें; आणि आमची तर अन्नसामग्री संपण्याच्या बेतास येऊन गलबतही मोडकळीस आलें होतें; त्या अर्थी मध्यें कोठें तरी गलबताची डागडुजी करावयास सांपडून अन्नसामग्री मिळाल्या खेरीज आफ्रिकेच्या किनाऱ्यावर आमचें पोहोंचणें असंभाव्य दिसले; त्यावरून बार्बेदोज ह्या बेटाचा रस्ता धरावा असा आम्हीं निश्चय केला. कारण मेक्सिकोच्या अखातांत न शिरतां किनाऱ्यापासून दुरून जहाज हाकारिलें असतां सुमारें १५ दिवसांत आम्ही तेथें सहज पोहोंचूं, असें आम्हांस खचीत वाटलें.

ह्या प्रमाणें बेत करून आम्हीं आपल्या जहाजाचा रोंख बदलिला, आणि मध्यें इंग्लिश लोकांचीं कांहीं बेटें लागल्यास तेथें आमच्या अडचणी दूर होतील अशीआशा धरून वायव्य व पश्चिम ह्यांच्यामधून जहाज हांकारिलें. परंतु मनुष्यानें बेत करून उपयोग काय ! ईश्वरी संकेत कांहीं निराळाच असतो. आमच्या सर्व आशा एकीकडेच राहून ह्या जलपर्यटनाचा भलताच परिणाम झाला. तो असा, आम्ही उत्तर अक्षांशाच्या १२ अंश १० कलांवर आलों, तेव्हां तुफानानें आम्हांस पुनः गांठलें; आणि पूर्वीप्रमाणें त्याच्या योगानें जहाज पश्चिमेस इतकें भलतीकडे झुकलें कीं, ज्या ठिकाणीं लोकांचें जाणें येणें मुळींच नव्हतें व आम्ही कदाचित् तुफानांतून वांचलोंच तरीं ज्या ठिकाणीं रानटी लोक आम्हांला खाऊन टाकितील असें भय होतें, अशा ठिकाणीं गेलों.

ह्या प्रमाणें भयंकर तुफानाच्या झपाट्यांत सांपडून आम्ही मोठ्या संकटांत पडलों असतां एके दिवशीं पाहाटेस आम्हां पैकीं एक मनुष्य,

अमीन रे अमीन, म्हणून ओरडला. हे शब्द ऐकतांच ही जमीन कोणती आहे, व गलबत झुकलें तरी कोणीकडे, हें पाहण्या करितां आम्ही बाहेर आलों, इतक्यांत गलबत भाटींत रुतून बसलें; आणि लाटा इतक्या जोरानें आंत शिरूं लागल्या कीं, आम्ही सर्व आतां क्षणांत बुडून मरतों, असें वाटून लाटांचा फेस व तुषार ह्यां पासून बचाव व्हावा म्हणून आम्हा सर्वांना दडून रहावें लागलें.

ह्या प्रसंगीं भीतीनें आमची जी अवस्था झाली, तिचो, ज्यांना अशा प्रकारचें संकट कधींही प्राप्त झालें नसेल त्यांना कल्पना करितां येणें सुद्धां दुर्घट, मग तिचें वर्णन करणें तर दूरच आहे. असो, आम्ही आहों तरी कोठें, मुख्य जमिनीस येऊन लागलों आहों, किंवा एखाद्या बेटाजवळ आलों आहों, तसेंच त्या ठिकाणीं वस्ती आहे किंवा नाहीं, हें कांहींच आम्हांस समजेना. तुफानाचा जोर तर बहुतेक पहिल्या सारिखाच होता; त्यामुळें जहाज घटकाभर सुद्धां टिकाव धरीलसें वाटेना. सारांश, ह्या प्रमाणें अति दुर्घट प्रसंग प्राप्त झाल्यामुळें, आतां मृत्यु येईल क्षणांत मृत्यु येईल असें वाटून आम्ही सर्व एकमेकांच्या तोंडाकडे पहात बसलों; व इहलोकचा आपला सर्व संबंध तुटून आपणाला आतांच परलोकचा रस्ता धरावा लागेल, असें प्रत्येकास वाटून प्रत्येक जण परलोक यात्रेची तयारी करूं लागला. मग असल्या संकटांत एवढी एक गोष्ट बरी झाली कीं, जहाज अद्यापि फुटलें नव्हतें; तें इतका वेळ टिकेल अशी आम्हांस आशा नव्हती; आणि वाराही किंचित् कमी होऊं लागला आहे, असें जहाजाच्या नाखव्यानें सांगितलें.

वारा थोडासा कमी झाला खरा; परंतु जहाज वाळूवर जोरानें आपटल्यामुळें तीमध्यें तें इतकें बळकट रुतून बसलें होतें कीं, तें वाळूंतून काढण्याची आम्हांस मुळींच आशा उरली नाहीं. कोणत्या तरी युक्तीनें आतां आपले प्राण वांचवावे म्हणजे झालें, असा आम्हीं निश्चय केला. आमच्या जहाजाच्या मागल्या बाजूस (वरामास) एक होडी बांधिली होती, परंतु तुफानामध्यें ती सुकाणावर आपटून आपटून फुटली, आणि शेवटीं जहाजापासून दूर गेली, त्यामुळें तिजविषयींही आमची निराशा झाली. दुसरी एक होडी जहाजावर होती, परंतु ती पाण्यांत लोटावी कशी हाच मोठा विचार पडला. पण असले विचार करण्याचो

ही वेळ नव्हती. कारण प्रतिक्षणीं जहाज फुटून त्याचे तुकडे तुकडे होतील असें वाटे; आणि तितक्यामध्यें आम्हांपैकीं एकजण बोलला कीं, जहाज तर फुटून गेलेंच आहे. तेव्हां नाखव्याच्या हाताखालच्या अधिकाऱ्यानें तत्काळ होडी धरून सर्वांच्या साह्यानें पाण्यांत फेकिली; आणि आम्ही एकंदर अकरा असामी होतों ते तिजमध्यें उतरलों, आणि परमेश्वरावर भरंवसा ठेवून निरर्गल जलनिधी महाराज आमचें काय करितील तें करोत, असें म्हणून आम्हीं होडी हांकारिली. ह्यावेळीं तुफान बरेंच कमी झालें होतें खरें, परंतु किनाऱ्यावर लाटा अद्यापि उंच उंच उसळत होत्याच. तेव्हां असल्या लाटांत होडी टिकणार नाहीं, व आपण आतां निःसंशय बुडून जाणार, हें सर्वांस पक्कें कळून आलें. होडीस अवजारें चढवावीं म्हटलें तर तींही आम्हांजवळ नव्हतीं, आणि कदाचित् असतीं तरी त्यावेळेस तीं चढवितांही येतींना. सबब नुसतीं वल्हींच मारीत आम्हीं होडी किनाऱ्याकडे चालविली. कोणा एखाद्यास फांशी द्यावयास नेत असतां जसें त्याचें अंतःकरण निराश व उदास झालेलें असतें, त्याप्रमाणें आम्हा सर्वांचीं अंतःकरणें झालीं होतीं. कारण, होडी किनाऱ्यापाशीं गेली तरी ती त्यावर आपटून तिचे लक्षावधि तुकडे होणार, हें आम्हांस पक्कें ठाऊक होतें.

ह्याप्रमाणें लोटीत लोटीत होडी आम्हीं सुमारें दोन कोस नेली, इतक्यांत पर्वतासारिखी एक लाट होडीच्या मागल्या बाजूनें येऊन तिजवर इतक्या वेगानें आपटली कीं, त्या योगानें होडी तत्काळ उलथून दूर गेली. आणि आम्हीही सर्व एकमेकांपासून दूर दूर फेकले जाऊन, हे ईश्वरा, इतकें म्हणण्यापुरताही अवकाश न सांपडतां एका क्षणांत सर्व बुडून गेलों.

पाण्यांत बुडालों त्या वेळेस माझ्या जिवाची जी त्रेधा झाली ती माझी मीच जाणें; ती सांगतां म्हणून यावयाची नाहीं. मला पोंहावयास चांगलें येत होतें खरें, परंतु उपयोग काय? ह्या वेळेस मजमध्यें अवसान न राहिल्यामुळें मला दमच छाटेना. शेवटीं एक लाट येऊन तिनें झपाट्यासरसें मला दूर किनाऱ्यावर नेऊन टाकिलें; आणि ती परत गेल्यावर पाहातों तों मी जमिनीवर आहें, असें दिसलें. परंतु बुडालों त्यावेळेस पाणी पोटांत फार गेलें होतें, त्यामुळें अगदीं मी मृतप्राय झा-

लें होतों. तथापि आतां श्वास टाकण्याला थोडा वेळ सांपडल्यामुळें हुशारी आली, व अवसानही आलें; म्हणून मला वाटत होतें त्यापेक्षां फारच नजीक जमीन आली आहे असें लक्ष्यांत आलें. इतक्यांत पुनः दुसरी एक लाट येऊन मला घेऊन जाईल, सबब ती येण्यापूर्वीं जमिनीवर जावें ह्या हेतूनें मी ताडदिशीं उभा राहिलों, आणि जमिनीकडे पळत सुटलों. परंतु उपयोग काय? मी पळत आहें इतक्यांत टेंकडीप्रमाणें उंच एक लाट मागून मोठ्या वेगानें येत आहे असें दृष्टीस पडलें. त्या वेळेस कोणी महाबळवान् शत्रु आंगावर चवताळून आला असतां दुर्बलाची जशी गाळण होऊन जाते तशी माझी गाळण झाली. त्या लाटेपासून आपला बचाव करणें तर असंभाव्यच होतें, तथापि पाण्यांत बुडालों असतां दम कोंडेल तो न कोंडावा म्हणून लाटेवर उडी मारून तरंगत रहावें, आणि तसेंच पोहोत तिज बरोबर किनाऱ्याकडे चलावें, एवढें मला माझ्यानें होईलसें दिसलें. परंतु लाट येतांना जशी मला किनाऱ्याकडे लांब पर्यंत नेईल, तशी परत जातांना ही मला लांबपर्यंत ओढीत घेऊन जाईल, असें भय होतें; सबब तें तसें घडूं न देणें हें मला अत्यंत आवश्यक होतें.

ही जी मागून लाट आली तिच्या योगानें माझ्या डोक्यावर एक दम १५।२० हात पाणी चढलें; आणि तिनें आपल्या झपाट्याबरोबर एका क्षणांत किनाऱ्याकडे मला खूप लांब नेलें; तथापि दम कोंडून धरून होती नव्हती तितकी शक्ति खर्चून मी पुढेंच पोहोत चाललों. मी फार वेळ पर्यंत एक सारिखा दम कोंडून धरिल्यामुळें छाती फुटून जाण्याचा रंग आला होता. इतक्यांत मी पाण्याच्या आंत बुडालों होतों तो वर येत आहें असें मला वाटलें, आणि खरोखर माझें डोकें व हात पाण्यावर निघालेले मीं पाहिले. आतां जरी ह्या स्थितींत माझ्यानें चार पांच अंकांपेक्षां जास्त राहवलें नाहीं, तरी श्वास मोकळेपणें टाकितां आल्यामुळें जीवाला पुष्कळ आराम वाटून आंगांत नवी उमेद आली. नंतर पुनः मी लाटेमध्यें बराच वेळ गडप होऊन राहिलों; परंतु ह्या पाळीला अगदीं दम धरवत नाहींसें होईपर्यंत पाण्यांत रहावें लागलें नाहीं; आणि पुनः पाणी उतरत जाऊन लाट परत चालली आ-

हें कृत्य करतांच मी उसळी मारल्यामुळें गेलों, तों माझें मस्तक जमिनीवर टेंकलें; आणि मजजवळून पाणी अगदीं निघून जाईपर्यंत त्यांत शिरून येण्याकरितां स्वस्थ उभा राहिलों. नंतर होईल तितक्या सामर्थ्यानें पुढें मी किनाऱ्याकडे धूम मारिली, परंतु यावेळेलाही मी त्यापासून बचावलों नाहीं असें नव्हतें. कारण पूर्वीप्रमाणें आणखी दोनतीन वेळां मला लाटांनीं वर उचलून लांब नेऊन टाकिलें.

मागून आलेल्या ह्या लाटा किनाऱ्याजवळच्या असल्यामुळें पूर्वीच्या लाटांप्रमाणें उंच नव्हत्या; म्हणून त्यांच्या तडाक्यांत जीव वांचला, परंतु मला दम धरितां आला. नंतर पुनः एक धूम मारिली; आणि इतका किनाऱ्याच्या जवळ आलों कीं, ह्यापुढें जी लाट आली ती जरी माझ्या डोक्यावरून गेली तरी मला ओढून नेण्याइतका तिच्यांत जोर नव्हता. ती ओसरल्यावर मी आणखी एकदां धांव काढिली, आणि किनाऱ्यावर जाऊन पोहोंचलों; आणि तेथच्या खडकावर चढल्यामुळें अत्यंत हर्षित होत्साता तेथेंच गवतावर बसलों.

अशा महत्संकटांतून परमेश्वरानें मला वांचवून सुरक्षितपणें किनाऱ्यावर आणिल्याबद्दल शक्त्यनुसार मीं त्याची स्तुति केली. नंतर उठून इकडे तिकडे फिरूं लागलों. तेव्हां मी ह्या अनर्थांतून सुटलों तरी कसा, ह्या गोष्टीचा मला मोठा विस्मय झाला; कारण विचारामध्यें व जे माझे सोबती बुडाले त्यांपैकीं आजपर्यंत कधीं कोणी असेल हें विश्वासांत माझें अंतःकरण अगदीं निमग्न होऊन गेलें, तेव्हां व तोंडानें जे कांहीं अंगविक्षेप मीं केले त्यांचें वर्णन करवत नाहीं. होडी उलथली त्या क्षणापासून तें कोणाचें मुळींच माझ्या दृष्टीस पडलें नाहींत; त्यांपैकीं त्यांच्या टोप्या, टोपी व दोन जोडे, एवढेंमात्र मला सांपडले. मी ज्या स्थलीं बसलेला आहें त्या जहाजाकडे पाहूं लागलों तों लाटांच्या जोरानें समुद्रांत कोस भर उंच उडत होतें व जहाजही बरेंच दूर होतें, त्यामुळें तें दृष्टीस पडलें नाहीं, परंतु तथापि व तो समुद्राची भयंकर खळबळ ही पाहून, मी त्यांतून जिवंत निसटलों तरी कसा, याचा वारंवार मला मोठा अचंबा वाटे.

नंतर हें स्थळ कोणत्या प्रकारचें आहे, व एथें आपण आतां कोणता उद्योग करावा, ह्या गोष्टीचा मी चोहींकडे पाहून विचार करूं लागलों;

तेव्हां त्यावरून माझ्या लक्षांत आलें कीं, एका अनर्थांतून मी सुटलों खरा, परंतु पुनः दुसऱ्या अनर्थांत पडलों आहें. कारण माझे अंग अगदीं ओलेंचिंब होतें तें पुसावयास किंवा ओलें सोडून नेसावयास दुसरें वस्त्र नाहीं; आणि खाण्यापिण्यासही कांहीं नाहीं; असें झाल्यामुळें भुकेनें मरणें किंवा हिंस्र पशूंच्या तावडींत सांपडणें अशा प्रकारच्या प्रकारा आपला परिणाम होणार, असें मला दिसून आलें. कांहीं खाण्याकरितां एखादें जनावर मारावें म्हटलें तर जवळ शस्त्र मुळींच नाहीं. आणि तें नसल्यामुळें खाण्याची गोष्ट एकीकडे राहिली, पण एखादें घातक जनावर उलटें मलाच खावयास आलें असतां, त्यापासून आपलें रक्षण करण्याचें सुद्धां मजजवळ साधन नाहींसें झालें. त्यावेळीं मजजवळ एक गुरगुडी, एक सुरी, व लहानशा एका डबींत थोडी तमाखू, इतकें मात्र होतें. दुसरें कांहीं नव्हतें; त्यामुळें चित्त इतकें भ्रांत झालें कीं मी वेड्यासारिखा इकडे तिकडे भटकूं लागलों. रात्र पडण्याचा समय आला, तेव्हां एथें क्रूर श्वापदें असल्यास ती भक्ष्यशोधार्थ रात्रीं बाहेर येतील, मग आपली अवस्था काय होईल, ही गोष्ट मनांत येऊन मला अत्यंत दुःख झालें.

शेवटीं तेथें जवळच देवदारासारिखें एक दाट व झुपकेदार झाड उगवलेलें होतें त्यावर चढून रात्रभर तेथें बसावें, असा मीं निश्चय केला. नंतर किंचित् गोडें पाणी प्यावयास मिळेल तर पहावें म्हणून किनाऱ्यापासून सुमारें दोन अडीचशें पावलें दूर गेलों तों पाणी आढळलें तेणेंकरून फार आनंद झाला; आणि तें थोडेंसें प्याल्यावर क्षुधा निवारणार्थ थोडी तमाखू तोंडांत टाकून त्या झाडाजवळ परत आलों. नंतर वर चढलों, आणि झोंप लागली असतां जेथून पडावयाचें भय नव्हतें अशी एक जागा शोधून तेथें बसलों, व सोट्या सारिखी एक फांदी कापून ती हातांत घेतली. मी अगदीं दमून गेलों होतों त्यामुळें तेथें बसलों न बसलों तोंच मला गाढ झोंप लागली.

जागा झाल्यावर मीं पाहिलें तों दिवस पुष्कळ वर आला होता, हवा निर्मळ झाली होती, व तुफान बंद झाल्यामुळें समुद्रही अगदीं स्थिर झाला होता. त्यांत विशेषेंकरून एक गोष्ट पाहून मला परम विस्मय झाला. ती ही कीं, आमचें जहाज ज्या ठिणाणीं वाळूंत रुतून

बसलें होतें, तेथून रात्रीं भरतीच्या जोरानें निघून, मी होतों त्या जाग्या पासून सुमारें अर्ध कोसाचे अंतरावर येऊन लागलें होतें; आणि त्याचा बराच भाग अद्यापि पाण्यावर दिसत होता. हें पाहून मला वाटलें कीं आपणास त्यावर जातां येईल तर बरें होईल; कारण मला अवश्य असे कांहीं जिन्नस त्यांत सांपडल्यास आणितां तरी येतील.

ह्यानंतर आमची होडी माझ्या दृष्टीस पडली. ती वाऱ्याच्या जोरानें व भरतीच्या वेगानें माझ्या उजव्या बाजूस सुमारें एक कोसावर जाऊन किनाऱ्यास लागली होती. तिजजवळ जावें म्हणून होईल तितक्या जलदीनें मी किनाऱ्या वरून धांवत चाललों; परंतु पुढें पाहातों तों माझ्या व होडीच्या मध्यें सुमारें १००० पावलें रुंदीचा एक समुद्राचा फांटा दृष्टीस पडला. सबब ह्या वेळेस तो नाद सोडून मला परतावें लागलें; कारण सध्यां आपल्या उपजीविकेस अवश्य असे जिन्नस जहाजांत कदाचित् सांपडतील म्हणून तिकडे पहिल्यानें जाण्याचा यत्न करावा, असें माझ्या मनांत आलें.

पुढें दोन प्रहर उलटून गेल्यानंतर कांहीं वेळानें समुद्र अगदीं स्थिर झाला, व ओहोटीमुळें पाणी इतकें उतरून गेलें कीं गलबताच्या अलीकडे सुमारें दोनशें पावलें मात्र पाणी राहिलें, तेव्हां मीं पाण्यापर्यंत येऊन पाहिलें तों स्पष्टपणें लक्ष्यांत आलें कीं आम्ही जर तसेच गलबतावर बसून राहतों तर सारेच सुरक्षितपणें किनाऱ्यावर आलों असतों, आणि हल्लींप्रमाणें मला एथें कोणी सोबती नाहीं व कोणत्याच प्रकारचें सुख नाहीं, अशी माझी अवस्था झाली नसती. ही गोष्ट मनांत येऊन फार दुःख झालें, आणि नेत्रांतून अश्रुधारा चालल्या; परंतु आतां असाच शोक करीत बसलों तर आपल्या दुःखाचा परिहार होतो असें नाहीं, अशी मनाची समजूत करून मीं शोक आवरला; आणि गलबतावर आपणास जातां येईल तर पहावें अशा विचारानें कपडे काढून ठेवून मी पाण्यांत शिरलों. गलबतापर्यंत पोहोंचल्यावर पाहिलें तों वरती चढण्याची कांहीं युक्ति दिसेना. तेव्हां पोहत त्याच्या भोंवतीं फिरलों, तों पुढच्या बाजूस सांखळदंडाला अडकविलेला एक दोरखंड लोंबतांना दृष्टीस पडला. तो थोडासा उंच होता तरी मोठ्या कष्टानें धरून त्याच्या योगानें मी वर चढलों. पुढें पाहिलें तों गलबताच्या कोठींत पुष्क-

क पाणी शिरलें होतें, परंतु तें वाकूंत अशा रितीनें रुपून बसलें होतें कीं, त्याचा वरचा बहुतेक भाग अगदीं कोरडा राहून आंतील सामानास प- ण्याचा स्पर्श सुद्धां झाला नव्हता. हें पाहून मला मोठा आनंद झाला, आणि फार भूक लागली होती म्हणून पहिल्यानें पावांच्या कोठडींत शिरलों, व सावकाशपणें खात बसावयास वेळ नव्हता सबब खिशाम- ध्यें पाव भरून घेऊन खातखात दुसरे जिन्नस पहाण्याकरितां फिरूं ला- गलों. थोरल्या कोठडींत गेलों तों तेथें गौडी दृष्टीस पडली, तेव्हां पुढें मेहनत करावयास शक्ति आली पाहिजे म्हणून तीही एक पेलाभर प्या- लों. मला फार उपयोगी अशा वस्तू जहाजामध्यें पुष्कळ दृष्टीस पड- ल्या; परंतु त्या किनाऱ्यावर नेण्यास एक होडी मात्र पाहिजे होती. प- ण होडी पाहिजे होडी पाहिजे म्हणून तिचें चिंतन करीत स्वस्थ बसलों तर काय उपयोग ? सबब तिच्या ऐवजीं तसलेंच दुसरें कांहीं तयार क- रण्याच्या उद्योगास मी लागलों. जहाजांत पुष्कळ काठ्या, वांसे, व डोलकाठ्यांचे एक दोन तुकडे शिलक होते, त्यांचेंच कांहीं करितां येईल तर पहावें म्हणून, आपणास जितके लागतीलसें वाटलें तितके वांसे मीं पाण्यांत फेंकून दिले; व ते वाहून न जावे म्हणून दोरास बांधून टाकिले. नंतर मी गलबताच्या एका बाजूवरून खालीं उतरलों, आणि ते वांसे आपणाकडे ओढून घेऊन त्यांतले चार वांसे बळकट बांधून त्यांची एक ताफ्या सारिखी चौकट तयार केली; आणि तीवर ते फळ्यांचे तुकडे टा- कून पाहिलें तों त्यांवर चांगलें चालतां येईल असें दिसलें परंतु तीं लांकडें फार हलकीं असल्यामुळें त्या ताफ्यावर फारसें ओझें राहीलसें वाटेना. तेव्हां गलबतावरील सुताराची करवत तेथें सांपडली ती घेऊन तिनें मी डोलकाठीचा तुकडा मीं उभा कापून त्याचे तीन वांसे केले, आणि ते ताफ्यास बांधिले, त्यामुळें बरेंच ओझें नेण्याजोगा तो बळकट झाला. याप्रमाणें ताफा तयार झाला खरा, परंतु त्यावर मी जें सामान ठेवीन तें लाटांच्या तुषारांनीं भिजून जाणार, ही एक अडचण मनांत उभी राहिली. तेव्हां तिच्या निवारणार्थ जहाजांत जितक्या फळ्या सांपड- ल्या तितक्या सर्व मीं ताफ्यावर घातल्या. तशाच दोघां तिघां खलाश्यांच्या पेट्या उघडून रिकाम्या केल्या, आणि त्याही ता- फ्यावर आणून ठेविल्या. ह्यांपैकीं पहिल्या पेटींत पाव, तांदूळ, हालंडी

चका (खवा,) बोकडाच्या वाळल्या मांसाचे तुकडे, आणि आम्हीं बरोबर आणिलेल्या पक्ष्यांकरितां जें धान्य सांठवून ठेविलें होतें त्यांतून बाकीं राहिलेलें थोडें धान्य, इतकी अन्नसामग्री मीं भरिली. नंतर नाखव्यानें आपणा करितां आणिलेल्या बाटल्यांच्या पेट्या दृष्टीस पडल्या; त्यांमध्यें कांहीं एका प्रकारचें पुष्टिकारक औषधी पाणी सुमारें ५।६ ग्यालन होतें, सबब त्याही मीं तराफ्यावर आणिल्या. ह्या उद्योगांत मी गुंतलों असतां हळू हळू भरती येऊं लागली आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें. आणि पाण्यांत शिरतेसमयीं किनाऱ्यावर ज्या ठिकाणीं मीं आपले दोन आंगरखे आणि वास्कूट हीं काढून ठेविलीं होतीं तेथपर्यंत पाणी जाऊन तीं वाहून जाऊं लागलीं, हें पाहून मला किंचित् वाईट वाटलें. तेव्हां मी गलबतावरील पुष्कळ कपडे धुंडाळून काढिले, परंतु सध्यां आपल्या गरजेपुरतेच बरोबर घेतले; कारण दुसऱ्या पुष्कळ वस्तू घ्यावयाच्या होत्या. त्यांत मी किनाऱ्यावर राहणार त्या ठिकाणीं काम करण्याकरतां हत्यारें अवश्य पाहिजे होतीं, सबब पहिल्यानें तीं शोधूं लागलों, तों सुताराची हत्यारांची पेटी सांपडली, त्यामुळें मला फार आनंद झाला. कारण तीं हत्यारें ह्या प्रसंगीं जितकीं माझ्या उपयोगीं पडतील तितकें गलबत भरून सोनें सुद्धां उपयोगीं पडणार नाहीं असें मला वाटलें.

असो, ह्यानंतर कांहीं दारूगोळा व बंदुका शोधण्याच्या उद्योगास मी लागलों. तेव्हां थोरल्या कोठडींत दोन छानदार शिकारीच्या बंदुका व दोन पिस्तुलें सांपडलीं, तीं व कांहीं दारूचे शिंगडे आणि छऱ्यांचें एक लहानसें तोस्तान, इतकें सामान घेतलें; व दोन जंगलेल्या जुन्या तरवारी दृष्टीस पडल्या त्याही घेतल्या. ज्याअर्थी तेथें दारूचीं तीन पिंपें होतीं असें मला ठाऊक होतें, म्हणून त्यांचा तपास करूं लागलों, तों [illegible] तीं सांपडलीं. त्यांपैकीं दोन अगदीं कोरडीं होतीं, परंतु तिसरें भिजून गेलें होतें. सबब तीं कोरडीं दोन पिंपें व हत्यारें वगैरे सामानही तराफ्यावर आणून ठेविलें. इतकें ओझें घातल्यावर तराफ्याची भरती झाली असें मला वाटलें; परंतु तराफ्याला शीड, वल्हें, किंवा सुकाणूं, वगैरे कांहीं नसल्यामुळें [illegible] न्यावें कसें हा एक मोठाच विचार पडला; कारण [illegible]

पण जे मला तें कुशल करून कीं आपल्याला सर्व कुशल [illegible]
करून माझा सर्व [illegible] स्वाधीन होणार.

असल्या अवस्थेंत परमेश्वरकृपेनें असें बरें झालें कीं, समुद्र अगदीं स्थिर होता, भरतीचा जोर किनाऱ्याकडे होता, व जो थोडा थोडका वारा होता तो किनाऱ्याकडे वाहत होता. ह्या तीन गोष्टी [illegible] अनुकूल आहेत असें पाहिलें तेव्हां दोन तीन मोडक्या तोडक्या वल्ह्यांच्या [illegible] सुरक्षितपणें नेला, परंतु त्यांत इतकें मात्र झालें कीं, पूर्वी मी किनाऱ्यावर जेथें लागलों होतों त्या ठिकाणापासून तो कांहींसा दूर वाहत गेला. त्यावरून मला असा अजमास झाला कीं, त्या ठिकाणीं एखादी खाडी किंवा असल्यामुळें पाण्याचा ओघ तिकडे आहे; आणि कांहीं असलीच तर आपणास किनाऱ्यावर माल उतरण्याकरितां बरी उपयोगाची पडेल अशी माझी आशा उत्पन्न झाली. तो माझा अजमास खरा झाला. नंतर पुढें लागलीच एक लहानशी खाडी लागली, व तिजमध्यें भरतीचें पाणी फार जोरानें शिरत आहे असें दृष्टीस पडलें. तेव्हां मी आपला तराफा जितका त्या खाडीकडील ओघाच्या मध्यावर राखतां आला तितका राखिला. परंतु येथें मला आणखी एकदां समुद्रांत फिरून बुडून जाण्याचा प्रसंग आला होता. तो असा, मला किनाऱ्याकडील मुळींच माहिती नसल्यामुळें तराफ्याचें एक अंग उथळ जागेंत शिरून जमिनीवर टेकलें, आणि वरचें सारें ओझें दुसऱ्या अंगास झुकून पाण्यांत पडण्याचीच संधी आली होती; इतक्यांत, मी मोठी खटपट करून ओझें जागच्या जागीं सावरिलें. परंतु होतें तितकें बळ खर्चिलें तरी मला तराफा कांहीं केल्या उथळ पाण्यांतून पुढें ढकलितां येईना. तेव्हां मी माझा यत्न [illegible]; इतक्यांत भरतीचें पाणी चढलें, त्यामुळें तराफा आपोआप तरंगूं लागला; तेव्हां मी त्याला [illegible] वल्ह्यानें खाडीच्या मध्याकडे ढकलून पुढें चालविलें. नंतर पाण्याच्या ओघानें पुढें चालतां जातां एका लहानशा नदीच्या मुखांत तो तराफा शिरला. ह्या ठिकाणीं दोन्ही बाजूस चांगला किनारा असून मधून भरतीचा ओघ मोठ्या जोरानें चालला होता. नंतर तो तराफा नदीमध्यें [illegible] जतां नदीच्या [illegible] हेतु होता; कारण, [illegible]

रामणीक असल्यामें कधीं एखादें गलबत आलें गेलें तर दृष्टीस तरी प-डेल, ही मला आशा होती. म्हणून तेथेंच कोठें तराफा जमिनीवर उतर-ण्यास सोईवार जागा मी शोधूं लागलों.

शेवटीं त्या नदीचा उजवेकडील कांठ एका ठिकाणीं बराच आंत गेले-ला दृष्टीस पडला; तेव्हां तेथें मोठ्या कष्टानें मीं आपला तराफा नेला, तो ज-मिनीच्या इतका नजीक गेला कीं, माझें वल्हें सुद्धां तळास लागलें. नं-तर वल्हें टेंकून ज्या ठिकाणीं पाणी फार थोडें होतें अशा सपाट जाग्या-वर मीं तराफा रेटून नेला, आणि तेथें दोहीं बाजूंस दोन वल्हीं रोंवून तो अडकवून ठेविला. पुढें कांहीं वेळानें ओहोट लागल्यामुळें तेथील पाणी नाहींसें होऊन तराफा आपोआप मोकळ्या जमिनीवर टेंकला; तेव्हां अ-र्थात माझें सामान पाण्याच्या संबंधानें अगदीं निर्भय झालें.

ह्या प्रमाणें तो तराफा सुरक्षितपणें किनाऱ्यावर आणून ठेविल्या नंतर आपणास रहावयाकरितां व हें सर्व सामान ठेवण्याकरितां मी सोईवार जागा पाहूं लागलों. परंतु हें का लहानसें बेट आहे किंवा एकादें मोठें खंडच आहे हें लक्ष्यांत येईना; तसेंच एथें वस्ती आहे किंवा हें ओसाड असून हिंस्र प्राण्यांनीं भरलें आहे, हेंही समजेना. सबब प्रथमतः ह्याच गोष्टींचा तपास करण्याचें मीं मनांत आणिलें. मी उभा होतों त्या ठि-काणापासून सुमारें अर्ध कोसावर एक उंच व नीटच उभी अशी टेंकडी दिसत होती आणि तिच्या उत्तरेस तशीच टेंकड्यांची एक रांग असून त्या सर्वांपेक्षां हिचें शिखर उंच गेलेलें दिसत होतें. हें पाहून मी शिका-रीची एक बंदूक, दोन पिस्तुलें, आणि एक दारूचा शिंगडा, इतकें सा-मान बरोबर घेऊन वरील गोष्टींचा शोध करण्याकरितां त्या टेंकडीकडे चाललों; आणि वर चढून पाहिलें तों हें बेट असून त्यापासून बऱ्याच अंतरावर समुद्रांत लहान लहान खडक आहेत, व पश्चिमेस एथून सुमारें ४।५ कोसांवर ह्यापेक्षां लहान अशीं दोन बेटें आहेत, आणि त्याखेरीज जमीन कोठेंच दिसत नाहीं असें पाहिलें. तेव्हां आपण ओसाड व नि-राश्रित अशा स्थळीं येऊन पडलों आहों, हें मनांत येऊन मला अत्यंत दुःख झालें.

ह्या बेटांतील जमीन ओसाड व नापीक दिसली; आणि वस्ती असल्यास कदाचित रानटी जनावरांची मात्र असावी असें अनुमान झालें.

तीं जनावरें तशी प्रत्यक्ष दृष्टीस पडलीं होतीं असें नाहींच. एवें मीं प-क्षी मात्र पुष्कळ प्रकारचे पाहिले, परंतु त्यांपैकीं खाण्या जोगे कोणते आहेत व कोणते नाहींत हें कांहींच समजेना. तरी टेंकडीकडून माघारा येते समयीं झाडावर बसलेला एक पक्षी दृष्टीस पडला, तो मीं गोळी घा-लून मारिला. जगाच्या उत्पत्तीपासून ह्या बेटावर बंदूक उडालेली अशी काय ती पहिल्यानें होय असावी, असें मला वाटतें. कारण बंदुकीचा आवाज होतांच त्या जंगलांतून नानाप्रकारचे असंख्य पक्षी आपापल्या निरनिराळ्या रीतीप्रमाणें शब्द करीत एकदम उडाले. परंतु तितक्या सर्व पक्ष्यांमध्यें एकही माझ्या ओळखीचा दिसेना. मीं मारिलेला प-क्षी ससाणा असावा, असें मला वाटलें; कारण त्याचा रंग व चोंच हीं ससाण्यासारिखीं दिसलीं; परंतु त्याचीं नखें ससाण्याच्या नखांसारिखीं मोठ मोठालीं नव्हतीं, आणि त्याचें मांसही निरुपयोगीच होतें.

असो, पण माझी सध्यां पुरती तृप्ति होऊन मी परत तापया जवळ आलों, आणि त्यावरील सामान किनाऱ्यावर आणून ठेवण्याच्या उद्यो-गास लागलों. त्या कामामध्यें माझा बाकीचा सारा दिवस गेला. नं-तर रात्र पडली तेव्हां निजावयास निर्भय स्थल पाहिजे, म्हणून बरोबर आणिलेल्या पेट्या व फळ्या आपणाभोंवतीं बंदोबस्तानें रचून एक ल-हानशी झोंपडीच तयार केली. परंतु खाण्यापिण्याची कोणतीही तज-वीज सुचेना फक्त ज्या ठिकाणीं मीं तो मोठा पक्षी मारिला तेथें ससा सारिखीं दोन तीन जनावरें मात्र जंगलांतून निघतांना दृष्टीस पडलीं हो-तीं. त्यांखेरीज दुसरा खाण्यासारिखा प्राणी पाहण्यांत आलाच नाहीं.

गलबतांत आणखीही आपणास उपयोगी असे पुष्कळ जिन्नस सां-पडतील ते आणावे, असें मनांत येऊन तिकडे पुनः जाण्याचा मीं निश्च-य केला. परंतु ह्या गोष्टीस विलंब करितां कामानये, कारण एखादें तु-फान झालें तर पहिल्याच सपाट्यास तें गलबत फुटून त्याचे तुकडे तुकडे होतील, आणि मग कोणताच जिन्नस हातीं लागावयाचा नाहीं; सबब गलबतावरील जितकें सामान आणवेल तितकें आणावें, आणि तोंपर्यंत दुसऱ्या कोणत्याच कामाला हात लावावयाचा नाहीं, असा मीं निश्चय केला.

वरील संकेता प्रमाणें मीं पुनः गलबतावर जाऊन दुसरा एक तापा

त्यांनी [illegible]. [illegible] झाला होता, [illegible] कि [illegible] त्यांनी [illegible] उपयोगी [illegible] [illegible] आणि [illegible] पुष्कळ [illegible] बरोबर [illegible] आणि [illegible] हे सर्व [illegible] घेतले. [illegible] [illegible] त्यांच्या [illegible] [illegible] थोडी थोडी [illegible] आणि [illegible] लहान. [illegible] एक [illegible] [illegible] घेतल्या. [illegible] सर्व [illegible] [illegible], [illegible] एक [illegible] [illegible] आणि कांहीं [illegible] घेतले; आणि ते [illegible] त्या [illegible] [illegible] मला [illegible].

[illegible] नंतर [illegible] [illegible] एक [illegible] [illegible] [illegible] [illegible] ते [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] नंतर [illegible] [illegible] [illegible] त्या-[illegible].

[illegible] करितां [illegible] कांहीं [illegible] [illegible] नंतर एक [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] दमलों होतों त्यामुळें रात्रभर गाढ झोंप लागली.

[illegible] सर्व [illegible] [illegible] झाली

[illegible]

सारीं अवजारें मीं आणिलीं. तीं [illegible]

[illegible]

मोठेंसें पिंप, तीन मोठालीं दारूचीं पिंपें, एक साखरेची [illegible]

[illegible]

ज्या लहानशा खाडीत मीं तापे आणून माझें सर्व सामान उतरिलें होतें, तेथें हा तापा घेऊन आलों, तेव्हां हा तापा फार मोठा असून त्यावर ओझेंही मनस्वी असल्या कारणानें मला तो नीट चालवितां आला नाहीं, त्यामुळें तो उलथून जाऊन सर्व सामानासहित मी पाण्यांत पडलों. किनाऱ्याजवळच पडल्यामुळें मला सहज बाहेर निघतां आलें, परंतु तें सामान बहुतेक नष्ट झालें. त्यांत मला फार उपयोगी पडणारें लोखंडी सामान गेल्यामुळें मला फार वाईट वाटलें. तथापि ओहोटीच्या वेळेस मीं अत्यंत श्रम करून कांहीं दोरांचे तुकडे व थोडें लोखंडी सामान हीं बाहेर काढिलीं.

आतां मात्र जहाज अगदीं रिकामें झालें असें मला वाटलें, तथापि आणखी एक वेळ वर गेलों, तेव्हां एक कपाट दृष्टीस पडलें. त्याच्या एका खणामध्यें दोन तीन वस्त्रें, एक मोठी कातरी, दहा बारा सुऱ्या आणि कांहीं कांटे सांपडले. दुसऱ्या एका खणामध्यें कांहीं युरोपांतलीं नाणीं, व कांहीं ब्राझिल देशांतलीं नाणीं, मिळून सुमारें ३६० रुपये किमतीचीं नाणीं सांपडलीं. त्यांपैकीं कांहीं नाणीं सोन्याचीं होतीं, बाकीचीं रुप्याचीं.

तीं नाणीं पाहून मला फार हांसें आलें, आणि मी आपणाशीं म्हणालों, ह्यांचा मला काय उपयोग? ह्या ठिकाणीं हीं मला मातीच्या मोलाचीं सुद्धां नाहींत. हा सारा पैक्याचा ढीग टाकून मीं जर एकच सुरी घेतली तर ती देखील मला अधिक उपयोगाची होईल. सबब हीं नाणीं एथेंच पडून समुद्राचे तळीं कां जाईनात? एखादे निरुपयोगी प्राण्याचा जीव वांचविण्याविषयीं यत्न करणें जसें व्यर्थ, तसें हीं नाणीं बाळगून ठेवणें व्यर्थ होय; असें मला वाटलें खरें, परंतु पुनः थोडा विचार केल्यावर, तीं घ्यावीं असें मनांत येऊन, शिडाच्या एका तुकड्यांत तें सर्व सामान मी गुंडाळिलें, आणि दुसरा एक तापा करण्याचे उद्योगास लागलों. तापा तयार होत आहे इतक्यांत आकाश मेघांनीं आच्छादित होऊन वाराही वाहूं लागला. नंतर अर्ध्या घटकेनें किनाऱ्याकडूनच वारा किंचित् जोरानें येऊं लागला. तेव्हां, वारा प्रतिकूल असतां तराफ्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं, आणि इतक्यांत भरती आली तर आपणास मुळींच किनाऱ्यावर जातां येणार नाहीं; सबब कि-

स तरी भरतीची वेळ होण्यापूर्वी किनाऱ्यास पोहोंचलें पाहिजे. असें मनांत येऊन मी पाण्यांत उडी घातली, आणि किनाऱ्याचें वाळवंट व जहाज ह्यांच्या मधील खाडींतून पोहोत चाललों. मजजवळ ओझें फार होतें व वाऱ्याचा जोर अधिकाधिक वाढत जाऊन वादळ सुटण्याचाही बेत आला होता, त्यामुळें मात्र पोहोत येण्यास फार कठीण पडलें. तथापि मोठी मेहनत करून कसा तरी त्या खाडींतून पार पडलों.

ह्याप्रमाणें मी आपल्या सर्व संपत्तीसहवर्तमान तंबूंत येऊन बसलों, तेव्हां तुफानाची भीति माझे पोटांतून नाहींशी झाली. तें तुफान रात्रभर मोठ्या जोरानें चालूच होतें; आणि सकाळीं मी बाहेर जाऊन पाहिलें तों तें गलबत कोठें दिसेना. हें पाहून मी विस्मित झालों, परंतु गलबत बुडाल्याबद्दल मला विस्मय किंवा दुःख करण्याचें प्रयोजन नव्हतें. कारण मला उपयोगी असें त्यांतील सर्व सामान आणण्याच्या कामांत मीं यत्किंचित् सुद्धां आळस केला नव्हता; व आणखी कांहीं दिवस तें गलबत राहिलें असतें तरी त्यापासून म्हणजे मला विशेष उपयोग झाला असता असें नाहीं, कारण तें बहुतेक रिकामें झालें होतें.

आतां, ह्या बेटांत कोणी रानटी मनुष्य किंवा हिंसक पशु असल्यास त्यांपासून आपलें संरक्षण कसं करावें, हा विचार मी करूं लागलों. त्यांत एक वेळ असें वाटे कीं, आपणास राहण्याकरितां एक तंबू करावा; पुनः वाटे कीं, जमिनींत एखादी गुहा करावी, म्हणजे तेथें कोणापासून उपद्रव होणार नाहीं. परंतु ह्याविषयीं पुष्कळ भवति न भवति करून, शेवटीं दोन्ही करावीं. असें मीं ठरविलें, आणि तीं तयार केलीं; तीं येणेंप्रमाणें:—

माझें सांप्रतचें स्थळ सखल जमिनीवर व समुद्राचे लगत्यास असून पाणथळ होतें, त्यामुळें प्रकृतीस मानणार नाहीं; व मुख्यत्वें करून तेथें गोड पाणी नव्हतें, ही तर मोठीच अडचण; सबब ही जागा राहण्यास मुळींच उपयोगी नाहीं, असें मनांत येऊन, प्रथमतः दुसरें चांगलें सोईचें स्थळ शोधून काढण्याचा मीं निश्चय केला.

दुसरी जागा मी शोधीत होतों, तींत तरी मला मुख्यत्वेंकरून चार प्रकारच्या सोई पाहिजे होत्या. प्रथम, वर सांगितल्याप्रमाणें तींतील

[illegible] गवताचा [illegible] असून, [illegible] तिकडे [illegible] [illegible] होऊन [illegible] आमची. [illegible] किंवा [illegible] सांप [illegible] तेथें [illegible] आणि [illegible] कीं [illegible] आले तेथें सर्व [illegible] कीं [illegible] आलें [illegible] म्हणजे [illegible] असलें [illegible] कांहीं [illegible] आम्ही अगदीं निराश [illegible] नव्हतों.

[illegible] च [illegible] किंवा [illegible] शेवटीं एक [illegible] ही सपाटी [illegible] मार्ग [illegible] होता [illegible] राहिलों असतां [illegible] कोणी [illegible] येईल असा [illegible] नव्हता. [illegible] त्यामुळें [illegible] गुहेच्या [illegible] तयार [illegible] आम्ही [illegible] निश्चय केला. ही सपाटी सुमारें ४०० हात लांब व २०० हात रुंद असून [illegible] असून [illegible] पाणी [illegible] ही सपाटी [illegible] [illegible] त्यामुळें सर्व [illegible] आणि [illegible] सूर्य [illegible] येतो. [illegible] संभव नव्हता.

सारांश, हें स्थळ बरेंच सोईवार आहे असें पाहून प्रथमतः [illegible] मिळालेल्या [illegible] एक [illegible] आणिलें, आणि त्यांत ओळीनें [illegible] खांबे [illegible] सुमारें चार [illegible] अंतरावर त्यांच्या [illegible] केला. ते खांबे [illegible] बसतील असे [illegible] जमिनींत पुरले, आणि बाहेर [illegible] सुमारें [illegible] हात [illegible] त्यांचे बुडखे [illegible] अणकोचीदार केले.

नंतर [illegible] आणिलेल्या [illegible] तुकडे घेऊन मी ते या [illegible] रचिले, आणि [illegible] देतात तसे

[illegible] कुंपणांत [illegible] ([illegible]) [illegible] पशु [illegible] किंवा [illegible] येऊं [illegible] नाहीं [illegible] करून [illegible] आणखी [illegible] [illegible] कुंपणाच्या आंत [illegible] कोणी [illegible] [illegible] शिपाई [illegible] तर [illegible] कोणाचें मन [illegible] आहे [illegible] [illegible] शिपाई [illegible] [illegible] नाहीं [illegible]

नंतर मोठी [illegible] सर्व [illegible] कुंपणाच्या आंतल्या [illegible] आणि पा- [illegible] एकांत [illegible] [illegible] आणि [illegible] [illegible] सर्व [illegible] आंतल्या [illegible] [illegible] पर्यंत एक वाट ठेविली होती ती बुजवून टाकिली, आणि पूर्वी सांगितल्या [illegible] जा- [illegible]

[illegible] ही [illegible] [illegible] कुंपणाच्या [illegible] आणि [illegible] [illegible]

[illegible] सर्व कामें [illegible] निदान एकदां तरी [illegible] करितां, आणि आपल्यास [illegible] [illegible] [illegible] करितां, व वेदांत कोणते कोणते [illegible] उत्पन्न होतात [illegible] गोष्टीचा शो- ध करण्याकरितां, [illegible] आपल्या [illegible] [illegible] जात असे. [illegible]

पहिल्यानें ज्या दिवशीं बाहेर पडलों त्या दिवशींच बोकड माझ्या दृष्टीस पडले, त्यामुळें ह्या बेटांत बकरीं पुष्कळ आहेत असें अनुमान होऊन मला मोठा आनंद झाला; आणि पहिल्यानें मीं गोळी मारिली ती ही चांगली लागू होऊन मला एक शेळी सांपडली. ह्या शेळी जवळ तिचें करडूं होतें, तें आपली आई पडली असें पाहून निश्चल उभें राहिलें; व मी शेळीजवळ जाऊन तिला उचलिलें तरी तें हाललें नाहीं. मग शेळीला खांद्यावर घेऊन मी चाललों तेव्हां तें माझ्या पाठीमागें कुंपणापर्यंत आलें असें पाहून मी शेळीस खालीं ठेवून त्या करडास खाण्यापिण्यास घालून आपल्या सवईचें करावें, अशा हेतूनें तंबूंत घेऊन गेलों. परंतु तें खाईचना, तेव्हां मलाच तें मारून खावें लागलें. ह्या दोघांचें मांस मला बरेच दिवस पुरलें; कारण मी फार बेताबातानें अन्नाचा खर्च करीत असें; त्यांत मुख्यत्वें करून पावांला फार जपत असें.

असो ह्याप्रमाणें घराची सोय झाल्यावर त्यांत विस्तव पेटविण्यास जागा व सरपण पाहिजे होतें, त्याची तजवीज मीं कशी केली, व आपली गुहा कशी वाढविली, आणि दुसऱ्या कोणकोणत्या सोई घरांत केल्या, ह्यांचें इत्थंभूत वर्णन मी योग्य प्रसंगीं करीन. परंतु आपलें पुढें काय होणार, व एथें राहून आपण आयुष्याचे दिवस कोणत्या प्रकारें घालवावे, ह्याविषयीं माझ्या मनांत ज्या अनेक कल्पना आल्या त्या सांगतों.

वास्तविक पाहतां ह्यापुढें माझा परिणाम चांगला होईल असें मला दिसेना. कारण, आधीं मी ह्या ओसाड बेटावर येऊन पडलों, तशांत तें बेट तरी गलबतें येण्या जाण्याच्या मार्गावर आहे असें ही नाहीं; त्याच्या भोंवतीं शेकडों कोसांवर व्यापारी लोकांचीं गलबतें कधीं दृष्टीस सुद्धां पडावयाचीं नाहींत. सारांश, अशा गोष्टीवरून ह्या विजन प्रदेशांत विविक्तपणामध्येंच माझा अंत व्हावा ही परमेश्वराचीच इच्छा आहे असें मला खचीत वाटलें. हा विचार मनांत आला म्हणजे नेत्रांतून अश्रूंचे लोट वाहूं लागत. आणि एखादे वेळीं मला सृष्टिकर्त्याच्याच कृतीचें मोठें आश्चर्य वाटे; कारण तो आपणच उत्पन्न केलेल्या प्राण्यांस इतक्या नीच आणि दैन्ययुक्त स्थितींत कां ठेवितो? तस्मात् त्या प्राण्यांनीं आपणास ईश्वरानें उत्पन्न केल्याबद्दल त्याचे आभार

मानण्याचें टाकून उलटी त्याची निंदाच केली तरी चालेल. परंतु अशा असत्कल्पना मनांत येऊं लागल्या म्हणजे त्यांस घालविण्याजोगी एखादी गोष्ट मनांत येऊन, त्या कल्पनांबद्दल मलाच पश्चात्ताप होत असे. एके दिवशीं मी आपली बंदूक हातांत घेऊन फिरत असतां माझ्या सांप्रतच्या स्थितीविषयीं वर सांगितल्याप्रमाणें विचार मनांत येऊं लागले, तेव्हां माझीच बुद्धि मला ह्या प्रमाणें उपदेश करूं लागली, अरे, तूं निर्जन प्रदेशांत आहेस हें खरें, पण असा विचार कर कीं, होडी उलथून गेली तेव्हां तुम्ही अकरा असामी तींत होतां, त्यांपैकीं दहा असामी कोठें आहेत ? तेच कां बुडाले आणि तूंच कसा एकटा वांचलास ? ही गोष्ट मनांत येतांच मीं समुद्राकडे पाहिलें, आणि असा निर्णय केला कीं, कोणत्याही दुःखप्रद गोष्टींचा विचार करणें झाल्यास त्यामध्यें मिश्रित सुखाचा व त्यापासून प्राप्त होणाऱ्या दुसऱ्या दुःखांचा एकदम विचार केला पाहिजे; म्हणजे त्या गोष्टी वास्तविक किती दुःखदायक किंवा किती सुखदायक आहेत हें समजतें.

आणखी असें मनांत आलें कीं, मला अन्नसामग्री किती विपुल मिळाली आहे ! तसेंच जहाज ज्या ठिकाणीं पहिल्यानें भाटीवर आपटलें, तेथून लाटांनीं निसटून किनाऱ्याजवळ येऊन पडलें नसतें, अथवा त्यांतील जिन्नस मी आणी तोंपर्यंत तें त्या ठिकाणीं राहिलें नसतें, तर माझा किती भयंकर परिणाम झाला असता ! त्याचप्रमाणें बंदूक, दारू गोळा, काम करावयास हत्यारें, अंथरावयास व पांघरावयास कपडे वगैरे सामान गलबतावर सांपडलेंच नसतें, तर मीं काय केलें असतें ? अशा विचारांनीं मी आपल्या मनाचें समाधान करीत असें.

प्रकरण दुसरें.

आतां मीं एकांतवासांत घालविलेल्या आपल्या आयुष्याचें वर्णन करणार, आणि अशा प्रकारचा एकांतवास तर जगतांत कोणीं कधींच भोगिला नसेल किंवा ऐकिलाही नसेल; तस्मात् आरंभापासून त्यांतील सर्व गोष्टींचें यथानुक्रमें साद्यंत वर्णन केलें पाहिजे.

प्रथमतः सेप्टेंबर महिन्याच्या तिसावे तारिखेस मीं ह्या बेटावर पाय ठेविला. त्या वेळेस विषुवपद असून सूर्य बहुतेक मस्तकावर आला होता; कारण साधारण अनुमानावरून हें बेट विषुववृत्ताच्या उत्तरेस ९ अंश २२ कलांवर असावें असें मला वाटलें. ह्या ठिकाणीं मी येऊन सुमारें दहा बारा दिवस झाल्यावर सहज माझ्या मनांत आलें कीं, एथें आपणाजवळ शाई, लेखणी, कागद, वगैरे लिहिण्याचें सामान संपलें तर दिवस मोजतां येणार नाहींत, व तेणेंकरून रविवाराचे दिवसही चुकतील. तेव्हां असें होऊंनये म्हणून मीं एक युक्ति काढिली, ती अशी एका खांबावर, मोठमोठ्या अक्षरांनीं तारीख ३० सेप्टेंबर सन १६५९ असे शब्द एका लांकडावर कोरून तें आडवें बसवून त्या खांबास कुसासारिखा आकार दिला, आणि ज्या ठिकाणीं पहिल्यानें मी जमिनीवर उतरलों होतों तेथें तो रोवून ठेविला. ह्या खांबावर मी चाकूनें रोज एक खूण करीं, व प्रत्येक सातवी खूण रविवाराची असें समजण्याकरितां ती इतरांपेक्षां किंचित् अधिक अंतरावर करीं, आणि महिन्याच्या आरंभींची खूण त्याहीपेक्षां थोड्या अधिक अंतरावर करीं.

जहाजावरून मीं सामान आणिलें त्यामध्यें हलक्या किमतीचे पण मला फार उपयोगी असे अनेक पदार्थ मीं आणिले होते, त्यांचीं नांवें पूर्वीं सांगितलीं नाहींत, ते हे,—लेखण्या, शाई, कागद, गणित संबंधी यंत्रें, दुर्बिनी, नकाशे, आणि नौकागमनशास्त्रसंबंधी पुस्तकें; तसेंच इंग्लंदांतून मीं आणिलेल्या सामानांत दोन ख्रिस्ती धर्मशास्त्राचीं पुस्तकें आलीं होतीं तीं, कांहीं पोर्तुगीज भाषेंतील पुस्तकें, व त्यांत रोमन क्याथोलिक धर्माचीं दोन तीन प्रार्थनापुस्तकें, आणि तशींच दुसरीं कांहीं पुस्तकें, हीं सर्व आणून मीं जपून ठेविलीं होतीं. आणखी जहाजावरून मीं एक कुत्रा व दोन मांजरें आणिलीं होतीं, त्यांचें वर्णन योग्य प्रसंगीं करीन. तीं मांजरेंमात्र मला हातांत घेऊन आणावीं लागलीं; पण कुत्रा, मी पहिली खेप घेऊन आलों त्याच्या दुसऱ्या दिवशीं आपोआप जहाजावरून उडी टाकून पोहोत पोहोत किनाऱ्यावर मजकडे आला.

मीं आपल्या प्रस्तुत स्थितीचा सूक्ष्मपणें विचार करून तींतील सर्व गोष्टी नीटपणें कागदावर लिहिल्या. ह्या म्हणजे माझ्या मागें एथें येणाऱ्या लोकांनीं वाचाव्या एवढ्याच करितां मीं लिहून ठेविल्या असें नाहीं. मु-

स्यत्वें त्या स्थितीविषयीं कल्पना नेहमीं मनांत येऊन मला अत्यंत त्रास होत असे, तो न व्हावा हा लिहून ठेवण्यांत माझा मूळ उद्देश होता. आणि हल्लीं माझ्या विचारशक्तीचेंही विशेष प्राबल्य झालें होतें, त्यामुळें तसल्या कल्पनांपासून मी आपणास फारसें दुःख होऊं देत नसें. मी आपली स्थिति लिहून ठेविली म्हणून सांगितलें, तींत जमाखर्चाप्रमाणें जमेकडे अनिष्ट गोष्टी व नावेंकडे इष्ट, तसेंच जमेकडे दुःखें व नावेंकडे सुखें अशीं लिहून ठेविलीं तीं येणें प्रमाणें:-

अनिष्ट.	इष्ट.
मी ओसाड व भयंकर अशा एका बेटावर येऊन पडलों आहें, व एथून माझी सुटका होण्याचा संभव नाहीं.	परंतु माझे सारे सोबती बुडाले तसा मी बुडालों नाहीं, अद्यापि जिवंत आहें.
मला एकट्यालाच जसें कांहीं सर्व जगतापासून निराळें करून दुःखांत पाडिलें आहे.	परंतु मला एकट्यालाच सर्व नावाडी लोकांपासून निराळें करून वांचविलें. आणि ज्यानें अशा रीतीनें मृत्यूपासून माझी सुटका केली, तोच ह्या अवस्थेपासूनही माझी सुटका करण्यास समर्थ आहे.
मनुष्य जातीपासून मला अगदीं विभक्त केलें आहे; व आतां मानवी प्राणी म्हणून माझे दृष्टीस पडण्याचा संभव दिसत नाहीं.	तथापि माझ्या खाण्या पिण्याची कांहीं एक तजवीज न करितां, ज्या ठिकाणीं मुळींच पीक होत नाहीं अशा स्थळीं मला टाकिलें नाहीं; त्यामुळें मी उपाशीं मरेन असें नाहीं.
अंथरण्यास व पांघरण्यास मला वस्त्रें नाहींत, व पुढेंही मिळण्याचा संभव नाहीं.	परंतु मी उष्ण हवेच्या प्रदेशांत असल्यामुळें वस्त्रें असतीं तरी त्यांचा मला फारसा उपयोग झाला नसता.

एकादा क्रूर माणूस किंवा जनावर माझ्या अंगावर धांवून आलें असतां त्यापासून आपलें संरक्षण करण्यास मजजवळ कांहीं साधन नाहीं.

आपलें दुःख दुसऱ्यास सांगून किंचित् समाधान पावेन म्हटलें तर मजजवळ कोणी मनुष्यच नाहीं.

पण मी अशा बेटावर येऊन पडलों आहें कीं, ज्या ठिकाणीं असले क्रूर प्राणी मुळींच नाहींत. त्यामुळें संरक्षणाचे साधनांची आवश्यकता नाहीं.

परंतु परमेश्वराची व्यवस्था अत्यद्भुत आहे. त्याच्या कृपेनें तें जहाज किनाऱ्याच्या इतकें संनिध येऊन पडलें कीं, मला लागणारें सर्व सामान त्यांतून काढितां आलें; आणि यावज्जन्म मला कोणत्याही गोष्टीचा तोटा पडूंनये अशी तजवीज झाली.

सारांश, माझ्या स्थितीचें मला दुःख वाटत असे, तें अशा विचारांनीं नाहींसें करून मी ती उलटी कांहींसी सुखदायक मानूं लागलों; आणि समुद्रावर एखादें गलबत दृष्टीस पडेल तर पहावें म्हणून नेहमीं टपत असें, तें सोडून देऊन, आपण आतां कोणत्या रीतीनें आयुष्य घालवावें, व जेणेंकरून आपणास सुख प्राप्त होईल अशा कोणत्या गोष्टी कराव्या, हा विचार करूं लागलों.

मीं आपणास राहण्याकरितां एका खडकाच्या बाजूस तंबू देऊन त्याचे भोंवतीं बळकट काठ्या व नांगराचे दोर ह्यांचें कुंपण केलें म्हणून पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या कुंपणास आतां भिंत म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं; कारण त्याच्या बाहेरच्या बाजूस सुमारें एक हात जाड असा एक गवताचा थर मीं रचिला. नंतर सुमारें दीड वर्षानें त्या भिंतीवर व खडकावर वांसे टाकून त्यांवर झाडांच्या फांद्यांचें छप्पर केलें. हें सारें पावसा पासून आपला बचाव करण्याकरितां मीं केलें; कारण वर्षांतून बरेच वेळ मोठा जोराचा पाऊस पडत असे.

मीं आपलें सर्व सामान ह्या भिंतीच्या आंत व तंबूच्या मागील गुहेंत आणून ठेविलें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. परंतु पहिल्यानें तें सामान

अस्ताव्यस्त टाकून दिलें होतें, त्यामुळें सगळी जागा त्यानेंच व्यापून जाऊन मला पाय ठेवण्यापुरती देखील जागा तेथें राहिली नव्हती. म्हणून गुहा आणखी पुढें पोखरून ती वाढविण्याच्या उद्योगास मी लागलों. हल्लीं हिंसक पशूंविषयीं माझी भीति बहुतेक नाहींशी झाली होती, म्हणून मी गुहेंत आजू बाजूनें खणूं लागलों; आणि उजव्या बाजूस थोडें खणीत जाऊन तेथून पुन: उजवीकडे वळलों, तों खणतां खणतां भिंतीच्या बाजूस निघालों, त्यामुळें भिंतीच्या पलीकडल्या बाजूस एक दारच पडल्या सारिखें झालें. ह्या नव्या पोखरण्यानें सामान ठेवण्यास प्रशस्त जागा होऊन, भिंतीच्या बाहेरून येण्या जाण्यास एक मागीलदारही झालें.

नंतर ज्या वस्तूंवांचून माझें फार अडे, त्या मी तयार करावयास लागलों. त्यांत प्रथम खुर्ची व मेज मजजवळ नसल्यामुळें लिहिण्याचे व जेवणाचे वेळीं माझी मोठी अडचण होत असे, व दुसऱ्या पुष्कळ गोष्टींमध्यें खुर्ची व मेज ह्यां वांचून अडे.

सबब तीं तयार करावयास मीं लागलों. परंतु मीं जन्मत: कधीं हत्यारास शिवलों सुद्धां नव्हतों, त्यामुळें हत्यार धरावें कसें हें ही मला ठाऊक नव्हतें. तथापि मनुष्यानें मनावर घेतलें असतां त्यास दु:साध्य अशी कोणतीही गोष्ट नाहीं; हें लवकरच माझ्या अनुभवास आलें. कारण मीं मेहनत करून त्या कामाची पाठच घेतली, तेव्हां मला पाहिजे होत्या त्या सर्व वस्तू करितां आल्या.

प्रथमत: जहाजांतून ताफ्यावर घालून आणिलेल्या फळ्यांचें एक मेज व एक खुर्ची तयार केली. नंतर हत्यारें, खिळे, वगैरे लोखंडी सामान ठेवण्याकरितां, व सर्व वस्तू पाहिजेत तेव्हां बसल्या ठिकाणीं हातास याव्या अशा व्यवस्थेनें ठेवण्याकरितां, सुमारें हात हात रुंदीच्या फळ्या तयार करून मीं गुहेच्या भिंतीस एकावर एक बसविल्या. तसेंच बंदुका वगैरे सामान टांगावयाकरितां खडकास मीं लांकडाच्या खुंट्या ठोकिल्या. ह्याप्रमाणें व्यवस्था केल्यामुळें माझी गुहा मनुष्याच्या चरितार्थास लागणाऱ्या वस्तूंच्या भांडाराप्रमाणें शोभूं लागली. अशी सर्व गोष्टींची समृद्धि असून पाहिजे ती वस्तु बसल्याजागीं सहज हातास येईल अशा रीतीनें ठेविलेली पाहून मलाही मोठें समाधान वाटे.

सारांश आपलें घर व त्यांतील सर्व गोष्टी ह्यांची अशा प्रकारची सुंदर व्यवस्था केल्यावर मीं आपलें दिनवृत्त लिहून ठेवण्याचा क्रम सुरू केला. हा क्रम मीं कांहीं दिवस चालविला; परंतु पुढें शाई संपल्यामुळें तो सोडून देणें प्राप्त झालें. तथापि जितकें लिहून ठेविलें होतें तितक्याचा उतारा देतों. तें येणें प्रमाणें.

दिनचर्यालेख.

तारीख ३० माहे सेप्टेंबर सन १६५९— ह्या दिवशीं मी हतभाग्य राबिन्सन क्रूसो, भयंकर तुफानामुळें जहाज फुटून ह्या निर्जन द्वीपावर येऊन पडलों, व जहाजांतील बाकीचीं सर्व मनुष्यें बुडून मेलीं. ह्या ठिकाणीं येऊन पडलों त्या दिवसापासून ह्यास "नैराश्यद्वीप" असें नांव मीं दिलें आहे.

मीं आपलें घर तयार केलें त्या वेळेपर्यंत सर्व गोष्टींचें यथास्थित कथन केलेंच आहे, सबब आतां त्यांविषयींचा लेख मी मुद्दाम गाळितों. त्यांत इतकेंमात्र सांगितलें पाहिजे कीं, मी जान्युआरी महिन्याच्या तिसऱ्या तारिखेपासून एप्रिल महिन्याच्या चवदाव्या तारिखेपर्यंत एकसारिखा आपली भिंत तयार करण्यांत गुंतलों होतों. इतके पुष्कळ दिवसपर्यंत भिंतीचेंच काम चाललें होतें ह्यावरून ती भिंत म्हणजे फार मोठी होती अशी कोणीं कल्पना करूं नये. ती वर्तुलाकृति असून तिची लांबी सुमारें ५० हात होती, व तिचीं दोन शेवटें परस्परांपासून सुमारें १५ हातांच्या अंतरावर खडकास लागलीं होतीं.

हें भिंतीचें काम चाललें असतां, पाऊस नाहीं त्या वेळेस मी रोज शिकार करावयास जंगलांत जात असें; आणि ह्या फिरण्यामध्यें नेहमीं आपणास उपयोगी असे कांहीं तरी नवे नवे पदार्थ आढळत असत. त्यांत मुख्यत्वेंकरून एका प्रकारचीं जंगली खबुतरें मला आढळलीं, त्यांचीं कांहीं पिल्लें आणून आपल्या सवईचीं करून ठेवण्याविषयीं यत्न करूं लागलों; परंतु त्यांस खावयास घालण्यासारिखें मजज-

वळ नव्हतें; म्हणून तीं कांहीं दिवस टिकून थोडींशीं वाढलीं तेव्हां उडून गेलीं. असा एक वेळ फसलों, तथापि पुढें मी नेहमीं त्यांचीं घरटीं शोधून काढून पिल्लें आणीं, आणि त्यांचें मांस फार मिष्ट लागे.

मी आपल्या घरांतील व्यवस्था करीत असतां पुष्कळ गोष्टी वांचून आपली अडचण होते असें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. उदाहरण, मजजवळ मेणबत्त्या किंवा दिवा लावण्याचें दुसरें कांहीं साधन नसल्यामुळें संध्याकाळीं सात वाजण्याचे सुमारास अंधकार पडतांच मला निजावें लागे. ह्याकरितां मीं अशी एक युक्ति काढिली कीं, बोकड मारिला तेव्हां त्याची चरबी राखून ठेवीं, आणि मातीचें एक दिवेलावणें तयार करून तें वाळविलें, नंतर ती चरबी व काथ्याची एक वात त्यांत घालून दिवा लावण्याचा क्रम चालविला. ह्या दिव्याचा उजेड चांगला स्वच्छ पडत नसे, तरी त्याची जोत मेणबत्ती सारिखी संत चाले.

मी घरामध्यें अशाच प्रकारची कांहीं खटपट करीत असतां अडगळींत मला एक पिशवी सांपडली ह्या पिशवींत गलबतावरील कोंबड्यांना घालण्याकरितां धान्य भरून ठेविलेलें होतें. परंतु हल्लीं तें सारें उंदिरांनीं खाऊन टाकिल्यामुळें आंत कोंडा व भुसकट मात्र राहिलें होतें. सबब त्या पिशवीचा दुसरा कांहीं उपयोग करावा ह्या हेतूनें मीं तींतील कोंडाबिंडा भिंतीच्या एका बाजूस खडका खालीं झाडून टाकिला.

मीं कोंडा फेंकून दिला ही गोष्ट पावसाळ्यास प्रारंभ होण्याच्या पूर्वीं थोडे दिवस घडली होती. आणि तो कोंडा मीं सहज वृत्त्या तेथें टाकिला होता, त्यामुळें तें माझ्या लक्ष्यांतही नव्हतें. परंतु पुढें सुमारें एका महिन्यानंतर कसलेसे हिरवे मोड जमिनींतून उगवलेले माझ्या दृष्टीस पडले. तेव्हां आपण पूर्वीं पाहिली नाहीं अशी ही एखादी वनस्पति असेल, अशी कल्पना करून मी स्वस्थ बसलों. पण कांहीं दिवसांनीं पाहतों तंव त्यांचीं मोठमोठालीं ताटें होऊन त्यांना इंग्लंदांतील जवाच्या कणसांसारिखीं दहा बारा हिरवीं चार कणसेंही आलीं. हें दृष्टीस पडतांच मला मोठा विस्मय प्राप्त झाला.

ह्या वरील गोष्टीच्या योगानें माझ्या मनांत जे अनेक तरंग उत्पन्न झाले त्या सर्वांचें अशेष वर्णन करणें अशक्यच होय. ह्या वेळेपर्यंत मी कोणत्याही गोष्टीचा धर्मदृष्ट्या यत्किंचित्सुद्धां विचार करीत नसें.

आणि वस्तुगत्या माझ्या अंतःकरणाचा धर्माकडे कल फारच थोडा असे. मला जीं जीं संकटें वगैरे प्राप्त झालीं तीं सहज केवळ सृष्टिक्रमाच्या अनुरोधानेंच प्राप्त झालीं, असें मी मानीं. परंतु अशा गोष्टी करण्यामध्यें सृष्टिकर्त्याचा हेतु काय असावा, तो जगताची व्यवस्था कोणत्या प्रकारें चालवितो, इत्यादि विचार माझ्या गांवींसुद्धां नसत. परंतु एथील हवा पिकाला अनिष्ट असून ह्या ठिकाणीं जवाचीं कणसें उगवलीं, आणि मी म्हणतों जरी कदाचित् हवा पिकाला इष्ट असली, तथापि तेथें बीं कोठून आलें, हें माझ्या लक्ष्यांत मुळींच येईना, त्यामुळें अंतःकरण फारच विस्मित झालें. तेव्हां मला असें वाटूं लागलें कीं परमेश्वरानें आपल्या अद्भुत कृतीच्या योगानें बीं पेरल्यावांचून ह्या ओसाड प्रदेशांत केवळ माझ्या उपजीवनाची तजवीज व्हावी म्हणूनच हें धान्य उत्पन्न केलें असावें. असा विचार मनांत येतांच माझ्या नेत्रांतून आनंदाश्रु आले, आणि मज दीनाकरितां परमेश्वरानें असें विस्मापक कर्म केलें, म्हणून मी आपणास मोठा दैवशाली मानूं लागलों. ह्या गोष्टीपासून मला विस्मय होण्यास आणखी एक कारण झालें. तें असें कीं, त्या खडकाच्या बाजूस कांहीं भाताचीं ताटें उगवलीं होतीं; तसलें भात मीं आफ्रिकेच्या किनाऱ्यावर असतां पाहिलें होतें, त्यावरून हें भातच अशी माझी खातरी झाली.

ह्या गोष्टी परमेश्वरानें माझ्या उपजीविकेकरितां उत्पन्न केल्या इतकेंच मानून स्वस्थ बसलों असें नाहीं. त्या बेटावर असलें धान्य अणखी पुष्कळ असावें असें खचित वाटून, बेटाच्या ज्या भागांत मी होतों तेथें सर्व ठिकाणीं बारीक दृष्टीनें पाहत फिरलों; परंतु कोठें कांहींच दृष्टीस पडलें नाहीं. शेवटीं विचार करितां करितां कोंबड्यांचा दाणा ठेवण्याची पिशवी मीं त्या ठिकाणीं झाडिली होती, ह्या गोष्टीचें मला अकस्मात् स्मरण झालें; तेव्हां माझा विस्मय उत्तरोत्तर कमी होत चालला. आणि हेंही मला कबूल केलें पाहिजे कीं, जें झालें तें सृष्टिक्रमास अनुसरूनच झालें, ह्यांत आश्चर्य करण्यासारिखें कांहीं नाहीं, असें जेव्हां मला वाटलें, तेव्हां इतकावेळपर्यंत ईश्वराविषयीं जी माझी अत्यंत पूज्य बुद्धि झाली होती, तीही नाहींशी होत चालली. वास्तविक रीतीनें पाहिलें असतां ह्या वेळेस मीं परमेश्वराचा आभार मानावा ही गोष्ट य-

था योग्य होय. कांकीं, माझ्या संबंधानें पाहिलें असतां तें ईश्वराचें अद्भुतच कृत्य होतें. पहा कीं, अद्भुत न म्हणावें तर, त्या पिशवींतीलबाकीचे सारे दाणे उंदिरांनीं खाऊन टाकिले आणि दहावाराच कोठून राहिले ? सबब ते परमेश्वरानें ह्या कृत्याकरितांच राखिले असें म्हणण्यास काय चिंता आहे ? त्याचप्रमाणें ती पिशवी चांगल्या ठिकाणीं झाडण्याची मला बुद्धि होऊन, तेथें खडकाची सावली असल्यामुळें लागलेच त्या दाण्यास मोड आले, हा चमत्कार नव्हे काय ? कारण तेच दाणे जर मीं दुसऱ्या एखाद्या वाईट व उघड्या जाग्यावर फेंकिले असते तर ते उन्हानें करपून गेले असते.

जून महिन्याच्या सुमारास तीं कणसें कापण्यासारिखीं झालीं तेव्हां तीं कापून मीं जीवापलीकडे जपून ठेविलीं; आणि तीं सारीं पुनः पेरण्याचा मीं निश्चय केला; कारण तीं पेरलीं असतां भाकरीपुरती आपली तजवीज होईल अशी मला आशा उत्पन्न झाली, परंतु चवथ्या वर्षाच्या अखेरीपर्यंत त्यांतला एक दाणासुद्धां माझ्यानें खाण्याकडे खर्च करवला नाहीं. आणि पुढें तरीं थोडें थोडेंच धान्य खर्चूं लागलों. कारणकीं, पहिल्या वर्षीं भलत्याच वेळेस म्हणजे उन्हाळा लागण्याचे सुमारास पेरल्यामुळें उगवावा तसा त्यांतला एक दाणा सुद्धां उगवला नाहीं.

तारीख १६ माहे एप्रील— ह्या दिवशीं मीं शिडी तयार केली. आणि तीवरून भिंतीवर चढून शिडी उचलून घेऊन भिंतीच्या आंतल्या बाजूस लाविली. ही भिंत बळकट असल्यामुळें मी आतां अगदीं निर्भय झालों. कारण आंतल्या बाजूस मला वागण्यास प्रशस्त जागा असून, भोंवती ही मजबूत भिंत असल्यामुळें बाहेरून कोणी आंत येऊं लागल्यास भिंतीवर चढल्याशिवाय त्यास आंत येतां येणार नाहीं; आणि तीवर चढण्यास तर बाहेरच्या बाजूस कांहीं साधन नाहीं, असें मला वाटलें.

दुसऱ्या दिवशीं माझी मागली सर्व मेहनत व्यर्थ जाऊन माझा प्राणही जाण्याचा प्रसंग आला होता. तो असा– मी आपल्या घरांत गुहेच्या दाराशीं कांहीं खटपट करीत असतां गुहेच्या वरल्या भागावरून अकस्मात् माती ढासळूं लागली; आणि मी बसलों होतों त्याच्या

वरच्या बाजूस खडकाच्या कडेवरून माझ्या डोक्यावर ही माती पडूं लागली; व गुहेंत पुरलेले दोन खांब मोठ्या भयंकर रीतीनें कडाडले. हा प्रकार पाहतांच मी फार घाबरलों, आणि ह्याचें कारण काय असावें वगैरे विचार न करितां, पूर्वी जशी गुहेंत थोडीशी माती पडली होती त्याप्रमाणें आतां सगळी गुहा ढांसळणार असें वाटून, त्याच्या खालीं मी चेंगरून मरेन ह्या भीतीनें झटदिशीं शिडीजवळ गेलों. परंतु तेथें ही आपल्या मागोमाग टेंकडी ढांसळून धोंडे बिंडे आंगावर येतील, असें भय प्राप्त होऊन मी भिंतीवर चढून बाहेर आलों. नंतर निर्भय स्थळीं उभा राहून पाहतों तों हा भूकंप आहे, असे स्पष्टपणें माझ्या लक्ष्यांत आलें. कारण ज्या ठिकाणीं मी उभा राहिलों होतों ती जमीन सुमारें पाव पाव घटकेच्या अंतरानें तीन वेळ इतक्या जोरानें हालली कीं, कितीही बळकट इमारत असती तरी ती ह्या धक्यांनीं उलथून पडली असती. आणि मजपासून सुमारें पाव कोसाच्या अंतरावर एक टेंकडी होती, तिच्या शिखरावरचा एक कडा कोसळून त्याचा इतका मोठा आवाज झाला कीं, असा मीं साऱ्या जन्मांत कधीं ऐकिला नव्हता. आणखी ह्या भूकंपाच्या योगानें समुद्रही मनस्वी खवळून गेला.

मी असा बसलों आहें इतक्यांत आकाश चोंहोंकडून मेघांनीं आच्छादित होऊन, लवकरच मोठी पर्जन्यवृष्टि होईल असें दिसूं लागलें. पुढें थोड्या वेळानें हळू हळू वारा वाहूं लागला; आणि सुमारें दीड घटकेच्या आंत मोठें भयंकर तुफानच सुरू झालें. त्याच्या योगानें अकस्मात् सारा समुद्र फेंसाळून जाऊन किनाऱ्यावर एकामागून एक लाटा मोठ्या जोरानें येऊं लागल्या; झाडें मुळासकट उपटून पडूं लागलीं; अशा प्रकारचा अनर्थ एकसारखा प्रहरभर चालला होता. नंतर तें तुफान किंचित् कमी कमी होत चाललें, आणि सुमारें पांच सहा घटिकांत तें अगदीं बंद होऊन मोठा पाऊस पडूं लागला.

पावसास प्रारंभ झाला तेव्हां मला दुसरीच एक काळजी उत्पन्न झाली. ती अशी कीं, माझ्या भिंतीच्या आंत पावसाचें पाणी सांचलें तर, तें गुहेंत शिरून सगळा नाश करून टाकील, असें वाटलें. सबब त्या भिंतीस मोरीसारिखें एक भोंक पाडून आंत जमलेलें पाणी मीं

बाहेर घालविलें. नंतर गुहेंत जाऊन कांहीं वेळ बसल्यावर पुनः भूकंपाचे धक्के बसले नाहींत, ह्यामुळें भीति नाहींशी होऊन किंचित् धैर्य येत चाललें. पुढें ताजातवाना होण्याकरितां आपल्या कोठारांत जाऊन मीं थोडीशी गोडी प्यालों; पण ती फार थोडी प्यालों; कारण ती एकदा संपली म्हणजे पुनः आपणास मिळण्याचा संभव नाहीं, असें समजून मी ती फार जपून खर्चीत असें.

त्या दिवशीं सारी रात्रभर व दुसऱ्या दिवशींही बरीच वेळपर्यंत हा पाऊस एक सारिखा पडत होता, त्यामुळें मला बाहेर पाऊल सुद्धां ठेवितां आलें नाहीं.परंतु पूर्व दिवशींची माझी भीति अगदीं नाहींशीं होऊन चित्त स्वस्थ झाल्यामुळें मनांत हे पुढील विचार येऊं लागले. प्रथमतः असें वाटलें कीं, ह्या बेटांत जर असे भूकंप नेहमीं होत असले तर आपलें गुहेंत राहणें अगदीं उपयोगीं नाहीं. सबब आपणास राहण्याकरितां एखाद्या उघड्या जाग्यावर झोंपडी बांधण्याचा विचार केला पाहिजे, व हिंसक पशु किंवा मनुष्यें ह्यांपासून आपले संरक्षणार्थ ह्या पहिल्या भिंतीप्रमाणें त्या झोंपडी भोंवतीं एक भिंत बांधिली पाहिजे. कारण, असें न करितां जर मी आहें तेथेंच राहीन, तर कधीं तरी अकस्मात् असा प्रसंग येऊन मला जिवंत असतांच समाधी मिळेल; असें मला खचीत वाटलें.

असे विचार मनांत आल्यामुळें, माझा तंबू अगदीं टेंकडीच्या त्या कड्याखालींच होता तो पहिल्यानें काढून दुसरे ठिकाणीं ठोकावा, असा मीं निश्चय केला. आणि पुढले दोन दिवस, म्हणजे एप्रिल महिन्याची एकुणिसावी व विसावी ह्या दोन तारखा, एथून कोणत्या ठिकाणीं तंबू न्यावा व कसा न्यावा, ह्या विचारांत मीं घालविल्या.

परंतु नवी जागा पाहून, ती नीटनेटकी करून, तेथें तंबू ठोकून राहण्याजोगी सोय करणें,इतक्या कृत्यास बरेच दिवस लागणार; सबब आजच ही जागा सोडिली तर तितके दिवसपर्यंत राहण्यास दुसरी जागा नाहीं; म्हणून आधीं जागा तयार होईतोंपर्यंत कसें तरी करून एथेंच राहावें, असा मीं विचार केला; आणि पहिल्यानें होईल तितकी जलदी करून, काठ्या व दोरखंड ह्यांची एक मजबूद वर्तुलाकृति भिंत

तयार करावी, आणि मग तिच्या आंत आपला तंबू ठोकावा, असा निश्चय केला.

तारीख ३० वी माहे एप्रील — माझे पाव संपण्याच्या बेतांत आले आहेत असें वाटल्यावरून ह्या दिवशीं मीं मोजून पाहिले, तों खरोखरच थोडे राहिले होते. सबब रोज पावाचा एकेकच तुकडा खाण्याचा मीं निश्चय केला, तेव्हां थोडें वाईट वाटलें; परंतु उपाय नाहीं. एकदा ते संपले म्हणजे पुनः जन्मांत कधीं दृष्टीसही पडण्याचा संभव नसल्यामुळें बेतानें खर्च करणें भाग पडलें.

तारीख १ माहे मे— आज प्रातःकाळीं मीं सहज समुद्राकडे पाहिलें तों ओहोट झाली होती, व किनाऱ्यावर पिंपासारिखें कांहींसें पडलेलें दिसत होतें. जवळ जाऊन पाहिल्यावर तें खरोखरच पिंप आहे असें समजलें. व नुकतेच झालेल्या वादळाच्या झपाट्यानें जें जहाज किनाऱ्यावर येऊन फुटलें होतें त्याचे दोन तीन तुकडे त्या पिंपाजवळ पडले होते. तसेंच तें फुटकें जहाज पाहतां तें पहिल्यापेक्षां किंचित् पाण्याच्यावर जास्त दिसतेंसें वाटलें. तें पिंप उघडून पाहिलें तों त्यांत बंदुकीची दारू होती; पण आंत पाणी शिरल्यामुळें त्या दारूचा दगडासारिखा कठीण गोळा बनला होता. तथापि त्या वेळेस तें पिंप मीं लोटीत लोटीत जमिनीवर दूर नेऊन ठेविलें; व आणखी कांहीं पिंपें सांपडतील तर पहावीं म्हणून वाळवंटांतून फुटलेल्या जहाजाकडे चाललों.

जहाजाच्या अगदीं नजीक गेलों तेव्हां तेथें कांहीं निराळाच प्रकार झालेला दृष्टीस पडला. तो असा कीं पूर्वीं जहाजापुढच्या बाजूस खोल पाणी असल्यामुळें त्यापासून सुमारें ½ कोसाच्या अंतरावर देखील मला पोहल्या वांचून येववत नसे. परंतु आतां तर ओहोटीच्या वेळेस मी अगदीं जहाजापर्यंत नुसता चालत गेलों. ह्या गोष्टीचें प्रथमतः मला मोठें आश्चर्य वाटलें; परंतु किंचित् विचार केल्यावर सहज लक्ष्यांत आलें कीं, पूर्वोक्त भूकंपानें असें झालें असावें. आणि त्याच्याच धक्यांनीं जहाज जास्ती फुटून मोकळें झाल्यामुळें त्यांतील वस्तू लाटांच्या व वाऱ्याच्या जोरानें लोटत लोटत किनाऱ्यावर येऊन पडल्या असाव्या.

जहाजाची ही स्थिति पाहून आपले बिऱ्हाडाची जागा बदलण्याची गोष्ट कांहीं वेळ माझ्या मनांतून गेल्यासारिखी झाली; आणि जहाजावरच्या आणवतील त्या वस्तू आणिल्या असतां त्यांचा कधींना कधीं तरी उपयोग पडेल, असें वाटून तें मोडून तोडून जें सांपडेल तें आणण्याचा मीं निश्चय केला.

तारीख ५ माहे मे — आज जहाजावर मेहनत करून त्याच्या दोन तुळया व देवदाराचे दोन तीन तक्ते कापून काढिले, नंतर ते सर्व एके ठिकाणीं बांधून भरतीच्या वेळेस पाण्यांतून ढकलीत ढकलीत किनाऱ्यावर आणिले.

तारीख २४ माहे मे ह्या दिवसापर्यंत मी नेहमीं त्या फुटक्या जहाजावर काम करावयास जात असें; आणि मोठ्या सक्त मेहनतीनें खिळे उपटून उपटून जहाज इतकें ढिलें करून टाकिलें कीं, पहिल्याच भरतीच्या वेळेस त्यांतील पुष्कळ पिंपें व खलाशांच्या दोन पेट्या बाहेर निघून तरंगूं लागल्या; परंतु वारा उलटा किनाऱ्या कडून वाहात होता, त्यामुळें तीं पिंपें वगैरे समुद्रांतच वाहून गेलीं. फक्त कांहीं लांकडाचे तुकडे व एक लहानसें पिंप मात्र किनाऱ्यावर आलें. त्या पिंपांत थोडें मांस होतें; पण त्यांत समुद्राचें खारें पाणी व वाळू शिरल्या मुळें तें अगदीं नासून गेलें होतें.

हें जहाज फोडून आणण्याचें काम मीं एकसारिखें जून महिन्याच्या पंधराव्या तारिखेपर्यंत चालविलें होतें. तितक्या या वेळांत मीं इतके लोखंडी सामान, तक्ते, व इतर लांकडें आणिलीं कीं, होडी कशी करावी हें मला माहीत असतें, तर तितक्या सामानांत एक पसंत होडी झाली असती. ह्या सर्व सामानामध्यें प्रत्येक खेपेस थोडथोडे मिळून एकंदर सुमारें दीड मण शिशाचे पत्रेही मीं आणिले.

ह्या बेटावर येऊन हल्लीं मला सुमारें दहा महिन्यावर दिवस लोटले, तेव्हां माझी सुटका होण्याची आशा समूळ नाहींशी झाली; आणि ह्या बेटावर मानवी प्राण्यानें म्हणून कधींच पाऊल ठेविलें नसेल असें मला खचीत वाटलें. असो, आपल्या राहण्याची वगैरे यथास्थित सोय झाली असें वाटलें, तेव्हां ह्या बेटांत दुसरें काय काय उत्पन्न होतें, ह्या-

ची आणखी बारीक रीतीनें चौकशी करण्याकरितां पुनः चोहींकडे फि-रावें असा मीं निश्चय केला.

वरील संकेताप्रमाणें जुलई महिन्याचे १५ वे तारखेस मी फिरावयास निघालों. . त्यांत प्रथम ज्या लहानशा खाडींत मीं आपले ताफे जमिनीवर उतरिले होते, तिकडे गेलों. नंतर त्या खाडीच्या कांठाकांठानेंच वरच्या बाजूस सुमारें एक कोसभर गेल्यावर पाहिलें तों भरतीचें पाणीं त्याच्या पुढें जात नसल्यामुळें तेथें खाडी संपून जाऊन, वरून फार स्वच्छ आणि गोड अशा पाण्याचा एक लहानसा ओढा मात्र येऊन त्या खाडीस मिळत आहे, असें दृष्टीस पडलें. ह्या ओढ्याचे कांठीं सपाट व हिरवीं चार अशीं गवताचीं सुंदर कुरणें होतीं. ह्या कुरणांच्या पलीकडे चढत्या जमिनी असून, त्यांच्या खालच्या बाजूस ज्या ठिकाणीं पाणीं शिरत नसे, तेथें हिरवीं तंबाकूचीं झुडपें व दुसऱ्या अनेक प्रकारच्या वनस्पति उगवलेल्या दृष्टीस पडल्या.

दुसरे दिवशीं, म्हणजे जुलई महिन्याचे १६ वे तारिखेस, मी पुनः तिकडेच फिरावयास गेलों. आणि आदले दिवसापेक्षां किंचित् पुढें जाऊन पाहिलें तों तो ओढा व त्याचें कांठचीं कुरणें संपत चाललीं, व पुढें पुढें जंगल फार वाढलेलें दिसूं लागलें. ह्या प्रदेशांत अनेक जातीचीं फळें विपुल दृष्टीस पडलीं, त्यांत् विशेषेंकरून जमिनीवर खरबुजें व झाडांवर द्राक्षें हीं फार होतीं. द्राक्षांचे वेलांनीं अनेक झाडांचीं झाडें अअगदीं व्यापून टाकिलीं होतीं; आणि ते दिवस द्राक्षांच्या बहराचे असल्यामुळें पक्क आणि मधुर द्राक्षांच्या घडांनीं ते वेल जणू वांकूनच गेले होते. हीं फळें दृष्टीस पडल्यामुळें मला फार आनंद झाला. परंतु तितक्यांत मला स्मरलें कीं, मी बार्बरी प्रांताच्या किनाऱ्यावर असतां त्या ठिकाणीं जे इंग्रेज लोक गुलाम होते त्यांनीं द्राक्षें खाल्ल्यामुळें त्यांस ताप व रेच ह्यांचा उपद्रव होऊन ते प्राणास मुकले; ही गोष्ट लक्ष्यांत आल्यामुळें द्राक्षें अपकारक वाटून, तीं खाणें तर बेताबातानेंच खावयाचीं; असा मीं निश्चय केला. परंतु ह्या द्राक्षांचा दुसराच एक चांगला उपयोग करण्याचा मीं योजिला. तो असा कीं, तीं द्राक्षें वाळवून त्यांच्या मनुका करून ठेवाव्या, म्हणजे त्या खाल्ल्या असतां बाधणार नाहींत व द्राक्षें नसतील त्या दिवसांत द्राक्षांचे ठिकाणीं उपयोगीं पडतील.

ते दिवशीं सायंकाळपर्यंत मी जंगलांतच होतों, त्यामुळें परत बि-म्हार्डी येण्यास वेळ न सांपडून रात्रही तेथेंच घालवावी लागली. ह्या बेटावर आल्यापासून मी रात्रीं बाहेर राहिलों असा काय तो त्याच दिवशीं. रात्र पडल्यानंतर एका झाडावर चढून चांगलीशी जागा पाहून तेथें बसलों; आणि तेथें रात्रभर गाढ झोंप घेऊन सकाळीं उठल्यावर पुनः मार्गास लागलों. अझून ही माझा जाण्याचा रोंख उत्तरेकडेसच होता, व माझ्या दक्षिण बाजूस व उत्तर बाजूस एकएक टेंकड्यांची रांग होती; अशा रीतीनें चालतां चालतां सुमारें दोन कोस गेलों.

हे दोन कोस चालल्यावर पुढें एक खिंड लागली. ह्या खिंडीच्या पलीकडील जमीन पश्चिमेकडे उतरते अशी वाटली, व जवळच्या टेंकडींतून एक गोड्या पाण्याचा लहानसा झरा निघून तो पूर्वेकडे वाहात होता. हा सर्व प्रदेश हिरवा गार असून तेथील झाडें झुडपें नेहमीं टवटवीत व फलपुष्पांनीं सुशोभित असल्यामुळें, ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष वसंतऋतुच सतत नांदत आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं; व अशा शोभेमुळेंच ही कोणीं मुद्दाम लाविलेली बागच आहे असें मला भासे.

मी त्या खिंडींतून थोडासा खालीं उतरून त्या रमणीय प्रदेशांत शिरलों. त्या वेळेस माझ्या मनांत नेहमीं प्रमाणें कांहीं दुःखदायक कल्पना होत्याच; पण हा सुंदर प्रदेश माझा आहे, व मी ह्या सर्व बेटाचा राजा आहें, व कदाचित् मला संतति प्राप्त झाल्यास, इंग्लंदांतील एकाद्या जमीनदाराप्रमाणें मला वंशपरंपरेनें या सर्व बेटाचा व अशा रमणीय प्रदेशाचा निर्विवाद उपभोग घेण्यास सांपडेल, ही गोष्ट मनांत येऊन मला मोठा आनंद झाला. ह्या प्रदेशांत नारळी, नारिंग्या, लिंबांचीं झाडें, माहळुंगांचीं झाडें वगैरे पुष्कळ दृष्टीस पडलीं. परंतु तीं सर्व जंगली झाडें असल्यामुळें त्यांस फारशीं फळें येत नसत असें दिसलें; निदान त्यावेळेस तरी नव्हतींच. तथापि थोडीं हिरवींच लिंबें सांपडलीं तीं जमा करून मीं खाऊन पाहिलीं तों तीं फार चांगलीं लागलीं व पथ्यकारक ही आहेत असें वाटलें. हा त्यांचा गुण समजला तेव्हां त्यांचा रस मी प्यावयाचे पाण्यांत घालूं लागलों, त्यामुळें तें पाणी फार गार व श्रमापहारक होत असे.

पुढें पर्जन्यकाळ लवकरच प्राप्त होणार, आणि त्या दिवसांत आप-

णास लिंबें व द्राक्षें मिळणार नाहींत, असें वाटल्यावरून, ह्या वेळेसच तीं जमाकरून सांठवून ठेवण्याचा मीं निश्चय केला. नंतर द्राक्षें गोळा करून त्यांचे दोन ठिकाणीं दोन ढीग केले, व लिंबांचाही एक मोठा ढीग जमविला. परंतु तीं नेण्यास तेथें मजजवळ कांहीं नव्हतें, म्हणून थोडीं द्राक्षें व थोडीं लिंबें हातांत घेऊन मी घरीं चाललों, आणि ते ढीग नेण्याकरितां एखादें पोतेंबितें घेऊन पुनः येण्याचा निश्चय केला. ह्याप्रमाणें तीन दिवस चालल्यानंतर मी वरील संकेताप्रमाणें घरीं जाऊन पोहोंचलो. परंतु तीं द्राक्षें अगदीं अलगलेलीं असून त्यांत रस फार असल्यामुळें एकमेकांच्या वजनानें तीं चिरडून, गेलीं त्यामुळें मी घरीं जाऊन पोहोंचण्याचे पूर्वींच तीं नासून अगदीं निरुपयोगी झालीं. लिंबें मात्र चांगलीं शाबूद राहिलीं होतीं, परंतु तीं तरी मला फारशीं आणितां आलीं नाहींत.

दुसरे दिवशीं म्हणजे १९ वे तारिखेस मी दोन पिशव्या तयार करून घेऊन पुनः फळें आणण्याकरितां गेलों, आणि पुष्कळशीं द्राक्षें जमा करून तीं उन्हानें सुकावी म्हणून त्यांचे घडांचे घड झाडांच्या फांद्यांस अडकवून ठेविले; आणि लिंबांचें जेवढें उचललें तेवढें ओझें घेऊन मी परत घरीं जावयास निघालों.

घरीं येऊन स्वस्थ बसल्यानंतर त्या रमणीय प्रदेशांतील फळांची समृद्धि, त्याची सुंदर रचना, त्यांतील दाट जंगल, इत्यादि गोष्टी व त्याचे पुढील समुद्राच्या भागांत वादळाचें फारसें भय नाहीं, ही गोष्ट मनांत येऊन मला फार आनंद झाला; आणि माझें सांप्रतचें बिऱ्हाड साऱ्या बेटांतील अत्यंत वाईट प्रदेशांत आहे असें स्पष्ट दिसून आलें. तेव्हां पूर्वींच्या बिऱ्हाडाप्रमाणें गुहा वगैरे करण्यास सोईवार व निर्भय असें एखादें स्थळ त्या रमणीय प्रदेशांतच सांपडेल तर पाहून तेथेंच आपलें बिऱ्हाड न्यावें असें मीं मनांत आणिलें.

तो नवीन शोधून काढिलेला प्रदेश माझ्या अंतःकरणास फार अवडल्यामुळें तेथें जाऊन राहण्याची गोष्ट मनांत आली म्हणजे मोठा आनंद होत असे. असें कांहीं दिवस चाललें; परंतु ह्याच गोष्टीचा जेव्हां मी किंचित् सूक्ष्मरीत्या विचार करूं लागलों, आणि ज्या बाजूस माझें हल्लींचें बिऱ्हाड आहे तिकडील समुद्राच्या भागांत कधींना कधीं तरी

एखादें गलबत माझ्या दृष्टीस पडेल, किंवा मजसारिखा कोणी एखादा गलबत फुटून समुद्रांत पडलेला दुर्दैवी माणूस इकडे येऊं लागेल, ही गोष्ट मनांत आली, तेव्हां माझें अंतःकरण फिरलें. कारण, मला असें वाटलें कीं, जरी वरील गोष्टी घडण्याचा संभव कमी आहे, तथापि त्या दुसऱ्या बाजूस जाऊन राहिलों असतां ह्या गोष्टी घडण्याचा संभव मुळींच नाहींसा होईल. सारांश, अशा विचारांवरून मीं तिकडे जाण्याचा बेत रहित केला.

तथापि तें स्थळ मला फार आवडल्यामुळें जुलई महिन्याचे राहिलेले बहुतेक दिवस मीं तेथेंच राहून घालविले; आणि वरील विचारावरून बिऱ्हाड तेथें नेण्याचा माझा बेत जरी रहित झाला होता, तथापि तेथें कधीं कधीं चैनीनें जाऊन बसण्याकरितां मीं एक मंडप तयार केला; आणि त्याच्या भोंवतीं थोड्या अंतरावर बळकट व उंच काठ्या पुरून एक दुहेरी कुंपण केलें, व त्याच्यामध्यें झाडें झुडपें टाकून तें दाट केलें; आणि त्याच्या आंत जाण्यायेण्यास एक शिडी तयार केली. अशा रीतीची सुरक्षित जागा तयार झाल्यावर कधीं कधीं तेथें जाऊन मी एकसारिखा दोन दोन तीन तीन दिवस निर्भयपणें राहत असें. सारांश, आतां मला समुद्रतीरीं एक व जंगलांत एक अशीं दोन घरें झालीं. हें सर्व काम संपलें तों जुलई महिना संपून आगष्टास प्रारंभ झाला.

आगष्ट महिन्याच्या १४ व्या तारिखेपासून २६ वे तारिखेपर्यंत एकसारिखा झपाट्यानें पाऊस पडत होता, त्यामुळें मला घरांतून बाहेरसुद्धां पडतां आलें नाहीं. सबब तितके दिवस मी नेहमीं दोन तीन तास आपली गुहा वाढविण्याचें काम करीत असें. ती गुहा मी अधिकाधिक पोखरूं लागलों तों तटाच्या पलीकडील बाजूस एक दार पडलें, तेव्हां त्याच दारानें मी येण्याजाण्याचा परिपाठ ठेवूं लागलों. परंतु हें दार पडल्यानें मला बरें वाटलें नाहीं. कारण आपलें राहणें अगदीं गुप्त असावें अशा हेतूनें मीं कुंपणाचा वगैरे खटाटोप केला होता; आणि आतां ह्या दारामुळें तर तें अगदींच उघडें पडलें. तथापि पुनः विचार केला कीं, ह्या बेटांत आल्या तागाईत बोकडापेक्षां मोठा प्राणी एकही माझ्या दृष्टीस पडला नाहीं, सबब एथें कोणाचें भय बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं.

प्रकरण तिसरें.

एके दिवशीं सहज विचार करीत बसलों असतां, गतवर्षीं ज्या दिवशीं मी ह्या बेटावर येऊन राहिलों तो दुःखप्रद दिवस येऊन पोहोंचला असें वाटल्यावरून खांबावरच्या खुणा मीं मोजून पाहिल्या, तों मला एथें येऊन बरोबर ३६५ दिवस झाले, असें दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हां त्या दिवशीं मीं उपवास करून सारा वेळ ईश्वर भजनांत घालविला; आणि अत्यंत नम्रभावेंकरून आपले सर्व अपराध परमेश्वरापुढें कबूलकरून त्यास साष्टांग नमस्कार केले, व, माझ्या अपराधांबद्दल त्वां मला केलेलें शासन यथायोग्य आहे, असें म्हणून, येशू ख्रिस्ताच्या द्वारें त्यानें आपणावर दया करावी म्हणून त्याची वारंवार प्रार्थना केली. अशा रीतीनें अस्तमान होईतोंपर्यंत तोंडांत पाणीसुद्धां न घालितां मीं परमेश्वरचिंतनांत वेळ घाळविला, आणि मग एक लहानसा भाकरीचा तुकडा व द्राक्षांचा एक घड एवढें मात्र खाऊन निजलों.

इतके दिवसपर्यंत रविवार अमुक असें समजून ते दिवशीं प्रार्थना वगैरे करण्याचा माझा परिपाठ मुळींच नव्हता. कारण मला आजतागाईत धर्मवासना फार कमी असल्यामुळें; त्या खांबांवर आदित्यवाराबद्दल मी मोठी खूण करीत असें, तेंही लवकरच टाकून दिलें होतें; त्यामुळें आलीकडे मला वार मुळींच समजेनातसे झाले होते. परंतु सांप्रत माझें चित्त ईश्वराकडे विशेष लागून मला भक्तिपुरःसर त्याची प्रार्थना करण्याची बुद्धि होऊं लागल्यामुळें, प्रत्येक सातवा दिवस रविवार समजून तो पाळण्याचा मीं निश्चय केला.

ह्यापुढें थोड्याच दिवसांनीं माझी शाई संपण्याच्या बेतांत आली, तेव्हां प्रत्येक दिवसाचा सर्व वृत्तांत न लिहितां, कांहीं विशेष गोष्टी घडल्या असतील त्या मात्र लिहून शाईचा बेताबातानेंच खर्च करावा असा मीं विचार केला.

पर्जन्यकाळ व उष्णकाळ हे कोणत्या क्रमानें व केव्हां केव्हां येतात हें आतां माझ्या लक्ष्यांत पूर्णपणें आल्यामुळें, ते प्राप्त होण्यापूर्वीं त्यांत लागणाऱ्या वस्तूंची मला तजवीज करून ठेवितां येऊं लागली. परंतु पर्जन्यादि काळांचें ज्ञान तरी टक्के टोणपे खाल्यावांचून व अनेक

प्रसंगीं फसल्यावांचून मला प्राप्त झालें नाहीं. त्यांत एका प्रसंगीं मोठीच फसगत झाली होती, ती येणें प्रमाणें:—

पूर्वी मोठ्या विलक्षण रीतीनें उगवलेलीं जवांचीं व तांदळांचीं थोडथोडीं कणसें मीं सांठवून ठेविलीं हें मागें सांगितलेंच आहे. त्यांत जवांचीं सुमारें वीस व तांदुळांचीं तीस होतीं. पावसाळा गेल्यानंतर पेरणीला हेच दिवस चांगले असें समजून तीं सर्व कणसें पेरण्याचा मीं निश्चय केला; आणि आपल्या लांकडी कुदळीनें जमीन खणून दोन्ही धान्यें निरनिराळीं पेरण्याकरितां तिचे दोन भाग केले. नंतर पेरणी करीत असतां सहज माझ्या मनांत आलें कीं, पेरणीचे दिवस हेच अशी आपली पक्की खात्री नाहीं, त्यास आतां पेरलेलें धान्य उगवेल कीं नाहीं कोण जाणे; सबब सगळें धान्य पेरून खर्चून टाकणें योग्य नाहीं; असें वाटल्यावरून सुमारें दोन हिस्से धान्य मीं पेरिलें, आणि प्रत्येक जातीचें मूठ मूठ शिलकेस ठेविलें. मीं शिलकेस ठेविलें ही गोष्ट फार चांगली झाली; कारण तें धान्य पेरल्यानंतर लवकरच उन्हाळ्यास प्रारंभ झाला व पावसाचा एक थेंब सुद्धां दृष्टीस पडला नाहीं, त्यामुळें त्या पेरलेल्या धान्यापैकीं एक दाणा देखील उगवला नाहीं. नंतर जेव्हां पावसाळ्यास पुनः प्रारंभ झाला तेव्हां तेंच धान्य अगदीं नवीन पेरिल्या सारिखें उगवलें.

असो परंतु आपलें पहिलें बीं व्यर्थ गेलें असें प्रथमतः वाटल्यावरून दुसरी ह्यापेक्षां ओलसर जमीन पाहून तेथें पुनः पेरून पहावें, असा मीं निश्चय केला; आणि नव्या मंडपानजीकच ओलसर जमीन सांपडली ती खणून तीमध्यें पावसाळा लागण्यापूर्वींच म्हणजे फेब्रुआरी महिन्यांत मीं थोडेंसें धान्य पेरिलें. नंतर मार्च व एप्रिल ह्या दोन महिन्यांत त्या धान्यास पाऊस पुष्कळ मिळाल्यामुळें त्याचें पीक फार पसत आलें. परंतु ह्या वेळेसही सगळें बीं मला पेरवलें नाहीं, त्यामुळें एकंदरींत थोडेंच धान्य उत्पन्न झालें. तें प्रत्येक जातीचें सुमारें दोन पायल्यांपेक्षां जास्त नव्हतें. तथापि ह्या वेळच्या अनुभवावरून पेरणीचे व हंगामाचे दिवस वर्षांतून दोन वेळ असतात, व ते अमुक अमुक वेळेस असतात, हें मला पक्कें कळून आलें.

हें धान्य उगवत असतां इकडे दुसरी एक गोष्ट मला नवीन समजली

व तिचा मला मोठा उपयोग झाला. ती अशी-पर्जन्यकाळ संपतांच नोव्हेंबर महिन्यांत मी एकदा सहज आपल्या नव्या मंडपाकडे गेलों. बरेच दिवसपर्यंत मीं इकडे पाहिलें सुद्धां नव्हतें, तथापि पूर्वी जातेसमयीं जी व्यवस्था करून ठेविली होती तीमध्यें यत्किंचितही फेरफार न होतां सर्व वस्तू जेथल्या तेथें होत्या. मंडपाभोंवतीं मीं जें दुहेरी कुंपण केलें होतें, तें इतक्या वेळांत चांगलें बळकट झालें एवढेंच नाहीं; तर जसें वाळंजाचें झाड खच्ची केलें म्हणजे त्यास लागलीच एका वर्षात फांद्या व पालवी हीं फुटूं लागतात, त्याप्रमाणें त्या कुंपणांत झाडांच्या फांद्या मीं तोडून पुरल्या होत्या त्यांस दुसऱ्या लांब लांब फांद्या फुटले-ल्या पाहून पहिल्यानें फार विस्मित झालों; पण किंचित् विचार केल्या-वर त्या गोष्टीचा मला मोठा संतोष होऊन मीं त्या फांद्या पुनः खच्ची केल्या, आणि सारें कुंपण सारखें वाढत जाईल अशी त्याची व्यवस्था केली. पुढें हीं झाडें किती जलद वाढत गेलीं हें सांगितलें तर कोणी खरें मानील असें मला वाटत नाहीं. कारण तीन वर्षांत तीं इतकीं मोठीं झालीं कीं, त्या वर्तुलाकृति कुंपणाचा गर्भ जरी सुमारें ४० हात होता, तरी आंतील सर्व जाग्यावर त्या झाडांची दाट छाया पसरून भर उन्हा-ळ्यांत सुद्धां घरावांचून तेथें राहण्यास चिंता नाहीं अशी सोय झाली. ही गोष्ट पाहिल्यावरून आपल्या पहिल्या घराच्या पुढील भिंती भोंवतीं ही असेंच फांद्यांचें अर्धवर्तुलाकृति कुंपण करावें, असें मनांत येऊन त्या भिंतीपासून सुमारें १२ हातांचे अंतरावर फांद्या पुरून एक दुहेरी कुंपण मीं तयार केलें. त्या फांद्यांचीं पुढें लवकरच मोठ मोठीं झाडें ब-नून त्यांनीं आंतील जागा अगदीं झांकून गेली; आणि ह्याच झाडांनीं पुढें मोठ मोठ्या संकटापासून माझें संरक्षण झालें; परंतु त्या सर्वांचें य-थाप्रसंग वर्णन करीन.

हें सारें बेट पाहण्याची इच्छा होऊन मी फिरत फिरत एका ओढ्याप-र्यंत गेलों, व तेथून पुढें बेटाच्या दुसऱ्या अंगास समुद्र दृष्टीस पडूं लागे-तोंपर्यंत जाऊन त्या ठिकाणीं एक मंडप बांधला, इतका वृत्तांत मीं पूर्वी सांगितला. आतां पुनः त्याच बाजूस थेट समुद्रतीरापर्यंत जावें, असें मनांत आलें तेव्हां आपली बंदूक व कुऱ्हाड खांद्यावर टाकिली, आणि नित्यापेक्षां थोडा अधिक दारूगोळा घेऊन, एका पिशवींत दोन भाकरी

आणि मनुकांचा एक घड हीं घालून तीं कमरेस अडकविली; व कुत्रा बरोबर घेऊन मोठ्या थाटानें पुनः फिरावयास निघालों माझा नवा मंडप ज्या दऱ्यांत होता तो दरा टाकून पुढें जातांच पश्चिमेकडचा समुद्र दिसूं लागला. त्या दिवशीं आकाश अगदीं निरभ्र झालें होतें त्यामुळें समुद्रांत दूर जमीन दृष्टीसपडली. हें का एखादें बेट आहे, किंवा मुख्य जमीन आहे, ह्या गोष्टीचा मला निर्णय करितां येईना. परंतु ती जमीन उंच असून पश्चिमेकडून नैर्ऋत्य दिशेस लांबपर्यंत पसरत गेली,आहे व ह्या बेटापासून सुमारें २०।२५ कोसांचे अंतरावर असावी, एवढें मात्र दिसून आलें.

ही जमीन कोणत्या देशांतील आहे हें पक्कें माझ्या लक्ष्यांत येईना, तथापि हा अमेरिकेंतील स्पानिश लोकांच्या मुलुखा नजीकचा प्रदेश असावा, व तेथें रानटी लोकांची वस्ती असावी, एवढें मात्र अनुमान झालें. आणि मी ह्या बेटावर न येतां जर तिकडेच जाऊन उतरलों असतों, तर माझी दशा हल्लींपेक्षां फारच वाईट झाली असती, असें मला खचीत वाटलें. सारांश, अशा प्रकारच्या गोष्टींवरून जगन्नियंत्याची व्यवस्था यथायोग्य असते अशी माझी खात्री झाली.

अशा प्रकारचे विचार करीत मी हळू हळू पुढें चाललों; तेव्हां कोठें कोठें फुलझाडें व गवत ह्यांनीं गच्च भरलेलीं मैदानें, कोठें कोठें दाट जंगल वगैरे अनेक प्रकार दृष्टीस पडले. तेणेंकरून बेटाच्या ज्या भागांत माझें पहिलें घर होतें, त्यापेक्षां हा भाग फारच रमणीय आहे, असें मला स्पष्ट दिसून आलें. त्या ठिकाणीं पुष्कळ राघू दृष्टीस पडले. तेव्हां थोडी मेहनत करून त्यांपैकीं एक राघू मीं धरिला; व पुढें कांहीं दिवसांनीं मीं त्यास माझें नांव घेऊन हाक मारावयास शिकविलें. आणि त्याप्रमाणें तो हाक मारी तेव्हां मला मोठी मौज वाटे.

मी अगदीं समुद्रतीरावर येऊन पोहोंचलों तेव्हां तर पहिल्या घराकडील प्रदेश अगदींच वाईट अशी माझी पक्की खात्री झाली; कारण, ह्या किनाऱ्यावर पाहिलें तों असंख्य कांसवें दृष्टीस पडलीं; आणि तिकडील किनाऱ्यावर साऱ्या दोड वर्षांत तीनच कांसवें मला सांपडलीं होतीं. तसेंच ह्या किनाऱ्यावर अनेक प्रकारचे पाणकोंबडे, बदकें, व इतर जलचर पक्षीही पुष्कळ दृष्टीस पडले. त्यांपैकीं बरेच मीं कधीं पाहिले दे-

खील नव्हते. ह्या जलचर पक्ष्यांस मी गोळ्या घालून मारितों तर पाहिजेत तितके सांपडते; परंतु माझ्यानें दारू गोळा फार खर्चवेना. सबब एखादा बोकड मारिला असतां थोड्या दारूगोळ्यांत काम होऊन तो बरेच दिवस खावयास पुरेल असें वाटल्यावरून, एक बोकडच मारावा असा मीं निश्चय केला. परंतु बेटाच्या दुसऱ्या बाजूपेक्षां ह्या बाजूस बोकड पुष्कळ असतांही ते हातीं लागण्यास फार श्रम पडले; कारण इकडील जमीन अगदीं सपाट असल्यामुळें मी पुष्कळ अंतरावरूनच त्यांचे दृष्टीस पडें, त्यामुळें ते लवकर पळत; आणि त्या बाजूस टेंकड्या पुष्कळ असल्यामुळें त्यांच्या दृष्टीस न पडतां अगदीं जवळ जावयास सांपडे.

आतां यद्यपि इकडील भाग इतका रमणीय होता तथापि आपलें पहिलें बिऱ्हाड काढून ह्या ठिकाणीं आणावें, असें मला वाटेना. कारण त्या ठिकाणीं माझी वस्ती फार दिवस झाल्यामुळें मला तिकडची अगदीं सवई लागून गेली होती, आणि इकडे होतों तोंपर्यंत आपण प्रवासांत आहों असें मला वाटे. असो, तथापि मी तसाच फिरत फिरत समुद्राच्या कांठा कांठानेंच पूर्वदिशेकडे सुमारें १२ मैल गेलों, व तेथें खुणे करितां एक काठी पुरून ठेवून परत घराकडे यावयास निघालों; आणि पुनः फिरण्यास निघावयाचें तें आपल्या घराच्या पूर्वेकडून निघून बेटाची दुसरी बाजू पाहत पाहत ह्या खुणेपर्यंत यावें, असा मीं निश्चय केला.

मी हा प्रवास करून सुरक्षितपणें घरीं येऊन आपल्या झोपाळ्यावर स्वस्थ पडलों, तेव्हां मला इतकें समाधान झालें कीं तें सांगतां पुरवत नाहीं. प्रवासांत श्रम फार झाले होते, म्हणून मीं सुमारें आठ दिवस पर्यंत घरींच राहून विश्रांति घेतली. मीं बरोबर आणिलेला राघू अगदीं माझ्या सवईचा झाल्यामुळें त्यास रहावयाकरितां एक पिंजरा करणें अवश्य प्राप्त झालें; सबब ह्या आठ दिवसांत मीं तो तयार केला. नंतर नवीन केलेल्या कुंपणांत जें करडूं मीं अडकवून ठेविलें होतें, तें घरीं आणून पोसण्याचा मीं निश्चय केला; आणि तिकडे जाऊन पाहतों तों तें जेथचें तेथेंच आहे; परंतु त्यास खावयास न मिळाल्यामुळें बिचारें अगदीं मरावयास टेंकलें होतें. हें पाहून मी झाडां-

च्या कोंवळ्या कोंवळ्या फांद्या व पाला त्यापुढें आणून टाकिला; तें खाऊन त्यास थोडा जीव आला तेव्हां त्याला घरीं आणितांना तें इकडे तिकडे पळेल म्हणून त्याच्या गळयास मीं दोरी बांधिली; परंतु तें बापडें मुळींच इतकें गरीब झालें होतें कीं मी चालूं लागतांच तें पाळलेल्या कुत्र्यासारिखें आपोआप माझ्यामागून येऊं लागलें. पुढें घरीं आणिल्यावर मीं त्यास नित्य आपले हातानें खावयास घालीं; त्यामुळें मजवर त्याची अत्यंत ममता जडून तें माझ्या कुटुंबांतलें होऊन राहिलें.

ह्यानंतर लवकरच पावसाळ्यास आरंभ झाला; आणि मी ह्या बेटावर ज्या दिवशीं येऊन पडलों तो दिवस म्हणजे सप्तेंबर महिन्याची तिसावी तारीख आली. तेव्हां ते दिवशीं मीं सालगुदस्तप्रमाणें व्रतस्थ असून सारा वेळ भक्तिपुरःसर परमेश्वर सेवनांत घालविला; आणि त्यानें हरएक प्रसंगीं मजवर दया करून माझीं संकटें दूर केलीं, ह्याबद्दल मी त्याचा मोठा आभार मानिला. ह्या दिवशीं मला एथें येऊन बरोबर दोन वर्षे झालीं; तथापि माझी एथून सुटका होण्याविषयीं पहिल्या दिवशीं जी निराशा होती, ती यत्किंचितही कमी झाली नव्हती.

असो, अशा प्रकारच्या स्थितींत तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. पहिल्या वर्षाप्रमाणें गेल्या वर्षाचा इत्थंभूत इतिहास मीं आपल्या वाचकांस विदित केला नाहीं; तथापि एकंदरींत इतकें सांगतों कीं, तें बहुतेक वर्ष मीं उद्योगांतच घालविलें. रोज जीं जीं कामें करावयाचीं त्यांच्या वेळा नेमून ठेवून त्या त्या वेळेस तीं कामें मी नियमितपणें करीत असें. तो प्रकार असा; प्रथम परमेश्वर चिंतन करणें; ह्या कृत्यास मीं दिवसांतून तीन वेळा नेमून ठेविल्या होत्या. दुसरें, बंदूक घेऊन पारध करावयास जाणें हें काम पाऊस नाहीं त्या दिवशीं सकाळीं मी करीत असें, व ह्यांत सुमारें एक प्रहर मोडे. तिसरें काम, पारध करून आणिलेल्या जनावरांचें मांस काढून शिजविणें, व तें बंदोबस्तानें ठेवणें, इत्यादि ह्या तीन कृत्यांत बहुतकरून माझा सारा दिवस खर्चून जात असे. त्यांत आणखी एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, हा प्रदेश उष्ण असल्यामुळें दोनप्रहरीं उष्णता अत्यंत वाढे, ह्यामुळें घराबाहेर पाऊल ठेवण्याचीही सोय नसे. सबब संध्याकाळीं

कायतें प्रहर दीड प्रहर मात्र काम करावयास सांपडे. त्यांत कधीं कधीं मी सकाळचें पारधीचें काम संध्याकाळीं, व संध्याकाळचें काम सकाळीं असें मात्र करीत असें.

हल्लीं दिसेंबर महिना चालू असून तांदूल व जव ह्यांच्या शेतांची कापणी करण्याचा समय आला होता, सबब मी त्या तयारींत होतों हीं माझीं शेतें फार मोठीं होतीं असें नाहीं. कारण मीं पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, एक वार उन्हाळ्यांतच धान्य पेरून फसल्यामुळें, मजजवळ प्रत्येक जातीचें बीं दोन पायल्यांपेक्षां जास्त राहिलें नव्हतें.

कापणी करण्यास विळा नसल्यामुळें माझी फार अडचण झाली. तेव्हां निरुपाय होऊन, जहाजावरून आणिलेल्या सुऱ्यांपैकीं एक सुरी घेऊन तिनेंच मी कापणी करूं लागलों. तथापि माझें शेत फार लहान असल्यामुळें तें कापण्यास फारसा वेळ लागला नाहीं. तें सारें शेत कापून मळणी वगैरे केल्यावर पाहिलें तों माझ्या दोन दोन पायल्या बियाचें सुमारें ८ पायल्या तांदूळ व १० पायल्या जव इतकें पीक झालें.

अशा प्रकारचें पीक झाल्यामुळें मला मोठें उत्तेजन आलें आणि जगदीश्वराच्या कृपेकरून मला धान्याचा पुरवठा नेहमीं होईल अशी आशा उत्पन्न झाली. परंतु आपणाजवळ सतत धान्याचा सांठा पुष्कळ झाला पाहिजे, असें वाटल्यावरून सालमजकुरीं उत्पन्न झालेले धान्यांतील एक दाणाही न खर्चितां तें सारें पेस्तर सालीं पेरण्याकरितां ठेवावें; आणि बहुतेक वेळ जमिनी तयार करण्यांत व धान्य उत्पन्न करण्यांत घालवावा असा मीं निश्चय केला.

हल्लीं मजजवळ सुमारें दीड बिघा जमिनींत पेरण्या पुरतें बीं होतें, सबब पहिल्यानें जास्त जमीन खणून तयार करणें प्राप्त झालें. तेव्हां आपल्या घराच्या अगदीं नजीक मीं दोन मोठ मोठालीं शेतें तयार करून त्यांत तें बीं पेरिलें, आणि त्याच्या भोंवतीं एक बळकट कुंपण घातलें. ह्या कुंपणास पहिल्या कुंपणांतील झाडांच्याच फांद्या मीं लाविल्या; कारण तीं झाडें लवकर वाढतात हें अनुभवास आल्यामुळें हें कुंपण त्याच झाडांच्या फांद्यांचें केलें असतां एका वर्षांत आपोआप मोठें होईल असें वाटलें.

हें झाल्यावर मला दुसरा एक उद्योग सुचला तो असा कीं, भांड्यां

वांचून माझी फार अडचण होत असे, म्हणून मातीचीं मडकीं वगैरे कशीं तयार करावीं ह्या गोष्टीच्या विचारांत मी पुष्कळ दिवस होतों. ह्या बेटांतील हवा उष्ण आहे हें पाहून मला निःसंदेह वाटलें कीं, चांगली चिकणमाती सांपडली असतां आपणास मडकीं करितां येतील, व तीं उन्हांत वाळलीं म्हणजे हवीं तशीं वापरण्याजोगीं कडक व भक्कम होतील; आणि मग कोणताही सुका पदार्थ त्यांत ठेवितां येईल. आणि धान्य पीठ वगैरे ज्या जिनसा मी तयार करीत होतों, त्या ठेवण्यास सांठवणें तर अवश्य पाहिजे होतीं. सबब करवतील तितकीं मोठीं व रांझणासारखीं उभट अशीं कांहीं मडकीं तयार करण्याचा मीं निश्चय केला.

ह्या कमावलेल्या मातीचीं भांडीं तयार करण्यासाठीं किती अडाणी तऱ्हतऱ्हा मीं काढिल्या, व किती विलक्षण बेढब अशीं भांडीं केलीं, हें लिहूं लागलों असतां वाचणारांस हासूं आल्यावांचून राहणार नाहीं. मातीच्या आंगीं आपलें वजन सोसण्यासारखा चिवटपणा नसल्यामुळें किती एकांना आंत पोंचे आले, कित्येकांना बाहेर आले; कित्येक भांडीं केल्या बरोबर उन्हांत ठेविल्यामुळें अतिशयित मखर तापाच्या योगानें तडकून गेलीं. तसेंच कित्येक वाळण्याच्या अगोदर व कित्येक वाळल्यानंतर जाग्यावरून हालविलीं तोंच फुटून त्यांचे तुकडे तुकडे झाले. फार काय सांगूं, माती शोधून काढून ती खणण्यास, ती नरम करण्यास व ती घरीं आणून कामीं लावण्यास, पराकाष्ठेचे श्रम घेऊनही, सुमारें दोन महिने खपून सुध्दां, त्या मातीचीं बेढब मोठाल्या दोन मडक्यांहून (पण त्यांस मडकीं हें सुद्धां नांव शोभत नाहीं) अधिक मडकीं माझ्यानें करवलीं नाहींत.

जरी मोठीं भांडीं करण्याचा माझा बेत फसला, तरी लहान लहान वाटोळीं सुगडें, परळें, कळश्या, लोटे,. वगैरे भांडीं करण्याचें मला बरेंच साधलें. आणि उन्हाच्या तापानें तीं वाळून अगदीं खडखडीत झालीं.

तथापि पातळ पदार्थ ठेवितां येण्याजोगें व विस्तवावर ठेविलें असतां फुटणार नाहीं, असें एखादें भांडें आपणापाशीं असावें, असा जो माझा हेतु होता, तो इतकें करूनही सिद्धीस गेला नाहीं. एकदां अशी गोष्ट घडली कीं, मी स्वयंपाकाकरितां बराच मोठा विस्तव पेटविला होता, तो स्वयंपाक आटोपल्यावर विझवायास गेलों तेव्हां माझ्या मातीच्या भां-

ह्यांपैकीं एका भांड्याचा तुकडा त्या विस्तवांत सांपडला. तो भाजून दगडासारिखा कठीण व कौलासारिखा लाल झाला होता. तें पाहून मला मोठा आनंद झाला; आणि मीं आपल्या मनांत म्हटलें कीं, जर ह्या भांड्यांचे तुकडे भाजले जातात, तर निःसंशय तीं सगळीं देखील भाजलीं जातील.

असें वाटल्यावरून जेणेंकरून मला कांहीं भांडीं भाजतां येतील अशा प्रकारचा विस्तव करण्याला काय युक्ति करावी, ह्या गोष्टीकडे माझें चित्त लागलें. कुंभार ज्या भट्टींत भांडीं कौलें वगैरे भाजितात ती भट्टी कशी असते, त्याची मला कल्पनाही नव्हती.-तसेंच भांड्यांस शिश्याचें रोगण कसें करितात हेंही बिलकूल माहीत नव्हतें. तथापि तीन मोठाले डेरे व दोन तीन दुसरीं मडकीं अशीं मीं एकावर एक रचून त्यांच्याखालीं खूप निखारे घातले, आणि त्यांसभोंवतीं लांकडें रचिलीं; आणि बाहेरून चोहींबाजूंस व वरून आणखी लांकडें लावून आग घातली; आणि तीं मडकीं अगदीं इंगळासारखीं लालभडक होत तोंपर्यंत ती आग एकसारिखी राखिली होती. तेव्हां तीं मडकीं अगदीं तडकलीं नाहींत असें दिसून आलें. तीं कांहींवेळ पर्यंत आगींत राहिल्यानंतर त्यांची लाली मोडे तोंपर्यंत हळू हळू विस्तव कमी करीत गेलों; व तो फारच जलद विझूं देऊंनये म्हणून मी रात्रभर जागत बसलों होतों. सकाळीं, दिसण्यांत सुंदर नव्हते तरी फार भक्कम असे तीन डेरे व दुसरीं दोन मडकीं अशीं पांच भांडीं प्राप्त झालीं. तीं असावीं तितकीं कठीण असून त्यांतील एकाला वाळूच्या रसाचें नामी पूट बसलें होतें.

ह्यापुढें धान्य कुटण्याला एकादी दगडी उखळी कशी मिळते ? ह्याची मला चिंता पडली. आतां जांत्याविषयीं म्हणाल तर माझ्या दोन हातांनीं असलें करामतीचें काम होण्याचें मनांत देखील आणावयास नको. तेव्हां, ज्याचें खोदून उखळ करितां येईल, एवढा मोठा धोंडा शोधण्यांत मीं पुष्कळ दिवस घालविले; पण तसा एकही आढळला नाहीं. भरीव खडकांत मात्र तसला धोंडा सांपडला असता, पण त्यांतून तो खणून किंवा कापून आणण्यास मजजवळ कांहीं साधन नव्हतें. असो, ह्या प्रकारचा दगड शोधून काढण्यास पुष्कळ वेळ व्यर्थ घालविल्या-

वर मीं तो नाद सोडून दिला, आणि एक कठीण लांकडाचा तुकडा हुडकून काढण्याचा विचार केला; व तो सांपडण्यास मला फारसे आयासही पडले नाहींत. नंतर बराच मोठा एक ठोकळा घेऊन कुऱ्हाडीनें तासून मीं त्यास गोलाकार दिला; आणि मग ब्राजिल देशांतील इंडियन लोक ज्याप्रमाणें लांकडें पोंखरून होड्या करितात त्याप्रमाणें मीं पराकाष्ठेची मेहनत करून विस्तवाच्या योगानें तो पोंखरून काढिला. ह्या नंतर, ज्याला लोखंडी लांकूड असें म्हणतात, त्याचें एक जड मुसळ करून पुढें पेस्तर सालीं जें धान्य उत्पन्न होणार तें धान्य कुटण्याची तयारी करून ठेविली.

आतां पुढें भाजण्याचें काम कसें करावें ह्याचा विचार प्राप्त झाला; म्हणजे धान्य मिळालें तरी मजजवळ तवा नसल्यामुळें त्याची भाकर करावी कशी, हें मला समजेना. शेवटीं त्यालाही मला एक युक्ति सांपडली. तीही कीं, फार रुंद असून उथळ म्हणजे ज्याचा व्यास सुमारें एक हात असून सहा तसूच्या आंत खोल, अशीं कांहीं मातीचीं परळें मीं तयार केलीं; आणि दुसरीं कांहीं भांडीं जशीं विस्तवांत भाजलीं म्हणून सांगितलें, तशीं हींही भाजून ठेविलीं. आणि जेव्हां मला भाजावयाची गरज पडे, तेव्हां मीं स्वतः करून भाजलेल्या कौलांची जी आगटी रचिली होती, तीवर मोठा विस्तव करीत असें. लाकडें बरींच जळून त्यांचे निखारे पडले म्हणजे ते आगटीवर ओतून तीवर ते पसरीं; आणि ती खूप तापेपर्यंत ते निखारे मी तीवर राहूं देई. नंतर ते सर्व काढून टाकून तीवर पाव ठेवीं; आणि त्यांवर मातीचें परळ घालून, आंत उष्णता राहून ज्यास्ती उष्णता मिळावी म्हणून परळाच्या बाहेर चोंहीकडून निखारे घालीं. ह्या कृतीनें उत्तम तव्यावर भाजून होणाऱ्या रोटाप्रमाणें माझे रोट भाजले जात असत. आणि थोड्याच काळांत पक्वान्नें करण्याचे कामांत मी तरबेज झालों. तांदुळांचीं सांदणें व मोदक मी पुष्कळ करीत असें; तथापि पुरणाच्या पोळ्या मीं कधीं केल्या नाहींत, कारण कोंबडीं व बकरीं ह्यांच्या मांसाखेरीज पोळ्यांत घालण्यास पुरण दुसरें कोणतेंच नव्हतें.

आतां माझ्या धान्याचा संचय वाढत चालल्यामुळें मला कोठारेंही पहिल्याहून मोठीं बांधणें भाग पडलें. कारण ह्यावेळीं धान्याचें उत्पन्न

इतकें वाढलें होतें कीं, सुमारें २० बुशेल जव व तितकेंच किंवा त्यांही पेक्षां जास्त भात इतकें धान्य मजपाशीं झालें. तेव्हां तीं धान्यें किंचित् सढळ हातानें खर्चण्याचा मीं निश्चय केला. तसेंच सगळ्या वर्षाला अजमासें किती धान्य लागेल हें पाहून वर्षांत एकदाच दाणा पेरावा असा विचार मीं मनांत आणिला.

हीं वर सांगितलेलीं कामें मी करीत असतां ह्या बेटाच्या दुसऱ्या बाजूकडून जी जमीन माझ्या दृष्टीस पडली होती, तीविषयीं माझ्या मनांत पुष्कळ वेळ विचार आले. तेथें मी असतों तर बरें होतें, अशी माझ्या मनांत कल्पना येत असे. कारण मला वाटे कीं, महाद्वीप व वस्तीचा प्रदेश ह्यांत जर मी असतों तर तेथून पुढें जाण्याला कांहींना कांहीं तरी मार्ग सांपडता, आणि कदाचित् शेवटीं ह्या विपत्तींतून सुटण्याचाही उपाय सांपडता.

ह्या वेळेस माझा पोऱ्या जूरी व, ज्या लांबोळ्या होडींत बसून आफ्रिकेच्या किनाऱ्यानें मीं हजार मैलांपेक्षां अधिक जलपर्यटन केलें, ती होडी, हीं दोन असतीं तर बरें होतें, असें मला वाटूं लागलें. परंतु तें वाटून कांहीं उपयोग नव्हता. तेव्हां मनांत आलें कीं, पूर्वीं सांगितल्या प्रमाणें आमचें जहाज वादळानें फुटलें तेव्हां त्यावरील होडी किनाऱ्यावर लांबपर्यंत जाऊन पडली होती ती जाऊन पहावी. ती बहुत करून पहिल्यानें पडली होती त्याचजागीं होती; आणि वारा व लाटा ह्यांच्या झपाट्यानें वाळवंटांतील वाळूच्या एका उंच ढिगाशीं ती इतकी कलली होती कीं, बहुतेक पालथीच होण्याचा बेत आला होता, पण पूर्वीं प्रमाणें तिच्या भोंवतीं पाणी नव्हतें.

होडी पुनः नीट करून पाण्यांत लोटण्यापुरतीं माणसें असतीं, तर तिचा मला चांगला उपयोग झाला असता; आणि तींत बसून मला सहज ब्राजिल देशास जातां आलें असतें; परंतु हें बेट उचलून नेणें मला जितकें अशक्य होतें, तितकेंच ही होडी वळवून उताणी करणें अशक्य होतें.

शेवटीं अशी कल्पना मनांत येऊं लागली कीं, त्या देशचे लोक जसे मोठमोठाल्या झाडांचीं खोडें घेऊन त्यांचे पगार किंवा पडाव तयार करितात, तसा आपणास एक करितां येईल तर पाहावें. हें काम

आपणास करितां येईल इतकेंच केवळ मला वाटलें नाहीं, तर सहज करितां येईल असेंही वाटलें. आणि ती करण्याचे विचार मनांत आणून व त्या शिद्दी किंवा इंदियन लोकांपेक्षां आपणा जवळ हत्यारें वगैरे पगार करण्याचीं साधनें पुष्कळ आहेत, हें मनांत आणून मला फार आनंद झाला. परंतु इंदियन लोकांपेक्षां मला एका गोष्टीची विशेष गैरसोय होती, तिचा मीं मुळींच विचार केला नाहीं. ती गैरसोय ही कीं, होडी तयार झाल्यानंतर ती लोटून पाण्यांत नेण्यास मला मदत मुळींच नव्हती. कल्पना करा कीं, जंगलामध्यें मीं एखादें मोठें झाड शोधून काढून तें मोठ्या श्रमानें तोडिलें, व त्याची होडी तयार केली, आणि इतकी मेहनत करूनही जर ती मला लोटून पाण्यांत नेतां न आल्यामुळें तेथेंच टाकावी लागली, तर तिचा काय उपयोग!

परंतु होडींत बसून जलपर्यटन करण्याच्या कल्पनेंत माझें मन इतकें गढून गेलें होतें कीं, ती मला एकट्याला जमिनीवरून ओढून नेतां येईल कशी, ही शंका माझे मनांत मुळींच आली नाहीं. वास्तविक पाहतां ती जमिनीवर जेथें असेल तेथून ४५ वावें अंतरावरच्या पाण्यापर्यंत नेण्यापेक्षां समुद्रावर ४५ मैल होडी हाकणें मला सोपें होतें.

परंतु माझ्या मूर्खपणास तर सीमाच नाहींशी झाली. जो कोणी यत्किंचितही शुद्धीवर असेल, तो मजसारिखा अविचार खचीत करणार नाहीं. कारण पहा कीं, वरील सर्व अडचणी मनांत न आणितां मी तें होडीचें काम करावयास लागलों. आतां होडी लोटून पाण्यांत नेण्याची अडचण माझ्या मनांत येत नव्हती असें नाहीं; पण ह्या विषयींच्या शंका बंद करण्यास मी आपणास असें उत्तर देई कीं, पहिल्यानें होडी तयार होऊंद्या तर खरी, मग तिला पाण्यांत नेण्यास खचीत कांहींनाकांहींतरी युक्ति सुचेलच.

सुमारें चार महिने मेहनत करून मीं हें काम शेवटास नेलें, तेव्हां मला मोठें समाधान झालें. ती होडी खरोखर इतकी मोठी झाली होती कीं, एवढा पडाव किंवा पगार एका झाडाचा केलेला आजन्मांत मीं कधीं पाहिला नव्हता. आतां तिला पाण्यांत नेऊन सोडण्याचेंच काम राहिलें; आणि हें काम जर का सिद्धीस गेलें असतें; तर, कोणीं कधींच आरंभिलें नसेल, अशा प्रकारचें हें असंभाव्य व मूर्खपणाचें जल-

पर्यंटन मीं आरंभिलें असतें, असें मला खचीत वाटतें. परंतु तिला पाण्यांत नेण्यास ज्या कांहीं युक्ति मीं काढिल्या त्या लागू करण्यास अत्यंत श्रम पडूनही साऱ्या व्यर्थ गेल्या. होडी पाण्यापासून सुमारें २०० हातांपेक्षां अधिक अंतरावर नव्हती. परंतु त्यांत पहिली अडचण ही होती कीं, त्या खाडीच्या बाजूला उंचवटा होता. ही अडचण दूर करण्याकरितां जमीन खणून त्या बाजूस उतरण करावी असा मीं निश्चय केला. ह्या कामास आरंभ करून मीं त्यांत पराकाष्ठेची मेहनतही केली, परंतु आपली सुटका करून घेण्याविषयीं मनांत अत्यंत औत्सुक्य असल्यामुळें त्या मेहनतीबद्दल मीं मुळींच कुरकूर केली नाहीं. परंतु ती अडचण दूर होऊन सुद्धां माझा मूळचा हेतु सिद्धीस गेला नाहींच. कारण पहिली होडी जशी मला हालत नव्हती तशी ही देखील हालेना.

तेव्हां होडी व समुद्र ह्यांच्या मधील अंतर मीं मोजिलें, आणि होडी पाण्याकडे आणितां येत नाहीं असें पाहून पाणीच तिच्याकडे नेण्याकरितां एक कालवाच खणण्याचा मीं निश्चय केला. परंतु जेव्हां हा कारखाना मीं सुरू केला, व आपणास किती खोल, किती रुंद कालवा खणावा लागेल, आणि माती बिती किती काढून टाकावी लागेल, ह्याचा जेव्हां अजमास करूंलागलों, तेव्हां असें दिसून आलें कीं, मी एकटा असल्यामुळें आपल्या दोन हातांनीं हें काम शेवटास नेण्यास मला निदान १०।१२ वर्षें लागतील. कारण जमीन किनाऱ्याकडे इतकी उंच होत गेली होती कीं, वरच्या कडेपासून किनाऱ्याची खोली निदान १५ हात असावी, असें दिसलें. शेवटीं मोठ्या संकटानें हाही प्रयत्न मीं सोडून दिला; आणि ह्या वेळेस मात्र माझ्या लक्ष्यांत आलें कीं, कोणतेंही काम आपले हातून होईल किंवा नाहीं, ह्याचा पुरता अजमास केल्यावांचून त्या कामास आरंभ करणें हा मूर्खपणा होय. परंतु हें आतां लक्ष्यांत येऊन उपयोग काय ?

हें काम चाललें असतां, ह्या बेटावर आल्यापासून माझें चवथें वर्ष संपलें; आणि पूर्वींप्रमाणें येण्याचा वार्षिक दिवस मीं ईश्वरभक्तींत घालविला.

हल्लीं मजविषयीं परमेश्वराचा कृपाळूपणा माझ्या लक्ष्यांत पुरता येऊं लागला; आणि जरी मला सांप्रत हाल व संकटें भोगावीं लागत

होतोंच, तथापि आपल्या स्थितीविषयीं मी त्याचा मोठा आभार मानूं लागलों. आणि जे लोक कांहीं थोडीशी विपत्ति प्राप्त झाली असतां लागलेच म्हणतात कीं, माझ्या सारिखा दुःखी त्रिभुवनांत कोणी सांपडेल काय ? अशा लोकांनीं ह्या गोष्टीचा विचार अवश्य करावा, असें त्यांस सांगितल्यावांचून मला राहवत नाहीं. त्यांनीं असें मनांत आणावें कीं, कांहीं लोकांची स्थिति आपल्या स्थिती पेक्षां किती वाईट असते; व परमेश्वराच्या मनास आलें असतें तर आपली स्थिति ह्याही पेक्षां वाईट झाली नसती काय ?

अशा ह्या विचारांच्या योगानें, आपल्या प्रस्तुत स्थितींत भगवदिच्छेचें अवलंबन करून असण्याविषयीं, व त्या स्थितीबद्दल त्याचा आभार मानण्याविषयीं माझ्या मनाचा दृढ निश्चय झाला. आणि मी अद्यापि जिवंत असून माझ्या पातकांबद्दल मला यथायोग्य दंड झाला नाहीं, हें लक्ष्यांत आणून मीं कोणत्याही गोष्टीचा खेद न करावा, तसेंच अन्नोदकादि ज्या गोष्टी मला प्राप्त होण्याचा यत्किंचित्‌ही संभव नव्हता, त्या परमेश्वराच्या दयेनें प्राप्त झाल्या, व ज्या महा संकटांचें निवारण होण्याची आशाही नव्हती, तीं संकटें त्याचेच दयेनें दूर झालीं, तस्मात् सांप्रतच्या स्थितीबद्दल मुळींच खेद न करितां उलटा आनंद मानून त्याबद्दल नेहमीं आभारी असावें, असा मीं आपल्या मनास बोध केला. कारण पहा कीं, इलयजा ह्याला डोमकावळ्यांनीं पोषिलें, ही जशी एक अमानुष गोष्ट, तशाच प्रकारच्या अनेक अमानुष गोष्टी माझ्या पोषणार्थ घडल्या आहेत, हें मला लक्ष्यांत वागविलें पाहिजे. किंबहुना ह्या ठिकाणीं पडल्यानें जें मला सुख झालें, तें सुख ह्या भूपृष्ठावरील दुसऱ्या कोणत्याही ओसाड प्रदेशांत पडलों असतों तर झालें नसतें, असें मला खचीत वाटलें. कारण हें स्थळ म्हणजे असें होतें कीं जरी एथें सोबत नसणें हें एका प्रकारचें दुःख होतें, तरी व्याघ्र, लांडगे, इत्यादि बुभुक्षित व क्रूर पशु ह्या स्थळीं नसल्यामुळें मला कोणत्याही प्रकारचें भय नव्हतें; व जे भक्षिल्यानें मला अपाय झाला असता असे विखारी प्राणी किंवा दुसरे विषाचे पदार्थही नव्हते, तसेंच रानटी मनुष्याचें भय असेल म्हणावें तर तेंही नव्हतें. सारांश एका प्रकारें माझी स्थिति क्लेशयुक्त होती खरी, तरी तीमध्यें मला सुखेंही पुष्कळ होतीं. आ-

तां ही स्थिति केवळ सुखाची करून घेण्यास, आपणाविषयीं ईश्वराची दया व आस्था हीं मनांत आणून त्यापासून नित्य समाधान मानणें हें मात्र मला पाहिजे; हें असलें म्हणजे झालें. ह्याप्रमाणें सर्व गोष्टींचें मनन करून चित्तवृत्ति स्थिर केल्यावर माझा खेद नाहींसा झाला.

ह्या बेटावर येऊन मला पुष्कळ दिवस झाल्यामुळें आपल्या उपयोगा करितां ज्या पुष्कळ वस्तू मीं गलबतांतून आणिल्या होत्या, त्यांपैकीं कांहीं मुळींच नाहींतशा झाल्या होत्या, व कांहीं नासून अथवा खर्चून संपण्याच्या बेतांत आल्या होत्या. त्यांत विशेषेंकरून माझ्या वस्त्रप्रावरणांचा विशेष क्षय होत चालला. खलाशी लोकांच्या बारदानांत सांपडलेलीं कांहीं चित्र विचित्र रंगांचीं खमिजें मीं जपून ठेविलीं होतीं, त्यांखेरीज दुसरे तागाचे कपडे मला राहिले नाहींत. तीं खमिजें मीं फार जपून ठेविलीं होतीं ह्याचें कारण असें कीं, अनेक प्रसंगीं त्यांखेरीज दुसरें वस्त्र अंगावर घेतलेलें, उष्णतेमुळें, मला सहनच होत नसे आणि ह्या साऱ्या खलाशी लोकांच्या कपड्यांत मिळून सहा छकड्या खमिजें सांपडलीं त्यांचा मला फारच उपयोग झाला.

आजपर्यंत मीं असा क्रम चालविला होताकीं, जितके चतुष्पाद प्राणी मारावे तितक्यांचीं कातडीं, आंत काटक्या घालून पसरून उन्हांत वाळत ठेवावीं. असें केल्यामुळें त्यांपैकीं कांहीं वाळून इतकीं कडक झालीं होतीं कीं, त्यांचा कांहींच उपयोग नव्हता; पण दुसरीं कांहीं फारच उपयोगी पडलीं. पहिल्यानें पावसाचा उपद्रव न लागावा ह्या हेतूनें, एका कातड्याचे केंस बाहेरच्या बाजूस करून त्याची आपल्या डोक्यास घालण्या करितां एक मोठीशी टोपी बनविली. ही टोपी इतकी पसंत साधली होतीकीं पुढें एक सगळा पोषाख मीं नुसत्या कातड्याचाच तयार केला. तो पोषाख असा कीं, एक वास्कूट, व जो घातला असतां गुडघे उघडे राहातील असा एक चोळणा; हीं दोन्हीं अगदीं ढिलीं केलीं होतीं; कारण तीं उबेकरितां केलीं नव्हतीं, तर उष्ण हवेपासून संरक्षण व्हावें म्हणून केलीं होतीं. आतां हे कपडे फारच ओबड धोबड झाले हें मी कबूल करितों; कारण, मी सुताराच्या कामांत अडाणी होतों म्हणून सांगितलेंच आहे, पण त्यापेक्षां शिंप्याच्या कामांत तर फारच अडाणी होतों. तथापि त्यांच्यायोगानें माझी बरीच चालढ-

कल होत असे; आणि ते अंगावर घालून बाहेर पडलों असतां पाऊस पडूं लागला तर, वास्कूट व टोपी ह्यांस बाहेरून केंस असल्यामुळें पावसाचें पाणी बाहेरच्या बाहेर गळून जाऊन माझें आंग अगदीं कोरडें राहत असे.

हें झाल्यावर, छत्रीवांचून माझी फार अडचण होत असे, व ती करण्यांत मीं पुष्कळ दिवस मेहनत केली. कातड्याच्या छत्र्या केलेल्या मीं ब्राजिल देशांत पाहिल्या होत्या. तेथें ऊन फार मखर असल्यामुळें तद्देशीय लोकांस त्यांचा फार उपयोग होतो. आणि हा प्रदेश तर ब्राजिल देशापेक्षां विषुववृत्ताच्या सन्निध असल्यामुळें एथील उष्णता अधिकच असे. दुसरें असेंकीं, मला बाहेर फिरणें फार पडे, त्यामुळें पाऊस व ऊन ह्या दोहोंच्या निवारणार्थ मला छत्रीची जरूरी मनस्वी लागे सबब मीं छत्रीचें काम सुरू केलें; आणि दोन तीन छत्र्या केल्या तरी मनासारिखी होईना. पण शेवटीं सरासरी उपयोगीं पडेल अशी एक तयार करून तिला वरून कातड्याचें आच्छादन घातलें. त्या कातड्याचे केंस वरच्या बाजूस केले होते, त्यामुळें पावसाचा बंदोबस्त चांगला होत असे; व उन्हाचाही बंदोबस्त इतका चांगला होत असे कीं, पूर्वीं अतिशयित थंड हवेंत फिरून मला जें सुख होत असे, त्यापेक्षां छत्री बरोबर असतां अतिशयित उन्हांत फिरून विशेष सुख होत असे.

ह्या पुढें पांच वर्षें पर्यंत एखादी सांगण्यासारिखी विलक्षण गोष्ट घडली असें म्हणवत नाहीं. दर वर्षास जव व भात लावण्यास व मनुका वाळवून ठेवण्यास जो श्रम करावा लागे, व दर रोज बंदूक घेऊन बाहेर जाण्याचा जो मला उद्योग असे, त्या वेगळा, दुसरा एक पगार करण्याचें काम मीं चालविलें होतें. तें काम मीं शेवटीं तडीस नेलें. नंतर सहा फूट रुंद चार फूट ओंड असा एक कालवा, खाडीपासून तो पगार होता तेथपर्यंत, सुमारें पाव कोस खणीत आणून पगार खाडींत आणून सोडिला. आतां पहिल्यानें केलेला पगार तर फारच मोठा होता. एवढा मोठा पगार आपणांस पाण्यांत लोटतां येईल कसा, ह्या गोष्टीचा मीं पूर्वीं विचार करावा, तो केला नाहीं; ह्यामुळें तो मला पाण्यांत नेतां येईना अगर पाणी ही त्याजपाशीं आणितां येईना, म्ह-

णून तो जेथच्या तेथेंच पडूं देणें मला भाग पडलें. तो पगार निरुपयो- गी होऊन तेथेंच पडून राहिल्यामुळें त्याकडे पाहिलें म्हणजे, पुनः तरी विचार केल्यावांचून कोणतीही गोष्ट आपण करूं नये, असा मला बोध होत असे, एवढाच त्याचा उपयोग झाला. आणि वास्तवि- कच दुसरे वेळीं जरी मला पगार करण्याजोगें झाड सांपडलें नाहीं, व पू- र्वीं सांगितल्याप्रमाणें, तेथून पाण्यापर्यंत सुमारें पाव कोसाहून कमी अंतर नव्हतें, इतकी जरी गैरसोय होती, तथापि ही गोष्ट होण्यासारिखी आहे, असें मला शेवटीं दिसल्यावरून मीं पगार करण्याचें काम टाकून दिलें नाहीं. आणि जरी तें काम सुमारें दोन वर्षें चाललें होतें, तथापि अशा क्रमानेंतरी समुद्रांत सफर करण्याला आपणास पगार मिळेल, ह्या आशेनें त्याबद्दल जे श्रम पडले त्यांविषयीं मीं कधीं कुरकुर केली नाहीं.

माझा लहान पगार तयार झाला, तथापि पहिला करिते वेळेस जो हेतु मीं मनांत आणिला होता, तो सिद्धीस नेण्याजोगा हा पगार नाहीं, हा लहान पडला म्हणून तो हेतु, म्हणजे एथून सुमारें वीस कोसांवर मु- ख्य जमीन दिसत होती तेथपर्यंत पडावांत बसून जावें असा माझा संके- त, तो संकेत मीं रहित केला; आणि पुनः ती गोष्ट मनांतसुद्धां आणिली नाहीं. परंतु इतकी मेहनत करून आपण होडी तयार केली तिचा कां- हीं तरी उपयोग झाला पाहिजे, म्हणून तींत बसून बेटा भोंवतीं प्रदक्षि- णा करण्याचा मीं बेत केला. कारण पूर्वीं बेटाच्या मागल्या बाजूस गे- लों होतों त्या वेळेस जे चमत्कार मीं पाहिले त्यांवरून त्या किनाऱ्या- चे दुसरे ही भाग पाहाण्याविषयीं माझे अंतःकरणांत फार उत्कंठा उत्प- न्न झाली होती. परंतु जें करणें तें विचार पूर्वक केलें पाहिजे हें मनांत आणून मीं आपल्या होडीस एक लहानशी डोलकाठी तयार केली, व गल- बताच्या अवजारांचे तुकडे मजपाशीं पुष्कळ सांठविलेले होते त्यांपैकीं कांहीं तुकड्यांचें एक अवजार ही तयार केलें. नंतर खाण्याचे पदार्थ व दारूगोळा वगैरे सामान पावसानें व लाटांच्या तुषारांनीं न भिजावें म्हणून तें ठेवण्याकरितां लहान लहान खण तयार केले; व बंदूक ठेव ण्याकरितां चिचोळी, खोल, व लांब अशी एक जागा केली, आणि त्या जागीं बंदूक ठेविली असतां न भिजावी म्हणून तीवर एक झडप बसविली.

कराभाजवळ ज्या जागीं डोल्काठी बसवितात त्या जागीं मीं आपली छत्री बसविली; ती माझ्या डोक्यावर चांदव्यासारिखी होऊन तिच्या योगानें उन्हापासून माझा चांगला बचाव होत असे. ह्याप्रमाणें तयारी करून मी समुद्रांत कधीं कधीं लहान लहान सफरी करूं लागलों; परंतु कधीं ही फारसा दूर जात नसें. शेवटीं आपल्या ह्या लहानश्या राज्याचा घेर पाहण्याविषयीं माझी उत्कंठा फार वाढून, होडींत बसून बेटा भोंवतीं एक प्रदक्षिणा करण्याविषयीं माझा दृढ निश्चय झाला. तेव्हां मीं होडींत अन्न पाण्याची वगैरे बेगमी नेऊन केली.

एथें राज्य करूं लागल्यापासून, किंवा बंदींत पडल्या पासून असें ही पाहिजे तर म्हणा, सहावे वर्षी नोवेंबर महिन्याचे सहावे तारिखेस मी त्या जलपर्यटनास निघालों. ह्या पर्यटनास जितका वेळ लागेल असें मला वाटलें होतें, त्यापेक्षां जास्त लागला; कांतर जरी बेट स्वतः फारसें मोठें नव्हतें, तरी जेव्हां मी त्याच्या पूर्वेकडील बाजूस आलों, तेव्हां एक मोठा खडकाचा फांटा सुमारें तीन कोस समुद्रांत गेलेला दृष्टीस पडला. त्या फांट्याचा कांहीं भाग पाण्याच्यावर दिसत होता, व कांहीं पाण्यांत बुडालेला होता; आणि त्याच्या पलीकडे सुमारें पाऊण कोस पर्यंत कोरडें वाळवंट होतें. तेव्हां तो खडक व हें वाळवंट ह्यांना वळसा घालण्याकरितां समुद्रांत पुष्कळ लांब पावेतों गेलें पाहिजे असें दिसलें. पहिल्यानें जेव्हां खडक वगैरे माझ्या दृष्टीस पडले तेव्हां समुद्रांत मला किती लांब जावें लागेल ह्याचा अजमास न समजल्यामुळें तें साहसकर्म सोडून देऊन परत येण्याच्या बेतांत मी होतों त्या हेतूनें मीं नांगरही टाकिला; आणि होडीचा नीट बंदोबस्त करून आपली बंदूक घेऊन किनाऱ्यावर गेलों. नंतर तेथील एका टेंकडीवरून तो खडक टोंकापर्यंत दिसेल असें वाटल्यावरून तीवर मी चढलों.

त्या टेंकडीवर उभा राहून मी समुद्राकडे पाहत असतां, पूर्व दिशेस वाहत जाणारा व त्या खडकाच्या टोंकाला अगदीं भिडणारा, असा एक जबर व मोठ्या झपाट्याचा प्रवाह माझ्या दृष्टीस पडला. त्याकडे माझें विशेष लक्ष लागलें, कारण, मला असें भय पडलें कीं, जर मी त्यांत शिरलों, तर त्याच्या जोरानें समुद्रांत दूर जाईन, आणि मग कदा-

किंतु मला ह्या बेटापाशीं पुनः येववणारही नाहीं, आणि वास्तविकच जर मी त्या टेंकडीवर पहिल्यानें गेलों असतों, तर, मला वाटतें, माझी तशीच अवस्था झाली असती. कारण बेटाच्या दुसऱ्या बाजूस तोच प्रवाह वळलेला होता. त्यांत इतकेंच कीं, तो बऱ्याच अंतरावरून जात होता. त्याखेरीज किनाऱ्याच्या खालच्या बाजूस एक जोराचें फुगें होतें, त्यामुळें त्या पहिल्या प्रवाहांतून पलीकडे गेलों असतों म्हणजे तत्क्षणींच त्या फुग्यांत सांपडलों असतों.

ह्या ठिकाणीं मीं दोन दिवस पर्यंत मुकाम केला; कारण कीं, वारा पूर्व व नैर्ऋत्य ह्या दिशांमधून बऱ्याच जोरानें वाहत होता, म्हणजे त्या प्रवाहाच्या उलट्या दिशेकडचा होता; म्हणून त्या टोंकापाशीं लाटांची मोठी खळखळ चालली होती, तीमुळें किनाऱ्यास अगदीं चिकटून राहण्याचीही सोय नव्हती; व त्या प्रवाहाच्या भीतीनें फार दूर जाण्याची ही सोय नव्हती. नंतर दुसरे दिवशीं रात्रीं वारा पडल्यामुळें तिसरे दिवशीं सकाळीं पाहिलें तों समुद्र अगदीं शांत झाला होता; तेव्हां मी धैर्य धरून होडी हांकारिली; परंतु सर्व साहसी व अज्ञानी नाविक लोकांनीं माझी गोष्ट ऐकून सावध व्हावें,. कारण मी त्या टोंकाजवळ येऊन किनाऱ्या पासून एका हाकेच्या अंतरावर आलों न आलों तोंच फार खोल पाण्यांत जाऊन पाणचक्कीच्या सांडीसारख्या प्रवाहांत आलों. त्या प्रवाहानें माझी होडी इतक्या जोरानें ओढून नेली कीं, मीं आपली पराकाष्ठा केली तरी त्याच्या कडेसुद्धां माझ्यानें होडी राखवेना. आणि पूर्वी सांगितलेलें फुगें माझ्या डाव्या हाताकडे होतें, त्यापासून फार दूर दूर झपाट्यानें होडी चालली आहे असें माझ्या दृष्टीस पडलें. ह्या वेळेस मला वाऱ्याचें साह्य मुळींच नव्हतें, त्यामुळें मीं पाहिजे तितक्या जोरानें वल्हीं मारिलीं तरी तीं व्यर्थच. तेव्हां मात्र माझे आयुष्याचें दिवस भरले, असें मला वाटूं लागलें. कारण बेटाच्या दोन्ही ही बाजूंस प्रवाह असल्यामुळें कांहीं कोसांच्या अंतरावर ते प्रवाह मिळाले पाहिजेत असें मला ठाऊक होतें, तेव्हां अर्थातच त्यांतून सुटण्याचा किंवा तो मुळींच टाळण्याचा कांहींच संभव नव्हता; म्हणून मला पुढें जगण्याची मुळींच आशा दिसेना. मी मरणार तर समुद्रांत बुडून मरणार असें नव्हे; कांतर समुद्र अगदीं शांत

होता; तर उपासमार होऊन मरणार असें होतें. आतां ही गोष्ट ख-री कीं, मला उचलण्यासही कठीण पडलें एवढें मोठें एक कासव किना-ऱ्यावर मला सांपडून मीं तें होडींत आणून ठेविलें होतें; व गोड्या पा-पाण्यानें भरलेली एक सुरईही होती; पण ज्या अफाट समुद्रांत मी वा-हत जाणार होतों, व ज्यांत हजारों कोस पर्यंत किनारा, किंवा महा-द्वीप, अथवा बेट वगैरे कांहीं लागण्याचा संभव नव्हता, अशा ठिका-णीं मला एवढ्याशा अन्नपाण्याचा काय उपयोग होणार होता ?

तथापि मीं अत्यंत श्रम करून आपली होडी उत्तरेकडे, म्हणजे प्र-वाहाच्या ज्या बाजूस तें फुगें होतें त्या बाजूस, राखवली तितकी राखि-ली. तेव्हां मध्यान्हाचे सुमारास नैर्ऋत्य व दक्षिण ह्यांच्या मधील दिशे-कडून थोडीशी वाऱ्याची झुळूक माझ्या तोंडावर आली, असा भास झा-ला ह्या योगानें व विशेषतः पुढें सुमारें घटकेनें दीड घटकेनें तीच झुळूक एकसारखी मंद मंद गतीनें वाहूं लागली, ह्या योगानें मला आनंद झाला. एवढ्या अवकाशांत माझी होडी बेटापासून फारच दूर गेली; आणि जर का तितक्यांत अभ्रांनीं किंवा धुक्यानें दिशा धुंद झाल्या असत्या; तर तिकडूनही मी नाश पावलों असतों. कारण जर एकदां बेट दिसें-नासें झालें असतें, तर होडींत मजपाशीं होकायंत्र नसल्यामुळें, त्याकडे होडी हांकारण्याचें मला अगदीं समजतें ना. परंतु आकाश एकसार-खें निरभ्र राहिल्यामुळें मीं डोलकाठी उभी करून शीड पसरिलें, आणि प्रवाहांतून निघण्याकरितां हांकवली तितकी उत्तरेस होडी हांकिली.

मीं डोलकाठी व शीड उभारिल्यावर होडी झपाट्यानें जाऊं लाग-ली; तोंच पाण्याच्या स्वच्छतेवरून, जवळच त्या प्रवाहांत कांहीं तफा-वत झाली असावी असें मला वाटलें. कारण जेथें प्रवाह जोरानें चाले तेथें पाणी फार गढूळ झालें होतें; पण पाणी निर्मळ दिसलें तेथें त्याचा वेग मंद झालेला दृष्टीस पडला. पुढें पूर्व दिशेस सुमारें अर्ध कोसावर ए-का खडकावर लाटा फार जोरानें आपटत आहेत, असें दिसलें. ह्याच खडकाच्या योगानें पूर्वोक्त प्रवाह पुनः दुभागला होता; आणि त्याचा एक भाग त्या खडकाला ईशान्येस टाकून मोठ्या वेगानें दक्षिणेकडे व-ळला होता; व दुसरा भाग त्या खडकानें मागें हटविल्यामुळें परतू न

ल्याचे एक जोरदार फुगें झालें होतें; आणि तेथून पुनः परतून अतिशयित वेगानें वायव्य दिशेस वाहत गेला होता.

फांशीं जाण्याकरितां शिडीवर चढला असतां जर फाशीं देणें तहकूब ठेवण्याचा हुकूम आला, किंवा चोर अतां ठार मारणार इतक्यांत त्यांचे हातून कोणीं सोडविलें, तर अंतःकरणाची स्थिति कशी होते हें ज्यांस ठाऊक असेल; अथवा ह्याच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्या प्राणांतिक संकटांत पडून ज्यांचे अकस्मात् रक्षण झालें असेल, त्यांला, ह्या प्रसंगीं मला किती हर्ष झाला असवा, हें सहज समजेल. अतिशयित आनंदानें मीं आपली होडी त्या फुग्याच्या प्रवाहांत घातली, आणि वाराही जोरावल्यामुळें मोठ्या औत्सुक्यानें शीड चढविलें. पुढें लवकरच मी बेटाजवळ येऊन पोहोंचलों; आणि किनाऱ्यावर उतरल्यानंतर लागलेंच परमेश्वरानें अशा महासंकटापासून आपणास सोडविल्या बद्दल गुडघे टेंकून मी भक्तिपूर्वक त्याचें स्तवन केलें. आणि त्या होडींत बसून एथून आपली सुटका करून घेणें पुनः मनांतसुद्धां आणावयाचें नाहीं असा मीं निश्चय केला. नंतर खावयास जें कांहीं घेतलें होतें तें खाऊन पाणी पिऊन हुशार झाल्यावर मीं आपली होडी, किनाऱ्यापाशीं एका झाडाखालीं सोईची जागा होती, तींत आणून ठेविली. आणि सफर केल्यामुळें मनस्वी आयास होऊन अगदीं थकून गेलों होतों, म्हणून तेथेंच पडून झोंप घेतली.

आतां होडी घेऊन घरीं कोणत्या वाटेनें जावें, हें मला अगदीं सुचेना. मीं ज्या वाटेनें आलों होतों तींत मला जिवावरचीं संकटें भोगावीं लागलीं, म्हणून त्या वाटेनें आण्याचें मनांत सुद्धां आणवेना. बरें, दुसऱ्या बाजूनें म्हणजे पश्चिमेकडून तरी कसा काय मार्ग असेल, हेंही ठाऊक नव्हतें; व आपला जीव पुनः धोक्यांत घालण्यास माझें मन घेईना; म्हणून दुसरे दिवशीं सकाळीं किनाऱ्याच्या बाजूनें पश्चिमेस जाऊन एखादी खाडी असली तर पहावी, आणि तींत होडी नीट तजविजीनें ठेवावी, म्हणजे गरज पडेल तेव्हां तिचा उपयोग करितां येईल, असा बेत करून सुमारें दीड कोस पर्यंत मी किनाऱ्याचे बाजूनें गेलों, तों एक खाडी दृष्टीस पडली. ती चिंचोळी होत होत एका ओह्यापर्यंत गेली होती; त्या ठिकाणीं होडी ठेवण्याला फार सोईची जागा सांपडली.

ती जागा जणूकाय होडीकरितां लहानशी गोदीच बांधिल्यासारिखी उपयोगीं पडली. त्या जागेंत होडी हांकारून नेऊन मीं तिचा नीट बंदोबस्त केला, आणि चोहींकडे दृष्टि देऊन, आपण कोणत्या प्रदेशांत आहों, ह्याचा विचार करण्याकरितां मी किनाऱ्यावर गेलों.

ह्या गोष्टीचा तपास करितां, पूर्वीं त्या किनाऱ्यावर ज्या ठिकाणीं मी पायीं चालत गेलों होतों, त्या ठिकाणापासून मी हल्लीं फारशा अंतरावर नाहीं, असें लवकरच कळून आलें. तेव्हां होडींतून फक्त बंदूक व छत्री घेऊन मी वाट चालूं लागलों. मी नुक्ताच जी सफर करून आलों होतों, तिच्या संबंधानें पाहिलें असतां ही वाट चालणें मला पुष्कळ सुखावह वाटलें; आणि संध्याकाळीं मी आपल्या मंडपांत जाऊन पोहोंचलों, तेव्हां त्यांतील हरएक वस्तू मीं जातांना जशी ठेविली होती, त्याच स्थितींत हल्लीं आहे, असें दृष्टीस पडलें. मीं कुंपणावर चढून आंत उडी टाकिली, आणि हात पाय अगदीं थकले होते, म्हणून विश्रांति घेण्याकरितां सावलींत पडलों, तों मला गाढ झोंप लागली; परंतु इतक्यांत राबिन, राबिन, राबिनक्रूसो, बापड्या राबिनक्रूसो, तूं कोठें आहेस? राबिनक्रूसो, तूं कोठें आहेस? तूं कोठें गेला होतास? अशा अनेक वार माझ्या नांवानें कोणीं हाका मारून मला जागें केलें. तेव्हां मी किती चकित झालों असेन हें वाचणारांनीं मनांत आणावें.

पहिल्यानें मला इतकी गाढ झोंप लागली होती कीं, त्या हाकांनीं मी प्रथमतः पुरा जागा झालों नाहीं; परंतु धड झोंपेंतही नाहीं, व धड जागाही नाहीं, असा कांहींसा गुंगींत असून मला वाटलें कीं, स्वप्नांत मजशीं कोणी बोलत आहे. पण राबिनक्रूसो, राबिनक्रूसो, असा ध्वनी एक सारिखा चालूच होता, त्यामुळें मी शेवटीं बराच जागा झालों; आणि पहिल्यानें अतिशयित भिऊन मोठ्या झपाट्यानें दचकून उठलों; परंतु मीं डोळे उघडिले न उघडिले तोंच कुंपणाच्या शेंड्यावर माझा राघू बसलेला दृष्टीस पडला. तेव्हां लागलेंच लक्ष्यांत आलेंकीं, मला ज्यानें हाका मारिल्या तो हाच. कारण तो जसा विवळून करुणास्वरानें मला हाका मारीत होता, तसाच मीही हेल काढून त्याजबरोबर बोलून त्याला शिकवीत असें. मीं जें त्याला शिकविलें होतें, त्यांत तो इतका तरबेज झाला होता कीं, तो माझ्या हाताच्या बोटावर बसून, आप-

ली चोंच माझ्या तोंडास लावून, राबिनसनक्रूसो, राबिनसनक्रूसो, तूं कोठें आहेस ? तूं कोठें गेला होतास ? तूं एथें कसा आलास ? इत्यादि शिकविलेलें सारें बोलत असे.

मी ह्या बेटांत आल्यापासून हल्लीं अकरावें वर्ष चाललें होतें. ह्या वेळेस मजजवळचा दारूगोळा संपत आला होता, त्यामुळें बकरे जीवंत सांपडतील तर पाहण्या करितां फांस अथवा जाळें ह्यांत त्यांस धरण्यास कांहीं युक्ति काढण्याच्या तजविजीस मी लागलों. प्रथम मीं कांहीं सांपळे लावून ठेविले. त्यांत बकरे बरेच सांपडले असावे, असें मला वाटतें; पण सांपळ्यांस बांधण्याला मजजवळ तार नसल्या मुळें मी दोरीच बांधीत असें; व ती बळकट नसल्यामुळें तोडून आंतील खाण्याचा पदार्थ ते खाऊन जात, असें हमेशा मला आढळे. शेवटीं बकऱ्यांस फसवून खळग्यांत पाडण्याचा मीं बेत केला; आणि कित्येक मोठमोठाले खळगे खणून, त्यांवर मीं स्वतः केलेल्या ताट्या घातल्या व त्यांवर मोठें दडपण ठेविलें. नंतर कितीएक वेळां सांपळा न लावितां जवाचीं कणसें व वाळलेलें भात मीं त्या खळग्यांत घालून ठेविलें. परंतु तेथेंही बकरे येऊन खाऊन जात, असें त्यांच्या पावलांच्या खुणांवरून दृष्टीस पडे. सरते शेवटीं मीं एके दिवशीं एकदम तीन सांपळे लावून ठेविले; आणि दुसरे दिवशीं सकाळीं जाऊन पाहूं लागलों तों, सांपळे जशाचे तसे उभे होते, पण त्यांत खावयास ठेविलेलें खाऊन ते पळून गेले असें नजरेस आलें. ह्यामुळें तर माझी हिम्मत अगदीं खचली. तथापि पुनः मीं सांपळे बदलून मांडिले, आणि एके दिवशीं सकाळीं जाऊन पाहूं लागलों तों एका सांपळ्यांत एक मोठा म्हातारा बोकड, व दुसऱ्यांत तीन करडें अडकलेलीं माझ्या दृष्टीस पडलीं. त्या करडांपैकीं एक नर होता व दोन माद्या होत्या.

त्या म्हाताऱ्या बोकडाचें काय करावें हें मला सुचेना. तो इतका उग्र होता कीं, सांपळ्यांत त्यापाशीं जाऊन त्यास धरण्यास मला धैर्य होईना. आतां मला तो मारावयाचा असता तर मीं केव्हांच मारून टाकिला असता; पण त्यास मारून माझा हेतु सिद्धीस न जाता. सबब मीं त्यास सोडून दिलें. तेव्हां तो गर्भगलित झाल्यासारिखा होऊन पळून गेला. परंतु क्षुधेनें सिंहही दीन होऊन हातीं सांपडतो, मग

बकऱ्याची काय कथा! ही गोष्ट मागून माझ्या लक्ष्यांत आली. जर मीं त्याला तीन चार दिवस तेथेंच उपाशीं राहूं दिलें असतें, आणि मग थोडा दाणा पाणी त्यापाशीं नेला असता, तर तो करडाप्रमाणें गरीब झाला असता; कारण हे प्राणी फार चतुर असतात. त्यांच्याशीं ममतेनें वागणूक केली असतां ते अगदीं हुकमी होऊन राहतात.

असो, तथापि ह्यावेळीं मला चांगली युक्ति सुचेना, म्हणून मीं त्याला सोडून दिलें; आणि त्या तीन करडांपाशीं जाऊन त्यांपैकीं एकेक धरून तिन्हीं एकाच दावणीला बांधून टाकिलीं, व वाटेनें थोडे श्रम पडले तरी ते सोसून मी त्यांस घरीं घेऊन आलों.

पुष्कळ वेळपर्यंत तीं कांहीं खाईनातच; पण जेव्हां थोडें मिष्ट धान्य मीं त्यांपुढें ठेविलें, तेव्हां त्याच्या लालुचीनें तीं खाऊं लागलीं. आतां मला असें दिसून आलें कीं, माझा दारूगोळा संपला म्हणजे बकऱ्याचें मांस मिळण्याचा उपाय म्हटला तर बकरीं पाळून वाढविणें, एवढाच आहे. आणि तीं पाळिलीं असतां कदाचित् शेळ्यांचा कळपच माझ्या घराभोंवतीं जमेल, असें वाटलें.

परंतु पुनः दुसरी एक गोष्ट सुचली, ती अशी कीं, शेळ्या पाळणें तर, पाळींव शेळ्यांचा रानटी शेळ्यांशीं अगदीं संबंध तोडिला पाहिजे. कारण, तसें न केलें तर रानटी शेळ्यांबरोबर ह्याही वाढल्या म्हणजे रानांत पळून जाण्यास कधीं चुकणार नाहींत. तर हें न होण्याचा मला एकच उपाय दिसला; तो हा कीं, एकाद्या जाग्याला कुंपण किंवा मेढा इतका मजबूद घालावा कीं, त्यांत त्या सुरक्षित राहून, तें फोडून आंतल्यांना बाहेर किंवा बाहेरच्यांना आंत जातां येऊं नये.

हें काम मीं लवकरच शेवटास नेलें; नंतर सुमारें दीडवर्षांत करडें, शेळ्या मिळून एकंदर १२ जनावरांचा कळप मजपाशीं झाला; आणि पुढच्या दोन वर्षांत तर ४० बकरीं जमलीं. ह्यांवेगळीं खाण्यासाठीं मीं कित्येक धरून मारिलीं होतींच. तीं मला हावीं तेव्हां मिळावीं म्हणून तीं कोंडण्यासाठीं मीं निरनिराळ्या ठिकाणीं कुंपणें घालून पांच वाडगीं तयार केलीं; आणि एका वाडग्यांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत असें जातां यावें, म्हणून त्यांना फाटकें केलीं. ह्या सर्व व्यवस्थेमुळें मला बकऱ्यांचें मांस खावयास मिळूं लागलें इतकेंच

नाहीं, तर दूध ही मिळूं लागलें. दुधाविषयीं तर पहिल्यानें माझे मनांत काडीमात्र कल्पनाही नव्हती, आणि ती एकाएकी सुचल्यामुळें मला खरोखरच फार आनंद झाला. कारण माझें दुधाचें बस्तान इतकें चांगलें बसलें कीं, कधीं कधीं एका दिवसांत दहा पांच शेर दूध निघूं लागलें. विश्वस्रष्टा ज्याप्रमाणें प्राणिमात्रास अन्न पुरवितो, त्याचप्रमाणें त्या अन्नाचा उपयोग कसा करावा हें स्वभावतः कळण्याची त्याचे अंगीं शक्तिही देतो. ह्यास दृष्टांत माझाच पहा कीं, मीं आजन्मांत कधीं गाईचेंसुद्धां दूध काढिलें नव्हतें, मग शेळीचें कोठून काढणार, व लोणी किंवा चक्का कसा बनतो हें कधीं दृष्टीनेंही पाहिलें नव्हतें; असें असतां लोणी व चक्का करण्याची कृती मला फार पसंत साधली. इतकेंच कीं, कांहीं वेळ यत्न करून फसावें मात्र लागलें; परंतु एकदा करितां येऊं लागल्यावर पुढें कधीं मला त्याची ददात पडली नाहीं.

जी स्थिति प्राप्त झाली असतां प्राणिमात्रास वाटतें कीं, मी सर्व प्रकारें संकटांनीं ग्रासून गेलों आहें, व आतां ह्या स्थितींतच माझा लय होणार, अशा अति नीच अवस्थेंत देखील दयाळु परमेश्वर कसा सांभाळ करितो पहा! तसेंच त्याच्या दयेनें अत्यंत दुःखास्पद गोष्टी किती सुखप्रद होतात! फार कशाला, आपण प्रत्यक्ष बंदिखान्यांत किंवा अंधारकोठडींत पडलों असतां, तशा स्थितींत देखील आपण त्याचे गुणच गावे ह्याविषयीं अनेक कारणें तो दर्शवितो. पहावें, ह्या घोर अरण्यांत, जेथें प्रथमतः उपाशीं मरण्यावांचून गत्यंतर नाहीं, असें मला वाटलें होतें, तेथें परमेश्वरानें कोणत्या प्रकारचें अन्न मला प्राप्त करून दिलें तें!

मी आपल्या स्वल्प परिवारासहवर्तमान डौलानें जेवावयास बसें, तेव्हां एखाद्या इंद्रियासंगी मनुष्यानें मला पाहिलें असतें तर त्यास हंसें आल्यावांचून राहिलें नसतें. पाहा कीं साऱ्या बेटावर अम्मल चालविणारा प्रभु काय तो मींच. माझ्या सर्व प्रजांच्या प्राणांवर माझी पूर्ण सत्ता. कोणाला फांशीं देणें, कोणाचीं आंतडीं बाहेर काढणें, कोणाला सोडून देणें, कोणाला बंदींत घालणें, ह्या सर्व गोष्टी करण्याचा मला पूर्ण अधिकार होता. माझ्या रयतेंत दंगेखोर म्हणून बिलकुल

कोणी नव्हतें. तसेच माझे चाकर लोक भोंवतालीं हुकूम बजाविण्यास तत्पर असून त्यांमध्यें मी एकटा राजासारिखा जेवावयास बसें, ती एक पाहण्यास मोठी मौजच होती. माझा राघू ह्या जणूं काय आवडता, म्हणून त्याला एकट्यालामात्र मजबरोबर बोलण्याची परवानगी असे. माझा कुत्रा वृद्धपणामुळें चळल्यासारिखा झाला होता, तो नेहमीं माझ्या उजव्या हाताकडे बसे. आणि दोन्ही मांजरें मेजाच्या दोहों बाजूंस बसून, माझ्या विशेष लोभाचें चिन्ह एखादा माझ्या हातचा तुकडा मधून मधून मिळेल ह्या आशेनें टकटक पाहत बसत.

पूर्वीच्या रपेटीचें वर्णन करितांना मीं सांगितल्या प्रमाणें किनाऱ्याची रचना कशी आहे व प्रवाह कसा चालला आहे, हें पाहण्याकरितां ज्या टेंकडीवर मी पूर्वीं गेलों होतों, तेथें पुनः जाण्याविषयीं माझे मनांत उत्कंठा उत्पन्न होत चालली. ही उत्कंठा दिवसानुदिवस वाढत जाऊन शेवटीं खुष्कीच्या मार्गानें मीं तेथें जाण्याचा निश्चय केला; मग किनाऱ्याच्या बाजूनें मी तेथपर्यंत गेलों. ह्या पर्यटनाचे वेळेस माझा वेष फार विलक्षणच होता. मजसारिखी मूर्ति इंग्लंदांत जर कोणाच्या दृष्टीस पडती, तर तो खचीत भ्याला असता, किंवा त्यास पराकाष्ठेचें हांसें तरी आलें असतें. मी वारंवार आपल्या शरीराकडे पाहत उभा राहीं, तेव्हां, असला पोषाख घालून ह्या इतमामानिशीं मी यार्कशयर नांवाच्या प्रांतांत फिरलों असतां जी मजा होईल, ती मनांत येऊन मला फार हांसें येई. आतां मी आपल्या मूर्तीचें वर्णन करितों त्याकडे वाचकांनीं कृपा करून लक्ष्य द्यावें.

माझ्या डोक्यावर एक मोठी व उंच पण अगदीं बेढब अशी बोकडाच्या कातड्याची टोपी होती, व मानेस ऊन किंवा पाऊस ह्यांचा उपद्रव न व्हावा म्हणून त्या टोपीच्या मागल्या बाजूस त्याच कातड्याचा तुकडा लोंबत लाविला होता. माझ्या आंगांत बोकडाच्या कातड्याची एक आंखूडशी बंडी होती, तिचा घेर माझ्या अर्ध्या मांडीपर्यंत पोहोंचत असे. त्याच कातड्याचा एक चोळणा मीं घातला होता, त्याला गुडघ्याशीं भोंकें असत; आणि तो एका म्हाताऱ्या बोकडाच्या कातड्याचा केला होता, त्यामुळें त्याचे केंस इतके लांबपर्यंत लोंबत कीं, त्यांच्या योगानें विजारीप्रमाणें पोटरीपर्यंत माझे पाय झांकले जात.

पायमोजे व जोडे हे तर मला नव्हतेच माझ्या कमरेस बकऱ्याच्या वाळलेल्या कातड्याचा एक पट्टा होता; व पडदळास जशीं हत्यारें ठेवण्याचीं भोंकें असतात, तशीं त्या पट्ट्यास भोंकें करून, त्यांत तरवार व कट्यार ह्यांचे ऐवजीं एक करवत व एक कुऱ्हाड अशीं दोन हत्यारें दोहों बाजूंस अडकविलीं होतीं. दुसरा एक पट्टा वरच्यापेक्षां रुंदीला किंचित् कमी, असा खांद्यावरून बांधिला होता; व डाव्या आंगास त्याच्या शेवटाला बोकडाच्याच कातड्याच्या दोन पिशव्या अडकविल्या होत्या. त्यांपैकीं एकींत बंदुकीची दारू व दुसरींत छर्रे भरले होते. पाठीशीं एक टोपली होती, तशीच खांद्यावर बंदूक, आणि डोक्याच्यावर बोकडाच्याच कातड्याची बोजड व बेढब अशी एक छत्री होती. ही छत्री कितीही वाईट असली तरी फक्त बंदूक शिवाय करून छत्रीप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही वस्तूचा उपयोग होत नसे.

सारांश, अशा प्रकारच्या पोषाखानिशीं मी हें नवें पर्यटन करावयास निघालों; आणि सुमारें पांच सहा दिवस चालत होतों. समुद्राच्या कांठानें जातजात, पूर्वी ज्या ठिकाणीं मी आपली होडी नांगरून ठेविली होती, तेथेंच पहिल्यानें गेलों; आणि पूर्वीप्रमाणें आतां होडीची वगैरे कांहीं काळजी नसल्यामुळें जमिनीवरून जवळच्या काटेनेंच, पूर्वी जितक्या उंचीवर गेलों होतों, तितक्या उंचीवर चढलों. नंतर त्या खडकाचें जें टोंक पाण्यांत शिरलें होतें, व ज्यास मला होडींत बसून वळसा घालावा लागला होता, त्याकडे नदर फेंकली. तेव्हां समुद्राच्या त्या भागांत खळबळ किंवा प्रवाह मुळींच नसून इतर भागांप्रमाणें तो अगदीं स्थिर आहे, असें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें.

ह्याच ठिकाणीं पूर्वी प्रवाहाच्या योगानें मला अत्यंत क्लेश भोगावे लागले, आणि आतां तेथें अगदीं संथ पाणी आहे, ह्याचें कारण काय असावें, हें मुळींच लक्ष्यांत येईना. तेव्हां भरती ओहोटीच्या योगानें असें होतें कीं काय ह्याचा शोध करण्यांत कांहीं वेळ खर्चावा, असा मीं निश्चय केला. परंतु किंचित् विचार केल्यानें लवकरच त्या गोष्टीचें कारण माझे ध्यानीं आलें. तें असें कीं, ओहोटीचा आरंभ पश्चिमेकडून होऊन किनाऱ्यावरील एखाद्या मोठ्या नदीशीं त्याचा मिलाफ झाल्यामुळें हा प्रवाह उत्पन्न झाला असावा; आणि त्याच संधीस प-

दक्षिणेकडून वाराचा वारा सुटला तर तो प्रवाह किनाऱ्याजवळ येतो, व उत्तरेकडून सुटला म्हणजे तो किनाऱ्यापासून दूर जातो. ही गोष्ट लक्ष्यांत येण्याचें कारण असें झालें कीं, मी सायंकाळपर्यंत तेथेंच आसपास फिरत होतों; व सायंकाळीं ओहटी सुरू झाली तेव्हां पुनः त्या खडकावर पाहिलें, तों पहिल्याप्रमाणें तो प्रवाह स्पष्ट दृष्टीस पडला. त्यांत भेद इतकाच कीं, ह्यावेळेस तो किनाऱ्यापासून सुमारें पाऊण कोस दूर होता, व पूर्वी मी गेलों तेव्हां तो किनाऱ्यास अगदीं लागून चालला होता; आणि त्यामुळेंच माझी होडी समुद्रांत झुकली, ती इतर वेळेस झुकली नसती.

हा प्रकार पाहिल्याकरून माझी खातरी झाली कीं, फक्त भरती ओहटीचें संधान राखिलें, तर मला बेटा भोंवतीं होडी पुनः सहज फिरवून नेतां येईल. परंतु ही गोष्ट प्रत्यक्ष करून पाहण्याचें मनांत आणूं लागलों, तेव्हां, ह्या कृत्यांत पूर्वी मला जीं संकटें भोगावीं लागलीं होतीं, त्यांचें स्मरण होऊन अशी कांहीं धास्ती उत्पन्न झाली कीं, ती गोष्ट पुनः मनांत आणण्यास देखील धैर्य होईना. तेव्हां तो नाद सोडून देऊन मीं दुसरी एक युक्ति मनांत आणिली. तीमध्यें श्रम किंचित् ज्यास्त होते, पण असला कांहीं धोका मुळींच नव्हता. ती युक्ति ही कीं, दुसरा एक पगार तयार करावा, म्हणजे बेटाच्या दोन्ही बाजूंस दोन पगार होतील; व तेणेंकरून त्या प्रवाहांत शिरण्याची मुळींच जरूरी पडणार नाहीं.

वाचणारांचे ध्यानीं असेलच कीं, आतां ह्या बेटांत माझीं दोन ठिकाणें झालीं होतीं, त्यांपैकीं एक लहानसा तंबू. त्याचे भोंवतीं खडकाच्या खालच्या बाजूस भिंत असून मागल्या बाजूस गुहा होती. ती गुहा पोंखरून पोंखरून मीं बरीच वाढविली होती; व तीमध्यें एकींतएक अशा कितीएक खोल्याही पाडिल्या होत्या. ह्या खोल्यांपैकीं, जी सर्वांत कोरडी व विस्तृत होती, व जिला कोटाच्या बाहेरच्या बाजूस, म्हणजे जेथें तो कोट खडकास मिळाला होता, त्यापलीकडे दार होतें, तींत पूर्वी सांगितलेलीं सर्व मातीचीं भांडीं व पांच पांच सहा सहा पायलीं धान्य मावण्याजोग्या सुमारें चवदा पंधरा पांट्या ठेविल्या होत्या. ह्या सर्व भांड्यांत व पांट्यांत मीं आपली अन्न सामग्री व मुख्यत्वेंकरू-

न धान्य सांठवून ठेविलें होतें. ह्या धान्यांत कांहींतर कणसेंची कणसेंच तोडून ठेविलीं होतीं, व कांहीं धान्य मीं हातांनीच मळून ठेविलें होतें. भोंवतालचा कोट मीं डांभे पुरून केला होता. ते डांभे त्वरेंने वाढत जाऊन त्यांचीं इतकीं दाट व विस्तृत झाडें झालीं कीं, त्यांच्या मागें वस्ती आहे, असें कधींच कोणाचे लक्ष्यांत यावयाचें नाहीं.

ह्या ठिकाणाजवळच, पण किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर, सखल प्रदेशांत माझीं धान्याचीं दोन शेतें होतीं. तीं वेळेच्या वेळेस नांगरून मी धान्य पेरीं, ह्यामुळें पीक यावें तसें येत असे. जेव्हां जेव्हां मला अधिक धान्याची गरज लागे, तेव्हां त्या शेतांजवळ त्यांच्याच योग्यतेची दुसरी जमीन होती, तीमध्यें मी धान्य पेरीत असें.

ह्याखेरीज जसे श्रीमंत लोकांचे बगीचे व बंगले शहराबाहेर असतात, त्याप्रमाणें दुसरी एक माझी राहण्याची जागा होती. तेथेंही मीं बरींच झाडें लाविलीं होतीं. त्यांत मुख्यत्वें करून एक वेलींचा मंडप केला होता, त्याची मी नेहमीं डागडुजी करीत असें, म्हणजे त्याच्या भोंवतालच्या कुंपणाची उंची नेहमीं बेताची राखीं; व कुंपणांतील डांभे वाढून त्यांची उंच उंच व मजबूद झाडें झालीं होतीं, त्यांचा विस्तार वाढून दाट व्हावा, व तेणेंकरून मजेची छाया व्हावी म्हणून मी तीं नेहमीं खची करीत असें; त्यामुळें त्याची माझे मनासारिखी छाया झाली होती.

ह्या ठिकणाजवळच बकरीं शेळ्या वगैरे कोंडण्याचें माझें एक वाडगें होतें. ह्या वाडग्याभोंवतीं कुंपण घालून बंदोबस्त करण्याचे कामांत जी मेहनत मीं केली होती, ती मनांत सुद्धां आणितां येणार नाहीं. त्या शेळ्या वगैरे कुंपण फोडून बाहेर न जाव्या म्हणून तें शाबूद राखण्याविषयीं मी फार सावध असें. तें कुंपण गजांच्या कठड्या सारिखें व्हावें, म्हणून पराकाष्ठेची मेहनत करून त्याच्या बाहेरच्या बाजूस इतके जवळ जवळ डांभे रोंविले कीं, दोहों डांभ्यांच्या मधून हात सुद्धां जाऊं नये. पुढें जेव्हां ते डांभे वाढले तेव्हां तें कुंपण भिंतीपेक्षांही बळकट झालें.

ह्या ठिकाणीं माझें द्राक्षांचेंही पीक होत असे; त्यावर मुख्यत्वेंकरून मला हिंवाळ्यामध्यें मनुकांचा पुरवठा होत असे. माझ्या सर्व

खाण्याच्या पदार्थांमध्यें मनुकाच कायतो मिष्ट पदार्थ होता, म्हणून त्या मोठ्या काळजीनें राखून ठेवण्यास मी कधीं चुकत नसें. आणि वास्तविक पाहतां मनुका हा पदार्थ गोड आहे इतकेंच नव्हे, पण औषधी असून पौष्टिकही आहे.

मी हल्लीं ज्याचें वर्णन करीत आहें तें स्थळ, माझें राहण्याचें मुख्य ठिकाण व ज्या जागीं मीं होडी ठेविली होती तें ठिकाण, ह्यांपासून सारख्या अंतरावर मध्यें होतें. सबब होडीकडे जातांना मी बहुतकरून ह्या ठिकाणीं मुक्काम करीं. होडीकडे जाण्याचें प्रयोजन हेंकीं, तिची व तिच्या संबंधाच्या सर्व वस्तूंची नीट दागडुजी ठेवावी लागे. कधीं कधीं होडींत बसून चैनीनें मी फिरावयास ही जात असें; परंतु प्रवाहानें किंवा वाऱ्यानें अथवा दुसऱ्या एखाद्या अकल्पित कारणानें नकळत होडी लांब झुकेल ह्याची मला इतकी धास्ती होती कीं, किनाऱ्यापासून एका धोंड्याचे टप्यावर सुद्धां मी कधीं होडी जाऊं देत नसें.

प्रकरण चवथें.

आतां मी कांहीं निराळ्याच गोष्टीचें वर्णन करणार आहें, त्याकडे वाचकांचें पूर्ण अवधान असावें. एके दिवशीं दोन प्रहरच्या सुमारास मी आपल्या होडीकडे जात असतां किनाऱ्यावर अनवाणी चालणाऱ्या कोणी मनुष्याचें पाऊल उमटलेलें दृष्टीस पडलें. हें पाहून मी एकाएकीं इतका गर्भगलित झालों कीं, जणू काय मजपुढें पिशाचच उभें आहे. मी इकडे तिकडे कानोसा घेऊं लागलों, आसपास रेखून पाहूं लागलों, परंतु कोणाचा शब्द ऐकूं येईना आणि कोणी दिसेना. तेव्हां थोडी लांबपर्यंत दृष्टि पोहोंचावी म्हणून एका उंचवट्यावर गेलों; मग किनाऱ्यावर इकडे तिकडे फिरलों; पण त्या एका पावलाखेरीज तेथें मनुष्य आल्याचें दुसरें कांहीं एक चिन्ह दृष्टीस पडलें नाहीं. तेव्हां पाऊल दृष्टीस पडल्याची तरी मला भ्रांतिच झाली आहे कीं काय, हें पाहण्याकरितां मी पुनः त्या ठिकाणीं गेलों. परंतु भ्रांति कशाची; पा-

याची बोटें, टांच, वगैरे पावलाचे भाग अगदीं स्पष्ट उठलेले होते. हें पाऊल एथें कसें उठलें असावें हें समजेना, किंवा त्या विषयीं यत्किंचित् कल्पनाही करितां येईना. तेव्हां नाना प्रकारचे भयंकर विचार मनांत येऊन मी अगदीं गांगरून गेलों, व चित्त शुद्धीवर नाहींसें झालें. शेवटीं माघारीं आपल्या कोटाकडे जावयास निघालों. वाटेनें चालत असतां दोन तीन पावलें टाकून पुनःमागें पहावें; एखादें झाड झुडूप किंवा दूर एखाद्या झाडाचें खोड दृष्टीस पडलें म्हणजे तें मनुष्यसें भासावें, असें होत असे. तसेच दुसरे किती तरंग मनांत उठत, हें सांगणें अशक्य आहे.

मी आपल्या कोटाजवळ येऊन पोहोंचलों, तेव्हां जसें कांहीं कोणी माझ्या पाठीसच लागलें आहे, अशा प्रमाणें घाईनें मी आंत पळालों. फार काय सांगावें ! आंत जातांना मी का भिंतीवर चढण्याकरितां करून ठेविलेल्या शिडीवरून गेलों, किंवा खडकांतील विवरानें आंत शिरलों, हें देखील मला स्मरत नाहीं. कारण त्या वेळेस माझी इतकी धांदल झाली होती कीं, ससा किंवा खोकड ह्याचे पाठीस पारधी लागले असतां त्याची सुद्धां लपण्याचे जागीं जातांना अशी धांदल होत नसेल.

त्यादिवशीं रात्रीं मला झोंप मुळींच आली नाहीं. प्राणिमात्राचा स्वभाव असा असतो कीं, त्यास ज्या गोष्टीचें भय वाटतें, तीपासून जसजसा तो दूर जातो तसतसें तिजविषयीं त्याचें भय कमीकमी होत जातें; पण माझी स्थिति ह्याचे अगदीं विरुद्ध झाली. ज्या गोष्टीमुळें माझे मनांत भीति उत्पन्न झाली तीपासून मी जितका जितका दूर जाई, तितकी तितकी ती भीति वाढतच चालली. त्या पावलाविषयीं कल्पनांच्या योगानें माझें मन इतकें घोंटाळून गेलें कीं, त्यापासून मी इतका दूर आलों असतांही भीतीवांचून दुसरें कांहींच मनांत येईनासें झालें. क्षणभर असें वाटावें, क्षणभर तसें वाटावें, असें होतां होतां शेवटीं मीं असा निर्णय केला कीं, समोरच्या मुख्य जमिनीवरील कोणी रानटी लोक पडावांत बसून समुद्रांत फिरत असतां, त्या प्रवाहाच्या जोरानें किंवा उलटा वारा सुटल्यामुळें ते ह्या बेटास लागले असावे, आणि किनाऱ्याकरही उतरले असावे; पण ह्या ओसाड बेटावर राहणें त्यांस न आवडून ते माघारे गेले असतील. आणि ते माघारे गेले ही गोष्ट चांगलीच झाली; कारण त्यांचें एथें राहणें मला इष्ट नव्हतें.

अशा प्रकारचे विचार चालले असतां दुसरी एक गोष्ट मनांत येऊन मी परमेश्वराचा मोठा आभार मानूं लागलों. ती गोष्ट ही कीं, ते लोक किनाऱ्यावर आले तेव्हां मी तेथें आसपास नव्हतों, व माझी होडीही त्यांचे दृष्टीस पडली नाहीं ही गोष्ट फार चांगली झाली. ती त्यांनीं पाहिली असती तर तीवरून एथें कोणी लोक राहतात असा तर्क करून ते मला शोधावयास पुढें आले असते. मग माझी होडी त्यांच्या दृष्टीस पडली असेल, आणि अझून बेटावर कांहीं लोक असतील; असले तर आणखी पुष्कळ लोक जमून येऊन ते मला खाऊन टाकितील; आणि कदाचित् प्रत्यक्ष मी त्यांस सांपडलों नाहीं तरी माझें राहण्याचें ठिकाण त्यांचे दृष्टीस पडून तेथील धान्याचा ते नाश करून टाकितील, व माझा पाळींव शेळ्यांचा कळपही पळवून नेतील; आणि तेणेंकरून शेवटीं अन्न अन्न करून मला मरावें लागेलच अशा प्रकारच्या भयंकर कल्पनांनीं माझे अंतःकरणास फार यातना होऊं लागल्या.

ह्या प्रकारचे विचार चालून भीतीनें अंतःकरण ग्रस्त असतां एके दिवशीं मनांत सहज अशी कल्पना आली कीं, हे सारे माझ्या मनाचे निरर्थक तरंग नसतील कशावरून? कारण, मी होडी पासून किनाऱ्यावर येतअसतां माझेंच पाऊल कदाचित् एथें उठलें असावें. असें त्यावेळेस वाटलें खरें; परंतु प्रत्यक्ष त्या पावला समीप आलों, तेव्हां मला स्पष्ट दिसलें कीं, मीं आपली होडी बांधून ठेविल्यानंतर किनाऱ्यावर पाऊल उठलें होतें त्याजागीं येण्याचा माझा मुळींच संभव नव्हता. दुसरें असें कीं, आपल्या पावलानें तें पाऊल मोजून पाहिलें तों तें फारच मोठें आहे असें आढळलें. ह्या दोन कारणांनीं पुनः नव्या नव्या तरंगांच्या योगानें माझें मस्तक फिरून गेलें, व हींव आल्याप्रमाणें भीतीनें अंगास कंप सुटला, तेव्हां पुनः घरीं गेलों; आणि किनाऱ्यावर कोणी लोक आलेच असावे, अथवा कदाचित् ह्या बेटांतच वस्ती असावी, व मी गैरसावध असतां कोणी येऊन मला गांठील, असें खचीत वाटलें.

अशा ह्या काळजीमुळें मला त्या दिवशीं रात्रीं अलोचन जागरण झालें; परंतु त्या क्लेशामुळें अगदीं दमून गेलों होतों, त्या योगानें पाहटेस मात्र डोळा लागला. कांहीं वेळ गाढ झोंप लागून जागा झालों तेव्हां

चित्तवृत्तीस पहिल्यापेक्षां किंचित् समाधान वाटलें. नंतर स्थिरमनानें विचार करून आपणाशींच ह्या गोष्टीची भवति न भवति करूं लागलों, तेव्हां असा निर्णय झाला कीं, हें बेट इतकें सुंदर व सुपीक असतां एथें मानवी प्राण्याचा गंध सुद्धां नाहीं, असें जें मला वाटलें होतें, तें सर्वांशीं खरें नाहीं. कारण, जरी एथें कोणी नेहमींचे रहिवासी नसले, तरी कधीं कधीं मुद्दाम किंवा कधीं कधीं वारा प्रतिकूळ असल्यामुळें मुख्य जमिनीवरून होड्या एथें येत असतील. परंतु दुसरें असें वाटलें कीं, आज एथें येऊन मला पंधरा वर्षें झालीं, पण इतक्या काळांत कधीं ह्या ठिकाणीं लोक असल्याचें किंवा आल्याचें कांहींच चिन्ह दृष्टीस पडलें नाहीं. ह्यावरून दिसतें कीं, जर कधीं ते वाऱ्याच्या झपाट्यानें इकडे झुकले असले, तर लागलेच एथून चालते झाले असतील. सारांश, मुख्य जमिनीपासून केव्हां केव्हां लोक एथें येतात त्यावेळेसच कायतो मला विशेषें करून संकट प्राप्त होण्याचा संभव दिसला. सबब, अशा प्रसंगीं आपण त्यांचे दृष्टीस न पडावें म्हणून लपण्याकरितां एखादें निर्भयस्थान पाहून ठेविलें म्हणजे झालें, असें मला खचीत वाटलें.

मीं आपली गुहा बाहेरच्या बाजूस दार पडे तों पर्यंत पोंखरिली त्या गोष्टीचा आतां मला मोठा पश्चात्ताप झाला; कारण, त्या गुहेस हें बाहेरचें दार नसतें, तर ती लपण्यास फार सोईची जागा होती. शेवटीं पूर्ण विचार करून, पहिल्या तटापासून कांहीं अंतरावर, ज्या ठिकाणीं सुमारें १२ वर्षांपूर्वीं मीं झाडांच्या दोन रांगा लाविल्या म्हणून सांगितलें, तेंवें दुसरा एक तट तयार करण्याचा मीं निश्चय केला. हीं झाडें मुळचींच फार जवळ जवळ लाविलेलीं होतीं, त्यामुळें तो तट दाट व मजबूद करण्यास फारसे डांभेही मध्यें पुरण्याची जरूरी नव्हती, सबब तो तट थोडक्या काळांत तयार होईल, असें मला वाटलें. असो, ह्याप्रमाणें विचार करून मीं तो लवकरच शेवटास नेला; आणि मोठमोठीं तुळवटें, जुने होरखंड, वगैरे जें कांहीं बळकटी आणणारें दिसलें, तें घालून तो तट खूब मजबूद करून सोडिला. त्यास माझा हात शिरण्यापुरतीं लहान लहान सात भोकें ठेविलीं; आणि त्यांत मीं आपल्या सात बंदुका तोफांसारिख्या ठेवून, तोफांस गाड्या असतात तसे लांकडाचे सांचे करून त्यांत त्या

अशा बसविल्या कीं, येणेंकरून त्या सातही बंदुका मला ४-५ पळांत तोडितां येतील.

हें झाल्यावर त्या नवीन तटाच्या भोंवतीं चोहींकडे बरेंच लांब पर्यंत वाळुंजा सारिख्या एका झाडाचे डांभे जितके मावले तितके पुरून भोंवतालचा प्रदेश मीं भरून टाकिला. पण कोणी शत्रु आल्यास तो माझ्या दृष्टीस पडावा, व तो बाहेरच्या तटाजवळ येऊं लागला असतां त्यास त्या झाडांचा आश्रय सांपडूं नये, म्हणून तो तट व तीं झाडें ह्यांच्यामध्यें मीं बरेंच अंतर ठेविलें होतें.

हे डांभे पुरल्यामुळें माझ्या नव्या स्थळापुढें दाट झाडी झाली; व सुमारें ५।६ वर्षें गेल्यावर तर त्यांचें मोठें वनच बनून गेलें. तें इतकें दाट आणि इतकें बळकट झालें कीं, खरोखर त्यांतून जाण्यायेण्यास मार्गच नाहींसा झाला; आणि ह्या वनाच्या पलीकडे वस्तीची जागा किंवा दुसरें कांहीं असेल असा कोणास संशय येण्याचा मुळीं संभवच उरला नाहीं. ह्याप्रमाणें आपल्या संरक्षणार्थ माझ्या बुद्धीला जितके कांहीं उपाय सुचले, तितके सारे मीं केले; आणि हे मीं केलेले उपाय केवळ निष्कारण होते असें नाहीं, हें पुढें वाचणारांच्या लक्ष्यांत येईल.

हा उद्योग चालला असतां आपल्या इतर कृत्यांकडे माझें केवळ दुर्लक्ष होतें असें समजूं नये. विशेषेंकरून बकऱ्यांच्या कळपाची मला मोठी काळजी वाळगावी लागे. कारण तो असल्यामुळें मला पाहिजे तेव्हां बकऱ्यांचें मांस व दूध आयतें मिळे, इतकेंच नाहीं; पण रानांत त्यांची पारध करण्याचे श्रम चुकत. आणि त्यांची एकदां हयगय होऊन तीं निरुपयोगी झालीं, म्हणजे हा फायदा होणार नाहीं, व पुनः त्यांना वाढविण्याचे श्रम करावे लागतील; म्हणून त्यांच्याविषयीं मला फार सावध राहणें पडे. एखादें संकट प्राप्त झालें असतां, ह्या कळपाचें रक्षण कसें करावें ह्याविषयीं पुष्कळ विचार केल्यानंतर मीं असा निश्चय केला कीं, परस्परांपासून बऱ्याच अंतरावर अशीं दोन तीन लहान लहान वाडगीं तयार करून तीं कोणाच्या दृष्टीस न पडतील अशी तजवीज करावी; आणि त्या प्रत्येकांत सुमारें सहा सहा करडें ठेवावीं. येणेंकरून एकंदर कळपावर एखादें अरिष्ट प्राप्त होऊन कदाचित्

तो माहीत झाला, तर थोडक्या श्रमानें व थोडक्या काळांत हीं करडें वाढवून त्यांचा कळप बनवितां येईल.

ह्याप्रमाणें संकेत करून बेटामध्यें आडवळणाचीं स्थानें कोठें कोठें आहेत, हें पाहण्यास मी कांहीं वेळ फिरलों. शेवटीं पाहिजे होती त्या तऱ्हेची सुमारें ५बिघे खुलाशाची जमीन दृष्टीस पडली. ह्या जमिनी भोंवतीं इतकें जंगल होतेंकीं, तिला तें साहजिक कुंपणच झालें होतें. निदान इतकें तरी खरें कीं, भोंवतीं कुंपण करून तिचें वाडगें बनविण्यास फार श्रमांची गरज नव्हती. अशी पसंत सोय पाहून मी तत्काळ तें वाडगें तयार करण्याच्या उद्योगास लागलों, तेव्हां एका महिन्याचे आंत इतक्या मतीचें कुंपण झालेंकीं, माझ्या कळपांतील शेळ्या वगैरे पहिल्यासारिख्या रानटी नसल्यामुळें त्यांत त्यांचा बराच बंदोबस्त झाला. ह्या वाडग्यांत मीं १० शेळ्या व बोकड आणून सोडिले; आणि मग तें कुंपण आपल्या इतर कुंपणांप्रमाणें मजबूद होई तों पर्यंत त्याचें काम पुढें चालविलें.

पहिलें वाडगें तयार झाल्यावर त्या सारिखें दुसरें एक तयार करण्याकरितां चांगलीशी जागा पाहण्यास मी पुनः फिरूं लागलों. एके दिवशीं पश्चिमेकडे हिंडत हिंडत, आजपर्यंत कधींही गेलों नव्हतों इतका दूर गेल्यावर मीं सहज समुद्राकडे पाहिलें, तों पुष्कळ अंतरावर होडीसारिखें कांहीं दिसतें असा भास झाला. तें इतकें दूर होतेंकीं, डोळे कंटाळत तोंपर्यंत एक सारिखी टक लावून त्याकडे पाहत होतों, तरी तें काय आहे हें स्पष्ट लक्ष्यांत येईना. पुढें मी टेंकडीवरून खालीं उतरलों, तेव्हां तर तें मुळींच दिसेनासें झालें. शेवटीं मीं तो नाद सोडून दिला, आणि इतका मात्र निश्चय केलाकीं, इतःपर दुर्बीन खिशांत घातल्या वांचून कधींही बाहेर पडावयाचें नाहीं.

टेंकडीखालीं उतरल्या नंतर बेटाच्या शेवटास गेल्यावर, (त्या ठिकाणीं मी आजपर्यंत कधींच गेलों नव्हतों) माझी खातरी झाली कीं, ह्या बेटांत मनुष्याचें पाऊल उमटलेलें दृष्टीस पडणें ही कांहीं मला वाटली होती तितकी नवलाची गोष्ट नव्हे. कारण तेथें पाहिलें तों नरोटी, हाताचीं पायाचीं व दुसऱ्या अवयवांचीं हाडें, ह्यांनीं किनारा भरून गेला होता. हें पाहून भीतीनें जी माझी अवस्था झाली तिचें वर्णन

कधिंही येत नाहीं. त्या ठिकाणीं दुसरी एक जागा दृष्टीस पडली, तेथें पूर्वी विस्तव पेटविलेला होता असें दिसलें. त्याच्या भोंवतीं एक वर्तुळाकृति खांच खणिलेली होती, त्या ठिकाणीं ते दुरात्मे रानटी लोक स्वजातीय प्राण्यांचीं शरीरें भक्षीत बसले होते असा अजमास दिसला.

ह्या सर्व प्रकार पाहून मी इतका विस्मित झालों कीं, त्या लोकांपासून स्वतः आपणावर एखादें अरिष्ट येईल हें भय वाटावें, पण ह्या गोष्टीची कल्पना देखील कांहीं वेळ पर्यंत मनांत आली नाहीं. कारण ह्या वेळेपर्यंत असल्या गोष्टी मी कानांनीं ऐकत मात्र होतों, पण कधीं प्रत्यक्ष पाहिल्या नव्हत्या; त्या इतक्यां प्रत्यक्ष पाहिल्यामुळें त्यांचे विचारांत माझें मन अगदीं गढून गेलें, व त्यामुळें आपणाविषयीं भीति एकीकडेच राहिली. त्याठिकाणीं माझ्यानें क्षणभरसुद्धां उभें राहवेना, तेव्हां झाली तितकी त्वरा करून मी त्या टेंकडीवर चढलों, व तेथून पुढें आपल्या घराकडे चालता झालों.

तो प्रदेश सोडून कांहीं अंतरावर आलों तेव्हां थोडा वेळपर्यंत विस्मित होत्सातां उगाच उभा राहिलों; आणि पुनः स्थितीवर आल्यानंतर अंतःकरणांत परमेश्वराविषयीं भक्तीचा उद्रेक उत्पन्न होऊन नेत्रांतून प्रेमाश्रूच्या धारा चालल्या, आणि ह्या प्रकारच्या भयंकर प्राण्यांपासून उपद्रव होणार नाहीं अशा देशांत त्यानें जन्म दिलें, म्हणून अंतःकरणपूर्वक त्याचा आभार मानूं लागलों. आपली प्रस्तुत स्थिति जरी मी इतकी दुःखप्रद मानीत होतों, तरी वास्तविक पाहतां हीमध्यें मला दुःखापेक्षां सुखच विशेष होतें. सर्व सुखांत ही गोष्ट विशेष कीं, अशा दुरवस्थेंत सुद्धां परमेश्वराचें ज्ञान मला झालें होतें, व त्याच्या कृपेची आशाही उत्पन्न झाली होती. हें सुख म्हणजे जीं कांहीं दुःखें मीं सोशिलीं व जीं आणखीं माझ्यानें सोसवतीं त्या सर्वांना पुरून उरण्यासारिखें होतें.

ह्याप्रमाणें ईश्वराच्या उपकारांचें स्मरण करीत करीत मी आपल्या कोटांत येऊन पोहोंचलों. आपल्या संरक्षणाविषयीं माझी चिंता आतां उत्तरोत्तर कमी होत चालली; कारण, ते दुष्ट लोक ह्या बेटावर काय सांपडेल तें शोधून काढावें ह्या बुद्धीनें कधींच येत नसतील. कदाचित् ह्या ठिकाणीं कांहीं सांपडण्याची त्यांस आशाही नसेल; आणि ते केव्ह-

मीं त्या प्रदेशांत जंगल दाट आहे तेथें येऊन उतरतात त्यामुळें त्यांच्या उपयोगी एखादी वस्तु त्यांना कधींही सांपडत नसेल, असें दिसलें. दुसरें असें कीं, ह्या ठिकाणीं मीं सुमारें अठरा वर्षे घालविलीं; पण तितक्या काळांत कधीं मनुष्याचें एकही पाऊल माझ्या दृष्टीस पडलें नाहीं; व आणखीही अठरा वर्षे अशाच रीतीनें गुप्तपणें मला घालवितां येतील, असें खास वाटलें. इतकेंच कीं मला कोणाचे दृष्टीस मात्र पडतां कामा नये; आणि वस्तुतः कोणाच्या दृष्टीस पडण्याचें मला प्रयोजनच नव्हतें; व त्या मनुष्यभक्षकांपेक्षां चांगले दुसरे लोक दृष्टीस पडले तर मात्र त्यांपुढें आपण प्रकट व्हावें, नाहीं, पक्षीं आहें त्या ठिकाणीं गुप्तरीतीनें रहावें, असाच मीं संकल्प केला होता.

अशा प्रकारें करून मीं आपल्या मनाची समजूत केली खरी, तथापि त्या क्रूर रानटी लोकांविषयीं व परस्परांस खाण्याच्या त्यांच्या दुष्ट राक्षसी चालीविषयीं माझें अंतःकरणास इतका तिटकारा आला होता कीं, ह्यापुढें दोन वर्षे पर्यंत मी एकसारिखा खिन्न व उदासीन असून सदोदित आपल्या प्रदेशांत कोंडून राहिल्या सारिखा होतों; कारण, प्रत्यक्ष झोटिंग दृष्टीस पडण्याचें जितकें भय मनुष्यास वाटतें, तितकें भय ते लोक दृष्टीस पडतील म्हणून मला वाटत असे. ह्या दोन वर्षांत होडीची व्यवस्था पाहण्याकरितां मीं तिकडे डुंकून सुद्धां पाहिलें नाहीं; आणि दुसरी एक होडी तयार करावी असें मनांत आणिलें. कारण ती होडी बेटास वळसा घालून इकडे आणण्याविषयीं प्रयत्न करणें मला मनांत सुद्धां आणवेना. कांकीं, असल्या लोकांची समुद्रांत कदाचित् गांठ पडेल ह्याचें भय वाटे. आणि एकदा गांठ पडून त्यांचे हातीं मी लागलों तर काय अवस्था होणार हें मला पक्कें ठाऊकच होतें.

असो, तथापि कालगतीनें, व आपणास ह्या लोकांचे हातीं लागण्याचें फारसें भय नाहीं अशा खात्री मुळें, त्यांच्याविषयीं माझी धास्ती उत्तरोत्तर कमी होत चालली, आणि पूर्वीप्रमाणें मी स्वस्थचित्त झालों. परंतु पूर्वींच्या व हल्लींच्या स्थितींत भेद इतकाच कीं, हल्लीं कदाचित् त्यांचे दृष्टीस पडेन ह्या भीतीनें नेहमीं चोहींकडे नजर ठेवून पूर्वींपेक्षां फार सावधगिरीनें वागत असें. तसेंच त्यांपैकीं कोणी एखादा बेटावर आला असल्यास त्यास ऐकूं जाईल ह्या भयानें बंदुकीचे आवाजही मी

फारसें कांहीं नसे. अशा प्रसंगीं मजजवळ पाळीव बकऱ्यांचे कळप होते, व त्यामुळें रानांत त्यांची पारध करणें अथवा त्यांस गोळ्या घालून मारणें ह्या गोष्टीची आवश्यकता नव्हती, हें माझें मोठें नशीबच समजावयाचें. आणि खरोखरच, जरी मी हातांत बंदूक घेतल्यावांचून कधींही बाहेर पडत नसें, तथापि ह्यापुढें दोन वर्षेंपर्यंत मीं कधीं एक वेळ सुद्धां तिचा बार काढिला नाहीं. बंदुकी खेरीज मीं जहाजांतून आणिलेलीं तीन पिस्तुलें, निदान त्यांपैकीं दोन तरी, कमरेस बकऱ्याच्या कातड्याचा पट्टा असे त्यांत खोंचून बरोबर नेत असें; परंतु त्यांचाही कधीं मीं उपयोग केला नाहीं. जहाजांतून आणिलेल्या मोठमोठ्या तलवारींपैकीं एक पाजवून ती कमरेस अडकविण्याकरितां एक पडदळ तयार केलें होतें. सारांश, मी बाहेर निघालों म्हणजे माझें स्वरूप किती भयंकर असे ह्याचें वर्णन मीं पूर्वीं केलेंच आहे, त्यांत आतां आणखी हीं दोन पिस्तुलें असून पडदळामध्यें तरवार लटकत असे, त्यामुळें तर स्वरूप फारच भयंकर दिसे.

सांप्रत त्या रानटी लोकांची असुरी मेजवानी चालली असतां त्यांपैकीं कित्येकांस कसें मारावें, व त्यांनीं खावयास आणिलेलीं मनुष्यें कशीं बांचवावीं, हे विचार अहोरात्र माझ्या अंतःकरणांत घोळूं लागले. त्यांवांचून दुसरी गोष्ट सुचेनाशी झाली. त्या लोकांस मारण्याकरितां, किंवा निदान त्यांचें पुनः एथें येणें बंद होण्याजोगें त्यांस भय प्रदर्शन तरी करण्याकरितां, मीं किती युक्ति मनांत आणिल्या त्या सर्वांचें वर्णन करूं लागलों तर एक मोठा ग्रंथच होईल. परंतु तसल्या युक्तींचा उपयोग काय? एकट्या मनुष्यानें त्यांच्यापुढें काय करावें? ते कदाचित् वीस किंवा तीस सुद्धां एकदम येत असतील; आणि त्यांचे हातांत भाले आणि तीर कमानी असून, मला जसा बंदुकीनें नेम मारितां येतो तसा त्यांनाही आपल्या आयुधांनीं बरोबर नेम मारितां येत असेल.

त्या रानटी लोकांची वाट पाहत टपून बसण्यास सोईवार जागा शोधून काढण्याकरितां मी पुष्कळ दिवस फिरलों. शेवटीं टेंकडीच्या बाजूस एक इच्छेप्रमाणें जागा सांपडली; तेथें बसून त्यांच्या होड्या येत असतां पाहण्यास कांहीं चिंता नाहीं, व ते लोक किनाऱ्यावर येण्यास तयार होण्याच्या पूर्वीच त्यांचे दृष्टीस न पडतां पलीकडे दाट झाडींत प-

ळून जाऊन दडून बसतां येईल, असें मला खचीत वाटलें. आणखी त्या ठिकाणीं लपून बसलों असतां त्यांचीं सर्व क्रूर कृत्यें लक्ष्यपूर्वक पहावीं, व जेव्हां ते एकमेकांस इतके चिकटून बसले असतील कीं माझा नेम बहुतेक चुकणार नाहीं, आणि पहिल्याच गोळीबरोबर तीन चार मनुष्यें जखमी झाल्यावांचून रहाणार नाहींत, अशा वेळेस त्यांच्या डोक्यांकडे बंदुकीचा रोंख धरावा, असा मीं बेत केला.

ह्याप्रमाणें बेत केल्यावर, आणि आपल्या मनामध्यें तो करून पाहिल्यावर कोटाजवळ आलेली किंवा इकडे वळलेली एखादी होडी समुद्रावर दृष्टीस पडते कीं काय, हें पहावें म्हणून, माझ्या कोटापासून सुमारें तीन मैलांच्या किंवा त्याहून किंचित् अधिक अंतरावर पूर्वीं सांगितलेली टेंकडी होती, तिच्या माथ्यावर नित्य प्रातःकाळीं एकदां मी फेरी मारून येत असें.

मला वाटतेंकीं ही पुढील गोष्ट मीं कबूल केली असतां वाचणारांस तिचें आश्चर्य वाटणार नाहीं; ती अशीकीं, हीं सतत प्राप्त होणारीं संकटें व सांप्रत उपस्थित झालेली चिंता, ह्यांच्या योगानें आपल्या पुढच्या सोईकरितां नव्या नव्या युक्ति काढावयाच्या, किंवा पूर्वीं काढिलेल्या युक्ति करून पहावयाच्या, वगैरे सर्व गोष्टी एकीकडेच राहिल्या. चरितार्थाच्या काळजीपेक्षां आपलें संरक्षण कसें होईल ह्याचीच काळजी मला विशेष येऊन पडली. कोणास शब्द ऐकूं जाईल ह्या भीतीनें एखादा खिळा ठोकणें किंवा लांकूड तोडणें, असलीं कामें करण्यास सुद्धां मला धैर्य होईना; मग बंदूक उडविण्याची गोष्ट कशास पाहिजे? ह्याहीपेक्षां विशेष आश्चर्य करण्यासारिखी गोष्ट ही कीं, विस्तवाचा धूर पुष्कळ अंतरावर दृष्टीस पडतो, त्यामुळें, एथें कोणी आहे असें त्या लोकांस वाटेल, ह्या भीतीनें विस्तव पेटविण्यास देखील मला धैर्य होत नसे. आणि ह्याच कारणास्तव मडकीं बिडकीं भाजणें वगैरे ज्या कामांत विस्तवाचें प्रयोजन लागणार तीं सर्व कामें, जंगलामध्यें माझी नवीन झोंपडी होती, तेथें करण्याचा क्रम मीं चालविला. ज्याठिकाणीं ही झोंपडी होती तेथेंच कांहीं वेळानें जमिनीमध्यें एक केवळ अकृत्रिम अशी गुहा दृष्टीस पडली ती पाहून मला परमानंद झाला; कारण ती फार खोल असल्यामुळें, तिच्या तोंडाशीं गेला असतां तिजमध्यें शिरेल इतका धीट मा-

खूस त्या रानटी लोकांत कोणी नसेल, असें मला वाटलें. आणि खरी-खर रानटी माणूसच कशाला, ज्याला म्हणून मजसारिखी सुरक्षित स्थळ मिळविण्याचीच इच्छा आहे, असा मनुष्य शिवाय करून दुसरा कोणीही त्या गुहेंत शिरण्या जोगा धारिष्टवान् नसेल. ह्या गुहेचें तोंड एका मोठ्या डगरीच्या तळाशीं होतें; तेथें मी सहजगत्या कोळसे तयार करण्याकरितां झाडांच्या फांद्या तोडीत होतों, तों अकस्मात् तें तोंड दृष्टीस पडलें. मी सहजगत्या म्हटलें हा मोठा प्रमाद होय; कारण पूर्वी मला अनेक प्रसंगीं असे ईश्वरी संकेत दिसून आले होते, तस्मात् मीं त्या ठिकाणीं जावें व ती गुहा माझे दृष्टीस पडावी हाही ईश्वरी संकेतच म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

ह्या गुहेंतील जमीन कोरडी असून सपाट होती, व तिजवर बारीक मोकळी रेती होती, त्यामुळें तेथें घाणेरडे किंवा विखारी प्राणी दृष्टीस पडण्याचा मुळींच संभव नव्हता. त्याचप्रमाणें गुहेच्या भिंती व तिचा वरला भाग ह्यांवरही ओल नव्हती. मुख्य अडचण कायती जाण्या येण्याच्या मार्गाची होती; तथापि ज्यापक्षीं हें स्थळ मला एकांतीं सुरक्षितपणें लपून बसण्याकरितां पाहिजे होतें, त्यापक्षीं मार्ग अडचणीचा असणें हीसुद्धां एक अनुकूळच गोष्ट मला भासूं लागली. असा विचार झाल्यानंतर, ज्या वस्तूंच्या रक्षणाविषयीं मला विशेष चिंता होती, त्या सर्व वस्तू, व विशेषें करून दारू गोळा, आणि तीन शिकारीच्या बंदुका होत्या त्यांपैकीं दोन व आठ मोठाल्या बंदुका होत्या त्यांपैकीं तीन हीं ठेवणीचीं हत्यारें, इतकें सामान लवकर तेथें नेऊन ठेवावें असा मीं निश्चय केला. बाकीच्या पांच मोठाल्या बंदुका मीं आपल्या कोटाच्या अगदीं बाहेरील तटावर तोफांप्रमाणें चढवून तयार ठेविल्या होत्या, आणि कोठें मोहिमेवर जाणें झालें तरीही त्या तेथून काढून बरोबर नेतां येत असत.

हा सर्व दारूगोळा त्या गुहेंत नेतेसमयीं, जे भिजलेलें दारूचें पिंप मीं समुद्रांतून आणिलें होतें, तें सहज उघडून पाहूं लागलों, तों दारूमध्यें चोहींकडून सुमारें तीन चार इंच पाणी शिरलें होतें, आणि तितकीच दारू वाळून अगदीं कठीण झाली होती. त्यामुळें नारळाच्या कवटीमध्यें जसें खोबरें सुरक्षित राहतें त्याप्रमाणें त्या वाळलेल्या दारू

मध्यें आंतील दारू सुरक्षित राहिली होती, व मध्यभागीं मला सुमारें तीस शेर पसंत दारू सांपडली, तेणेंकरून मला मोठा आनंद झाला. ती सर्व दारू मीं गुहेंत नेऊन टाकिली; आणि एकदम कोणी आपणावर हल्ला केला असतां दारू व्यर्थ जाईल ह्या भीतीनें दीड शेरापेक्षां जास्त दारू आपल्या कोटांत मी कधींही बाळगीत नसें. बंदुकीच्या गोळ्या करण्याचें जें कांहीं शिसें मजजवळ राहिलें होतें, तेंही मीं त्या गुहेंतच नेऊन ठेविलें.

हल्लीं डिसेंबर महिना चालू होता. माझी हंगामाची वेळ म्हटली म्हणजे मुख्यत्वें करून हीच असे; ह्यामुळें बाहेर शेतांत मला बराच वेळ रहावें लागे. ह्याच सुमारास एके दिवशीं प्रातःकाळीं मी बाहेर पडलों, तेव्हां सुमारें एक कोसाच्या अंतरावर समुद्रकांठीं एकाएकीं विस्तवाचा उजेड दृष्टीस पडला; तो पाहून मला परम विस्मय झाला. आणि तो उजेड बेटाच्या ज्या बाजूस मी होतों त्याच बाजूस दृष्टीस पडला त्यामुळें तर फारच वाईट वाटलें.

तो उजेड पाहून मी तर खरोखर अगदीं गर्भगलित होऊन आपल्या बनामध्यें जेथच्या तेथेंच थबकून उभा राहिलों; व कदाचित् मला अकस्मात् कोणी गांठील ह्या भीतीनें तेथून बाहेर पडण्याला देखील मला धैर्य होईना. बरें, तेथें लपून राहून तरी माझें चित्त स्वस्थ होतें म्हणावें तर तसेंही नव्हतें; कारण, मला असें भय पडलें होतें कीं, जर हे रानटी लोक बेटांत फिरत असतां माझीं शेतें त्यांच्या दृष्टीस पडलीं, किंवा दुसरीं कांहीं माझीं कामें व सुधारणेचे नवीन प्रकार त्यांनीं पाहिले, तर, ह्या जागीं वस्ती आहे, अशी लागलीच ते अटकळ बांधितील, आणि मग माझा तलास लाविल्याशिवाय ते कधीं स्वस्थ बसणार नाहींत. सारांश, असा विलक्षण प्रसंग प्राप्त झाल्यामुळें मी नीट आपल्या कोटाकडे गेलों आणि आंत जाऊन शिडी उचलून आंतल्या बाजूस ठेविली, व कोटाच्या बाहेर वस्तीची खूण खाण सर्व नाहींशी करून टाकिली.

नंतर आंत आपला बचाव करण्यासाठीं मी तयार होऊन बसलों. जे असा, मी ज्यांस तोफा म्हणत असें व ज्या मीं नव्या कोटावर चढविल्या होत्या, त्या सर्व बंदुका व सर्व पिस्तुलें ह्यांमध्यें मीं बार भरून ठेविले, आणि शेवटपर्यंत आपला बचाव करण्याचा निश्चय केला. ह्या-

असेंच आपला सर्व हवाला जगदीशावर ठेवून त्या रानटी लोकांपासून आपली सुटका होण्यासाठीं मन:पूर्वक त्याची प्रार्थना करण्यास मी चुकलों नाहीं. अशी तयारी करून सुमारें ४-५ घटिका मी उभा होतों; पण बाहेरची खबर कशी काय आहे ती समजून घेण्याकरितां पाठविण्यास कोणी नव्हतें आणि मला तर ती समजून घेतल्यावेरीज चैन पडेना.

तथापि आतां पुढें काय करावें ह्याचा विचार करीत आणखी थोडा वेळ बसल्यावर, टेंकडीच्या ज्या बाजूस सपाट जागा होती तेथें शिडी लावून मी त्या सपाट जाग्यावर चढलों, आणि शिडी काढून घेऊन ती पुन: वर लावून त्या टेंकडीच्या माथ्यावर चढलों; आणि मग दुर्बीण मुद्दाम बरोबर आणिलीच होती, ती बाहेर काढिली, व भुईवर पालथा पडून त्या दुर्बिणींतून त्या जाग्याकडे पाहूं लागलों. तेव्हां थोडा विस्तव पेटवून त्या भोंवताले रानटी लोक नागवे बसले होते, व त्यांची संख्या नवांहून कमी नव्हती, असें तत्काळ माझ्या दृष्टीस पडलें. तो विस्तव त्यांनीं शेकण्याकरितां पेटविला नव्हता; कारण हवा फारच गरम होती, त्यामुळें त्यांस शेकण्याची जरूरी नव्हती. तर त्यांचें अतिघोर खाद्य जें नरमांस, तें शिजविण्यासाठीं त्यांनीं तो पेटविला असावा; असें मला वाटलें. त्यांचीं भक्षणार्थ आपणाबरोबर जीं मनुष्यें आणिलीं होतीं, तीं जीवंत होतीं किंवा मृत होतीं हें माझ्या ध्यानांत आलें नाहीं.

त्यांच्या बरोबर दोन होड्या होत्या, त्या त्यांनीं कांठावर ओढून आणिल्या होत्या; आणि त्या वेळेस पाणी ओहोटत होतें, त्यामुळें परत जाण्यासाठीं भरती येण्याची ते वाट पाहात होते, असा मला अदमास दिसला. तो माझा अजमास खरा झाला. कारण पश्चिमेकडे भरती येतांक्षणींच त्यांनीं आपल्या होड्या हांकारिल्या. ते होड्यांत बसून गेले असें मीं पाहिलें तेव्हांच दोन बंदुकी खांद्यावर घेऊन, व दोन पिस्तुलें कमरेस खोवून आणि तरवार पडदळांत कमरेस लटकावून, होईल तितक्या जलदीनें मी त्या टेंकडीवर गेलों. तथापि तेथें जाण्यास मला दोन तासांपेक्षां कमी वेळ पुरला नाहीं; कारण इतक्या हत्यारांचें ओझें वहावें लागल्या मुळें माझ्यानें लवकर चालवेना. त्याठिकाणीं रानटी लोकांच्या आणखी तीन होड्या आल्या होत्या, असें नजरेस

आलें; आणि समुद्राकडे जरा दूर दृष्टि पिल्मावर त्या सर्व मिळून मुख्य जमिनीकडे चालल्या आहेत असें दृष्टीस पडलें.

हा प्रकार पाहून मला फार भय वाटलें. पुढें त्या टेंकडीवरून उतरून किनाऱ्यावर आल्यानंतर तेथें त्या चांडाळांनीं केलेल्या अति घोर कर्मांचीं चिन्हें राहिलेलीं दृष्टीस पडलीं. तीं चिन्हें हीं कीं, त्या दुरात्म्यांनीं मोठ्या चैनीनें जीं मनुष्यें भक्षिलीं होतीं; त्यांच्या शरीरांतील रक्त, हाडें, व मांसखंडें पडलीं होतीं; तीं पाहून तर माझ्या आंगावर कांटाच उभा राहिला. त्यांचें तें असुरीकर्म पाहून मला इतका त्वेष आला कीं, ह्यापुढें प्रथमतः जे कोणी एथें माझ्या दृष्टीस पडतील ते कितीही असले तरी त्यांचे मी प्राण घेईन असा मीं दृढ निश्चयकेला.

प्रकरण पांचवें.

ते रानटी लोक पुनः दृष्टीस पडले असतां त्यांस ठार मारण्या विषयीं मीं दृढ निश्चय केला, असें मागील भागांत सांगितलें, त्या पुढें सुमारें सवा वर्षपर्यंत त्या लोकांपैकीं कोणीही माझे दृष्टीस पडला नाहीं. तथापि त्यांच्या विषयीं निरंतर धास्ती असल्यामुळें तितक्या काळांत मला अगदीं चैन पडलें नाहीं. कधीं स्वस्थ झोंप येऊं नये; रात्री वारंवार दचकून जागें व्हावें, असें होत असे. सारा दिवसभर भीतिप्रद विचारांनीं अंतःकरण भ्रमून जाई, आणि रात्रीं ही झोंपेमध्यें निरंतर त्या रानटी लोकांशीं लढाईचीं स्वप्नें पडून त्यांनीं अंतःकरणास त्रास होत असे. एतावता चित्तास स्वस्थता मुळींच नव्हती. परंतु ह्या गोष्टीची कांहीं काळपर्यंत विस्मृति पडण्यासारिखा एक प्रकार घडून आला तो असा कीं, मे महिन्याचे १६ वे तारखेस सारा दिवसभर एकसारखें भयंकर वादळ चाललें होतें, व प्रचंड मेघगर्जना होऊन विजाही चमकत होत्या, आणि रात्रींही तसाच प्रकार चालला होता. पुढें मध्यरात्रीचे सुमारास एकाएकीं समुद्रावर तोफेचा आवाज झाला असें वाटून मी अत्यंत चकित झालों.

ह्या वेळेपर्यंत मला अनेक प्रसंगीं विस्मय प्राप्त झाला होता, पण हा विस्मय निराळ्याच प्रकारचा होता. तो आवाज कानीं पडतांच उठून

मीं अटदिशीं खडकांला शिडी लाविली, आणि टेंकडीच्या माथ्यावर च-ढून पाहिलें तों, चमक दृष्टीस पडली. त्या चमकीकडे माझें लक्ष्य गेलें तोंच दुसरा एक तोफेचा आवाज ऐकूं आला. ह्या आवाजावरून, ज्या ठिकाणीं पूर्वीं माझी होडी प्रवाहाच्या योगानें समुद्रांत घसरली होती, तेथेंच हे आवाज होतात, असें मला कळून आलें.

ह्या सर्व प्रकार पाहिल्यावरून, हें एखादें जहाज मोठ्या संकटांत असल्यामुळें त्यांतील लोक, आपण संकटांत आहों हें आसपास कोणी असतील त्यांस कळविण्याकरितां तोफेचे आवाज करीत आहेत, असें मीं तत्काळ अनुमान केलें. तेव्हां, जरी मजकडून त्या लोकांस साह्य होणें अशक्य आहे, तथापि, ते ह्या बेटावर आले असतां, त्यांजकडून मला साह्य होईल, हें मनांत आणून आसपास वाळलेल्या काटक्या कु-टक्या जितक्या मिळाल्या तितक्या मिळवून मीं त्यांचा एक मोठा ढीग केला, आणि तो पेटविला. त्या काटक्या कुटक्या कडकडीत वाळले-ल्या असल्यामुळें पेटवितांच मोठा जाळ झाला. तेव्हां मला वाटलें कीं, हें जहाज किंवा तसलेंच कांहीं असलें तर हा उजेड त्यांतील लोकांचे दृष्टीस पडल्यावांचून रहाणार नाहीं. आणि खरोखर तो त्यांचे दृष्टीस पडलाच असावा; कारण तो जाळ पेटतांच आणखी एक तोफेचा आवा-वाज ऐकूं आला; आणि त्यानंतर दुसरे पुष्कळ आवाज झाले, ते सर्व पूर्वोक्तप्रदेशाकडूनच ऐकूं आले. तो उजेड सूर्योदयापर्यंत मीं एकसा-रिखा राखिला होता. दिवस बराच वर येऊन हवा स्वच्छ झाल्यावर मीं समुद्राकडे पाहिलें तों, बेटाच्या पूर्वबाजूस पुष्कळ अंतरावर कांहीं दृष्टीस पडलें. हें का अवजार आहे किंवा जहाजाचें बूड आहे, हें दु-र्बीन लावून पाहिलें तरी स्पष्ट समजेना, कारण मध्यें अंतर पुष्कळ अ-सून हवेंत ही अद्यापि किंचित् धुकें होतेंच. त्या सगळ्या दिवसभर मीं वारंवार त्याकडे पाहत होतों, आणि तें अगदीं हालत चालत नाहीं अ-सें पाहिल्यावरून, हें नांगर टाकून उभें केलेलें एखादें जहाज असावें, अशी मीं अटकळ बांधिली. परंतु ह्या गोष्टीची खात्री करून घेण्या-विषयीं फार उत्कंठा लागल्यामुळें बंदूक हातीं घेऊन मी बेटाच्या दक्षिण-बाजूस पूर्वीं सांगितलेल्या खडकाकडे गेलों. त्या वेळेस आकाश अगदीं निरभ्र झालें होतें, म्हणून वर चढून पाहिलें तों पूर्वीं होडींत बसून मी

जात असतां पाण्यांत बुडालेला जो खडक मला आढळला होता, त्यावर तें जहाज आपटल्यामुळें फुटून पडलें आहे, असें स्पष्ट दिसून आलें. ह्या प्रकार पाहिल्यावरून मला उघड दिसलें कीं, ह्या जहाजांतील लोक, मग ते कोण असतील कोण जाणे, गैर माहीतगार असल्यामुळें, आणि तो खडक सगळा पाण्यांत बुडाला होता त्यामुळें, तसाच पूर्व आणि आग्नेयी ह्यांच्या मधील दिशेनें सपाट्याचा वारा वाहत होता त्यामुळें, रात्रीं त्यांचें गलबत खडकावर जाऊन आपटलें. मला वाटतें कीं हें बेट त्यांच्या दृष्टीस पडलें नसावें; कारण तें जर दृष्टीस पडलें असतें तर होडींत बसून आपला बचाव करण्यासाठीं खचीत त्यांनीं यत्न केला असता. मदत मिळण्यासाठीं ज्या त्यांनीं तोफा सोडिल्या, आणि विशेष करून मीं पेटविलेला विस्तव त्यांनीं पाहिल्यावरून जे त्यांनीं बार काढिले, त्यांचें स्मरण होऊन माझ्या मनांत पुष्कळ तरंग उठूं लागले. प्रथमतः मला वाटलें कीं, मीं पेटविलेल्या विस्तवाचा जाळ पाहून होडींत बसून त्यांनीं किनाऱ्यास येण्याचा यत्न केला असेल; परंतु समुद्राला फार मोठमोठ्या लाटा येऊं लागल्यामुळें ते भलतीकडे वाहत गेले असतील. पुनः असें वाटलें कीं, त्या तारवाच्या समागमें दुसरीं कांहीं तारवें असतील, त्यांवरील लोक, ह्या तारवावरील लोकांनीं संकटाबद्दल केलेला इशारा समजून त्यांस आपल्या तारवावर घेऊन चालते झाले असतील. आणखी पुनः असें वाटूं लागलें कीं, ते सर्व लोक होडींत बसून समुद्रांत चालते झाले असतील, पण पूर्वीं मी ज्या प्रवाहांत सांपडलों होतों, त्याच्या योगानें ते अफाट समुद्रांत वाहून गेले असतील; आणि असेंच झालें असलें तर मनस्वीच हाल भोगून उपाशीं मरणें, ह्याशिवाय त्यांस गत्यंतर नाहीं, असें मला वाटलें.

ही गोष्ट पाहिल्यावरून माझ्या अंतःकरणाची अशी कांहीं वृत्ति झाली कीं, मला तिचें वर्णन करितां येणार नाहीं. तसल्या वृत्तिमुळें केव्हां केव्हां माझ्या मुखांतून असे उद्गार निघत, अरेरे, ह्या जहाजावरील फक्त एक किंवा दोन प्राणी, किमान पक्ष एकजण जरी वांचून मजकडे येता, तरी तेवढाच मला सोबती झाला असता; आणि स्वजातीचा एक तरी प्राणी मला बोला चालायास झाला असता. मी ह्या निर्जनस्थळीं राहूं लागल्यापासून स्वजातीय प्राण्याच्या सहवासासाठीं ज-

तों हा मसेंगी मला हुरपास लागला, व तो नसल्यामुळें जसा परम खे-द झाला, तसा हुर्यांत व खेद हा आजपर्यंत कधींच झाला नव्हता.

परंतु अशी गोष्ट घडून येणें माझ्या ललाटींच नव्हतें; आणि त्या ज-हाजांतील लोकांपैकीं कोणी जिवंत निघालें किंवा नाहीं, हें ह्या बेटांती-ल माझ्या एकंदर वस्तीच्या शेवटल्या वर्षापर्यंतही मला कळून आलें नाहीं. कांहीं दिवसांनंतर बेटाच्या ज्या टोंकावर तें तारूं फुटलें होतें, त्या टोंकाजवळ बुडून मेलेल्या एका मुलाचें प्रेत किनाऱ्यावर लागलेलें माझ्या दृष्टीस पडलें, तेणें करून अंतःकरणास दुःख मात्र झालें. खला-शी लोक घालतात तशी एक बंडी, एक विजार, व निळ्यारंगाचें तागाचें एक पेहेरण, ह्यां खेरीज त्याच्या अंगावर दुसरे कांहीं कपडे नव्हते; व तो अमूक देशांतला मनुष्य असावा अशी अटकळ बांधण्यास कांहीं साधनही नव्हतें. त्याच्या खिशांत पीसेस् आफ् एट् नांवाचीं दोन ना-णीं व एक तमाखूचा चुट्टा ह्यांखेरीज दुसरें कांहीं एक नव्हतें. त्या ना-ण्यांपेक्षां तो चुट्टा मला पुष्कळ पटीनें अधिक उपयोगाचा होता.

ह्यावेळीं वारा अगदीं बंद असून समुद्र स्थिर झाला होता; ह्यामुळें आपल्या होडींत बसून त्या फुटलेल्या गलबतापाशीं जाण्याचें धाडस करावें असें माझ्या मनांत आलें. कारण माझ्या उपयोगाचें कांहींतरी त्यांत सांपडेल असें मला खचीत वाटलें. परंतु माझ्या मनांत ही गोष्ट भरण्याचें सर्वांशीं हेंच कारण नव्हतें; तर त्या जहाजावरचा एखादा तरी प्राणी जीवंत राहिला असेल; व त्याचे प्राण मला वांचवितां येतील इत-केंच नाहीं, तर त्याच्या प्राणाच्या रक्षणानें मलाही आपल्या जीवास सुख देतां येईल, असें वाटल्यामुळें मला तिकडे जाण्याविषयीं इच्छा झा-ली. ही कल्पना माझ्या ह्रदयास इतकी भिनून गेली कीं, रात्रंदिवस मला चैन पडेना. ती गोष्ट मनांतून मुळींच घालवितां येईना इतकी प-क्की ठसल्यामुळें, खचीत कांहीं अदृश्य शक्तीनें आपणास ही प्रेरणा हो-त आहे, त्यास जर मी तिकडे गेलों नाहीं, तर मीं आपल्या माणुसकीस बट्टा लाविलासें होईल, असें मला वाटलें.

अशी गोष्ट मनांत भरून मी आपल्या कोठाकडे जलदीनें गेलों, आणि सफरीची सर्व तयारी करून गोड्या पाण्यानें भरलेलें एक भां-डें, एक होकायंत्र, गोडीचा एक शिसा, मनुकांनीं भरलेली एक करंडी,

इतके पदार्थ बरोबर घेतले, आणि होडीमधील [illegible] तीतील पाणी बाहेर काढिलें, व ती तरती ठेवून तींत मीं आपलें सर्व सामान घातलें, नंतर दुसरें सामान आणण्याकरितां घरीं गेलों. मीं दुसऱ्या खेपेस सामान आणिलें तें येणें प्रमाणें;—तांदुळांनीं भरलेली एक मोठी पिशवी, सांवली करितां छत्री, गोड्या पाण्याचें दुसरें एक मोठें भांडें, जवांच्या पिठाचे आणखी सुमारें ४ छकड्या पाव, शेळीच्या दुधाचा एक शिसा, व चक्याचा एक गोळा, असें ओझें घेऊन मोठ्या कष्टानें व घामाघूम होऊन मी होडीपाशीं गेलों, आणि ह्या जलपर्यटनांत धोका येऊंनये म्हणून मीं परमेश्वराची प्रार्थना करून होडी हांकारिली.

पहिल्यानें मी आपली होडी उत्तरेकडे समुद्रांत, त्या बाजूच्या ओघाचें साह्य मला मिळे तोंपर्यंत, हांकारिली. हा ओघ पूर्वेकडे वाहत असून मोठ्या झपाट्यानें माझी होडी नेत होता. तथापि दक्षिणेकडील ओघानें जशी होडी अतिशयितच वेगानें वाहवत नेऊन मला अगदींच सांवरे नाशी केली होती, तसें ह्या ओघानें केलें नाहीं. ह्याच्या वेगानें व माझ्या वल्हविण्याच्या जोरानें थेट फुटलेल्या तारवाकडे मोठ्या झपाट्यानें जात जात सुमारें ५ घटकांच्या आंतच मी तेथें जाऊन पोहोंचलों.

त्या तारवाकडे पाहिलें तों तें फार उदासवाणें दिसलें. त्याच्या बांध्यावरून तें स्पानिश लोकांचें आहे असें समजलें. तें दोहों खडकांच्या मध्यें शिरून गच्च अडकून बसलें होतें. समुद्राच्या लाटांनीं त्याच्या वरामाचे तुकडे तुकडे होऊन गेले होते, आणि त्याच्या नाळीच्या जवळचा भाग मोठ्या सपाट्यानें खडकांच्या मध्यें रोंवून बसल्यामुळें त्याची पुढील डोलकाठी व मधील मोठी डोलकाठी ह्यांचा चुराडा होऊन गेला होता. पण त्याचा नाळदांडा भक्कम होता, आणि नाळ व बाजू हीं बळकट दिसत होतीं. मी तारवापाशीं गेलों तेव्हां त्यावर एक कुत्रा माझ्या दृष्टीस पडला. मी येत आहें असें पाहून तो किंकाळ्या फोडून भोंकूं लागला, आणि मीं त्याला बलाविलें तेव्हां तत्काळ त्यानें मजकडे येण्या करितां पाण्यांत उडी टाकिली. तो जवळ येतांच मीं त्याला उचलून होडींत घेतलें. पण भुकेनें आणि ताम्हेनें तो मृतप्राय झालेला दिसला; सबब मीं त्यास पावाचा एक तुकडा खावयास दिला,

तेव्हां बर्फांत पडून एक पंधरवड्यापर्यंत उपासमार झालेल्या एकाद्या लांडग्याप्रमाणें त्यानें तो तत्काळ गट्ट करून टाकिला.

नंतर मी बोडदावर गेलों, तेथें दोघे असामी एकमेकांच्या गळ्या भोंवतीं गच्च मिठया मारून नाळीजवळच्या भागांत बुडून मेलेले प्रथमतः माझ्या दृष्टीस पडले. त्यांस पाहून मीं अशी अटकळ बांधिली कीं, तारूं अपटलें त्या वेळेस तुफानामुळें लाटा इतक्या उंच उसळून त्यावर एक सारिख्या अपटल्या असतील कीं, त्यावरील मनुष्यांस तें सोसेनासें झालें असावें; आणि पाणी आंत एक सारिखें शिरूं लागल्यामुळें त्यांचा जीव पाण्यांत असतां जितका गुदमरावा तितका गुदमरून गेला असावा. त्या कुत्र्या खेरीज त्या तारवावर जिवंत म्हणून एकही प्राणी उरला नव्हता. तसाच जो कांहीं थोडा थोडका माल माझ्या दृष्टीस पडला, तो सारा पाण्यानें खराब झालेला होता. त्यांत कांहीं पिंपें होतीं तीं द्राक्षारसानें भरलेलीं होतीं किंवा ब्रांदीनें भरलेलीं होतीं हें मला कळलें नाहीं. हीं पिंपें कोठीच्या आंत खोलजागीं पडलीं होतीं, तीं ओहोटी लागून पाणी निघून गेल्यावर माझ्या दृष्टीस पडलीं; परंतु तीं इतकीं मोठीं होतीं कीं मला तीं नेतां आलीं नसतीं. तेथें मला कित्येक संदुका दिसल्या; त्या गलबतावरील खलाशांपैकीं कोणाच्या असाव्या, असें मला वाटलें. त्यांपैकीं दोन संदुका त्यांत काय आहे हें न पाहतां मीं होडींत नेऊन ठेविल्या.

ह्यांखेरीज सुमारें ४० शेरांचें एक दारूचें पिंप सांपडलें, तें मोठ्या कष्टानें मीं होडींत नेऊन ठेविलें. तसेंच उलथनें व सांडस ह्यांची मला फार ददात होती तीं, दोन लहान पितळी कढया, एक तांब्याचें भांडें, आणि ग्रिदेरन म्हणून निखाऱ्यावर मांस भाजण्याचा एक थाळा असतो तो, इतकें सामान मला सांपडलें. तें सर्व सामान व कुत्रा हीं घेऊन मी परत निघालों; आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं सुमारें अडीच घटका रात्रीस सुरक्षितपणें बेटावर येऊन पोहोंचलों; परंतु त्या श्रमामुळें पराकाष्ठेचा थकून गेलों होतों.

ती रात्र मीं होडीमध्येंच निजून घालविली, आणि सकाळीं बरोबर आणिलेल्या जिनसा कोठांत न नेतां आपल्या नव्या कपारींत जतन

करून ठेवाव्या असा बेत केला, नंतर जेव्हां मी संदुका उघडूं लागलों, तेव्हां त्यांत कित्येक फार उपयोगाच्या वस्तू मला आढळल्या; त्या अशा, एका संदुकींत चमत्कारिक आकृतीच्या, व अति रुचिकर असून पौष्टिक अशा द्रव पदार्थानें भरलेल्या बाटल्यांची एक पेटी सांपडली. त्या बाटल्यांच्या तोंडांस रुप्याचीं टोपणें बसविलेलीं होतीं. तशींच उत्कृष्ट मिठाईनें भरलेलीं दोन भांडीं सांपडलीं. त्यांचीं ही तोंडें इतकीं गच्च बांधून टाकिलेलीं होतीं कीं, आंतील मिठाईस खाऱ्या पाण्याचा उपसर्ग मुळींच लागला नव्हता. आणखी तेथें कांहीं फार नामी पेहरणें व पांढरे तागाचे हातरुमाल आणि रंगीत गळपट्या मिळून सुमारें १८ कपडे सांपडले, ते मला फार उपयोगी होते. ह्याखेरीज जेव्हां मीं संदुकीचा खण उघडिला तेव्हां त्यांत पोसेस आफ एट नामक+ नाण्यांनीं भरलेल्या तीन मोठ्या थैल्या सांपडल्या, त्या तिहींत मिळून सुमारें ११०० नाणीं होतीं; व एका थैलीमध्यें कागदांत गुंडाळिलेलीं सोन्याचीं दब्लून* नांवाचीं सहा नाणीं, आणि कांहीं लहान लहान सोन्याच्या कांबी होत्या.

मीं आपल्या सर्व जिनसा किनाऱ्यावर आणून त्यांचा बंदोबस्त करून ठेविल्यानंतर होडीकडे माघारा गेलों; व ती किनाऱ्या किनाऱ्यानें वल्हवून तिच्या पूर्वींच्या बंदरांत आणून ठेविली, मग मी आपल्या जुन्या ठिकाणीं चालता झालों. आतां मी सुखानें राहून पूर्वीं वागत होतों तसा वागूं लागलों, व घरदार पाहूं लागलों. कांहीं काळ मीं बऱ्याच सुखांत घालविला; पण त्यांत इतकेंच कीं पूर्वींपेक्षां जास्त हुशारीनें राहून वारंवार बाहेरची चौकशी ठेवीत असें, आणि पूर्वींप्रमाणें वारंवार बाहेरही पडत नसें. आणि जर एखादे वेळेस गेलोंच तर बेटाच्या पूर्व भागाकडे जात असें. कारण तिकडे ते रानटी लोक कधीं येत नाहींत अशी माझी बहुतेक खात्री झाली होती; ह्यामुळें दुसऱ्या भागाकडे मी कधीं गेलों तर जितक्या बंदोबस्तानें जावें लागे, व हत्यारें आणि दारूगोळा ह्यांचा जितका भार वहवा लागे, तितक्या बंदोबस्ताची वगैरे पूर्व बाजूस गरज नव्हती.

+ स्पेन देश व अमेरिकाखंडांतील युनैतेद स्तेत्सु नामक प्रांत ह्यांत चालणाऱ्या पीस आफ एत नामक नाण्याची किंमत सुमारें ४ शि. ४ पे. म्हणजे २०२०८ आहे.

* प्रत्येक दब्लून ३२ शिलींग अथवा १६ रुपये किमतीचें असतें.

यापुढें सुमारें दोड वर्षानंतर एके दिवशीं प्रातःकाळीं बेटाच्या ज्या बाजूस मी राहत होतों त्या बाजूस एकदम पांच होड्या किनाऱ्याजवळ एके ठिकाणीं जमलेल्या असून त्यांतील लोक किनाऱ्यावर उतरून कोठें गेले आहेत, असें दृष्टीस पडलें. हें पाहून मी अत्यंत चकित झालों. त्या लोकांची संख्या मनांत आणितांच माझें धाबें दणाणलें. कारण इतक्या पुष्कळ होड्या दृष्टीस पडल्या, आणि प्रत्येक होडींत ४-६व कधीं कधीं अधिकही मनुष्यें बसून येतात असें मला ठाऊक होतें, त्यामुळें आतां पुढें काय इलाज करावा, व मीं एकट्यानें ह्या वीस तीस मनुष्यांवर हल्ला कसा करावा, हें कांहींच सुचेना. तेव्हां व्यग्रांतःकरण होत्साता फार त्रासून मी आपल्या कोटांत जाऊन पडलों. तथापि मजवर हल्ला होऊन लढाईचा प्रसंग आला असतां लढावयास पूर्वीं सांगितल्या प्रकारची तयारी करून बसलों होतों. ह्याप्रमाणें बंदोबस्त करून, त्या लोकांचा गलबला ऐकूं येतो कीं काय म्हणून बराच वेळ कान देऊन बसल्यावर, शेवटीं आपल्या बंदुका तयार करून घेऊन त्या टेंकडीच्या माथ्यावर चढलों. तेथून पाहिलें तों ते सुमारें तीस असामी आहेत असें दृष्टीस पडलें त्यांनीं तेथें विस्तव पेटविला असून त्यावर ते मांस शिजवीत होते. त्यांनीं तें कसें शिजविलें व तें कोणत्या प्राण्याचें होतें हें समजलें नाहीं. परंतु त्या विस्तवाभोंवतीं ते आपल्या रितीप्रमाणें अनेक प्रकारें वांकडें तिकडें आंग हलवून व नानाप्रकारचीं वेडीं वांकडीं तोंडें करून नाचत होते.

ह्याप्रमाणें त्यांचें कृत्य मी पाहत आहें इतक्यांत दोन बिचारे हतभाग्य माणूस त्या होड्यांतून ओढून काढिलेले दृष्टीस पडले. ह्या दोघांस इतका वेळपर्यंत होड्यांतच ठेविलें होतें, व आतां त्यांची कत्तल करण्याकरितां बाहेर काढिलें, असें दिसलें. त्यांतील एक माणूस लागलाच खालीं पडला. त्यास त्यांनीं सोट्यानें किंवा लांकडी तरवारीनें ठोकून जमीनदोस्त केलें असें मला वाटलें. कारण हीच त्यांची ठार मारण्याची पद्धति असे. पुढें दोन तीन असामी तत्काल शिजविण्याकरितां त्याचें शरीर फाडून मांस काढण्याच्या उद्योगास लागले. इकडे तो दुसरा माणूस, ते लोक तयार होऊन त्यास मारावयास येत तोंपर्यंत, तसाच एकीकडे उभा केला होता. इतक्यांत, आपणाकडे कोणाचें लक्ष्य नाहीं,

असें पाहून त्या बिचाऱ्यास सहजच आपला जीव वांचविण्याची आशा उत्पन्न झाली; आणि तो त्या लोकांपासून निसटून वाळवंटामधून येऊन किनाऱ्याच्या ज्या बाजूस माझें राहण्याचें ठिकाण होतें तिकडे अतिशयितच त्वरेनें पळत सुटला.

आतां ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे कीं, तो माझ्या ठिकाणाकडे धांवत येत आहे असें जेव्हां मीं पाहिलें तेव्हां माझ्या मनांत मोठी धास्ती उत्पन्न झाली. त्यांत विशेषेंकरून जेव्हां त्याच्या पाठीस सारी टोळीची टोळी लागली आहे, व तो आतां माझ्या झाडींत येऊन लपणार, असें वाटलें, तेव्हांतर माझी अगदीं पांचांवर धारण बसली. तथापि मीं आपली जागा सोडिली नाहीं, आणि जेव्हां त्याचा पाठलाग करणारे असामी तिहींपेक्षां जास्त नाहींत असें दिसलें, तेव्हां मला किंचित् धैर्य येऊं लागलें. त्याहीपेक्षां जेव्हां त्यानें पळण्यामध्यें आपले पाठलाग करणाऱ्यांस मागें टाकिलें असें पाहिलें, तेव्हां मला अधिकच धैर्य आलें; कारण हा जर घटका दीड घटका असाच पळत राहील, तर त्या सर्वांच्या हातांतून अगदीं सुटेल, असे मला सहज दिसून आलें.

ते पळणारे लोक व माझा कोट ह्यांच्यामध्यें मीं पूर्वीं सांगितलेली खाडी होती, तींतून त्या मनुष्यास पोहून पार पडलें पाहिजे, नाहींतर तो बिचारा धरला जाईल असें स्पष्ट दिसून आलें, परंतु तो तेथें येतांच जरी त्या वेळेस खाडीस भरती आली होती, तरी तीस न जुमानितां त्यानें आंत उडी टाकिली, आणि सुमारें तीसच हात टाकून तो आलीकडील तीरास येऊन लागला, व पुनः अतिशयित जोरानें पळत सुटला. त्याचा पाठलाग करणारे ते तीन असामी खाडीजवळ येऊन पोंहोंचले; तेव्हां त्यांपैकीं दोघांसच पोंहतां येतें व तिसऱ्यास येत नाहीं असें दिसून आलें. तो तिसरा माणूस पलीकडील कांठावर कांहीं वेळ उभा राहिला, नंतर परतून आपल्या मंडळीकडे चालता झाला.

मीं असें पाहिलें कीं, त्या दोघां आसामींस त्या खाडींतून पोंहून पार पडण्यास पुढें पळालेल्या मनुष्याच्या दुप्पट वेळ लागला. तेव्हां अशी एक अनिवार्य कल्पना माझ्या अंतःकरणांत उत्पन्न झाली कीं, ह्या गरिबाचा जीव मीं वांचवावा अशी ह्या वेळेस परमेश्वराची इच्छा स्पष्ट दिसत आहे. असें मनांत येतांच करवली तितकी त्वरा करून मीं

मिडीवरून खालीं उतरलों, आणि आपल्या दोन बंदुका घेऊन तशाच घाईनें पुनः टेंकडीच्या माथ्यावर चढलों, व तेथून समुद्राच्या बाजूस वळलों; आणि टेंकडीवरून नीट उतरत्या अशा जवळच्या रस्त्यानें येऊन, ते पाठलाग करणारे व पुढें पळणारा मनुष्य ह्यांच्या मध्यें उभा राहिलों. नंतर त्या पुढील मनुष्यास मीं मोठ्यानें आरोळी दिली तों त्यानें मागें पाहिलें, तेव्हां प्रथमतः त्यास पाठीस लागलेल्या मनुष्यांप्रमाणेंच माझेंही भय वाटलें. पण मीं त्यास माघारा येण्यास हातानें खूण केली, आणि हळू हळू त्या मागून येणाऱ्या दोन आसामींकडे चाललों. नंतर त्या दोघांपैकीं पुढें आलेल्या मनुष्याच्या आंगावर एकदम तुटून पडून मीं बंदुकीच्या दुंध्यानें त्यास हाणून पाडिलें. हें पाहतांच त्याचे मागचा माणूस भ्यालयासारिखा होऊन तेथेंच थबकला. तेव्हां मीच पुढें सरसावलों. परंतु थोडासा जवळ गेल्यावर, त्यापाशीं तीर कमान असून तो मला तीर मारण्याची तयारी करीत आहे, असें तत्काळ माझ्या दृष्टीस पडलें. त्यामुळें अर्थातच त्यास आधीं गोळी मारणें मला प्राप्त झालें. तेव्हां बंदूक सोडून पहिल्याच गोळीस मीं त्यास ठार केलें. तो बिचारा पुढें पळणारा रानटी माणूस, मीं हाक मारिल्या वरून, थांबला होता, त्यानें जरी आपले दोघेही शत्रु पडलेले पाहिले, तरी माझ्या बंदुकीच्या चमकीनें व आवाजानें तो इतका भिऊन गेला होता कीं, तो स्तंभासारिखा निश्चल उभा राहिला; पुढें येईना व मागेंही जाईना; तरी मागेंच पळून जाण्याचा त्याच्या मनाचा विशेष कल दिसूं लागला. मीं त्यास पुढें येण्याविषयीं खुणा केल्या, त्या सहज समजून तो थोडासा आलीकडे आला, मग पुनः थांबला, व आणखी थोडासा पुढें येऊन पुनः आणखी थांबला. तेव्हां जसें कांहीं त्यास बंदिवान केलें आहे, व त्याच्या दोघां शत्रूं प्रमाणें त्यासही ठार मारावयास काढिलें आहे, म्हणून तो थरथर कांपत उभा आहे, असें माझ्या दृष्टीस पडलें. आणखी एकदा मीं त्यास पुढें येण्यास खूण केली, आणि त्याला धीर देण्याकरितां जितक्या कांहीं गोष्टी सुचल्या तितक्या सर्व केल्या. तेव्हां मीं त्याचा जीव वांचविल्याबद्दल कृतज्ञता दाखविण्याकरितां प्रत्येक १०।१२ पावलांवर गुडघे टेंकीत टेंकीत तो जवळ जवळ येऊं लागला. शेवटीं अगदीं माझ्याजवळ येऊन गुडघे टेंकून

व त्यानें भूमीचें चुंबन घेतलें, व आपलें मस्तक जमिनीवर टेकून त्यानें माझा पाय उचलून त्यांवर ठेविला. हा प्रकार, मी आमरण तुमचा दास होऊन राहीन, अशी शपथ घेण्याकरितां त्यानें केला असावा, असें दिसतें. मीं त्यास उठविलें आणि पुष्कळ पाठ थापटून देववला तितका धीर दिला. असो, परंतु अद्यापि थोडें काम करावयाचें राहिलें होतें; तें हें कीं ज्या मनुष्यास मीं बंदुकीच्या घावानें ह्मणून पाडिलें होतें, तो अगदीं ठार झाला नव्हता, त्या प्रहारानें तो मूर्च्छित मात्र होऊन पडला होता; तो आतां हळू हळू सावध होऊं लागला. तेव्हां त्याकडे बोट दाखवून तो पुरता मेला नाहीं, असें त्या मनुष्यास मीं दर्शविलें. तें पाहून तो मजशीं कांहीं शब्द बोलला, त्यांचा अर्थ मला समजला नाहीं खरा, परंतु ते माझ्या कानांस फार गोड लागले; कारण स्वतः माझें बोलणें शिवाय करून त्या पंचवीस वर्षांत मीं मनुष्याचा शब्द ऐकिला असा काय तो पहिल्यानें हाच. असो पण असले विचार करीत बसण्याची ती वेळ नव्हती. कारण तो ह्मणून पाडिलेला माणूस इतका चांगला सावध झाला कीं, तो उठूनसुद्धां बसला; आणि हें पाहतांच मजजवळचा माणूसही भिऊं लागला, असें दिसलें. असा प्रकार पाहून त्यास गोळी मारण्याकरितां म्हणून मीं आपली दुसरी बंदूक त्यावर रोंखून धरितांच मजजवळच्या मनुष्यानें कांहीं खूण करून माझी तरवार मागितली, मीं त्यास तरवार दिली, ती प्राप्त होतांच तो आपल्या शत्रूवर धांवून गेला आणि एकच घाव मारून त्यानें इतक्या चातुर्यानें त्याचें शिर उडविलें कीं, युरोपांतील कोणत्याही मारेकऱ्यास ह्यापेक्षां विशेष चातुर्यानें उडवितां आलें नसतें. ह्या प्रमाणें कृत्य केल्यावर तो तरवार घेऊन माघारा मजकडे आला, आणि मला समजले नाहींत असे नाना प्रकारचे हावभाव करून त्या मारिलेल्या मनुष्याच्या शिरा सुद्धां तरवार त्यानें मजपुढें ठेविली. . . . .

परंतु मीं इतका दूर उभा राहून तो दुसरा मनुष्य मारिला कसा, ह्याचेंच त्यास मोठें आश्चर्य वाटलें होतें म्हणून त्याकडे बोट दाखवून, मला त्याकडे जाऊंद्या, असें खुणेनें तो मला म्हणाला. तेव्हां मींही खुणेनें त्यास जावयास सांगितलें. तो त्या मनुष्याजवळ जाऊन चकित झाल्यासारिखा उभा राहिला, आणि त्यास ह्या आंगावरून त्या आंगावर व त्या

आंगावरून ह्या आंगावर वळवून पाहूं लागला. नंतर माझ्या गोळीनें त्यास जो जखम झाली होती तो त्यानें पाहिली, आणि त्याची तीर कमान घेऊन तो परत आला. तेव्हां मी माघारां जावयास निघालों; आणि कदाचित् ह्यांच्या मागून आणखीही रानटी लोक येतील असें खुणांनीं दर्शवून त्यास मीं आपल्यामागें येण्यास खूण केली.

ह्यावर त्यानें पुनः खुणांनीं सांगितलें कीं, बाकीचे लोक आले तर हीं मेतें त्यांच्या दृष्टीस न पडावीं म्हणून मला हीं मेतें वाळूंत पुरून टाकिलीं पाहिजेत. तेव्हां मींही त्यास खूण करून पुरावयास सांगितलें. तें पाहून तो त्या कामास लागला, आणि थोडक्याच वेळांत तीं दोनही मेतें पुरण्याजोगी खळी वाळूमध्यें त्यानें हातांनींच खणून तयार केली. मला वाटतेंकीं, त्यानें तीं दोनही मेतें सुमारें अर्ध्या घटकेंतच पुरून टाकिलीं. नंतर त्यास खूण करून मीं आपणाबरोबर चलावयास सांगितलें; आणि त्यास आपल्या कोटाकडे न नेतां बेटाच्या अगदीं पलीकडील बाजूस माझी गुहा होती, त्या ठिकाणींच नेमका घेऊन गेलों. नंतर फार धांवल्यामुळें खाण्यापिण्यावांचून तो फार व्याकूळ झाला आहे, असें दिसून आलें; तेव्हां मीं त्यास खावयास थोडी भाकरी व मनुकांचा एक घड दिला, आणि प्यावयास थोडें पाणी दिलें. ह्याप्रमाणें त्यास ताजातवाना केल्यावर, भातेण पसरून त्यावर घोंगडी घालून मीं आपणास कधीं कधीं निजण्याकरितां एक जागा तयार केली होती, ती त्यास दाखवून खुणांनीं तेथें निजावयास सांगितलें. तेव्हां तो गरीब बिचारा तेथें जाऊन पडला, आणि झोंपीं गेला.

तो मनुष्य सुरेख व देखणा असून त्याचें शरीर अगदीं बांधेसुद होतें. सर्व अवयवही निटस व सडक असून अतिशयित मोठाले नव्हते. तो बराच उंच असून माझ्या अजमासानें सुमारें २६ वर्षांचा होता. त्याच्या चेहऱ्यांत कांहीं मर्दपणा दिसे, तरी युरोपियन लोकांप्रमाणें त्याच्या मुखश्रीमध्यें माधुर्य व मार्दव हेही गुण होते; आणि विशेषेंकरून तो हास्य करूं लागला म्हणजे तर ते फारच स्पष्ट दिसून येत. त्याच्या डोकीचे केश लांब व काळे भोर होते. कपाळ उंच व विशाल होतें, आणि नेत्र अत्यंत तेजस्वी व पाणीदार होते. त्याच्या त्वचेचा वर्ण अगदीं काळा कुळकुळीत नव्हता, भोरा होता; आणि तो तरी, ब्रेझिल

व वर्जिन्या ह्या देशांतील लोक व अमेरिकेंतील इतर मुलखचे लोक ह्यां-च्या वर्णाप्रमाणें विरूप व ओंखरवाणा असून, भोंरा असा नव्हता; परंतु जैतून फळाच्या तेजस्वी भोन्या रंगाप्रमाणें असून त्यांत अशी कांहीं रमणीयता असे कीं, तिचें वर्णन सहज करितां येणार नाहीं. त्याचा तोंडवळा वाटोळा गरगरीत असून गुबगुबीत होता, नाक लहान होतें, तरी सिद्दीलोकांच्या नाकाप्रमाणें चपटें नव्हतें; त्याची जेवणीही फार सुंदर, ओंठ पातळ, दांत सारखे ओळीनें असून हस्तिदंताप्रमाणें पांढरे शुभ्र होते. सुमारें घटकाभर डुकली घेतल्यावर (ह्या वेळेस त्याला चांगलीशी झोंप लागली असें म्हणतां येत नाहीं.) तो जागा झाला, आणि मला पाहण्याकरितां गुहेच्या बाहेर आला; कारण त्या वेळेस मी जवळच्या वाडग्यांत शेळ्यांचें दूध काढीत बसलों होतों. त्यानें मला दुरून पाहिलें तेव्हां तो धांवतच मजजवळ आला; आणि आपली नम्रता व कृतज्ञता दर्शविण्याकरितां जितक्या कांहीं त्यास करवल्या तितक्या खुणा करून पुन: जमिनीवर पडला. शेवटीं त्यानें आपलें डोकें माझ्या एका पायाजवळ जमिनीवर पुरतें टेंकिलें, आणि पूर्वींप्रमाणें माझा दुसरा पाय घेऊन आपल्या डोक्यावर ठेविला. हें झाल्यानंतर मी यावज्जीव तुमची सेवा करीन, हें सांगण्याकरितां सुचल्या तितक्या खुणा त्यानें केल्या. त्याच्या बऱ्याच खुणांचा अर्थ मला समजला, आणि मी तुजवर फार खुष आहे, असें मीं त्यास दर्शविलें. कांहीं वेळानें मी त्याच्याशीं बोलूं लागलों, आणि त्याला आपणाशीं बोलावयास शिकवूं लागलों. प्रथमत: ज्या दिवशीं मीं त्याचा जीव वांचविला तो दिवस फ्रैदे (शुक्रवार) होता, तर हेंच तुझें नांव असें मीं त्यास समजाविलें. त्याप्रमाणेंच त्यास मास्तर हा शब्द म्हणावयास शिकवून हें माझें नांव असें मीं त्यास कळविलें. तसेंच "होय," "नाहीं" हे शब्द म्हणावयास त्यास शिकवून त्यांचा अर्थही त्याच्या ध्यानांत आणून दिला. नंतर एका मातीच्या भांड्यांत त्यास दूध देऊन, मी तें पितों कसें, व त्यांत भाकरी भिजवितों कशी हें त्यास पहिल्यानें पाहूं दिलें; मग त्यालाही दुधांत भिजवून खाण्यास मीं एक पांवाचा तुकडा दिला, तो घेऊन त्यानें मजप्रमाणें केलें, आणि, हें मला फार गोड लागतें, असें त्यानें खुणांनीं दर्शविलें.

ती सारी रात्र मीं त्या मनुष्या सहवर्तमान तेथेंच घालविली; परंतु सकाळ होतांच त्याला खूण करून मीं आपणाबरोबर येण्यास सांगितलें; व आतां मी तुला कांहीं कपडे आंगांत घालावयास देतों, असें त्यास कळविलें. हें माझें म्हणणें समजतांच तो फार हर्षित झालासें दिसलें. नंतर त्याचे शत्रु गेले किंवा नाहींत हें पाहण्याकरितां मी त्यास घेऊन टेंकडीच्या माथ्यावर गेलों; आणि आपली दुर्बीन काढून पाहिलें, तों ज्या ठिकाणीं ते लोक होते ती जागा स्पष्ट दृष्टीस पडली; परंतु ते लोक किंवा त्यांच्या होड्या वगैरे कांहींच तेथें दिसलें नाहीं. ह्यावरून ते लोक आपल्या दोघां सोबत्यांचा शोध मुळींच न करितां त्यांस मागें टाकून निघून गेले असें स्पष्ट दिसलें.

परंतु एवढेंच समजून माझी तृप्ति झाली नाहीं; आणि हल्लीं मजमध्यें धैर्य किंचित् ज्यास्त आलें होतें, त्यामुळें आतां त्या लोकांचा पूर्ण वृत्तांत समजून घ्यावा असें माझ्या मनांत आलें. तेव्हां फ्रैदे ह्यास बरोबर घेऊन ज्या ठिकाणीं ते लोक उतरले होते तिकडे मी गेलों. त्या स्थळीं पोहोंचल्यावर तेथील भयंकर प्रकार पाहतांच माझ्या आंगावर रोमांच थरारून उठले, व अंतःकरण अगदीं खचून गेलें. ती जागा मनुष्यांच्या अस्थींनीं अगदीं आच्छादित झाली होती, सर्व जमीन रक्तानें लाल होऊन गेली होती, व अर्धेमुर्धेच खाऊन छिन्न विच्छिन्न केलेले मांसाचे मोठमोठाले तुकडे ठायीं ठायीं पडले होते. सारांश, त्यांनीं केलेल्या मेजवानीचीं सर्व कांहीं चिन्हें तेथें पडलीं होतीं. फ्रैदे ह्यानें आपल्या खुणांनीं माझ्या लक्ष्यांत आणून दिलेंच होतें कीं, त्या लोकांनीं मेजवानी करितां चार बंदिवान ह्या ठिकाणीं आणिले होते, त्यांपैकीं तीन त्यांनीं खाऊन टाकिले, आणि (आपणाकडे बोट दाखवून) मी चवथा. आणखी त्यानें असें सांगितलें कीं, ह्या लोकांचा राजा व ह्यांच्या जवळच्या देशांतील राजा (ह्याच्याच प्रजेंतील फ्रैदे हा माणूस होता असें दिसतें) ह्यांजमध्यें मोठा युद्धप्रसंग होऊन ह्यांनीं त्या राजाचे पुष्कळ लोक बंदिवान केले; व जसें ह्या लोकांनीं त्या बिचाऱ्या चौघांस खावयाकरितां एथें आणिलें होतें तसें ज्यांनीं ज्यांनीं जे लोक लढाईंत धरिले त्यांनीं त्यांनीं त्यांस खाऊन टाकण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं नेलें.

मीं फ्रैदे ह्याजकडून तीं सर्व नरकपाळें, अस्थि, मांस, वगैरे जें कां-

हीं तेथें पडलें होतें तें सर्व एके ठिकाणीं जमवून त्यांचा एक ढीग करविला, आणि त्यावर मोठा विस्तव पेटवून जाळून त्यांची राख करविली. फ्रैदे ह्याची अजूनही त्यांतलें थोडें मांस खाण्याकरितां आशा गुंतली होती; व अजून त्याची स्वभावसिद्ध नरभक्षकता होती ती होतीच; परंतु ह्या कल्पनेचा किंवा असला कांहीं प्रकार दृष्टीस पडला असतां त्याचा इतका तिरस्कार मी दर्शवीत असें कीं, त्याला आपली इच्छा बाहेर दर्शविण्यास धैर्य होईना; कारण, असली इच्छा दाखविली असतां मी तुला ठार मारीन, असें कांहीं प्रकारांनीं मीं त्याच्या लक्ष्यांत आणून दिलें होतें.

असो, तें काम शेवटास नेल्यावर, आम्ही माघारे आपल्या कोटांत चाललों. नंतर तेथें मी फ्रैदे ह्याच्या वस्त्रप्रावरणादिकांच्या तजविजीस लागलों. प्रथमतः मीं त्यास एक तागाचा चोळणा घालावयास दिला. हा चोळणा त्या फुटक्या गलबतांतील गोलंदाजाच्या पेटाऱ्यांत मला सांपडला होता; त्यांत थोडासा फेरफार केल्यावर तो फ्रैदे ह्यास ठीक झाला. नंतर बोकडाच्या कातड्याची एक बंडी मीं त्यास करून दिली; आणि शेवटीं ससाच्या कातड्याची केलेली एक टोपी दिली. ह्याप्रमाणें त्याच्या पोषाखाची सध्यांपुरती बरीच सोय झाली, तेव्हां, आपला पोषाख बहुतेक आपल्या धन्याच्या पोषाखांप्रमाणेंच आहे, असें पाहून तोही फार खुष झाला.

मी फ्रैदे ह्यास घरीं घेऊन आलों त्याच्या दुसऱ्या दिवशीं त्याच्या राहण्याची कशी काय सोय करावी ह्या विषयीं विचार करूं लागलों; आणि त्याची सोय चांगली होऊन मला ही त्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नसावें, ह्या हेतूनें माझ्या दोन तटांच्या मध्यें, म्हणजे पहिल्या तटाच्या बाहेर व दुसऱ्याच्या आंत, जी रिकामी जागा होती, तीवर मीं त्याच्याकरितां एक राहुटी ठोकिली. ह्या ठिकाणीं माझ्या गुहेंत शिरण्याचा एक मार्ग होता, म्हणून दाराच्या चौकटीसारखी एक चौकट तयार करून तिला फळ्यांचीं दारें लाविलीं, आणि तीं त्या मार्गांत किंचित् आंतल्या बाजूस बसविलीं. तीं दारें आंतल्या बाजूस उघडतीं करून मी त्यास रात्रीचा आडसर घालून टाकीत असें, व आपल्या शिड्या ही रात्रीं भिंतीच्या आंतल्या बाजूस घेत असें. हें सर्व

अशाकरितां कीं, फ्रैदे ह्या कदाचित् दुष्ट बुद्धीनें रात्रीस आंतील तटा-च्या आंत येऊं लागलाच, तर निदान मी जागा होईन इतकी गडबड केल्यावांचून तरी त्यास तट ओलांडून आंत येतां येऊं नये. हत्यारां-विषयीं म्हटलें तर तीं सर्व नित्य रात्रीस मी आपणाजवळ आणून ठेवीत असें.

परंतु खरोखर पाहिलें असतां असा कोणताच बंदोबस्त करण्याचें मला प्रयोजन नव्हतें. कांकीं, फ्रैदे ह्या पेक्षां इमानी, मायाळू, व नि-ष्कपटी असा चाकर कोणास कधींच मिळाला नसेल. तो रागीट, घु-म्या, कुचर किंवा कावेबाज असला नसून, पुत्राचें अंतःकरण जसें सर्व-थैव पित्यावर असतें तसें त्याचें मजवर असे. आणखी मला असें खचीत वाटतें कीं, कधीं प्रसंग आला असता तर मला वांचविण्याकरितां त्यानें आपला जीवसुद्धां खर्चिला असता; व ह्या गोष्टीचे अनेक प्रत्यय येऊन फ्रैदे ह्यापासून आपलें संरक्षण करण्याकरितां कोणताही बंदोबस्त कर-ण्याची जरूरी नाहीं, अशी माझी लवकरच खात्री होऊन गेली.

फ्रैदे ह्याच्या संगतीनें मला फार आनंद होऊं लागला आणि ज्या गोष्टी शिकविल्यानें तो उपयोगी व चतुर माणूस होईल अशा सर्व गो-ष्टी त्यास शिकविणें, व मुख्यत्वेंकरून त्यास बोलावयास व माझें बोल-णें समजावयास शिकविणें हें मी आपलें एक मुख्य कामच समजूं लाग-लों. तो ही खरोखर इतका योग्य शिष्य होता कीं, असा कधींच को-णाच्या पाहण्यांत आला नसेल. आणि तो इतका उल्हासवृत्ति, व सतत उद्योगी, होता कीं माझें बोलणें त्याला समजलें असतां किंवा त्यास आ-पल्या मनांतील गोष्ट समजून देतां आली असतां त्याला फार संतोष हो-त असे, ह्यामुळें त्याच्याशीं बोलत बसणें मला मोठें आनंददायक होत अ-से. सांप्रत माझा काळ इतक्या सुखानें जाऊं लागला कीं, आतां आणखी रानटी लोकांपासून जर भय प्राप्त न होईल, तर हल्लींच्या ठिकाणाहून माझें जाणें कधींच न झालें तरी चिंता नाहीं, असें मी आपणाशीं म्हणूं लागलों.

नंतर माझ्या मनांत सहज अशी एक गोष्ट आली कीं, फ्रैदे ह्यास आपल्या पूर्वींच्या भक्ष्याचा, म्हणजे नरमांसाचा विसर पडण्यास त्या-ला दुसऱ्या एखाद्या प्राण्याच्या मांसाची रुचि घेऊं द्यावी म्हणजे झालें;

म्हणून एके दिवशीं प्रातःकाळीं आपल्या कळपांतील एक करडूं मारून तें घरीं आणून त्याचें मांस शिजवावें, अशा बेतानें मी फ्रैदे ह्यास बरो-बर घेऊन कळपाकडे चाललों. वाटेनें जात असतां झाडाच्या छाये-खालीं एक शेळी व तिच्याजवळ दोन करडें, अशीं दृष्टीस पडलीं. तें-व्हां मीं फ्रैदे ह्यास धरून उभें केलें, आणि हालूं नको असें त्यास खुणेनें सांगितलें. नंतर त्या करडांपैकीं एका करडावर बंदूक रोंखून मीं तें गो-ळी घालून ठार मारिलें. फ्रैदे ह्याच्या दोघां शत्रूंपैकीं एकास मीं अशी-च गोळी घालून मारिलें, तें कृत्य त्यानें दुरून पाहिलें होतें खरें, परंतु तें मीं कसें केलें हें त्या बिचाऱ्याच्या ध्यानांत आलें नव्हतें, व त्याविषयीं त्यास कांहीं कल्पनाही करितां आली नव्हती, त्यामुळें तो ह्या वेळेस फार विस्मित होऊन गेला. मीं ज्यावर नेम धरिलें होतें तें करडूं त्यानें पाहिलें नव्हतें, व मारिल्यावरही त्याच्या दृष्टीस पडलें नाहीं. परंतु आपणासच कोठें जखम पडली आहे कीं काय, म्हणून चांचनून पाह-ण्याकरितां त्यानें आपलें वास्कूट मोकळें केलें, आणि, हा मला खचीत ठार मारणार, असें त्याला वाटलें असावें; कारण त्यानें पुढे येऊन मज-पुढें गुडघे टेंकिले, आणि माझ्या गुडघ्यास घट्ट मिठी घालून तो कायसें पुष्कळ बोलला तें मला समजलें नाहीं; परंतु माझा जीव घेऊं नका, अ-शी तो माझी प्रार्थना करीत आहे, हेंच त्या बोलण्याचें तात्पर्य, एवढें सहज लक्ष्यांत आलें.

पुढें लवकरच कांहीं युक्ति करून, मजपासून तुला यत्किंचित् ही उपद्रव होणार नाहीं, अशी मीं त्याची खात्री करून दिली, आणि त्या-चा हात धरून त्यास उठवून हास्यवदनानें त्याजकडे पाहिलें, व मीं मा-रिलेल्या करडाकडे बोट दाखवून धांवत जाऊन तें आणण्याविषयीं त्या-स खूण केली. त्याप्रमाणें त्यानें केलें; तें करडूं मारिलें तरी कसें, म्ह-णून मोठ्या आश्चर्यानें तो त्याकडे पाहत आहे, इतक्यांत मीं आपली बंदूक पुनः खचिली; आणि जवळच्या एका झाडावर एक पोपट बसला होता त्याच्याकडे बोट दाखवून, आतां, मी ह्यास गोळी घालून मारणार असें त्याच्या लक्ष्यांत आणून दिलें. त्याप्रमाणें मीं बंदूक सोडितांच तो पोपट खालीं पडला. हें पाहून, मीं त्यास न भिण्याविषयीं पूर्वी इ-तर्के सांगितलें असतां ही पुनः तो भयभीत झाल्यासारिखा उभा राहिला,

आणि ह्या वेळेस तर तो फारच घाबरा झाला, कारण बंदुकींत कांहीं घालितांना त्याचें मला पाहिलें नव्हतें; त्यामुळें बंदुकींत प्राणघातक पदार्थांचा अद्भुत संचयच आहे, व मनुष्य, पशु, पक्षी अथवा दुसरा कोणताही प्राणी, दूर असो किंवा सन्निध असो, त्याचें प्राणहरण करण्याचें सामर्थ्य हिजमध्यें आहे, असें त्यास वाटलें. त्यास ह्या गोष्टीचें इतकें आश्चर्य वाटलें होतें कीं, जर मी त्यास प्रतिबंध न करितों, तर तो मला व माझ्या बंदुकीला अंतःकरणपूर्वक देव समजून भजता देखील. बंदुकीला तर ह्यापुढें कित्येक दिवस त्यानें स्पर्श सुद्धां केला नाहीं; परंतु तिच्याशीं तो बोलत बसे, जशी कांहीं ती ह्यास उत्तरेंच देत आहे. त्या सर्व बोलण्यांत, तूं मला मारूं नको, अशी तो तिची प्रार्थना करीत असे, हें मला पुढें कळून आलें.

असो, पुढें तें करडूं मीं घरीं आणिलें, आणि त्याच दिवशीं संध्याकाळीं त्याचें कातडें काढून त्याचे सांधे सोडविले, नंतर मांस शिजविण्याजोगें मजजवळ एक भांडें होतेंच, त्यामध्यें त्यांतलें कांहीं मांस शिजवून त्याचा पसंत रसा (मांसाची कढी) बनविला, व तो आम्हीं दोघांनीं खाऊन टाकिला. दुसरे दिवशीं थोडें करडाचें मांस भाजून त्यास खावयास देण्याचा मीं निश्चय केला; आणि इंग्लंडांत ज्या रीतीनें मांस भाजतांना मीं पुष्कळ लोकांस पाहिलें होतें त्या रीतीनें भाजण्याकरितां, विस्तवाच्या दोहीं बाजूंस दोन काठ्या पुरून त्यांवर एक आडवी काठी घातली, आणि तिला दोरीनें विस्तवावर मांस टांगून एक सारिखें फिरतें ठेविलें. अशा रितीनें भाजिलें हें पाहून फ्रैदे ह्यास मोठा अचंबा वाटला; परंतु जेव्हां त्यानें त्या मांसाची रुचि घेतली, तेव्हां हें मला फार फार आवडलें म्हणून इतक्या प्रकारांनीं त्यानें मला सांगितलें कीं, त्याच्या मनांतील भावाविषयीं मला मुळींच भ्रांति उरली नाहीं. शेवटीं त्यानें मला असें दर्शविलें कीं, मी ह्यापुढें नरमांसास कधीं स्पर्श देखील करणार नाहीं; हें त्याचें म्हणणें समजून अर्थातच मला मोठा संतोष झाला.

दुसरे दिवशीं, ज्याप्रमाणें मी धान्य मळून पाखडीत असें, त्याप्रमाणें थोडेंसें धान्य तयार करण्यास मीं फ्रैदे ह्याला बसविलें. हें काम लवकरच त्याला मजप्रमाणें करितां येऊं लागलें. आणि विशेषेंकरून

जेव्हां भाकरीकरितां तें धान्य तयार करावयाचें असें त्यास समजलें तेव्हां तो फारच आस्थेनें तें काम करूं लागला. नंतर मी भाकरी करितों कशी, व भाजितों कशी हें मीं त्यास दाखविलें. सारांश, थोडक्याच काळांत माझें सर्व काम त्याला मजप्रमाणें करितां येऊं लागलें.

ह्या ठिकाणीं मीं जितकीं वर्षें घालविलीं त्या सर्वांमध्यें हें वर्ष फारच सुखांत गेलें. फ्रैदे ह्यास ज्या ज्या वस्तू मागण्याचें मला कारण पडे, त्या सर्व वस्तूंचीं, व ज्या ज्या ठिकाणीं मला त्यास पाठवावें लागे, त्या त्या ठिकाणांचीं नांवें त्यास समजूं लागलीं; व मजशीं पुष्कळ बोलतांही येऊं लागलें. सारांश, ह्यापूर्वीं मला आपल्या वाणीचा उपयोग करण्याचा फार थोडा प्रसंग पडत असे, तो आतां कांहींसा प्रसंग पडूं लागला. त्याच्याशीं बोलण्यामध्यें मला मोठा संतोष होत असे हें खरेंच, पण ह्याखेरीज स्वतः त्याला पाहूनच मला कांहीं अपूर्व समाधान वाटे. त्याचा निष्कपट सरलस्वभाव दिवसानुदिवस अधिकाधिकच दृष्टोत्पत्तीस येऊं लागला; आणि त्यामुळें त्या प्राण्यावर माझें वास्तविक प्रेम जडत चाललें. तोही मजवर इतकी प्रीति करी कीं, ह्या पूर्वीं कोणावर ही त्याची इतकी बसली नसेल.

ह्याला पुनः स्वदेशीं जाण्याविषयीं इच्छा आहे किंवा नाहीं, हें त्यास एकवेळ विचारून पहावें, असें माझ्या मनांत होतें. सबब सामान्यतः माझ्या कोणत्याही प्रश्नाचें उत्तर देतां येईल इतक्या प्रतीची इंग्रजी भाषा मीं त्यास शिकविल्यावर, एके दिवशीं आम्ही संभाषण करीत बसलों असतां मीं त्यास विचारिलें, तुझ्या देशांतील लोकांनीं लढाईत कधींच जय मिळविला नाहीं काय? हें ऐकून तो हांसून म्हणाला, होय होय, आम्ही नेहमीं अधिक चांगलें लढतों. ह्या त्याच्या म्हणण्याचा भाव, लढाईमध्यें आमचें नेहमीं वर्चस्व असतें, असा होता. ह्यानंतर पुढें लिहिल्याप्रमाणें आमचा संवाद झाला:—

राबिन्सन्— अरे फ्रैदे, जर तुम्ही अधिक चांगले लढतां तर मग तूं धरला गेलास कसा?

फ्रैदे— मी धरला गेलों खरा, तरी माझ्या लोकांनीं जय मिळविला.

रा०— जय मिळविला! अरे जर तुमच्या लोकांनीं जय मिळविला, तर शत्रूंनीं तुला धरिलें कसें?

फ्रै०— जेथें मी होतों, तेथें माझ्या लोकांपेक्षां शत्रु पुष्कळ. ते एक, दोन, तीन आणि मला धरितात. जेथें मी नव्हतों, तेथें माझ्या लोकांनीं त्यांस फार मारिलें; तेथें माझे लोक एक, दोन, पुष्कळ हजार धरितात.

रा०—.पण तुमच्या पक्षाच्या लोकांनीं तुला शत्रूंच्या हातून कां सोडविलें नाहीं.

फ्रै०— ते एक, दोन, तीन, आणि मला घेऊन पळाले, आणि होडींत नेलें; आणि आमचे लोकांस त्यावेळेस होडी नव्हती.

रा०-- बरें, फ्रैदे, ज्यांना तुमचे लोक धरून नेतात त्यांचें ते काय करितात ? ह्यांनीं जसें केलें तसें ते धरिलेल्या लोकांस नेऊन खातात काय ?

फ्रै०— होय, आमचे लोकही मनुष्यें खातात; सगळ्यांना गट्ट करितात.

रा०— ते त्यांस कोणत्या ठिकाणीं नेतात ?

फ्रै०— त्यांच्या मनास येईल त्या ठिकाणीं नेतात.

रा०— ते कधीं ह्या ठिकाणीं येतात काय ?

फ्रै०— होय होय, ते इकडे येतात, दुसरे ठिकाणींही जातात.

रा०— तूं कधीं त्यांच्याबरोबर इकडे आला होतास काय ?

फ्रै०— होय, मी आलों होतों. (असें म्हणून त्यानें बेटाच्या वायव्य भागाकडे बोट दाखविलें; ह्यावरून त्याच बाजूस त्यांचा देश असावा असें दिसलें.)

ह्या त्याच्या बोलण्यावरून, ज्या नरमांसभक्षणाच्या व्यापारा करितां फ्रैदे ह्यास त्याच्या शत्रूंनीं एथें आणिलें होतें, त्या करितांच जे रानटी लोक बेटाच्या दुसऱ्या बाजूस पूर्वी येत असत, त्यांमध्यें हाही आला होता, हें माझ्या लक्षांत आलें. आणि कांहीं कालानंतर जेव्हां मी धीर धरून त्याला घेऊन बेटाच्या त्याच बाजूस गेलों (ही बाजू मीं पूर्वीं सांगितली होती तीच) तेव्हां तत्काल त्यानें ती जागा ओळखिली; आणि तो मला म्हणाला, मी ह्या ठिकाणीं एकदां आलों होतों; त्या वेळेस आमच्या लोकांनीं वीस पुरुष दोन बायका, आणि एक मूल, इतकीं मनुष्यें खाऊन टाकिलीं. त्याला वीस ही संख्या म्हणतां ये-

ईना, म्हणून त्यानें तितकेच धोंडे जमिनीवर ओळीनें मांडिले, आणि मला ते मोजावयास सांगितलें.

ह्याप्रमाणें त्याच्याशीं संवाद झाल्यावर, ह्या बेटापासून तुमच्या देशाचा किनारा किती दूर आहे, व त्या मार्गानें होड्या जात येत असतां कधीं नाहींतशा होतात कीं काय? असें मीं त्यास विचारिलें. त्याच्या उत्तरावरून असें समजलें कीं, त्या मार्गांत कोणत्याही प्रकारचा धोका नाहीं, व कधीं एकही होडी नाहींशी झाली नाहीं; परंतु इतकेंच कीं, किनारा सोडून किंचित् दूर गेल्यावर सकाळचा ओघ व वारा हे एकेकडचे नेहमीं लागतात व दुपार झाल्यावर उलटे लागतात. ह्या सांगत आहे ह्या भरती ओहोटीचाच परिणाम, दुसरें कांहीं नाहीं, असें मला वाटलें होतें; परंतु पुढें मला कळून आलें कीं, ज्या ओरिनोको नामक प्रचंड नदीच्या मुखांत म्हणजे खाडींत आमचें बेट आहे असें मागून मला समजलें, तिच्या वेगाच्या न्यूनाधिक्यामुळें हें घडून येतें. तो देश, तेथील लोक, तो समुद्र व त्याचा किनारा ह्यांविषयीं, व जवळ दुसरे कोणते लोक राहतात ह्याविषयीं मीं फैदे ह्यास हजारों प्रश्न विचारिले; आणि त्यानेंही ठाऊक होतें तितकें सर्व अति निष्कपटपणें मला सांगितलें. त्याच्या जातीच्या दुसऱ्या लोकांचीं नांवें मीं त्यास विचारिलीं परंतु "कारिब" ह्याशिवाय दुसरें कोणतेंच नांव त्याला सांगतां येईना. ह्यावरून मला सहज समजलें कीं, अमेरिकेचा जो भाग ओरिनोको नदीच्या मुखापासून गिनी प्रांतापर्यंत व पुढें सेंट् मार्था पर्यंत पसरत गेला आहे, त्या भागावर आमचे नकाशांत जे कारिबी लोक लिहिले आहेत तेच हे. त्यानें मला सांगितलें कीं चंद्राच्या पलीकडे लांब, म्हणजे चंद्र मावळण्याच्या जागे पलीकडे, (अर्थात् त्याच्या देशाच्या पश्चिमेस म्हटलें पाहिजे) तुमच्या सारिखे दाढीवाले लोक राहतात, असें म्हणून त्यानें माझ्या मोठाल्या कल्ल्यांकडे बोट दाखविलें. नंतर पुनः म्हणाला कीं, त्यांनीं पुष्कळ मनुष्यें मारिलें. ह्या त्याच्या बोलण्यावरून, ज्या स्पान्यर्ड लोकांचीं क्रूर कृत्यें अमेरिकेंतील सर्व देशांवर पसरलीं होतीं, व ज्यांच्या कृत्यांचा तेथील लोकांस पिढ्यानपिढ्या विसर पडला नाहीं, त्या स्पान्यर्द लोकांविषयीं हा बोलत आहे, असें मी समजलों.

ह्या वेळेपासून त्या लोकांकडे आपल्याला कांहीं युक्तिनें मला सांगूं शकेल किंवा नाहीं? असें मीं त्यास विचारिलें तेव्हां तो म्हणाला, होय होय, तुम्ही दोन होड्यांत जा. दोन होडी म्हणण्यांत त्याचा भावार्थ काय हें मला समजेना, व त्याच्याही तोंडांतून स्पष्ट होईना. शेवटीं मोठ्या कष्टानें कळून आलें कीं, दोन होड्यांएवढी एक मोठी होडी असावी म्हणजे तींत बसून जातां येईल, असा त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता.

हें ऐकून ह्याचें भाषण मला फार गोड लागलें; आणि ह्या वेळेपासून मला अशाही उत्कंठा झाली कीं, कधीं तरी एथून आपली सुटका करून घेण्याची संधि मला सांपडेल आणि हा बिचारा रानटी माणूस त्या कामांत मला मदत करण्यास उपयोगीं पडेल.

जेव्हे हा माणसाबरोबर बोलावयास लागून माझें बोलणें समजूं लागलें, त्यामुळें तो माझ्याजवळ राहिल्या दिवसापासून आजपर्यंत गेलेल्या काळांत त्याचे अंतःकरणामध्यें देवाविषयीं ज्ञाया घालण्याकरितां यत्न करण्यास मीं कमी केलें नाहीं. त्यांत विशेषेंकरून एके दिवशीं मीं त्यास असा प्रश्न केला कीं, तुला उत्पन्न कोणीं केलें? त्या बिचाऱ्याला माझ्या प्रश्नाचा अर्थ मुळींच समजला नाहीं. त्याला वाटलें कीं हा, तुझा बाप कोण, म्हणून विचारीत आहे. तेव्हां मीं त्यास तोच प्रश्न दुसऱ्या तऱ्हेनें विचारिला. तो असा कीं, समुद्र, ज्या जमिनीवर तूं चालतोस ती जमीन, त्या टेंकड्या, हीं जंगलें, हीं सर्व कोणीं निर्माण केलीं? तो म्हणाला, बेनामकी नांवाचा एक म्हातारा सर्वांच्या पलीकडे लांब राहतो त्यानें. ह्या महापुरुषाविषयीं त्याला दुसरें कांहीं सांगवा येईना, परंतु इतकें मात्र म्हणे कीं, तो फार प्राचीन काळापासून आहे; समुद्र, भूमि, चंद्र, व तारे ह्यांच्याही पूर्वींचा तो आहे. मीं त्यास विचारिलें कीं, जर ह्या पुरातन पुरुषानें सर्व वस्तु निर्मिल्या आहेत, तर त्या त्याचें भजन पूजन कां करीत नाहींत? हा प्रश्न ऐकतांच त्याची मुद्रा गंभीर दिसूं लागली, आणि अत्यंत सात्विक वृत्ति धारण करून तो म्हणाला, त्याला सर्व वस्तु 'ओ!' म्हणतात. मीं त्यास विचारिलें, तुमच्या देशांत जे लोक मरतात ते दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं जातात काय? तो म्हणाला होय, ते सारे बेनामकीकडे जातात. मीं विचारिलें, जे लोक माणसें

मारून खातात तेही तिकडेच जातात काय? तो म्हणाला, होय.

अशा गोष्टींच्या योगानें खरा जो देव त्याच्या ज्ञानाचा मी त्यास बोध करूं लागलों. आकाशाकडे बोट दाखवून मी त्यास म्हणालों कीं, सर्व वस्तूंचा जो निर्माणकर्ता तो तेथें राहतो; ज्या अनंतशक्तीच्या योगानें त्यानें हें जगत् निर्मिलें आहे, तिच्याच योगानें तो त्याचें नियमनही करितो; तसेंच तो सर्व शक्तिमान् आहे व आपणाकरितां कोणतीही गोष्ट करूं शकेल, आपणास पाहिजे तें देऊं शकेल, व आपणापासून कोणतेंही घेऊं शकेल. अशाच रितीनें हळू हळू बोध करून मीं त्याचे डोळे उघडिले. हें सर्व तो फार लक्ष्य देऊन ऐके; आणि येशू ख्रीस्त हा आपणा मानवी प्राण्यास तारण्याकरितां परमेश्वरानें पाठविला आहे ही गोष्ट, तशीच ईश्वराची प्रार्थना करण्याची आपली पद्धति, आणि तो आकाशांत असतांही आपली प्रार्थना ऐकूं शकतो, ह्या सर्व गोष्टी त्यानें मोठ्या आनंदानें ऐकून घेतल्या. तदनंतर आपला जो धन्य तारक त्यानें भ्रष्ट झालेल्या देवदूतांचा उद्धार कसा केला नाहीं, परंतु आब्रहामाच्या वंशांत जन्म घेण्याचें अंगीकारिलें, इत्यादि प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी, माझ्यानें करवला तितका यत्न करून मीं त्यास समजावून दिल्या.

ह्या बिचाऱ्यास उपदेश करण्यास ज्या ज्या पद्धति मीं योजिल्या, त्यांमध्यें मी प्रवीण होतों असें नाहीं; परंतु जें मी करीं तें शुद्ध भावानें करीं; आणि ज्या गोष्टींचें मला ज्ञान नव्हतें, अथवा ज्यांविषयीं मीं कधीं पूर्ण विचार केला नव्हता, व ज्या केवळ त्या गरिबास शिकविण्याच्या कारणानेंच साहजिक माझ्या मनांत आल्या, अशा गोष्टींचें वास्तविक ज्ञान मला त्यास शिकवितांनाच झालें, हें मला कबूल करणें प्राप्त आहे. आणि जे मजसारखें वागणारे आहेत त्यांचेंही म्हणणें असेंच पडेल, असें मला वाटतें. ह्यावेळीं अशा गोष्टींचा शोध मी मोठ्या आवडीनें करूं लागल्यामुळें, त्या गरीब प्राण्यास माझ्या उपदेशानें कांहीं ज्ञान प्राप्त झालें असो किंवा नसो, परंतु माझें तर ज्ञान वाढलें. सबब तो मजकडे आला ह्याबद्दल देवाचा आभार मानणें मला योग्य आहे. माझें दुःखाचें ओझें आतां मला हलकें वाटूं लागलें, व माझ्या राहण्याच्या ठिकाणापासूनही मला अत्यंत सुख होऊं लागलें. ह्या एकांत स्थितींत

मी [illegible] लिलें, त्या [illegible] परंतु [illegible] मनुष्याला [illegible] ज्ञान होऊन [illegible] ज्ञान होईल [illegible] बुद्धि [illegible]
य) असे विचार मनांत आले म्हणजे माझें अंतःकरण आनंदानें भरून जाई. आणि [illegible] मनावर [illegible] झालें, असें मी पूर्वी [illegible] आलोंच होतों [illegible] असें [illegible] लागलों.

[illegible] मी [illegible] पुढें [illegible] एकत्र होतों, [illegible] लोकांशीं [illegible] काहीं वस्तू असेल, तर [illegible] होत असे, असें [illegible] नाहीं.

[illegible] परस्परांविषयीं [illegible] समजूं लागलें, [illegible] तरी [illegible] बोलतां येऊं लागलें. [illegible] इतिहास [illegible] सांगितला; [illegible] शेवटीं [illegible] केली [illegible] गुढ [illegible] मी [illegible] एक [illegible] तरवारीपेक्षांही [illegible] उपयोगी पडे [illegible]
तरवारीपेक्षांही जास्त उपयोगी पडे.

[illegible] देश [illegible] मी [illegible] होते [illegible] ती [illegible] मी [illegible]

[illegible] सांप्रत [illegible] [illegible] [illegible]
[illegible] आणि [illegible] [illegible] [illegible]
[illegible] ह्या [illegible] विचार [illegible]
[illegible] विचार [illegible] आहे [illegible]
[illegible] [illegible]
[illegible] पाहिली [illegible]
[illegible] [illegible]
[illegible] विचार केल्यानें [illegible] असें
की, ह्या होडीसारखीच एक होडी त्यांच्या [illegible] [illegible]
[illegible] होती, [illegible] त्याचें [illegible] इकडे
[illegible] होती, असा [illegible] [illegible] [illegible]
[illegible] कीं, [illegible] [illegible] त्या [illegible]
[illegible] असावें, व ती होडी [illegible] [illegible]
आली असावी; परंतु मी असा अप्रबुद्ध कीं, फुटलेल्या तारवांतील [illegible]
[illegible] [illegible] [illegible] झाले [illegible]
[illegible] माझे मनांत [illegible] नाहीं, [illegible] कोठून
आले [illegible] [illegible] शास्त्र [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] होडीचें [illegible] परंतु [illegible]
[illegible] कीं, आम्ही [illegible] माणूस [illegible]
[illegible] [illegible] आणि [illegible]
[illegible] कीं, त्या होडींत [illegible] होते [illegible]
[illegible] होडी [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] असें मी [illegible] पुनः [illegible]
ते माझ्या लोकांकडे राहतात.
[illegible] गोष्ट [illegible] [illegible] लागले.
[illegible] कीं, जें [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible]

ऱ्हां आपलें प्राण वांचविण्याकरितां तो हिंडत हिंडत बेटांत येऊन त्या रानटी लोकांत राहिला असावा.

ह्यानंतर, त्या लोकांचा काय झाला? म्हणून मी त्यास प्रश्न केला. त्यावरून त्यानें मला सांगितलें कीं, ते अद्याप तेथेंच आहेत, व आमचे लोक त्यांचे बरोबर मुळींच न जाता उलट त्यास खाण्याकरितां पुरवितात. हें ऐकून मी त्यास विचारिलें कीं, तुमच्या लोकांनीं त्यांस मारून खाल्लें नाहीं हें कसें झालें? त्यानें उत्तर दिलें, आमचे लोक त्यांच्याशीं भाऊ म्हणूनच वागतात; आणखी तो म्हणाला, जेव्हां लढाई करितात तेव्हांच शिवाय माणूस न खातात. म्हणजे त्यांच्याशीं लढाई करून कैद करून जे लोक त्यांचे हातीं सांपडतात त्यांशिवाय दुसरीं माणसें ते कधीं खात नाहींत असा त्याच्या म्हणण्याचा भाव.

पुढें बराच काळ गेल्यानंतर एके दिवशीं असें झालें कीं, बेटाच्या पूर्व बाजूस जी टेकडी आहे, व जेथून एके दिवशीं आकाश निरभ्र आणि हवा स्वच्छ असतां अमेरिकाखंडाची जमीन दृष्टीस पडली म्हणून मी पूर्वीं सांगितलें आहे, त्या टेकडीच्या माथ्यावर आम्ही दोघे उभे असतां, हवा फार निर्मळ होती अशा वेळेस, फैदेंहा मोठ्या औत्सुक्यानें त्या जमिनीकडे पाहूं लागला, आणि त्यास मोठें नवल वाटून तो तेथें नाचावयास लागला, व त्यानें मला हांक मारिली (कारण मी त्याजपासून किंचित् अंतरावर होतों.) ती ऐकून काय आहे? म्हणून मी त्यास विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, वाहवा! काय आनंद! काय बहार! तो माझा देश पहा, ते माझे लोक पहा!

त्याचें तें पहाण्यावरून त्याला विलक्षण आनंद झाला आहे असें मला दिसलें, त्याचे नेत्र केवळ तेजःपुंज दिसूं लागले, व त्याचे मुद्रेवरून स्वदेशास जाण्याविषयीं त्यास कांहीं विजातीय औत्सुक्य उत्पन्न झालें असें दिसूं लागलें. हें पाहून माझ्या मनांत नानाप्रकारच्या कल्पना येऊं लागल्या; त्यांच्या योगानें फैदे ह्याविषयीं पूर्वीं जो माझा निःशंकपणा होता तो पहिल्यानें किंचित् कमी झाला. मला वाटूं लागलें कीं, जर का पुनः फैदे हा आपल्या देशास परत गेला, तर तो माझे सर्व उपकार विसरेल इतकेंच नाहीं, पण मी त्याला जें कांहीं शिकविलें आहे तें ही सर्व तो विसरून जाईल, आणि आपल्या लोकांस माझ्या हकीकती

[illegible] [illegible] कोणी [illegible] [illegible] [illegible], [illegible] मला खाऊन टाकितील; आणि [illegible] आपल्या [illegible] तो [illegible] [illegible] [illegible] असें त्याच्या [illegible] माझी [illegible] फौज [illegible].

[illegible] त्या [illegible] विषयीं मीं अशा कुत्सित कल्पना [illegible] [illegible] [illegible] मीं वस्तुतः त्याचा मोठा अपराध केला; आणि ह्या गोष्टी [illegible] पुढें [illegible] झाला. तथापि सांप्रत माझ्या अंतःकरणांत [illegible] विषयीं शंका [illegible] होऊन कांहीं दिवस तशीच राहिली, त्या [illegible] मी [illegible] फार सावधगिरीनें वागूं लागलों; व पूर्वी जसा [illegible] [illegible] मनमोकळेपणानें वागून त्यावर अत्यंत ममता करीत असें, तसें करीनासा [illegible]. असें करण्यांत वास्तविक [illegible] दोष. कारण त्या [illegible] चाऱ्या प्रामाणिक व कृतज्ञ मनुष्याच्या अंतःकरणांत असली कल्पना [illegible] नव्हती; आणि [illegible] एखादा खरा खिस्तीधर्मानुयायी अ- [illegible] व [illegible] [illegible] तो अत्यंत शुद्ध रीतीनें [illegible] [illegible] असें पुढें माझ्या ध्यानांत आलें.

[illegible] ही शंका माझ्या अंतःकरणांत होती तोंपर्यंत, त्याच्या [illegible] त्या नव्या [illegible] [illegible] [illegible] होते त्यांपैकीं कांहीं त्याच्या [illegible] [illegible]; [illegible] [illegible] [illegible] [illegible] विचारीत असें; परंतु जें जें [illegible] [illegible] [illegible] व सात्विक भाव असे कीं, मला त्याविषयीं जो संशय आला [illegible] [illegible] कोठें आधारच सांपडेना; आणि [illegible] संशयामुळें त्याच्या संबंधानें माझें अंतःकरण इतकें अस्वस्थ असतांही आपल्या ह्या सा- त्विकपणाच्या [illegible] पुनः त्यानें माझें अंतःकरण वश केलें. तसेंच माझें चित्त अस्वस्थ असल्याची वार्तासुद्धां त्याचे मनांत नसल्यामुळें [illegible] त्याविषयीं संशय घेववेना.

एके दिवशीं त्या टेकडीवर आम्ही चाललों असतां मी त्यास [illegible] [illegible] म्हणालों, कायरे [illegible], [illegible] [illegible] आपल्या देशांत व आपल्या लोकांत जावेंसें वाटत नाहीं काय? तो म्हणाला, होय, आपल्या लोकांत [illegible] मला [illegible] आनंद होईल. मीं विचारिलें, तूं तेथें [illegible] [illegible] [illegible]? [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

सारखा दिसला, आणि मान हालवून त्यानें उत्तर दिलें, छे, छे, कैदे त्यांना चांगलें वागावयास सांगेल, ईश्वराची प्रार्थना करावयास सांगेल, धान्याची भाकरी, जनावरांचें मांस, दूध खावयास सांगेल. पुनः माणूस खाऊं नये सांगेल. तेव्हां मीं म्हटलें, तर मग ते तुला मारून टाकितील. हें ऐकतांच त्याची मुद्रा गंभीर दिसूं लागली, आणि तो म्हणाला, छे, छे, ते मला नाहीं मारणार, त्यांस शिकणें आवडेल. त्यानें आणखी असें सांगितलें कीं, त्या होडीमध्यें जे दाढीवाले लोक आले त्यांजवळून ते पुष्कळ गोष्टी शिकले आहेत. बरें तर, आपल्या लोकांकडे पुनः जाण्याची तुझी इच्छा आहे काय? असें मीं त्यास आणखी एकदां विचारिलें. तें ऐकून तो हांसला आणि म्हणाला, मला इतकें लांब पोहून जातां येणार नाहीं. तेव्हां मीं सांगितलें कीं, तुजकरितां मी एक होडी तयार करीन. तो म्हणाला कीं, तुम्ही मजबरोबर याल तर मी जाईन. मीं उत्तर केलें, मी येऊं! मग ठीक! ते तुझे लोक मला खाऊन टाकितील. तो म्हणाला, छे, नाहीं; मी तुम्हांला न खायाला त्यांना करितों, तुम्हांवर पुष्कळ प्रीति करावयाला त्यांना करितों. असें बोलून जे सतरा दाढीवाले संकटांत पडून त्या किनाऱ्यावर आले, त्यांच्याशीं ते लोक किती कृपाळूपणें वागले, ह्याविषयीं, त्याच्यानें सांगवलें तितकें त्यानें मला सांगितलें.

मला हें कबूल केलें पाहिजे कीं, एक वेळ धैर्य धरून त्या दाढीवाले लोकांस जाऊन मिळतां येईल तर पहावें, अशी गोष्ट ह्यावेळेपासून माझे मनांत येऊं लागली. ते दाढीवाले लोक स्पान्यर्द किंवा पोर्तुगीज असावे असें मला खचीत वाटलें होतें. आणखी अशीही माझी खात्री असेकीं, मी त्या लोकांस जाऊन मिळालों असतां तेथून सुटका करून घेण्यास कांहीं तरी युक्ति सांपडेल. कारण, तेथून वीस कोसांच्या अंतरावरील बेटावर एकटा व निराश्रित पडून राहिलों असतां माझी सुटका होण्याचा जितका संभव आहे, त्यापेक्षां मुख्य जमिनीवर बऱ्याच मंडळीच्या संमतीनें राहिलों असतां एखादी चांगलीशी युक्ति निघून सुटका होण्याचा विशेष संभव आहे. सबब, कांहीं दिवसांनीं पुनः फैदे ह्यास मी तुला आपल्या देशास परत जाण्याकरितां एक होडी देतों, असें सांगितलें; आणि बेटाच्या दुसऱ्या बाजूस माझी होडी होती; तिकडे त्याला

नेऊन मी दाखविली, आणि आम्ही दोघे तींत जाऊन बसलो.

फ्रैदे हा होडी चालविण्याच्या कामांत मोठा हुशार असून मजपेक्षां जलदीनें त्याला होडी हांकारितां येते, असें ह्यावेळेसच माझ्या अनुभवास आलें. म्हणून तो आंत बसल्यावर मी त्यास विचारिलें, फ्रैदे, कसें काय? चलतोस तुझ्या देशाला? हें माझें बोलणें ऐकून तो फार खिन्न झाला. ह्याचें कारण असें दिसलें कीं, इतकें लांब जाण्याला म्हटलें म्हणजे ही होडी फारच लहान, असें त्यास वाटलें. तेव्हां, हीपेक्षां मोठी एक होडी मजजवळ आहे, असें मीं त्याला सांगितलें. नंतर दुसरे दिवशीं, मीं पहिल्यानें जी होडी तयार केली होती, व जी मला पाण्यांत लोटितां येईना म्हणून तशीच पडली होती, तिकडे त्यास घेऊन गेलों. ती होडी पाहून, ही बरीच मोठी आहे, असें तो म्हणाला. परंतु सुमारें २२-२३ वर्षेपर्यंत ती तेथें पडून राहिली होती, व तिची जतन मीं मुळींच केली नव्हती, त्यामुळें ती अगदीं कुजून गेली होती. फ्रैदे म्हणाला कीं, असली होडी चांगली उपयोगी पडेल, आणि तिजमध्यें पुरे पिणें भाकरी जाईल.

मुख्य जमिनीकडे जाण्याविषयीं माझा निश्चय ह्या वेळेस इतका दृढ झाला होता कीं, मीं त्यास म्हटलें, चल, आपण ह्या होडीइतकीच मोठी दुसरी होडी तयार करूं, आणि मग तिजमध्यें बसून तूं आपल्या देशास जा. ह्यावर तो चकार शब्दही बोलला नाहीं; आणि त्याची मुद्रा गंभीर व खिन्न अशी दिसूं लागली. हें पाहून, तुला काय होतें, म्हणून मीं विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, तुम्ही फ्रैदेवर कां रागावलां? मीं काय केलें? हें ऐकून मी म्हणालों, तुझें म्हणणें तरी काय? मी तुजवर मुळींच रागावलों नाहीं. तो बोलला, रागावलो नाहीं, रागावलों नाहीं! हे शब्द आणखी कित्येक वेळा उच्चारून पुनः म्हणाला, फ्रैदेला कां आपल्या देशास दूर पाठवितां? मीं विचारिलें, फ्रैदे, आपल्या देशास माझें जाणें होईल तर बरें होईल, असें तूं बोलला नाहींस काय? त्यानें उत्तर केलें, होय होय, आपण दोघांनीं जावें असें मी इच्छितों; फ्रैदे एकटा जाण्यास इच्छीत नाहीं; तेव्हां मीं म्हटलें, नको नको, फ्रैदे, तुला एकट्यालाच गेलें पाहिजे; मला येथेंच असूं दे, मी आपला पूर्वीप्रमाणें येथें एकटाच राहीन. हें ऐकून तो पुनः गोंधळल्यासा-

दिला होता, आणि ज्या कुऱ्हाडीची अवळ वाजवीत असे, त्यांपैकी एक पळत जाऊन आणून त्यानें मजजवळ दिली. तेव्हां मी त्यास विचारिलें, ही घेऊन मी काय करूं? त्यानें उत्तर दिलें, ही घ्या, फ्रैदे मारा. कशासाठीं मी तुला मारावें? म्हणून मी त्याला पुनः विचारिलें. तेव्हां त्यानें लागलाच जबाब दिला कीं, तुम्ही फ्रैदेला दूर कां पाठवितां? घ्या, मारा फ्रैदेला, दूर पाठवूं नये. हे शब्द तो इतक्या औत्सुक्यानें व अंतःकरणपूर्वक बोलला कीं, त्याच्या नेत्रांतून अश्रु आलेले दृष्टीस पडले. सारांश, मजविषयीं त्याची अत्यंत प्रीति स्पष्ट दिसून आल्यामुळें, मजजवळ राहण्याची तुझी इच्छा आहे तर तुला मी कधींही अंतर देणार नाहीं, असें मी त्यावेळेस त्याला सांगितलें, आणि पुढेंही वारंवार असेंच सांगत गेलों.

तथापि, त्या ठिकाणीं सतरा दाढीवाले मनुष्य आहेत ह्या कल्पनेच्या आधारावर, ह्या स्थितींतून आपली सुटका करून घेण्याचा यत्न करण्याविषयीं माझ्या अंतःकरणांत अजून प्रबल औत्सुक्य होतेंच. ह्यास्तव यत्किंचितही विलंब न करितां फ्रैदे ह्यास मदतीस घेऊन मोठीशी होडी करण्याजोगें एखादें झाड शोधून काढण्याच्या उद्योगास मी लागलों. त्या बेटांत वृक्ष म्हटले तर इतके होते कीं, त्यांच्या होड्या तरकाय, पण मोठमोठाल्या जहाजांचें एक लहानसें आरमारही तयार करितां आलें असतें; परंतु माझें लक्ष मुख्यत्वें करून ह्या गोष्टीकडे होतें कीं, होडीच्या संबंधानें पूर्वीं जो मीं वेडेपणा केला होता तो आतां न व्हावा; म्हणजे होडी तयार झाल्यावर पाण्यांत लोटितां येईल इतकें पाण्याच्या सन्निध तें झाड असावें.

शेवटीं फ्रैदे ह्यानें एक वृक्ष शोधून काढिला. नंतर हत्यारांचा उपयोग कसा करावा हें त्यास सांगून त्यांच्या योगानें वृक्ष कापून खोदण्यास शिकविल्यावर तो तें काम फार कौशल्यानें करूं लागला. आणि सुमारें एक महिनाभर सक्त मेहनत करून तें काम आम्हीं शेवटास नेलें. ही होडी फार सुरेख झाली, आणि विशेषेंकरून कुऱ्हाडीनें कसें तासावें हें मी फ्रैदे ह्यास शिकविल्यावर जेव्हां आम्हीं बाहेरची बाजू तासून तिला हुबेहूब होडीचा आकार आणिला, तेव्हां तर ती फारच छानदार दिसूं लागली. तथापि हें झाल्यावर ही, त्या होडीला मोठमोठ्या लो-

ढकलीकडून ढकलीत ढकलीत पाण्यामध्यें नेण्यास सुमारें १५ दिवस लागले; परंतु एकदां पाण्यामध्यें गेल्यावर तिजमध्यें वीस मनुष्यें बसलीं तरी त्यांचा समावेश होण्यासारिखी ती होडी मोठी होती.

होडी पाण्यांत लोटल्यानंतर तिजकरितां डोलकाठी व शीड तयार करणें, आणि तिला नांगर व दोर बांधणें ह्या उद्योगास आम्ही लागलों. डोलकाठी मिळण्याचें कांहीं कठीण नव्हतें; तेथें जवळच एक सरल व कोंवळें असें देवदाराचें झाड शोधून काढून मीं फ्रैडे ह्याला तें तोडावयास लाविलें, आणि त्याचा आकार कोणत्या प्रकारचा करावयाचा तेंही त्यास सांगितलें. शीड तयार करावयाचें काम किंचित् विचाराचें होतें म्हणून तें मीं स्वतः पतकरिलें. मजजवळ जुन्या शिडांचे तुकडे पुष्कळ आहेत, हें मला माहीत होतें. त्यांपैकीं बरेच दिसले असे दोन तुकडे शोधून काढून त्यांचें शीड तयार करावयास मी लागलों; मग मोठ्या कष्टांनीं, व सुया नसल्यामुळें वेंडे वांकडें कसे तरी टांके मारून, एक त्रिकोनी वेंडें वांकडें शीड तयार केलें. नंतर तें पसरून ताठ राहण्याकरितां त्याच्या खालच्या बाजूस एक काठी बांधिली, व शेंड्यालाही एक बांधिली. आपल्या तारवांच्या लांबोत नामक होड्यांस असल्या प्रकारचीं शिडें असतात; आणि अशाच प्रकारचीं शिडांची व्यवस्था असतां होडी चालविण्याचा मला चांगला अभ्यास झाला होता. कारण बार्बरी देशांतून ज्या होडींत बसून मी पळालों होतों, तिचें शीड असेंच होतें.

ह्यास्थळीं मी बंदिवानासारखा राहूं लागल्याला त्यावेळीं हें सत्ताविसावें वर्ष चाललें होतें. आतां वास्तविक पाहतां शेवटच्या तीन वर्षांत फ्रैडे हा मजपाशीं असल्यामुळें तीं तीन वर्षें पूर्वींच्या वर्षांपेक्षां निराळ्याच प्रकारचीं गेलीं. सबब ह्या सर्व बंधनवासाच्या कालांत ह्या तीन वर्षांची गणना करणें योग्य दिसत नाहीं. ज्या दिवशीं पहिल्यानें मी ह्या बेटावर येऊन लागलों त्या दिवसाच्या प्रतिवार्षिक दिवशीं, परमेश्वरानें करुणा करून माझा सांभाळ केल्याबद्दल त्याचे उपकार मानून उत्साह करण्याचा क्रम मीं पूर्वींप्रमाणें चालू ठेविला होता. कारण पूर्वीं जर त्याचे उपकार मानण्यास मला योग्य कारण होतें, तर तसें करण्यास आतां तर विशेष योग्य कारण होतें; कांकीं शिवाय ह्या

गोष्टींविषयीं आपलेंही ज्यास्त प्रसन्नें दिसून येऊन अल्प काळांतच माझी सुटका होईल अशी आशा उत्पन्न झाली. त्या आशेला आधार अशाकरितां, माझ्या सुटकेचा समय सन्निध येऊन पोहोंचला आहे, व यापुढें आणखी अरण्यांत मला रहावें लागणार नाहीं, अशी माझ्या मनाची खातरी होऊन गेली होती.

तथापि जमीन खणणें, लावणी करणें, कुंपणें घालणें, वगैरे शेतकीचीं कामें नेहमींप्रमाणें मी करीत गेलों. तसेंच द्राक्षें जमा करणें, त्यांच्या मनुका करून ठेवणें, इत्यादि जरूरीचीं कामेंही पूर्ववत् चालू होतीं. इतक्यामध्यें पावसाळ्यास आरंभ झाला, त्यामुळें मी नेहमींपेक्षां ज्यास्त वेळ पर्यंत घरांत बसून राहूं लागलों. पावसाळ्यामुळें आम्हीं आपली नवी होडी पूर्वीं सांगितलेल्या खाडींत, भरती आली असतां पाणी जेथपर्यंत चढण्याची खूण होती, तेथपर्यंत ओढीत आणून सुरक्षित स्थळीं ठेविली. नंतर फैदे हाकडून, फक्त होडी राहील इतकी रुंदी, व ती तरंगत राहण्यापुरतें पाणी राहील इतकी खोल, अशी एक लहानशी गोदी मीं खणविली. होडीमध्यें पावसाचें पाणी पडूं नये म्हणून आम्हीं झाडांच्या फांद्या तीवर इतक्या दाट रचून ठेविल्या कीं, शेतकऱ्याच्या घराप्रमाणें ती आच्छादून गेली. अशा रितीचा बंदोबस्त करून आम्ही नोवेंबर व दिसेंबर हे महिने येण्याची वाट पाहत बसलों; त्या महिन्यांत योजिलेलें साहस करण्याचा मीं संकेत केला होता.

पावसाचे दिवस गेल्यावर, नित्य थोडी थोडी अन्नसामग्री मागें टाकून मी जलपर्यटनाची सिद्धता करूं लागलों. कारण सुमारें आठ पंधरा दिवसांतच गोदी उघडून होडी पाण्यांत ढकलण्याचा मीं बेत केला होता. एके दिवशीं सकाळीं असल्याच प्रकारच्या कांहीं कामांत गुंतलों असतां मीं फैदे ह्यास हाक मारून, समुद्रकांठीं जाऊन एखादें कांसव सांपडलें तर पहा, असा हुकूम केला. कांसवाचीं अंडीं व मांस मिळण्याकरितां दर आठवड्यांत बहुधा एकवेळ आम्ही कांसव धरून आणीत होतों. फैदे ह्याला जाऊन फार वेळ झाला नाहीं तोंच तो परत माघारा येऊन, जसा एखादा मनुष्य घाईत असला म्हणजे ज्या जमिनीवर तो पाय ठेवितो त्याचें भान त्याला नाहींसें होऊन तो चालत असतो, त्याप्रमाणें माझ्या बाहेरील भिताडावरून तो ताडदिशीं उडी

मरहम आंत आला, आणि त्याशीं बोलण्यास अवकाश मिळण्यापूर्वीच तो भीतीनें ओरडून म्हणाला, अहो धनीसाहिब, अहो धनीसाहेब, काय अनर्थ ! काय वाईट हें ! तेव्हां मीं विचारिलें, अरे, झालें तरी काय, फ्रैदे ? तो म्हणाला, अहो त्या पहा पलीकडे एक, दोन, तीन हो-ड्या ! एक, दोन, तीन ! कांहीं चिंता नाहीं, फ्रैदे, भिऊं नको, असें म्हणून माझ्यानें देववला तितका मीं त्याला धीर दिला. परंतु भीतीनें त्या बिचाऱ्याच्या जिवांत जीव उरला नाहीं असें दिसलें. कारण त्या होड्यांवरील लोक त्याचा शोध लावण्याकरितां आले आहेत व ते त्यां-चे तुकडे तुकडे करून खाणार असें त्याच्या डोक्यांत पुरतें भरून गेलें होतें; आणि त्यामुळें त्या बिचाऱ्याच्या आंगाला कांपरें सुटलें. तेव्हां त्याची भीति घालविण्यास उपाय काय करावा, हें मला कांहींच सु-चेनासें झालें. शेवटीं मीं त्याला म्हटलें, पण फ्रैदे, आपण त्यांच्याशीं लढाई करण्याविषयीं मनाचा धडा केला पाहिजे. फ्रैदे, तुला लढतां येतें काय ? त्यानें उत्तर केलें, मी बंदूक मारतों, पण पुष्कळ लोक ये-तात. मीं त्याला पुन: सांगितलें, त्याविषयीं तूं अगदीं निर्भयीक रहा; त्यांपैकीं जे कोणी ठार मारिले जाणार नाहींत, ते आपल्या बंदुकांच्या आवाजानें गभंगलित होतील. तर तुझा जीव वांचविण्याविषयीं मी निश्चय केल्यास तूं माझा बचाव करशील किंवा नाहीं ? व मजपाशीं उभा राहून माझ्या हुकुमाप्रमाणें वागशील किंवा नाहीं ? त्यानें उत्तर केलें, धनीसाहिब, तुम्हीं मरायाला हुकूम केला तर मी मरेन सुद्धां. याप्रमाणें आमचें संभाषण झाल्यानंतर मीं एक घोटभर गोडी आणून त्याला प्यावयास दिली. ही गोडी मी इतक्या काटकसरीनें खर्चीत असें कीं, तीपैकीं बरीच मजपाशीं शिलक राहिली होती. ती त्यानें पिऊन टाकिल्यावर आमच्या नेहमींच्या दोन शिकार करण्याच्या बंदुका मीं त्याजकडून घेववि्ल्या, आणि पिस्तुलांत भरण्याच्या लहान गोळ्या एवढ्या गोळ्या त्यांत खचविल्या. नंतर मींही चार बंदुका घेऊन प्रत्ये-कींत दोन दोन शंक्वाकृति धातूचे तुकडे आणि पांच पांच लहान गोळ्या घालुन बार खचिले, तशींच मीं आपलीं दोन पिस्तुलें घेऊन प्रत्येकांत दोन दोन गोळ्या ठासल्या. मी आपली मोठी तरवार नेहमीप्रमाणें

[illegible] दिली आणि मैं [illegible] त्याची [illegible] कैदेस [illegible] दिली.

([illegible] माणें सर्व तयारी झाल्यावर मी आपली दुर्बीण घेऊन तींतून काय दिसतें तें [illegible] करितां त्या टेकडीच्या बाजूवर गेलों; तेव्हां २१ रानटी लोक तीन बंदीवान लोक, व तीन होड्या, अशीं तत्काळ माझ्या दृष्टीस पडलीं. [illegible] ते तीन बंदीवान [illegible] त्यांच्या मांसाची जेवणावळ [illegible] त्यांचें काम दिसलें. आतां हा असला त्यांचा भोजनादि [illegible] अत्यंत [illegible] खरा, तथापि त्यांना [illegible] म्हणजे ही केवळ [illegible] आणि [illegible] एक [illegible] झालें होतें.

[illegible] दुसरें असें दिसून आलें कीं, कैद [illegible] आला त्या वेळेस ते [illegible] ठिकाणीं हल्लीं न उतरतां, माझ्या खाडीच्या [illegible] तेथें किनारा [illegible] होता, व [illegible] बहुतेक [illegible] मिळालें होतें, तेथें ते उतरले. ते माझ्या खाडीजवळ उतरले होते [illegible] व [illegible] करण्याकरितां येथें आले होते [illegible] त्यांच्या योगानें मी इतका संताप [illegible] गेलों कीं, माझ्या [illegible] जाऊन मी त्यास म्हणालों, मी तर त्या लोकांवर [illegible] मारण्याचा निश्चय केला आहे, तर तूं माझी [illegible] किंवा [illegible] ? त्याचें भय हल्लीं नाहींसें झालें होतें; व मीं [illegible] गोळीचा घुटका दिला होता, त्याच्या योगानें त्याच्या अंतः-करणास किंचित हुशारी येऊन तो उल्हासयुक्त झाला होता. [illegible] प्रश्नास पूर्वींचेंच उत्तर दिलें कीं, तुम्हीं मला प्राण [illegible] हुकूम केला, तरी तो देखील मी देईन.

[illegible] मीं पूर्वीं [illegible] हत्यारें [illegible] अंकुश [illegible] तीं अशीं, मीं कैद ह्याला कंबरपट्ट्यांत खोवण्याकरितां एक पिस्तूल व [illegible] घेण्याकरितां तीन बंदुका दिल्या; व एक पिस्तूल आणि बा-[illegible] बंदुका मीं घेतल्या. मीं [illegible] गोळ्या [illegible] एक [illegible] आणि कैदा जवळ [illegible] बंदुकी-ची दारू व गोळ्या [illegible] दिली. [illegible] माणें [illegible] त्याला असा हुकूम केला कीं, तूं माझ्या [illegible] राहून मी तुला हुकूम देईन तोंपर्यंत हलूं नको, किंवा बार काढूं नको,

अथवा तोंडोतून एक प्रकारें शब्दही काढूं नको. मग त्या रानटी लोकांच्या दृष्टीस न पडतां त्यांपासून एका गोळीच्या टप्प्यावर जातां येईल (आणि दुर्बिणींतून पहातां हें सहज करितां येईल असें मला दिसलें.) म्हणून खाडी ओलांडून त्या जंगलांत शिरण्याकरितां उजव्या बाजूनें सुमारें अर्ध्या कोसाचा फेरा आम्हांला घ्यावा लागला.

मी जंगलांत शिरलों, आणि (फ्रैदे माझ्या मागोमाग चालत असून) पराकाष्ठेच्या सावधगिरीनें व अगदीं मौन धरून जात जात, त्यांच्या लगतच्या बाजूस जी त्या जंगलाची शींव होती तेथपर्यंत गेलों. तेथें मी फ्रैदे ह्यास हळूच बोलावून त्या जंगलाच्या कोंपऱ्यापाशीं एक झाड होतें तें दाखविलें, आणि सांगितलें कीं, तूं त्या झाडापाशीं जाऊन ते काय करीत आहेत हें तेथून तुला साफ दिसलें तर मला येऊन सांग. त्याप्रमाणें तो गेला, आणि लवकरच परत येऊन त्यानें मला सांगितलें कीं, तेथून ते स्पष्ट दृष्टीस पडतात, व ते सारे आपल्या बंदिवानांपैकीं एकाचें मांस खात विस्तवाच्याभोंवतीं बसले आहेत; आणि दुसरा एक बंदिवान त्यांनीं हातपाय बांधून जवळच वाळूवर ठेविला आहे, त्याला ते मागून मारून खाणार आहेत असें दिसतें. त्यानें आणखी असें सांगितलें कीं, तो मनुष्य रानटी लोकांपैकीं नाहीं, तर होडींत बसून जे दाढीवाले लोक माझ्या देशांत आले त्यांतला एक आहे. हें ऐकून माझ्या अंगाचा तिळ पापड होऊन गेला. दाढीवाल्या गोऱ्या मनुष्याचें केवळ नांव घेतल्यानेंच माझ्या आंगावर कांटा उभा राहिला; आणि त्या झाडापाशीं जाऊन दुर्बिणींतून पाहिलें तों, एक गोरा मनुष्य, त्याचे हातपाय लव्हाळ्यांनीं बांधिले असून, समुद्रकांठावर पडला आहे, व तो युरोपियन असून त्याच्या आंगावर कपडे आहेत, असें स्पष्टपणें माझ्या दृष्टीस पडलें.

ज्या ठिकाणीं मी उभा होतों, त्या ठिकाणांपेक्षां त्या लोकांपासून सुमारें पाऊणशें हात जवळ अशा ठिकाणीं दुसरें एक मोठें झाड होतें व त्याच्या पलीकडे थोडीशी झाडी होती. तेथें कोणीस नकळत त्यांच्या दृष्टीस पडल्यावांचून जातां येईल, व तिथून त्यांच्या माझ्या मध्यें गोळीच्या अर्ध्या टप्प्याचें मात्र अंतर राहील, असें मला दिसलें. म्हणून मनें जरी खरोखर मी त्यांवर हल्ला करण्याविषयीं पराकाष्ठेचा उतावळा

[illegible]होतीं, तरी मीं आपलें औत्सुक्य किंचित् कमी केलें; आणि सुमारें वीस पावलें मागें जाऊन कांहीं झुडपांच्या आड झालों. हीं झुडपें त्या झाडापर्यंत एकसारखीं लागत गेलीं होतीं, सबब त्यांच्या आडून जात जात मी त्या झाडापाशीं पोहोंचलों; मग एका उंचवट्यावर चढलों, तेव्हां तेथून सुमारें १२० हातांच्या अंतरावर ते लोक मला स्पष्ट दिसूं लागले.

आतां क्षणभरसुद्धां विलंब करणें योग्य नाहीं असें मला वाटलें, कारण त्या दुरात्म्यांपैकीं एकुणीस असामी जमिनीवर एकमेकांशीं खेटून बसले होते; व त्या बिचाऱ्या ख्रिस्ती मनुष्यास मारून बहुधा त्याचे हात पाय वगैरे अवयव कापून विस्तवापाशीं आणण्याकरितां बाकीच्या दोन असामीस त्यांनीं त्या वेळेसच पाठविलें होतें; व ते दोघे खालीं वांकून त्याच्या पायांच्या दोऱ्या सोडीत होते. तेव्हां मीं फ्रैदे ह्याकडे वळून म्हटलें, फ्रैदे, आतां मीं करितों तसेंच तूं कर; यत्किंचित्सुद्धां चूकूं नको. ह्याप्रमाणें त्याला सांगून मीं एक शिकारीची व एक दुसरी अशा दोन बंदुका खालीं ठेविल्या. फ्रैदे ह्यानें ही तसेंच केलें. मीं दुसरी बंदूक घेऊन त्या रानटी लोकांवर निशाण धरिलें, आणि त्यालाही तसेंच करावयास सांगितलें. नंतर, कां तूं तयार आहेसना? म्हणून मीं त्याला विचारिलें. तो म्हणाला, आहें. तर बार सोड, असें त्याला सांगून मींही तत्क्षणींच बार सोडिला.

फ्रैदे ह्यानें मजपेक्षां इतकें चांगलें नेम धरिलें होतें कीं, ज्या बाजूस त्यानें बार सोडिला त्या बाजूचे दोन असामी त्यानें ठार मारिले, व तीन जखमी केले; मीं तर एक असामी ठार मारिला, व दोन जखमी केले. हें पाहून त्या सर्वांची पांचांवर धारण बसली; आणि ज्यांना दुखापत झाली नव्हती, ते सर्व घाबरून उभे राहिले; परंतु, हा अनर्थ कोणीकडून प्राप्त होत आहे हें न समजल्यामुळें, पळावें कोणीकडे, व पहावें कोणीकडे, हें त्या वेळेस त्यांना कांहींच सुचेना. माझ्या आज्ञेप्रमाणें मीं काम करितों हें पाहण्याकरितां फ्रैदे ह्यानें मजकडे एकसारखे डोळे लाविले होते. सबब पहिला बार झाल्यावर मीं ती बंदूक खालीं ठेविली, आणि शिकारीची बंदूक उचलिली. तेव्हां फ्रैदे ह्यानें तसेंच केलें. मीं चापाचा घोडा चढवून नेम धरिलें; तें पाहून त्यानेंही तसेंच

केलें. तयार आहेस ना? म्हणून मीं त्याला विचारिलें. तो म्हणाला आहें. तर मग घे देवाचें नांव आणि सोड बंदूक, असें म्हणून मीं पुनः त्या घाबरून गेलेल्या दुष्ट लोकांवर बार सोडिला; आणि त्यानेंही सोडिला, परंतु पिस्तुलांत घालण्याच्या लहान लहान गोळ्या ह्या बंदुकांत ठासलेल्या होत्या, त्यामुळें फक्त दोनच असामी पडले; परंतु पुष्कळ जखमी झाले, ते वेड्यासारिखे किंकाळ्या फोडीत रानोमाळ पळूं लागले; व त्यांपैकीं आणखी तिघेजण थोड्या वेळानें जरी जखमा झाले नाहींत तथापि हतभय होऊन भूमीवर पडले.

नंतर मीं उडविलेल्या बंदुका खालीं ठेवून आणि एक भरलेली राखिली होती ती उचलून फ्रैदे, माझ्या पाठोपाठ चल असें त्याला सांगितलें. त्याप्रमाणें तो मोठें अवसान धरून माझ्या मागें येऊं लागला. तेव्हां मी त्या झाडींतून झपाट्यानें बाहेर पडून उघड्या जागेवर आलों. रानटी लोकांनीं मला पाहिलें असें माझ्या नजरेस येतांच मोठ्यानें तिकडे मोठी आरोळी मीं मारिली, आणि फ्रैदे यासही मोठ्यानें आरोळी मारावयास सांगितलें. हत्यारांचें ओझें अंगावर असल्यामुळें जरी मला फार जलद पळवेना, तरी पळवलें तितकें जलदीनें पळून, ते रानटी लोक जेथें बसले होते, त्या जाग्याच्या व समुद्राच्या मध्यें किनाऱ्यावर जो बिचारा मारण्याच्या उद्देशानें हातपाय बांधून किनाऱ्यावर टाकिला होता, असें मीं पूर्वीं सांगितलें, त्याकडे मी नीट गेलों. जे दोघे दुष्ट घातुक त्याला मारण्याच्या बेतांत आले होते, ते आम्हीं पहिल्यानें काढिलेला बार ऐकतांच अतिशयें भिऊन त्याला तसाच तेथें टाकून समुद्राकडे पळून गेले, आणि उडी टाकून होडींत बसले. आणखी तेथें पळत राहिले होते त्यांपैकींही तिघांजणांनीं तसेंच केलें. मीं फ्रैदे ह्याजकडे वळून, पुढें होऊन त्यांवर बंदूक सोड, म्हणून त्याला हुकूम केला. त्यानें तत्काळ माझा अभिप्राय समजून त्यांच्यापासून सुमारें ४० हात अंतरावर जाऊन त्यांवर बंदूक सोडिली. तेव्हां ते सर्व होडींत पडलेले पाहून मला वाटलें कीं, हे मेले. खरें म्हटलें तर त्यांपैकीं दोघेजण मर मेले होते, व तिसरा इतका जखमी झाला होता कीं तो मेल्यासारिखाच होडीच्या तळाशीं पडून राहिला.

फ्रैदे हा त्यांवर बंदूक सोडीत असतां, मीं चाकू काढून, ज्या

लव्हाळ्यांनीं त्या बिचाऱ्या बळी जाणाऱ्याला बांधून टाकिलें होतें, ते कापून त्याचे हातपाय मोकळे केले; आणि त्याला उचलून धरून, तूं कोण आहेस? असें पोर्तुगीज भाषेंत मीं त्याला विचारिलें. त्यानें लातिन भाषेंत मला उत्तर दिलें कीं, मी ख्रिस्तिआनस "(ख्रिस्ती धर्माचा) आहें. पण तो इतका निःशक्त झाला होताकीं, त्याच्यानें उभें राहवेना, व बोलवेनासुद्धां. मी आपल्या खिशांतली शिशी काढून त्याला दिली; आणि तींतील गोडी पिण्यास मीं त्याला खूण केल्यावरून तो ती पिऊन गेला. नंतर मीं त्याला थोडी भाकरी दिली तीही त्यानें खाल्ली. मग, तूं कोणत्या देशचा राहणारा? असें मीं त्याला विचारिलें. तो म्हणाला, इस्पानोल (स्पेन देशचा राहणारा) त्याला थोडिशी हुशारी आल्यावर, मी त्याची सुटका केल्याबद्दल तो माझा किती ऋणी आहे हें त्याला करवल्या तितक्या खुणा करून त्यानें मला दर्शविलें. मलाही स्पानिश भाषेंत बोलतां आलें तितकें बोलून मीं त्याला म्हटलें, अहो सेनोर, आपण मग बोलत बसूं; सध्यां आपणांला लढलें पाहिजे. तुमच्या आंगांत कांहीं सामर्थ्य उरलें असलें तर, हें पिस्तूल आणि ही तरवार आपणापाशीं घ्या. ह्याबद्दल मी तुमचा मोठा आभारी आहे, असें दर्शवून त्यानें तीं घेतलीं. तीं शस्त्रें हातांत येतांच त्याच्या आंगांत जणू काय नवीनच जोर येऊन तो काळाप्रमाणें भयंकर होत्साता आपल्या शत्रूंवर चालून गेला, आणि त्यांपैकीं दोघांचे एका क्षणांत त्यानें तुकडे तुकडे करून टाकिले.

मीं आपलें पिस्तूल व तरवार हीं त्या स्पान्यर्दाला दिलीं होतीं; म्हणून प्रसंग आला असतां बार भरलेला तयार असावा ह्या हेतूनें मीं आपल्या हातांतली बंदूक सोडिली नाहीं, तशीच राखिली. आणि फ्रैदे ह्याला बोलावून मीं हुकूम दिला कीं, ज्या झाडापासून आपण गोळ्या टाकिल्या तेथें पडलेल्या रिकाम्या बंदुकी वगैरे हत्यारें घेऊन ये. त्याप्रमाणें तो फार जलदीनें तीं घेऊन आला. तेव्हां आपली बंदूक त्यापाशीं देऊन बाकीच्या सर्व बंदुका पुनः ठांसण्याकरितां मी खालीं बसलों, आणि त्यांस सांगितलें कीं, तुम्हांस ठांसलेल्या बंदुकांची जरूरी लागेल तेव्हां मजकडे या. मी ह्या बंदुका ठांशीत आहें इतक्यांत एक रा-

नटी मनुष्य आणि तो स्पान्यर्द ह्यांची मोठी झोंबी लागून तो रानटी आपल्या लांकडी तरवारीनें त्यावर वार करूंलागला. तो स्पान्यर्द जरी निःशक्त झालेला होता, तरी तो फार धीट व शूर असल्यामुळें त्यानें त्या रानटी मनुष्याशीं बराच वेळ लढून त्याच्या डोक्यावर दोन मोठे वार केले; पण तो रानटी मनुष्य जोरदार व गब्बेलठ्ठ असल्यामुळें हातघाईवर येऊन क्षीणशक्ति झालेल्या त्या स्पान्यर्दाला खालीं पाडून त्याच्या हातांतली माझी तरवार हिसकावून घेत होता. तेव्हां स्पान्यर्द हा त्याच्या खालीं होता तरी त्यानें अक्कल लढवून हातची तरवार सोडून दिली, आणि पिस्तूल काढून त्या रानटी मनुष्याच्या आंगावर तें सोडिलें; व मी त्यास मदत करण्याकरितां जात होतों, तो मी त्यापाशीं पोहोंचण्यापूर्वींच त्यानें त्यास तेथल्या तेथेंच ठार मारून टाकिलें.

फ्रैदे हा आतां रिकामा असल्यामुळें आपली कुऱ्हाड हातीं घेऊन ते दुरात्मे पळ काढीत होते त्यांच्या पाठीस लागला, आणि जे तिघे घायाळ होऊन पडले म्हणून मीं सांगितलें, त्यांस ठार मारून जे कोणी दुसरे त्याच्या तावडीस सांपडले त्यांचा ही त्यानें पुरता समाचार घेतला.

नंतर तो स्पान्यर्द मजपाशीं येऊन बंदूक मागूं लागल्यावरून मीं त्याला एक शिकारीची बंदूक दिली; ती घेऊन त्यानें त्या दोघां रानट्यांचा पाठलाग करून त्या दोघांसही घायाळ केलें; परंतु त्याला पळण्याला सामर्थ्य नसल्यामुळें ते दोघेही त्याच्या हातांतून सुटून दाट रानांत पळून गेले. तेथेंही फ्रैदे ह्यानें त्यांच्या पाठीस लागून त्यांपैकीं एक ठार मारिला, पण दुसरा फारच चलाख असल्यामुळें तो घायाळ झाला असतांही, समुद्रांत उडी टाकून, होतें तितकें सामर्थ्य खर्चून, होडीमध्यें जे दोन असामी राहिले होते, त्यांच्याकडे पोंहत पोंहत गेला. ह्याप्रमाणें एकंदर २१ असामीं पैकीं एक घायाळ झालेला व होडींतले तीन, मिळून चवघेजण मात्र आमच्या हातून सुटले.

ह्या एकवीस मनुष्यांचा तपशील येणें प्रमाणें—

झाडापासून आम्हीं गोळ्या घालून मारिले ते	३
तेथूनच दुसऱ्या वेळीं गोळ्या घालून मारिले ते	२
फ्रैदे ह्यानें होडीमध्यें मारिले ते	२
घायाळ झालेल्यां पैकीं फ्रैदे ह्यानें मारिले ते	२

झाडींत त्यानें मारिला तो १
स्पान्यर्द ह्यानें मारिले ते २
फ्रैदे ह्यानें पाठलाग करून अथवा जखमी होऊन इकडे तिकडे पडलेले
शोधून काढून मारिले ते ४
एक घायाळ व दुसरे तीन असे मिळून होडींत बसून पळून गेले ते .. ४
एकंदर असामी २१

मीं त्यांच्या होड्यांपैकीं एक होडी घेऊन त्यांचा पाठलाग करावा, असें फ्रैदे ह्याच्या मनांत होतें. आणि ते सुटून गेले म्हणून मलाही फार काळजी लागली होती, कारण, ते आपल्या देशीं गेल्यावर आपल्या लोकांस हें वर्तमान सांगून ते, न जाणो, दोन तीनशें होड्यांनिशीं परत आले, तर आपल्या नुसत्या संख्येनेंच ते आम्हांस ग्रासून टाकितील, असें मला भय पडलें होतें. ह्या धास्तीमुळें पाण्यांतून त्यांचा पाठलाग करण्याच्या कामास मीं रुकार दिला, आणि एका होडीपाशीं धांवत जाऊन मीं तींत उडी टाकिली; आणि फ्रैदे ह्यालाही आंत येण्यास हुकूम केला. पण मी होडींत गेल्यावर तींत अत्यंत चकित होण्यासारिखी एक गोष्ट दृष्टीस पडली. ती अशी, त्या स्पान्यर्दाला ठार मारण्यासाठीं जसें हातपाय बांधून ठेविलें होतें, तसें दुसऱ्या एका बिचाऱ्या मनुष्याचे हातपाय बांधून त्याला होडींत ठेविलें होतें; आणि बंदुकांची वगैरे गडबड झाली त्यावेळेस कोणतें अरिष्ट आलें आहे, कोण जाणे, असें वाटून, भीतीनें तो अगदीं मृतप्राय झाला होता. कारण, त्याला इतकें बळकट जखडून टाकिलें होतें कीं, वर मान करून त्याला होडीच्या वरच्या बाजूस सुद्धां पाहतां येत नव्हतें. ज्या वळलेल्या लव्हाळ्यांनीं त्याला बांधिलें होतें ते मीं तत्काळ कापून टाकिले; आणि त्याला मीं हात देऊन उठविलेंही असतें, परंतु त्याच्यानें उभें राहवेना व बोलवेना सुद्धां. तो अतिशयित दीनपणें कण्हत होता; ह्यावरून खचीत दिसतें कीं, आपणास ठार मारण्याकरितांच केवळ आपलीं बंधनें कापिलीं आहेत. असें त्याला वाटत होतें.

फ्रैदे हा त्याजवळ आल्यावर मीं त्याला (फ्रैदेला) सांगितलें कीं, तूं त्याशीं कांहीं भाषण कर, आणि त्याला सांग कीं आम्हीं तुला मोकळें केलें आहे. आणि मीं आपली शिशी काढून त्या बिचाऱ्याला

शींतील दारूचा एक घोंट देवविला; तेणेंकरून व आपली सुटका झाली असें कळलें तेणेंकरून, त्याला हुशारी आली, आणि तो होडींत उठून बसला. पण फ्रैदे ह्यानें जेव्हां त्याला बोलतांना ऐकिलें व त्याच्या चेहऱ्याकडे न्याहाळून पाहिलें तेव्हां त्यानें (फ्रैदे ह्यानें) जे जे कांहीं विलक्षण प्रकार केले, ते पाहून पाहिजे त्याच्या डोळ्यांतून कळवळ्यानें अश्रुधारा चालल्यावांचून राहिल्या नसत्या. फ्रैदे ह्यानें त्याचें चुंबन घेतलें, कडकडावून आलिंगन दिलें, त्याला वेंग मारिली; नंतर फ्रैदे नाचूं लागला, गाऊं लागला, पुनः ओरडला; त्यानें हाताचीं बोटें मोडिलीं, तोंड व डोकें बडवून घेतलें; तो पुनः हंसला, नाचूं लागला, गाऊं लागला, पुनः उड्या मारूं लागला. ह्याप्रमाणें बुद्धिभ्रष्टासारिखे त्यानें अनेक वेडे वेडे चार केले. पुष्कळ वेळपर्यंत तो मजशीं कांहीं बोलेचना, व असे वेडे चार करण्याचें कारण काय तें मला सांगेचना. पुढें किंचित् शुद्धीवर आल्यानंतर त्यानें मला सांगितलें कीं, हा माझा बाप आहे.

फ्रैदे ह्यास आपला बाप दृष्टीस पडल्यामुळें, व तो मृत्यूच्या मुखांतून सुटला ही गोष्ट समजल्यामुळें, त्या बिचाऱ्याचें अंतःकरण परमानंदानें व पितृप्रेमानें अगदीं दाटून गेलें. हें पाहून मला जो कळवळा आला त्याचें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. तसेंच त्यानंतरही त्यानें जें अमर्याद पितृप्रेम दर्शविलें, त्याच्या अर्धे हिश्शाचें सुद्धां मला खचीत वर्णन करितां येणार नाहीं. तो आपल्या बापाजवळ गेला म्हणजे त्यानें त्यापाशीं बसावें, आणि त्याचें डोकें पोटाशीं गच्च धरावें; नंतर बापाचे हातपाय बांधल्यामुळें बधिर होऊन ताठले होते ते घेऊन चोळावे. तो सर्व प्रकार पाहून मीं आपल्या शिशींतली थोडी गौडी त्याच्या हातापायांस चोळण्याकरितां दिली; तिच्या योगानें त्याच्या हातांपायांना पुष्कळ सुख वाटलें.

ह्या कृत्यामुळें त्या रानट्यांच्या होडीचा पाठलाग करण्याचें काम रहित झालें. ती होडी ह्यावेळीं बहुतेक दृष्टीच्या टप्याच्या पलीकडे गेली होती; आणि आम्हीं त्या लोकांचा पाठलाग केला नाहीं हेंही फार चांगलें झालें; कारण, सुमारें २ तासांच्या आंतच एवढें मोठें वादळ झालें, व ते लोक ज्या दिशेनें जात होते त्या दिशेकडून म्हणजे वायव्य दिशेकडून तें वादळ सारी रात्रभर इतक्या जोरानें चालू होतें कीं, त्यां-

की होडी तसल्या वादळांत टिकली असेल, अथवा ते आपल्या देशाच्या किनाऱ्यास पोहोंचले असतील, अशी कल्पनासुद्धां करवेना.

इकडे फैदे हा आपल्या बापाच्या शुश्रूषेत इतका निमग्न झाला होता कीं कांहीं वेळपर्यंत तींतून त्याला ओढून घेणें मला बरें वाटेना. परंतु थोडी वेळ गेल्यानंतर, आतां तो आपल्या बापाला क्षणभर सोडून येण्याजोगा रिकामा झाला आहे, असें वाटल्यावरून मीं त्याला आपणाजवळ बोलाविलें. तेव्हां तो परमानंदभरित होत्साता उड्या मारीत व हांसत मजपाशीं आला. नंतर तूं आपल्या बापाला भाकरी वगैरे कांहीं खावयास दिलें कीं नाहीं ? म्हणून मीं त्यास विचारिलें. तेव्हां त्यानें डोकें हालवून उत्तर दिलें कीं; कांहीं एक नाहीं. ह्या रांडलेंकानें स्वतः सगळें खाऊन टाकिलें. हें ऐकून मीं आपणाबरोबर, प्रसंग पडेल म्हणून, एका ल्हानशा पिशवींत भाकरी घेतल्या होत्या, त्यांपैकीं कांहीं भाकरी त्याच्या बापाकरितां देऊन, त्याला स्वतः पिण्याकरितां एक घोटभर गौडी दिली. पण त्यानें ती तोंडालाही न लावितां आपल्या बापाला देण्याकरितां नेली. माझ्या खिशांत मनुकांचेही दोन तीन घड होते, त्यांपैकीं एक मूठभर मनुका त्याच्या बापासाठीं मीं दिल्या. त्या मनुका आपल्या बापास देऊन, लागलीच एखाद्याच्या आंगांत भूतसंचार होतो त्याप्रमाणें तो इतक्या जोरानें पळून गेला कीं, एका क्षणांत तो दिसेनासा झाला; आणि मी जरी त्याला त्याच्या मागून हाका मारीत राहिलों तरी सारें व्यर्थ गेलें. तोतर कसा तेव्हांच नाहींसा झाला. पुढें सुमारें अर्ध्या घटिकेनें तो परत येतांना मीं पाहिला. परंतु जितक्या वेगानें तो गेला तितक्या वेगानें परत आला नाहीं. तो जवळ जवळ येऊं लागला तेव्हां, त्याच्या हातांत कांहीं आहे व त्यामुळें तो हळू हळू पावलें टाकीत आहे, असें माझ्या दृष्टीस पडलें.

तो माझ्या जवळ येऊन पोहोंचला तेव्हां असें दिसून आलें कीं, आपल्या बापाकरितां पाणी आणावयास थेट घरीं जाऊन एक पाण्याचें भांडें व दोन रोट असें तो घेऊन आला. ते रोट त्यानें मला दिले, पण पाणी बापाकडे नेलें. त्याचा बाप तृषेनें फार व्याकुळ झाला होता, त्यामुळें मीं गौडी वगैरे जें त्याला प्यावयास दिलें, त्यापेक्षां पाणी प्याल्यानें त्याला अधिक हुशारी आली.

त्याच्या बापाचें पिणें झाल्यावर मी फ्रैदे ह्यास बोलावून कांहीं पाणी उरलें आहे काय? असें विचारिलें. त्यानें, उरलें आहे, असें सांगितलें. तेव्हां बिचारा स्पान्यर्डही त्याच्या बापाप्रमाणेंच तृषाक्रांत झाला होता, म्हणून तें पाणी त्याला द्यावयास मीं फ्रैदे ह्याला सांगितलें; आणि त्यानें जे रोट आणिले होते त्यां पैकीं एक स्पान्यर्डाला पाठवून दिला. त्याला अशक्ति येऊन तो एका झाडाच्या सांवलींत थंड जागेंत पडून राहिला होता. फ्रैदे हा त्याजवळ पाणी घेऊन गेल्याबरोबर तो बसला राहून पाणी प्याला, व तो रोट घेऊन खाऊं लागला, हें पाहून मींही त्यापाशीं जाऊन त्याला मूठभर मनुका दिल्या. त्या घेऊन त्यानें मजकडे पाहिलें तेव्हां, एखाद्यानें केलेले उपकार स्मरून त्याबद्दल अभारी असण्याचीं जेवढीं चिन्हें कोणत्याही पुरुषाच्या मुखश्रीवरून दिसावीं, तेवढीं सर्व चिन्हें त्याच्या मुखावर दिसत होतीं. लढाईमध्यें त्यानें एवढें बळ लढविलें होतें, तथापि हल्लीं तो इतका निःशक्त झाला होता कीं, त्याला उभें सुद्धां राहवत नव्हतें. त्यानें दोन तीन वेळ उठून उभें राहण्याविषयीं यत्न केला; परंतु त्याच्या पायाचे घोटे अतिशयित सुजून पराकाष्ठेचे ठणकत होते, त्यामुळें त्याला उठण्यास सामर्थ्य राहिलें नव्हतें. तें पाहून मी त्याला, स्वस्थ बैस, असें सांगून, फ्रैदे ह्यानें आपल्या बापाचे पाय जसे गोडी लावून रगडिले होते, तसे त्याचेही त्याकडून रगडविले.

नंतर स्पान्यर्डाला मीं सांगितलें कीं, फ्रैदे हा तुला उभा करून होडीजवळ घेऊन जाईल, व होडींत बसवून तेथून आमच्या राहण्याच्याठिकाणीं नेईल, तर तूं त्यास नेऊंदे, म्हणजे तेथें मी तुझी बरदास्त ठेवीन. हें मीं बोलतांच फ्रैदे हा भला ज्वान होता, त्यानें त्याला सहज पाठुंगळीस टाकून होडीपाशीं नेलें, आणि त्याचे पाय होडीच्या आंतल्या बाजूस करून त्याला तिच्या कडेवर बसविलें नंतर तेथून अल्लाद उचलून होडीच्या आंतल्या बाजूस आपल्या बापाजवळ त्यानें त्याला ठेविलें; आणि लागलीच होडीबाहेर येऊन त्यानें ती पाण्यांत ढकलिली; व त्या वेळेस वारा प्रतिकूळ असतांही त्यानें ती होडी किनाऱ्या किनाऱ्यानें इतकी जलद वल्हवून नेली कीं, तितक्या जलदीनें मला चालतां सुद्धां आलें नाहीं. अशा रितीनें त्या दोघांना सुरक्षितपणें तो आमच्या खाडींत घेऊन आला. नंतर त्यांना तसेंच होडींत राहूं देऊन आपण दुस-

री होडी आणण्याकरितां धांवत गेला. तो माझ्याजवळून गेला तेव्हां, तूं कोठें जातोस? म्हणून मीं त्यास विचारिलें. तेव्हां, जातों, आणखी होडी आणतों, असें म्हणून तो वाऱ्यासारिखा वेगानें चालता झाला; आणि मी पायरस्त्यानें होडीपाशीं येत आहें तोंच त्यानें दुसरी होडी आणिली. त्यानें मला खाडीचे पलीकडे नेलें, मग आमच्या नव्या पाहुण्यांकडे जाऊन त्यांस हात देऊन होडींतून बाहेर काढिलें. पण त्यांतून एकालाही चालण्याचें सामर्थ्य नव्हतें, त्यामुळें, त्यांना घरीं आणावें कसें; ह्याची फ्रैदे ह्यास मोठी पंचाईत पडली. ही पंचाईत दूर करण्याकरितां मीं फ्रैदे ह्यास सांगितलें कीं, त्यांना तेथेंच बसवून तूं मजकडे ये. त्याप्रमाणें तो आल्यावर, आम्हीं हातगाडीसारिखें कांहींएक तयार करून त्यावर त्यांना बसविलें, आणि दोघे दोहींकडे धरून त्यांना घेऊन चाललों. परंतु जेव्हां आम्हीं त्यांना कोटाच्या बाहेरच्या बाजूस आणिलें तेव्हांतर मोठ्याच पंचाइतींत पडलों. कारण कोटाची भिंत ओलांडून त्यांना आंत घेऊन जाणें अशक्य होतें. त्यामुळें मीं पुनः दुसरी एक तजवीज चालविली. ती अशी, आम्हीं दोघांनीं मिळून सुमारें दोन तासांच्या आंतच एक फार नामी तंबू तयार केला; आणि त्याच्याभोंवतीं जुनीं अवजारें लावून वरून झाडांच्या फांद्या पसरिल्या. हा तंबू माझ्या बाहेरील कुंपणाच्या बाहेर, तें कुंपण व जीं नवीन झाडें मीं लाविलीं होतीं तीं, ह्यांच्या मधल्या जागेंत दिला होता. ह्या तंबूमध्यें त्यांना निजण्याकरितां, मजपाशीं चांगला भाताचा कोंडा होता तो पसरून त्यावर मी एकेक घोंगडी टाकिली, अशा रितीनें दोन बिछाने तयार करून पांघरावयास आणखी एकेक घोंगडी त्यांवर ठेविली.

ह्याप्रमाणें आम्हीं काळाच्या तोंडांतून काढिलेल्या त्या दोन बंदिवानांची राहण्याची व निजण्याची यथास्थित सोय करून दिल्यानंतर त्यांच्या खाण्यापिण्याच्या तजविजीस मी लागलों. प्रथमतः मीं फ्रैदे ह्यास सुमारें एक वर्षाचा बोकड घेऊन मारावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केल्यावर मीं त्याच्या शरीराचा मागल्या बाजूकडील सुमारें चतुर्थांश कापून काढिला, आणि तो चिरून त्याचे लहान लहान तुकडे केले, व फ्रैदे ह्याला ते शिजवावयास बसविलें. आणि त्यांच्याकरितां पसंत मांस व मांसाची कढी असे दोन पदार्थ तयार केले. नंतर त्यांचीं

पात्रें वाढून मीही त्यांबरोबर जेवायास बसलों; आणि जेवतांना मला करवला तितका यत्न करून त्यांचें सांत्वन करण्याविषयीं व त्यांना धैर्य देण्याविषयीं मी झटलों. माझें बोलणें फैदे ह्याचे बापास समजून देणें, व त्याचें बोलणें मला समजाविणें, हें काम फैदे करी. आणि त्या स्पान्यर्दालाही माझें बोलणें तोच समजावून देत असे; कारण, त्या. स्पान्यर्दाला त्या रानटी लोकांची भाषा बरीच बोलतां येत होती.

पुढें हळू हळू मी त्या दोघां मनुष्यांस नानाप्रकारचे प्रश्न करून त्यांच्याशीं संभाषण करण्याचा उपक्रम चालविला. त्या स्पान्यर्दाशीं संभाषण करीत असतां त्यानें सांगितलें कीं, मी व आमच्या देशचे आणि पोर्तुगाल देशचे आणखी सोळा असामी, समुद्रपर्यटन करीत असतां आमचें गलबत फुटलें. मग मोठ्या संकटांतून सुटून त्या रानटी लोकांच्या देशाच्या किनाऱ्यास जाऊन लागलों. तेथें आम्ही त्या लोकांशीं सख्यानें वागतों खरे; परंतु आम्हांस निर्वाहाचे कोणतेच पदार्थ मिळत नसल्यामुळें आमची मोठी विपत्ति होते; किंबहुना प्राणरक्षण होईल किंवा नाहीं ह्याचा देखील विचार पडतो. त्यांच्या जलपर्यटनाचें इत्थंभूत वर्तमान मीं त्यास विचारिलें; तेव्हां त्याचे सांगण्यावरून असें कळून आलें कीं, ज्या जहाजांत हे लोक होते तें स्पेन देशांतील असून रिओदिलाप्लाता ह्या ठिकाणाहून हावान्ना येथें जाण्याच्या संकेतानें निघालें होतें; व त्यांतील माल मुख्यत्वें करून जनावरांचीं कातडीं व रुपें हा होता, तो हावान्ना येथें खपवून त्याठिकाणीं काय माल मिळेल तो घेऊन परत यावें असा त्या जहाजावरील लोकांस हुकूम होता. त्यांना वाटेंत एक जहाज फुटतांना आढळलें, त्यावरील पांच पोर्तुगीज खलाशी लोक त्यांनीं आपल्या जहाजावर घेतले होते; खुद्द त्यांचेंच जहाज बुडालें त्यावेळेस त्यांचे पांच असामी बुडून मेले; आणि उरले होते तेही अन्नावांचून मरत आहेत अशा स्थितींत त्या नरभक्षक लोकांच्या किनाऱ्यावर जाऊन लागले. पण तेथेंही ते आम्हांस केव्हां खाऊन टाकितील कोणजाणे ही दहशत त्यांचे अंतःकरणावर होतीच. त्या स्पान्यर्दानें आणखी असें सांगितलें कीं, तेथें आम्हांजवळ बंदुका वगैरे हत्यारें होतीं, परंतु दारूगोळा नसल्यामुळें त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं; कारण, आमची बंदुकेची दारू समुद्राचे पाण्यानें भिजून

नासून गेली होती, व जी कांहीं थोडीशी राहिली होती ती आम्हीं कि-
नाऱ्यावर उतरतांच भक्ष्य मिळविण्याचे कामांत खर्चिली होती.

मीं स्पान्यर्डास विचारिलें, तुम्हीं आपली सुटका करून घेण्याचा
विचार कधीं केला होता किंवा नाहीं ? त्यानें उत्तर केलें, आम्हीं पु-
ष्कळ विचार केला; परंतु उपयोग काय ? आम्हांजवळ जहाज नाहीं,
व एखादें तयार करावें म्हटलें तर लांकडें वगैरे सामान व हत्यारेंही
नाहींत; त्यामुळें सुटकेचा विचार करितांना आपणाजवळ कांहीं साधन
नाहीं ही गोष्ट मनांत आली म्हणजे निराशा होऊन नेत्रांतून अश्रुधा-
रा वाहूं लागाव्या, असा आमच्या विचारांचा शेवट होतो. हें ऐकून
मीं त्यास विचारिलें, तुमची मुक्तता होण्याची एखादी युक्ति सुचविली
असतां तुमचे लोक ती कबूल करितील किंवा नाहीं ? व ते सारे असा-
मी येथें आले असतां एखादी युक्ति निघून तुमची मुक्तता होणें शक्य
आहे असें तुम्हांस वाटतें किंवा नाहीं ? मीं मन मोकळें करून त्याला
आणखी असें सांगितलें कीं, मीं तुम्हां सर्वांस येथें आणून आपला जी
व तुमचे स्वाधीन केला असतां, कृतघ्नपणें तुम्ही मजशीं कपट करून
माझा नाश कराल, ह्या गोष्टीची मुख्यत्वेंकरून मला भीति वाटते. का-
रण, कृतज्ञता हा गुण म्हणजे प्रत्येक मनुष्यांत स्वाभाविकच असतो अ-
सें नाहीं; आणि मनुष्यमात्र दुसऱ्याशीं कोणता व्यवहार करितांना
आपणावर दुसऱ्यानें केलेले उपकार मनांत आणून वागत नाहीं; तर
कोणत्या प्रकारें वागल्यानें आपला फायदा होईल हें मनांत आणून
वागत असतें. सारांश, अशी भीति माझ्या अंतःकरणांत उत्पन्न हो-
ते एवढीच काय ती अडचण; नाहींपक्षीं मला असें वाटतें कीं, ते सारे
असामी येथें आले असतां, ज्यामध्यें बसून आपणासर्वांस दक्षिणेकडे
ब्राजिल देशास किंवा उत्तरेकडे स्पानिशलोकांच्या किनाऱ्यावर अथवा
त्या जवळील बेटांवर पोहोंचतां येईल, इतकें मोठें जहाज आपणासर्वांस
मिळून सहज करितां येईल.

हें ऐकून स्पान्यर्डानें अत्यंत निष्कपटपणें उत्तर दिलें, कीं त्या लो-
कांना हल्लीं इतकी विपत्ति भोगावी लागत आहे, व तीमुळें ते इतके
जेर होऊन गेले आहेत कीं, जो कोणी ह्या संकटांतून त्यांची सुटका हो-
ण्याचा यत्न करील, त्याच्याशीं निर्दयपणें वागणें ही गोष्ट त्यांच्या मनां-

तसुद्धां येणार नाहीं; आणि तुमची इच्छा असल्यास, मी ह्या म्हाता-
ऱ्या मनुष्यास (फ्रैदे ह्याच्या बापास) बरोबर घेऊन त्यांकडे जाईन,
आणि तुम्ही म्हणतां ह्या गोष्टीविषयीं त्यांजबरोबर संभाषण करून मी
त्यांचें उत्तर घेऊन परत येईन. मी त्यांजकडून शपथेवर असा करार
करून घेईन कीं, (जमिनीवर किंवा समुद्रावर असतां) तुम्हांस त्यांनीं
आपला धनी मानून सर्वथैव तुमच्या आज्ञेप्रमाणें वर्तावें; आणि आ-
म्ही तुम्हांशीं खरेपणानें वागूं; तुम्ही ख्रिस्ती लोकांच्या ज्या देशास जा-
वयास सांगाल तिकडेच जाऊं, दुसरीकडे जाणार नाहीं, व तुम्हांस
वाटेल त्या ठिकाणीं आपण जाऊन सुरक्षितपणें पोहोंचूं तोंपर्यंत आम्ही
सर्वांशीं तुमच्या आज्ञेंत राहूं, ह्याप्रमाणें त्यांनीं आपल्या धर्मपुस्तकाची
शपथ वाहून सांगावें; अशी व्यवस्था करून ह्या गोष्टी त्यांनीं कबूल
केल्याबद्दल त्या सर्वांच्या सहीचा करारनामाही मी घेऊन येईन.

स्पान्यर्द ह्याच्या ह्या सांगण्यावरून, त्या सोळा असामींवर भरंव-
सा ठेवण्यास चिंता नाहीं, असें मला वाटून, तो व फ्रैदे ह्याचा बाप ह्या
उभयतांस त्यांच्याशीं बोलीचाली करावयास तिकडे पाठविण्याचा मीं
निश्चय केला. परंतु स्पान्यर्द ह्यानें तिकडे जाण्याची तयारी केल्यावर
त्यानेंच स्वतः एक शंका काढिली. ही शंका काढण्यामध्यें त्याची दूर-
दृष्टि व प्रामाणिकपणा हीं पाहून मला फार संतोष झाला; आणि त्या-
च्या सोबत्यांची सुटका करण्याचें काम त्याच्याच सांगण्यावरून मीं
पुढें निदान सहा महिन्यांवर टाकिलें. त्यानें शंका काढिली ती येणेंप्रमाणें.

तो स्पान्यर्द आम्हांजवळ राहून सुमारें एक महिना झाला होता,
तितक्या काळांत, पूर्वीं परमेश्वराच्या साह्यानें मीं आपल्या उपजीविके
ची तजवीज कशी केली, हें आरंभापासून मीं त्यास समजावून दिलें
होतें. त्यावरून त्याला हें स्पष्ट दिसून आलें कीं, मीं तांदूळ व इतर
धान्य ह्यांचा जो संचय केला होता, तो स्वतः मला पुरण्यासारिखा
होता खरा; परंतु हल्लीं माझें कुटुंब ४ मनुष्यांचें झालें होतें तेवढ्यास
पुरण्याजोगा तो नव्हता. तेव्हां अर्थात् आमचे सोबत्यांपैकीं चवदा
असामीं जिवंत आहेत म्हणून त्यानें सांगितलें होतें, तितके आले अ-
सतां तें धान्य नाहींच पुरणार. मग अमेरिकेस जाण्याकरितां जहाज
तयार केलें असतां त्यांत सामग्री भरण्यास हें धान्य पुरणार नाहीं म्ह-

णून सांगावयासच नको. ह्या प्रकार मनांत आणून तो मला म्हणाला, तुम्हांजवळ जितकें फाजील धान्य असेल तितकें पेरावयापुरती आणखी जमीन आम्हा तिघांजणांस खणून तयार करूं द्या. आणि तीत पेरणी करून पुढल्या हंगामापर्यंत आपण वाट पाहूं; म्हणजे माझे सोबती आले असतां त्यांस पुरे इतकें धान्य आपणांजवळ सांचेल. मी असें म्हणतों ह्याचें कारण अन्नाच्या तोट्यामुळें ते आपणांशीं बिघडतील; व आपण त्यांची सुटका केली हें एकीकडेच राहून, उलटें आम्हांस एका संकटांतून काढून दुसऱ्या संकटांत घातलें असें त्यांस वाटेल. तुम्हांस ठाऊक आहेच कीं, मिसर देशांतून इस्रायल लोकांची सुटका झाल्यामुळें प्रथमतः त्यांस मोठा आनंद झाला; पण जेव्हां अरण्यामध्यें त्यांस अन्नपाणी मिळेनासें झालें; तेव्हां ज्यानें त्यांची सुटका केली, त्या परमेश्वराशींच ते द्वेष करूं लागले.

ह्याप्रमाणें पूर्वीं तयारी करण्याविषयीं त्यानें मला सूचना केली ती इतकी योग्य प्रसंगीं केली कीं तिच्या योगानें मला फार आनंद झाला, व त्याचा प्रामाणिकपणा पाहूनही चित्तास मोठें समाधान वाटलें. तेव्हां आम्ही चवघेजण आम्हांजवळ जीं हत्यारें होतीं त्यांनीं खणतां आलें तसें खणावयास लागलों; आणि सुमारें एका महिन्यानें पेरणीचे दिवस येऊन पोहोंचले तोपर्यंत, २२ बुशल जव व १६ रांजण तांदूळ (भात) इतकें फाजील धान्य आम्हांजवळ होतें, तें पेरण्यापुरती जमीन आम्हीं खणून तयार केली.

ह्या उद्योग चालला असतां, आपला पाळींव बकऱ्यांचा कळप वाढविण्याकरितां ही होईल तितका यत्न मीं चालविला होता. बकरीं धरून आणण्याकरितां एक दिवस तो स्पान्यर्द व फ्रैदे ह्यांस मी पाठवीं; आणि एक दिवस फ्रैदे ह्यास घेऊन मीच जाईं. असें करितां करितां आमच्या कळपांत पूर्वीपेक्षां सुमारें २०।२५ करडें अधिक झालीं. कारण, जेव्हां जेव्हां एखादी बकरी मारावयास सांपडे तेव्हां तिचीं करडें घेऊन कळपांत घालावीं, असें आम्हीं चालविलें होतें. आणि हल्लीं द्राक्षें वाळवून त्यांच्या मनुका करण्याचे दिवस आले होते, सबब त्या तिघांकडून द्राक्षांचे इतके पुष्कळ घड मीं उन्हांत टांगविले कीं, मनुकांची मुख्य पेठ जें अलिकांत शहर, तेथें आम्ही असतों तर मनुकांचीं

सुमारें ६०।७० दिवें आम्हीं भरलीं असतीं, अशी आमची खातरी आहे; आणि मनुका व भाकरी हे तर आमच्या जेवणांतील मुख्य पदार्थ असत.

हंगामाचे दिवस आले त्यावेळेस आमचें पीकही चांगलें आलें. हें पीक म्हणजे ह्या बेटावर जीं पिकें मीं पाहिलीं त्यासर्वांमध्यें उत्तम आलें होतें असें नाहीं; परंतु त्याच्या योगानें आमचा हल्लींचा हेतु शेवटास जाईल असें होतें. कारण, ते सोळांचे सोळा असामी स्पान्यर्द जरी येथें रहावयास आले, तरी त्यांना पुरे इतकें, अथवा आम्हीं जलपर्यटनाची तयारी केली तर अमेरिकेच्या कोणत्याही भागास जावयापुरती अन्नसामग्री गलबतांत भरण्यास पुरे इतकें धान्य ह्या पिकानें आम्हांजवळ झालें.

असो, ह्याप्रमाणें पुढें येणाऱ्या पाहुण्यांकरितां अन्नसामग्रीची यथास्थित तयारी झाल्यावर, मीं त्या स्पान्यर्दास सांगितलें कीं, आतां तुम्ही मुख्य जमिनीवर जाऊन तेथें राहिलेल्या सोळा असामींची कशी काय व्यवस्था करितां येईल ती पहा. मीं आणखी त्यास अशी सक्त तांकीद दिली कीं, जे मनुष्य तूं येथें आणिशील त्यांपैकीं प्रत्येकानें, तूं व हा म्हातारा रानटी माणूस ह्यांच्या समक्ष अशी शपथ वहावी कीं, "बेटांवरील ज्या मनुष्यानें ह्या विपत्तींतून आमची सुटका करण्याकरितां तुम्हांस पाठविलें आहे, त्यावर मी उलटून पडणार नाहीं, अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारें त्यास इजा देणार नाहीं; नेहमीं त्याच्या बरोबर राहून त्याच्या रक्षणाकरितां झटेन; आणि आपण कोठेंही गेलों तरी मी सर्वथैव त्याच्या आज्ञेंत वागेन." आणि जो कोणी ह्याप्रमाणें शपथ न घेईल, त्यास साफ येथें आणूंनको, असें मीं त्यास सांगितलें.

ह्याप्रमाणें माझा हुकूम मिळाल्यावर तो स्पान्यर्द व फ्रैडे ह्याचा बाप हे दोघे त्या रानटी लोकांच्या होड्यांपैकीं एकींत बसून चालते झाले. ते जाऊंलागले तेव्हां मीं प्रत्येकास एकेक बंदूक व सुमारें आठ बार काढण्यापुरता दारूगोळा इतकें सामान देऊन, हें सामान फार जपून ठेवा, व, आतां बार काढल्यावांचून उपायच नाहीं असा प्रसंग आल्यावांचून बिलकुल बंदुकांचा व दारूगोळ्याचा उपयोग करूनका, असें त्यांस सांगितलें. भाकरी व मनुका ही अन्नसामग्रीही त्या दोघांस बरेच दिवस

पुरण्याजोगी, व जे लोक यावयाचे त्यांकरितां आठ दिवसांपुरती मीं दिली. आणि परत येतेवेळेस तेच लोक आले आहेत असें मला कळावें म्हणून ह्या दोघांच्या व माझ्या मतानें एक खुणेचें निशाण ठरवून, तें निशाण किनाऱ्याजवळ येण्यापूर्वी दूर असतांनाच त्यांनीं आपल्या होडीवर उभें करावें, असें मीं त्यांच्याशीं ठरविलें. नंतर परमेश्वर कृपा करून तुमचें पर्यटन निर्विघ्नपणें सिद्धीस नेवो असा आशीर्वाद देऊन मीं त्यांस जाऊं दिलें.

ह्या बेटापासून पूर्णिमेच्या दिवशीं त्यांनीं होडी हांकारिली; त्या वेळेस त्यांना वारा फार अनुकूळ होता. ज्या महिन्यांत ते निघाले तो अक्तोबर महिना असावा, असा माझा आजमास झाला. परंतु एकदा माझा महिन्यांचा व दिवसांचा हिशेब चुकला आहे असें मला वाटत होतें, त्यापुढें मला तो कधींच सुधारितां आला नाहीं; व फार कशाला मी ह्या बेटावर येऊन वर्षें अमुकच झालीं आहेत हेंसुद्धां मला पक्कें ठाऊक नव्हतें; तथापि पुढें नीट तपास केल्यानंतर मला कळून आलें कीं, वर्षांच्या वगैरे हिशेबांत मी चुकलों नव्हतों.

प्रकरण साहावें.

त्या लोकांची सुमारें आठ दिवस मीं वाट पाहिल्यानंतर अकल्पित एक विलक्षण गोष्ट घडून आली. ती अशी, एके दिवशीं प्रातःकाळीं मी गाढ झोंपेंत असतां फ्रैदे हा धांवत धांवत येऊन मला मोठ्यानें हाक मारून म्हणाला, धनी साहेब, धनी साहेब, ते आले, ते आले. हे शब्द ऐकतांच मी धडपडून उठलों, आणि घाईनें कपडे आंगावर घालून, आपणावर एखादें अरिष्ट येईल वगैरे गोष्टींचें भय मनांत मुळींच न आणितां झटकन आपल्या लहान झाडीच्या बाहेर पडलों; परंतु समुद्राकडे पाहतांच किनाऱ्यापासून सुमारें दोन सवादोन कोसांच्या अंतरावर एक होडी आहे व ती बेटाच्या अगदीं दक्षिणभागाकडून किनाऱ्याकडे येत आहे, असें दृष्टीस पडलें. हें पाहून मी किती चकित झालों असेन हें

वाचकांनीं ध्यानांत आणावें. मीं तत्काळ फैदे ह्यास बोलावून सांगितलें कीं, तूं आंतच ऐस; बाहेर येऊं नको; कारण, आपण ज्यांची वाट पहात आहों ते हे लोक नव्हत. हे आपले शत्रु आहेत किंवा मित्र आहेत हें अद्यापि समजत नाहीं. नंतर ते लोक कोण आहेत तें पहावें म्हणून मी आपली दुर्बीण आणण्याकरितां घरांत गेलों; आणि दुर्बीण घेऊन त्या टेंकडीवर पाय ठेवितों आहें तोंच, मी उभा होतों त्या स्थळाच्या दक्षिण व आग्नेयी ह्यांच्या मधल्या दिशेस तेथपासून सुमारें चार पावणे-चार कोसांवर व किनाऱ्यापासून पराकाष्ठा दोन सव्वादोन कोसांवर नांगर टाकून उभें केलेलें एक जहाज स्पष्टपणें दुर्बिणींतून माझ्या दृष्टीस पडलें. सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यावरून हें इंग्लिश लोकांचें जहाज असावें, व ती इंग्लिश लोकांची लांगबोत नामक होडी असावी, असें मला वाटलें.

हें जहाज पाहून व त्यांत तें स्वदेशच्या लोकांचें आहे हें समजून मला अनिर्वाच्य आनंद झाला खरा, तथापि तें दृष्टीस पडल्यामुळें माझ्या चित्ताचा जो गोंधळ झाला, तोही अनिर्वाच्यच होता. कारण, ते लोक कोठून आले आहेत हें अद्यापि पक्कें न समजल्यामुळें नाना प्रकारच्या शंका मनांत उत्पन्न होऊन, आपण फार सावधगिरीनें असावें, असें मला वाटूं लागलें. प्रथमतः अशी शंका आली कीं, इंग्लिश लोकांच्या जहाजास इकडे येण्याचें प्रयोजन काय? कारण, ज्या ज्या ठिकाणीं इंग्लिश लोकांचा व्यापार आहे तेथें तेथें जाण्याचा किंवा तेथून इंग्लंदास परत जाण्याचा मार्ग हा नव्हे. बरें, वादळानें जहाज झुकून इकडे आलें असेल म्हणावें, तर आलीकडे वादळही झालें नाहीं हें मला पक्कें ठाऊक आहे. तस्मात् हे जर खरोखर इंग्लिश लोकच असले, तर ते कोणत्या एखाद्या चांगल्या उद्देशानें इकडे आले असतील असें दिसत नाहीं. ह्या सर्व विचारांवरून मला वाटलें कीं, आपण पुढें जाऊन कोणा चोरांच्या किंवा हिंसकांच्या हातीं लागावें, त्यापेक्षां पूर्वीप्रमाणें गुप्त रितीनें असावें हें फार चांगलें.

ह्याप्रमाणें विचार करीत मी उभा आहें इतक्यांत ती होडी तींतील लोकांनीं किनाऱ्याजवळ आणिली; आणि जमिनीवर उतरण्यास सुलभ पडावें म्हणून एखादी खाडी ते शोधीत आहेत असें दिसलें. तथापि ते खाडीचा शोध करीत फारसे दूर आले नाहींत, त्यामुळें ज्या जहा-

नशा खाडींत मी पूर्वी आपले माल्याचे तापे जमिनीस टेंकविले होते, ती त्यांचे दृष्टीस पडली नाहीं; व तेथून सुमारें पाव कोसाच्या अंतरावर त्यांनीं आपली होडी उभी केली. त्यांनीं होडी दूर उभी केली ही गोष्ट माझ्या हिताची झाली; कारण, जर त्यांनीं ती वर सांगितलेल्या खाडींत आणिली असती, तर ते जसे कांहीं नेमके माझ्या दारांतच येऊन उतरले असते, व कदाचित् मला घरांतून हांकून देऊन त्यांनीं माझें सर्वस्व लुटून नेलें असतें.

ते किनाऱ्यावर उतरले तेव्हां हे इंग्लिश लोकच अशी माझी पक्की खात्री झाली. ते एकंदर अकरा असामी होते, व त्यांपैकीं तिघांजणांपाशीं हत्यारें नसून त्यांच्या मुसक्या बांधिलेल्या होत्या असें दिसलें. पहिल्यानें चौघां पांचजणांनीं होडींतून किनाऱ्यावर उड्या टाकून त्या तिघां बंदिवानांस बाहेर काढिलें. त्यांपैकीं एकजण वेडीं वांकडीं तोंडें करून त्यांचें आर्जव करीत आहे, आणि त्यास अत्यंत दुःख व निराशा झाल्यामुळें पाहणारास कळवळा येण्यासारिखीं नानाप्रकारचीं चिन्हें करीत आहे असें दृष्टीस पडलें. दुसरे दोघेही दुःख झाल्याचीं चिन्हें दाखवीत खरे, परंतु पहिल्या मनुष्याच्या दुःखाइतकें ह्यांस दुःख होत आहे, असें दिसलें नाहीं.

हें पाहून मी फार गोंधळून गेलों; कारण, हा काय प्रकार आहे हें माझ्या कांहींच लक्ष्यांत येईना. फ्रैदे हा मला हाक मारून (इंग्लिश भाषेंत बोलतां आलें तसें बोलून) म्हणाला, धनीसाहेब, पहा रानटी माणसें जशीं बंदिवान खातात तशीं इंग्लिश माणसेंही खातात. मी म्हणालों, तर हे आतां बंदिवानांस खाणार, असें तुला वाटतें कीं काय? त्यानें उत्तर केलें, होय, ते आतां त्यांस खाऊन टाकितील. मीं म्हटलें, छे, छे, फ्रैदे, ते कदाचित् त्या बंदिवानांचा वध करितील, परंतु त्यांस खाणार नाहींत. हें तूं पक्कें समज.

इतका वेळ मीं विचार केला तरी त्या लोकांचा वास्तविक हेतु काय हें अझूनही माझ्या ध्यानांत आलें नव्हतें. पण आतां ह्या तिघांजणांचा ते वध करितील, असें प्रतिक्षणीं भय पडून मी एकसारिखा थरथर कांपत उभा होतों, इतकेंच नव्हे; एकदा तर त्या दुष्टांपैकीं एकानें त्या गरीब बंदिवानांतून एकास मारण्याकरितां तरवार उगारिली,

तें पाहतांच माझ्या आंगावर रोमांच थरारून उठले.

त्यावेळेस मला असें वाटलें कीं, तो माझा स्पान्यर्ड व त्याबरोबर गेलेला म्हतारा रानटी माणूस हे दोघे ह्याप्रसंगीं एथें असते तर फार बरें होतें. अथवा त्या लोकांच्या दृष्टीस नपडतां त्यांच्यापासून गोळीच्या टप्यांत पोहोंचण्याचा मला एखादा मार्ग सांपडता तरी मीं त्या तिघां गरिबांस वांचविलें असतें. कारण, त्यांपैकीं कोणाजवळ बंदुका वगैरे आहेत असें मला दिसलें नाहीं. असें मनांत आलें खरें, परंतु पुढें पाहतों तों कांहीं निराळाच प्रकार दिसून आला.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें त्या तिघांचे पुष्कळ हाल केल्यावर ते खलाशी लोक चोहींकडे पसरले. ह्यावरून बेट पाहण्याकरितां ते चालले आहेत असें मला वाटलें. त्या तिघां बंदिवानांसही पाहिजे तिकडे जाण्यास मोकळीक होती असें दिसलें. परंतु ते बिचारे दुःख करीत तेथेंच पडले व अगदीं निराश झाल्यासारिखी त्यांची चर्या दिसूं लागली.

हे लोक किनाऱ्यावर आले त्यावेळेस नुकताच समा झाला होता. परंतु त्या बंदिवान लोकांशीं बोलण्यांत व हें स्थळ कोणत्या प्रकारचें आहे हें पाहण्यांत त्यांनीं निश्चितपणें पुष्कळ वेळ घालविला, त्यामुळें ते किनाऱ्यावर परत आल्यापूर्वीं ओहोट होऊन त्यांची होडी जमिनीस टेंकली.

त्या लोकांपैकीं दोघे असामी होडींतच राहिले होते, ह्याचें कारण ते ब्रांदी नांवाचें मद्य किंचित् ज्यास्त प्याल्यामुळें झोंपीं गेले होते, असें मला कळून आलें. तथापि त्या दोघांपैकीं एकजण थोडा लवकर जागा झाला, आणि होडी जमिनींत फार रुपून बसल्यामुळें आपणास हालत नाहीं असें पाहून, बाकीचे जे लोक इकडे तिकडे उगेच भ्रमण करीत होते, त्यांस त्यानें आरोळी दिली. ती ऐकून ते सारे होडीपाशीं आले, परंतु आतां ती होडी हालविणें हें सर्वांच्याही सामर्थ्याबाहेर होतें; कारण, आधीं ती होडीच स्वतः फार जड, आणि त्यांत तिकडील किनाऱ्यावर बारीक रेतीही फार होती; त्यामुळें ती फारच बळकट रुपून बसली होती. सर्व मनुष्यजातीमध्यें खलाशीलोक हे बहुतकरून कोणतीही गोष्ट करितांना विचार फारच कमी करितात, त्याप्रमाणें हे लोक ह्याप्रसंगीं होडी हालत नाहीं असें पाहून तिला काढण्याचा कांहींच विचार

न करितां तिला तशीच टाकून पुनः चोर्हींकडे फांकले. त्यांपैकीं एक-जण दुसऱ्या एकास मोठ्यानें इंग्रेजी भाषेंत असें म्हणाला, असूंदेरे जाका, तुम्हांस उगेच राहवत नाहीं कायरे? आतां राहूंद्या. पुनः भरती आली म्हणजे ती आपोआप तरंगूं लागेल. ह्या त्यांच्या भाषणावरून ते लोक कोणत्या देशचे आहेत ह्याविषयीं मीं जी कल्पना केली होती ती मात्र खरी ठरली.

हें सर्व कृत्य चाललें असतां टेंकडीच्या माथ्याजवळ ज्या ठिकाणीं उभा राहून मी पाहत होतों, त्या जाग्यापुढें एक पाऊलभरही जाण्यास मला धैर्य होईना. आणि अशा प्रसंगीं माझ्याभोंवतीं मजबूद तट वगैरे मोठा बंदोबस्त आहे ही गोष्ट मनांत येऊन मला मोठा आनंद झाला. मला हें पक्कें ठाऊक होतें कीं, भरती येऊन होडी तरंगूं लागण्यास अजून ३ । ३½ प्रहर अवकाश आहे, व तोंपर्यंत चांगला काळोख पडेलच, आणि मग अर्थात् आपणास त्यांचीं कृत्यें पाहण्याची विशेष सोई होईल, व त्यांचें कांहीं संभाषण चालल्यास तें ऐकावयास सांपडेल, असें मला वाटलें. तरी हें मनांत आणून मी काळोख पडण्याची वाट पाहत स्वस्थ बसलों असें नाहीं; पूर्वींप्रमाणें मीं लढाईची तयारीही करून ठेविली; पण हल्लीं पूर्वींसारिख्या दुर्बल शत्रूशीं आपणास प्रसंग नाहीं हें मनांत आणून सांप्रतची तयारी मीं पूर्वींपेक्षां विशेष सावधगिरीनें केली. फ्रैदे ह्याला मीं बरेंच निशाण मारावयास शिकविलें होतें, सबब त्यासही हत्यारबंद होण्यास सांगितलें.

काळोख पडे तोंपर्यंत ह्या जाग्यावरून हालावयाचें नाहीं, व कोणताही यत्न करावयाचा नाहीं, हा माझा निश्चय झाला होता, असें मीं वर सांगितलें खरें, परंतु दोन वाजावयाचे सुमारास पाहतों तों ते सारे उन्हाच्या तीक्ष्णतेमुळें जंगलांत शिरले, आणि तेथें कोठेंतरी पडून ते झोंपीं गेले असतील असें मला वाटलें. त्या संकटांत पडलेल्या तिघां मनुष्यांच्या अंतःकरणावर, आपली अवस्था काय होईल, ह्या चिंतेचें ओझें असल्यामुळें बापुड्यांना झोंप कोठून येणार! ते बिचारे मजपासून सुमारें ४००।४५० पावलांच्या अंतरावर एका मोठ्या वृक्षाच्या छायेखालीं

बसले होते; व त्या ठिकाणीं बसले असतां ते बाकीच्या लोकांच्या दृष्टी-स पडत नाहींत असें मला वाटलें.

असा प्रकार पाहिल्यावर, आपण त्या तिघांपुढें प्रकट होऊन त्यांच्या स्थितीविषयीं कांहीं समजून घ्यावें, असा मीं निश्चय केला. नंतर त्यांच्या दृष्टीस नपडतां जितकें त्यांच्याजवळ जाववलें तितकें जाऊन, तिघांपैकीं कोणीही मजकडे पाहिलें नाहीं तोंच मीं त्यांना स्पानिश भाषेंत मोठ्यानें हाक मारून म्हटलें, सज्जनहो, तुम्ही कोण आहां? हा माझा ध्वनि ऐकतांच ते अत्यंत विस्मित झाले, आणि माझी विलक्षण मूर्ति पाहून तर त्यांना दसपट विस्मय झाला. ते गोंधळून गेल्यामुळें मुळींच कांहीं उत्तर करीनात, आणि उलटे मजपासून पळून जाण्याच्या बेतांत आहेत असें मला दिसलें; तेव्हां मीं इंग्लिश भाषेंत म्हटलें, सद्गृहस्थहो, तुम्ही मला पाहून विस्मित होऊं नका. येथें कोणी मित्र भेटेल अशी जरी तुम्हांस आशा नाहीं, तरी मीच तुमचा मित्र होणार नाहीं असें कशावरून? हें ऐकतांच त्यांपैकीं एकजण आपली टोपी काढून मोठ्या गंभीर मुद्रेनें मला म्हणाला, असें असेल तर तो प्रत्यक्ष परमेश्वरानें स्वर्गलोकाहूनच पाठविला असावा. कारण, ह्या ठिकाणीं मानवी प्राण्यापासून आम्हांस साह्य होण्याचा मुळींच संभव नाहीं. मी म्हणालों, होय बाबा, सर्व साह्य परमेश्वरापासूनच प्राप्त होत असतें. असो पण त्यां परकी मनुष्यानें तुम्हांस कोणत्या प्रकारें साह्य करावें, हें मला सांगाल काय? कारण, तुम्ही कांहीं महासंकटांत आहां असें मला दिसतें.

हें माझें भाषण ऐकतांच त्याच्या नेत्रांतून आनंदाश्रूंचा प्रवाह चालला, आंगास कंप सुटला, आणि अत्यंत आश्चर्यभरित दृष्टीनें मजकडे पाहून तो म्हणाला, काय? मी प्रत्यक्ष परमेश्वराशींच बोलत आहें किंवा मनुष्याशीं! हा वास्तविक मनुष्य आहे किंवा देवदूत आहे! मीं म्हटलें, बाबा, तसली कांहीं शंका मुळींच मनांत येऊं देऊं नका. परमेश्वरानें तुमच्या मुक्ततेकरितां देवदूत पाठविला असता, तर त्याचा पोषाख व शस्त्रें हीं माझ्याप्रमाणें रानवट नसतीं. असो, पण तुम्ही आपल्या सर्व शंका एकीकडे ठेवा; मी तुम्हांस सत्य सांगतों कीं, मी मानवी प्राणी आहें; जातीचा इंग्रेज आहें, आणि तुम्हांस साह्य करावें अशी बुद्धि उत्पन्न होऊन मी येथें आलों आहें. मजजवळ एक चाकर असून

[illegible]कोणाही आहे, हें तुम्ही पाहतच आहां; तस्मात् तुम्हांस कोणतें संकट प्राप्त झालें आहे, आणि आम्हांपासून तुम्हांस साह्य होण्याचा संभव आहे किंवा नाहीं, हें निःशंकपणें सांगा.

त्यानें उत्तर केलें, काय सांगूं महाराज, आमचे शत्रु फार सन्निध आहेत, आणि आमचा वृत्तांत तर फार लांब आहे; त्यास ह्यावेळीं तो सर्व विदित करणें संभवत नाहीं. पण थोडक्यांत सांगतों कीं, मी ह्या जहाजावरील मुख्य अधिकारी आहें, आणि हे सर्व माझे हाताखालचे लोक असून मजवर उठले आहेत. ते माझा वधच करणार होते, परंतु मी त्यांचें पराकाष्ठेचें आर्जव केल्यावरून त्यांनीं निरुपाय होऊन मोठ्या संकटानें मला जीवदान दिलें; आणि शेवटीं त्यांनीं हा एक माझा दुय्यम व दुसरा कोणी एक उतारू ह्या दोघांसहित मला ह्या निर्जनस्थलीं आणून सोडिलें आहे. ह्या ठिकाणीं मनुष्याचा गंधही नाहीं असें वाटून आम्ही मृत्यूचीच वाट पाहत आहों; आणि अजून पुढें तरी काय करावें हें आम्हांस मुळींच कांहीं सुचत नाहीं.

हें ऐकून मीं मोठ्या आवेशानें विचारिलें, कोठें आहेत ते दुष्ट पशु, तुमचे शत्रु? ते कोणीकडे गेले आहेत हें तुम्हांस ठाऊक आहे काय? त्यानें एका दाट झाडीकडे बोट दाखवून उत्तर केलें, ते त्या झाडींत आहेत, महाराज, त्यांनीं आपणास पाहिलें असेल किंवा आपलें बोलणें ऐकिलें असेल, ह्या भीतीनें माझें ह्रदय उडत आहे. कारण, तसें झालें असलें तर खचीत ते आपणा सर्वांस ठार मारितील.

हें ऐकून मीं विचारिलें, त्यांच्याजवळ बंदुकावगैरे हत्यारें आहेत काय? त्यानें उत्तर केलें, त्यांच्या जवळ हल्लीं दोन बंदुका आहेत, व एक होडींत राहिली आहे. मीं म्हटलें, बरें तर, आतां मजवर भरंवसा ठेवून तुम्ही स्वस्थ असा. ते लोक झोंपीं गेले आहेत, असें मला येथून दिसतें आहे, सबब आतां सहज त्या सर्वांची कत्तल उडवितां येईल. परंतु त्यांचे प्राण घेण्यापेक्षां त्यांना धरून बंदिवान करणें हें बरें नव्हे काय? तो म्हणाला, त्या लोकांमध्यें दोघे असामी अत्यंत शठ व साहसी आहेत, त्यांच्यावर दया करणें हें उलटें आपल्या नाशास कारण होईल. त्यास ते दोघे जर कसे तरी आपल्या ताब्यांत आणितां येती-ल, तर बाकीचे सर्व पूर्ववत् मजशीं विश्वासानें वागूं लागतील. ते दो-

घे मनुष्य कोणते ? म्हणून मीं त्यास विचारिलें. तो म्हणाला, इतक्या अंतरावरून ते मला अमुकच म्हणून दाखवितां येणार नाहींत. तथापि तुमच्या इच्छेप्रमाणें करा; मी सर्व प्रकारें तुमच्या आज्ञेप्रमाणें वागेन. मीं म्हटलें, बरें आहे, पण कदाचित् ते आतां जागे होतील; सबब, जेथें आपण त्यांचे दृष्टीस पडणार नाहीं, व आपलें बोलणें त्यांस ऐकूं जाणार नाहीं, अशा ठिकाणीं जाऊं, आणि तेथें पुढला विचार करीत बसूं. हें ऐकून ते संतोषानें माझ्या मागें येऊं लागले, आणि त्या निजलेल्या लोकांच्या आणि आमच्या मध्यें जंगल आड येई तोंपर्यंत आम्ही पुढें गेलों.

नंतर मी त्यांस म्हणालों, पाहा बाबांनो, मीं तुम्हांस ह्या संकटांतून मुक्त करण्याकरितां आपलाजीव धोक्यांत घातल्यास तुम्ही माझ्या दोन गोष्टी कबूल करालः? मी पुढें काय म्हणणार हें पूर्वींच मनांत आणून, मज बरोबर जो पूर्वीं बोलत होता त्यानें मला सांगितलें, हा माझा देह, व हें जहाज परत मिळाल्यास तें, हीं दोन सर्वथैव तुमचीं आहेत. जहाज न मिळालें तथापि मी स्वतः आमरण तुमच्या चरणांची सेवा करीत (पृथ्वीवर ज्या ठिकाणीं तुम्ही मला रहावयास सांगाल तेथें) राहीन. बाकीच्या दोघां मनुष्यांनींही ह्या प्रमाणेंच सांगितलें.

मीं म्हटलें, ठीक आहे, माझ्या फक्त दोन अटी आहेत. प्रथम अशी कीं, ह्या बेटावर आहां तोंपर्यंत तुम्ही आपला कोणत्याही प्रकारचा अम्मल येथें चालवूं नये. मी तुम्हांस हत्यारें दिलीं असतां मी मागेन त्या वेळेस तीं मला तत्काळ परत द्यावीं; आणि सर्व प्रकारें माझे आज्ञेंत वागावें. दुसरी अशी कीं, जहाज परत मिळालें असतां मी व माझा चाकर फ्रैदे ह्या उभयतांस तुम्ही उतार खर्च न घेतां इंग्लंदास घेऊन जावें.

हें माझें भाषण ऐकतांच त्यानें खात्री करून सांगितलें कीं, हें तुमचें म्हणणें केवळ रास्त आहे, हें मी मोठ्या आनंदानें कबूल करितों. पण इतकेंच नाहीं, ह्या संकटांतून माझा जीव वांचविला त्याबद्दल मी तुमचा ऋणी आहें, ही गोष्ट मी मरणपर्यंत मनांत बाळगीन.

तेव्हां मीं म्हटलें, बरें तर, घ्या ह्या तीन बंदुका व दारूगोळा; आणि पुढें कोणती तजवीज करणें तुम्हांस योग्य दिसते तें मला सांगा.

मीं बंदुका दिल्या बद्दल माझे मोठे उपकार मानून तो म्हणाला, आम्हांस कोणतीही तजवीज सुचत नाहीं; तुम्ही सांगाल तसें आम्ही करणार. मीं म्हटलें, ह्या प्रसंगीं कोणती गोष्ट करणें योग्य हें मलाही चांगलेंसें सुचत नाहीं. इतकें मात्र वाटतें कीं हे तुमचे शत्रु निजले आहेत तोंच त्यांच्यावर गोळ्या घालाव्या, आणि त्यांपैकीं कोणी पहिल्या बारांतून वांचले व आपल्या ताब्यांत येण्यास कबूल झाले, तर त्यांस जीवदान द्यावें. सारांश, आपण गोळ्या घालाव्या म्हणजे झालें. परमेश्वराच्या इच्छेनें कोण मरतील ते मरोत, व वांचतील ते वांचोत.

हें ऐकून तो मोठ्या मर्यादशीलपणानें म्हणाला, त्या लोकांस ठार मारावें हें मला प्रशस्त दिसत नाहीं; त्यांचे जीव घेतल्यावांचून एखादी तजवीज निघेल तर बरें. परंतु ज्या दोघांनीं मुख्यत्वेंकरून जहाजावर हा दंगा उपस्थित केला, ते मात्र महादुष्ट मनुष्य अगदीं ताळ्यावर येण्यासारिखे नाहींत. सबब ते जर आपल्या हातून सुटले, तर इतकें करूनही आपली दुर्दशाच होणार. कारण, ते जहाजावरील साऱ्या लोकांस आणून आमचा नाश करून टाकितील. मीं म्हटलें, बरें आहे तर, माझीच युक्ति ह्या प्रसंगीं आवश्यक दिसते; कारण, त्या युक्तीखेरीज आपलें प्राणरक्षण करण्याचा दुसरा मार्गच उरला नाहीं. मीं असें सांगितलें असतांही तो कोणाचा जीव घेण्यास कां मागें पुढें पाहतो, हें पाहून मीं त्याला म्हटलें, तुम्हीच तिघे आपल्या शत्रूंवर जा, आणि तुम्हांस योग्य दिसेल तशी तजवीज करा.

ह्याप्रमाणें आमचें संभाषण चाललें आहे इतक्यांत त्यांतून कोणी जागे होऊन बोलूं लागले, असें माझ्या कानावर आलें; व पुढें थोडक्या वेळानें त्यांपैकीं दोघे उठून उभे राहिले असें दृष्टीस पडलें. तेव्हां मी ह्या गृहस्थास विचारिलें, जे तुम्हीं दंगा करणारांमध्यें दोघे मुख्य सांगितले, त्यांपैकीं ह्या उभे राहिलेल्या मनुष्यांत कोणी आहे काय ? तो म्हणाला, नाहीं. मीं म्हटलें, बरेंतर, ह्या दोघांस तुम्ही जाऊं द्या. ह्यांचे प्राण वांचवावे म्हणून परमेश्वरानेंच ह्यांस जागें केलें, असें म्हणण्यास चिंता नाहीं. पण आतां संभाळा, बाकीचे जर तुमच्या हातांतून गेले, तर तो तुमचा दोष.

हें ऐकतांच मीं दिलेली बंदूक हातीं घेऊन त्यानें एक पिस्तूल कंबर

पल्यात सोडिलें आणि आपल्या दोघां सोबत्यांच्याही हातीं बंदुका दे-
ऊन त्यांसहित तो चालता झाला. त्याच्या दोघां सोबत्यांनीं किंचित्
पुढें जाऊन थोडीशी गडबड केली, ती ऐकतांच त्या खलाशां पैकीं एक
जण जागा होता त्यानें मागें पाहिलें; आणि हे आपणावर चालून येत
आहेत असें पाहून त्यानें बाकीच्यांस हाक मारून जागें केलें. पण
ते जागे होऊन उपयोग काय? त्यानें हाक मारिली न मारिली तोंच क-
प्तानाच्या दोघां सोबत्यांनीं बार सोडिले. कप्तानानें आपली बंदूक
सोडिली नाहीं, हें शहाणपण केलें. त्याच्या दोघां सोबत्यांनीं त्या मु-
ख्य दंगा करणाऱ्यांवर इतका बराबर नेम धरिला होता कीं त्यांपैकीं
एक तर ठार झाला; व दुसऱ्यास मोठी जखम झाली; परंतु तो अगदीं
चीत झाला नव्हता, त्यामुळें तत्काळ उठून त्यानें बाकीच्यांस मदती
करितां हाक मारिली. इतक्यांत कप्तान पुढें सरसावून त्यास म्हणाला
अरे दुष्टा, आतां तुझे लोकांस मदतीकरितां बोलावणें व्यर्थ आहे. पर-
मेश्वरानेंच तुझ्या दुष्टपणाची तुला क्षमा करावी म्हणून त्याची मात्र
तूं प्रार्थना कर म्हणजे झालें. असें बोलत बोलतच त्यानें आपल्या बं-
दुकीच्या दुंभ्यानें त्यास हाणून पाडिलें, तेव्हां तो अगदीं ठार झाला.
त्या मंडळींपैकीं आणखी तिघे उरले होते; त्यांपैकीं एक जखमी झाला
होता. हा प्रकार चालला आहे तोंच मीही तेथें जाऊन पोहोंचलों.
तेव्हां, हे लोक पुष्कळ आहेत, सबब ह्यांच्या पुढें गडबड करणें व्यर्थ
आहे, असें समजून बाकीचे तिघे आमची विनवणी करून क्षमा मागूं
लागले. तेव्हां कप्तानानें त्यांस सांगितलें कीं, तुम्हांवर जो विश्वास-
घाताचा गुन्हा आला आहे, तो तुम्ही वास्तविक बुद्धिपुरःसर केला ना-
हीं, अशी जर माझी खात्री कराल, आणि जहाज परत मिळविण्याचे
कामांत, व येथून आलों तेथें म्हणजे जमेका बेटास तें परत नेण्याचे
कामांत, विश्वासुकपणें मला साह्य करण्याविषयीं जर तुम्ही शपथ व-
हाल, तर मी तुम्हांस जीवदान देईन. हें ऐकून त्यांनीं आपल्या विश्वासु-
कपणाबद्दल हव्या तशा शपथा वाहिल्या, तेव्हां त्यांचें बोलणें खरें मा-
नून त्यांचे जीव वांचवावे असें कप्तानाच्या मनांत आलें. मींही तसें
करण्यास त्याला प्रतिबंध केला नाहीं; परंतु मीं इतकें मात्र सांगितलें

कीं, जोंपर्यंत हे ह्या बेटावर आहेत तोंपर्यंत ह्यांस मुसक्या बांधून ठेविलें पाहिजे.

हें काम चाललें आहे तों इकडे मी फैदे आणि कपतानाचा दुय्यम ह्या उभयतांस त्या लोकांच्या होडी कडे जावयास सांगितलें, आणि ती आपल्या ताब्यांत घेऊन तीवरील शीड व वल्हीं आणण्यास त्यांना हुकूम केला. त्यांनीं जाऊन त्याप्रमाणें केलें. पुढें कांहीं वेळानें असें झालें कीं, ते लोक पहिल्यानें होडींतून उतरले तेव्हां त्यांपैकीं तिघे असामी फिरत फिरत दुसरी कडे गेले होते, ते हे बंदुकीचे आवाज ऐकून माघारे आले; आणि ज्या कप्तानाला पहिल्यानें बंदिवान करून आणिलें होतें तोच आतां सर्वांस जिंकून विजयशाली होत्साता उभा आहे, असें पाहून ते आपोआप कप्तानाच्या स्वाधीन होऊन मुसक्या बांधून घ्यावयास कबूल झाले. ह्याप्रमाणें आमचा विजय पूर्णपणें झाला.

आतां कप्तान आणि मी ह्या उभयतांनीं परस्परांची स्थिति परस्परांपासून समजून घ्यावी, एवढें मात्र कृत्य राहिलें होतें. पहिल्यानें मी सांगण्यास आरंभ करून आपला इत्थंभूत इतिहास त्याला विदित केला. तो ऐकून, आणि विशेषें करून ज्या विलक्षण रीतीनें मीं आपणास अन्नसामग्री व दारूगोळा ह्यांचा पुरवठा केला, ती युक्ति ऐकून त्यास अत्यंत आश्चर्य वाटलें. आणि वास्तविक माझा साराच इतिहास आश्चर्यकारक गोष्टींचा केवळ समुच्चयच असल्यामुळें त्याचे श्रवणानें त्याचें अंतःकरण अत्यंत विस्मयभरित झालें, हें कांहीं मोठें नवल नव्हे. परंतु जेव्हां त्यानें स्वतःची स्थिति मनांत आणिली, तेव्हां आपले रक्षणार्थच परमेश्वरानें ह्या मनुष्यास येथें राखिलें आहे, असें त्यास वाटून त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा चालल्या, आणि कंठ अत्यंत सद्गदित झाल्यामुळें मुखांतून एक अक्षरही निघेना.

ह्यानंतर मी त्यास व त्याच्या दोघां सोबत्यांस आपल्या घरांत घेऊन गेलों, आणि तेथें जें कांहीं खाण्यासारिखें सांपडलें तें त्यांस खावयास देऊन त्यांना ताजे तवाने केलें. नंतर मी ह्या ठिकाणीं इतके पुष्कळ दिवस राहून ज्या ज्या उपयोगाच्या युक्ति व सोई केल्या होत्या त्या सर्व त्यांना दाखविल्या.

जें जें मीं त्यांस दाखविलें व जें जें सांगितलें तें सारेंच आश्चर्य कर-

ण्यासारिखें होतें खरें; परंतु विशेषेंकरून मीं जो तट बांधिला होता तो, व आपलें घर कोणाचे दृष्टीस न यावें म्हणून जीं पुढल्या बाजूस मीं झाडें लाविलीं होतीं तीं, ह्या दोन गोष्टी पाहून कप्तानास पराकाष्ठेचें आश्चर्य झालें. कारण, तीं झाडें लावून सुमारें २० वर्षें झालीं होतीं, व त्या ठिकाणीं झाडें इंग्लंदांतल्यापेक्षां फार जलद वाढतात, ह्यामुळें त्यांचें इतकें दाट जंगल बनून गेलें होतें कीं, एका बाजूस मीं मुद्दाम नागमोडी बारीक वाट राखिली होती तेवढी शिवाय करून त्या झाडींतून जाण्यास दुसरा मार्गच नव्हता. मीं त्यास सांगितलें, हा माझा कोट अथवा राहण्याचें मुख्य ठिकाण होय. परंतु ह्याखेरीज जसे राजेलोकांचे वनामध्यें चैनीनें रहावयाचे बागबगीचे व बंगले असतात, तसें माझेंही एक ठिकाण जंगलांत आहे, तेथें मी कधीं कधीं जाऊन राहतों. तें ठिकाण मी आणखी एखादे वेळीं तुम्हांस दाखवीन; परंतु सध्यां तें जहाज आपल्या ताब्यांत आणण्यास कोणती युक्ति करावी, हा विचार आपणास केला पाहिजे. हें माझें म्हणणें कप्तानासही मान्य झालें; परंतु तो म्हणाला, जहाज हातीं येण्यास कोणता उपाय करावा हें मला कांहीं सुचत नाहीं; कारण, जहाजावर अद्यापि २६ असामी उरले आहेत; व ते, आपण कप्तानावर उठून दंगा केल्यामुळें आपणास कायद्याप्रमाणें शिक्षा होणार, हें मनांत आणून जिवावर उदार होतील, आणि प्राण जाई तोंपर्यंत लढतील; वश होणार नाहींत. कारण, त्यांस पक्कें ठाऊक आहे कीं, ते जिंकून धरले गेले असतां, इंग्लंदास किंवा दुसऱ्या एखाद्या इंग्लिश वसाहतीस पोहोंचल्यावर फांशीं जाणें हेंच त्यांचे कपाळीं येईल. सारांश, आपण ईन मीन तीन मनुष्यांनीं इतक्या पुष्कळ लोकांवर हल्ला करणें हें केवळ आपल्या नाशास कारण होईल.

कप्तानाच्या म्हणण्याचा मीं कांहीं वेळपर्यंत विचार केला, तेव्हां त्याचें म्हणणें रास्त आहे असें माझ्या लक्ष्यांत आलें. सबब जहाजावरील लोकांस एखादी भुलथाप देऊन ते गैर सावध असतां त्यांना पकडण्यास, व ते किनाऱ्यावर येऊन आपला नाश न करितील असें करण्यास, कोणती तरी युक्ति झटकर योजिली पाहिजे, असें मला वाटलें. ही विवंचना मी करीत आहें इतक्यांत मला सुचलें कीं, बेटावर आलेल्या लोकांचें व त्यांनीं आणिलेल्या होडीचें काय झालें आहे हें जहा-

जावरील लोकांस न समजल्यामुळें, ते त्यांच्या शोधार्थ निःसंशय होडींत बसून येतील; आणि कदाचित् ते हत्यारबंद होऊन आले म्हणजे त्यांस जिंकणें ही अगदीं आपल्या सामर्थ्या बाहेरची गोष्ट होणार आहे. हें माझें म्हणणें त्या कप्तानासही बरोबर दिसलें.

तेव्हां मीं त्यास सांगितलें कीं, किनाऱ्यावर जी त्यांची होडी पडली आहे, ती कदाचित् गलबतावरील लोक येऊन घेऊन जातील, सबब पहिल्यानें तींतील सारें सामान काढून घेऊन तींत भोंक पाडून ती तरंगणार सुद्धां नाहीं इतकी निरुपयोगी करून टाकावी. याप्रमाणें ठरल्यावर आम्ही होडींत जाऊन हत्यारें व अन्नसामग्री वगैरे जें कांहीं तींत सांपडलें, तें सारें काढून घेतलें. आणि ढकलीत ढकलीत किनाऱ्यावर ती इतक्या उंच जागीं नेऊन टाकिली कीं, मोठी भरती आली तरी देखील तीपर्यंत पाणी पोहोंचणार नाहीं. अशी होडीची अवस्था केल्यावर, आतां पुढें कोणता उपाय करावा ? हा विचार करीत आम्ही बसलों आहों; इतक्यांत बेटावर उतरलेल्या लोकांनीं होडी घेऊन परत यावें म्हणून जहाजावरील लोकांनीं तोफ सोडिली, व निशाणही उभें केलें; परंतु होडी हालत नाहीं असें पाहून त्यांनीं तोफेचे आणखी आवाज केले, व दुसऱ्याही पुष्कळ खुणा केल्या. शेवटीं आपल्या सर्व खुणा व तोफांचे आवाज व्यर्थ जाऊन होडीतर जागची हालत देखील नाहीं, असें पाहून गलबतावरील लोकांनीं दुसरी एक होडी समुद्रांत ढकलून किनाऱ्याकडे चालू केली, असें आमचे दृष्टीस आलें. ती होडी किनाऱ्याचे जवळ जवळ येऊं लागली, तेव्हां तींत १० असामी असून त्यांच्याजवळ बंदुका आहेत, असें आम्हांस स्पष्ट दिसलें.

ते लोक येत असतां त्यांचे चेहरे आम्हांस स्वच्छ दिसत होते, त्यावरून कप्तानानें त्यांस ओळखून त्यांपैकीं कोण कोणते मनुष्य कसकशा प्रकारचे आहेत, हें सर्व सांगितलें. तो म्हणाला, त्यांपैकीं तिघे मनुष्य प्रामाणिक आहेत. दंगा करणारे लोक पुष्कळ असून त्यांनीं त्यांस भयप्रदर्शन केल्यामुळेंचमात्र हे तिघे निरुपाय होऊन त्यांत मिळाले आहेत; परंतु तो बोसन (जहाजावरील खालचा अधिकारी, हा त्या होडींतील लोकांपैकीं मुख्य होता असें दिसतें) व होडींतील बाकीचे असामी, हे जहाजांतील बंडखोर लोकांपैकींच आहेत; आणि ह-

र्लीतर ते निःसंशय जिवावर उदार होऊन आले असतील; सबब आपणाला ते फार भारी आहेत.

हें ऐकून मी किंचित् हासून त्यास म्हणालों, बाबा, आपणांसारिख्या संकटांत पडलेल्या मनुष्यांस कोणत्याच प्रकारच्या गोष्टीची भीति वाटत नाहीं. माझ्या स्वतःच्या इतिहासाविषयीं, विचार करून पहा बरें, तुम्हांस कसें काय वाटतें? त्या वरून कोणतें ही संकट प्राप्त झालें तरी त्यापासून मुक्त होण्याविषयीं यत्न करणें हें उचित आहे, असें दिसत नाहीं काय? आणि तुमचे प्राणांचें रक्षण करण्याकरितांच परमेश्वरानें मला येथें राखिलें आहे, असें तुम्हांस वाटून नुकतेच तुम्ही आनंदभरित झालां होतां ना? तें इतक्यांत कोठें गेलें? तर मी तुम्हांस पक्कें सांगतों कीं, ह्यापैकीं जो जो किनाऱ्यावर उतरेल तो तो आपलाच असें समजा. तो आपणापाशीं ज्याप्रकारें वागेल त्याप्रकारचेंच आपणापासून त्यास फळ प्राप्त होईल. ते मित्रत्वानें वागले तर वांचतील, नाहींतर प्राणास मुकतील.

हें बोलणें मी प्रसन्नवदन होऊन किंचित् आवेशानें बोललों, त्यामुळें त्या कप्तानास पुष्कळ धैर्य आलें असें दिसलें. तेव्हां आम्ही मोठ्या आवेशानें पुढल्या तजविजीस लागलों. होडी इकडे येण्याकरितां गलबतापासून निघाली असें जेव्हां पहिल्यानें आम्ही पाहिलें, तेव्हांच त्यापूर्वीं धरलेल्या बंदिवानांची फुटाफुट करण्याचा विचार करून त्यांना मोठ्या बंदोबस्तानें ठेविलें, आणि त्यांपासून आपणांस यत्किंचित्ही अपाय होणार नाहीं अशी तजवीज करून ठेविली होती. ती अशी, त्या बंदिवानांपैकीं ज्या दोघांच्या वर्तणुकीविषयीं कप्तानाची खात्री नव्हती, त्यांस फ्रैदे व कप्तानाच्या बरोबरच्या मनुष्यांपैकीं एक ह्या दोघांबरोबर मीं आपल्या गुहेंत पाठविलें. त्यांस तेथें पाठविण्यांत माझा उद्देश असा कीं, दूर असले म्हणजे ते मोठ्यानें ओरडले तरी येथें ऐकूं यावयाचें नाहीं, व कोणी त्यांस शोधूं लागले तरी ते लवकर सांपडावयाचे नाहींत, आणि ते गुहेंतून कदाचित् निसटले तरी त्या जंगलांतून बाहेर निघण्यास त्यांना मार्गही सांपडणार नाहीं. फ्रैदे व तो दुसरा मनुष्य ह्यांनीं त्यांस गुहेंत नेऊन, पूर्वीं त्यांच्या मुसक्या बांधिल्या होत्या त्या न सोडितां त्यांस तेथें तशाच ठेविलें. परंतु त्यांनीं त्यांस खा-

त्यांपिण्यास देऊन असें आश्वासन दिलें कीं, तुम्ही येथें मुकाट्यानें बसालं तर एक दोन दिवसांत तुमची सुटका होईल; परंतु पळून जाण्या करितां वगैरे यत्न कराल, तर मुळींच दया न करितां तुमचा वध आम्ही करूं; हें पक्कें ध्यानांत ठेवा.

बाकी राहिलेल्या कैद्यांशीं इतक्या कडकपणानें वागलों नाहीं. त्यांपैकीं ही दोघांची कमानास चांगलीशी खात्री नसल्यामुळें त्यांस मुसक्या बांधून ठेविलें होतें खरें, परंतु बाकीच्या दोघांस कमानाच्या शिफारशीवरून मीं आपल्या हाताखालीं घेतलें, आणि त्यांनींही शपथ वाहून सांगितलें कीं, आमच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तुमच्या हाताखालीं आम्ही इमानानें राहूं. ह्याप्रमाणें हे दोघे असामी आणि पहिले तिघे (कमान व त्याचे बरोबरचे दोघे) मिळून आम्ही हत्याखंद सात असामी जमलों. तेव्हां, त्या येणाऱ्या १० असामीं पैकीं तीन चार मनुष्य सामाधिक आहेत म्हणून कमानानें सांगितलें होतें, त्याचें स्मरण होऊन मला खचीत वाटलें कीं, आतां ह्यांच्यांशीं लढण्यामध्यें आम्ही चांगला टिकाव धरूं.

पहिल्यानें किनाऱ्यावर आलेली होडी ज्या ठिकाणीं आम्ही आणून टाकिली होती, तेथें येऊन पोहोंचल्यानंतर त्यांनीं आपली होडी खाडींत ढकलिली; आणि सारे किनाऱ्यावर उतरून त्यांनीं आपली होडीही वर ओढिली. होडीची त्यांनीं अशी व्यवस्था केली हें पाहून मला आनंद झाला; कारण, मला पहिल्यानें असें भय पडलें होतें कीं, हे आपल्या होडीच्या रक्षणार्थ तीमध्यें मनुष्यें ठेवून तो किनाऱ्यापासून दूर ठेवितील; तेणेंकरून ती आपल्या हातीं लागणार नाहीं.

किनाऱ्यावर उतरतांच पहिल्यानें ते धांवत दुसऱ्या होडीकडे गेले, तेव्हां तींतील सामान कोणी लुटून नेऊन तिच्या बुडाला भोंक पाडिलें आहे, हें पाहून अर्थातच त्यांस मोठा विस्मय झाला. पुढें सर्वांनीं मिळून होतें तितकें सामर्थ्य खर्चून पूर्वीं आलेल्या लोकांस दोन तीन मोठ्या आरोळ्या दिल्या. नंतर ते सारे एके ठिकाणीं कडें घालून उभे राहून त्यांनीं एकदम आपल्या बंदुकांचा ताशेरा झाडिला; तेणेंकरून तें सारें जंगल दणाणून गेलें. परंतु त्यांचा तो सर्व यत्न व्यर्थ झाला, कारण, गुहेंत जे कैदी ठेविले होते, त्यांना तर हें ऐकूंच गेलें नसेल हें आम्हां-

स पक्के ठाऊक होतें; आणि जे कैदी आम्हीं आपल्याजवळ ठेविले होते, त्यांस जरी हें चांगलें ऐकावयास आलें, तरी आमच्या भयामुळें उत्तर देण्यास त्यांना धैर्य होईना. शेवटीं आपणांस कोणी उत्तर देत नाहीं हें पाहून, ते लोक इतके विस्मित झाले कीं, जहाजावर परत जाऊन, बेटावर गेलेले लोक कोणी मारिले व त्यांची होडी फोडून टाकिली, असें जहाजावरील लोकांस कळविण्याचा त्यांनीं निश्चय केला; (हें पुढें आम्हांस कळून आलें) आणि होडी पाण्यांत ढकलून ते सारे तींत जाऊन बसले.

हें पाहून कप्तान मनस्वी भिऊन गेला. कारण, त्यास वाटलें कीं, आतां हे लोक बेटावर गेलेले आपले सोबती नष्ट झाले असें समजून निराश होत्साते गलबत हांकारून चालते होतील; आणि तेणेंकरून गलबत हातीं लागण्याची जी अम्हांस आशा आहे ती समूळ नाहींशी होईल. ह्या चिंतेंत तो आहे इतक्यांत त्यास दुसरी एक निराळ्याच प्रकारची भीति उत्पन्न झाली.

ती अशी, ते लोक होडींत बसून गेल्यास फार वेळ झाला नाहीं तोंच पुनः ते किनाऱ्यावर परत आले असें दृष्टीस पडलें. पण ह्या वेळेस त्यांनीं कांहीं निराळीच व्यवस्था केली. ती ही कीं, त्यांनीं आपणांपैकीं तिघांजणांस होडीच्या रक्षणार्थ ठेविलें, आणि बाकीचे सात असामी पूर्वीच्या लोकांच्या शोधार्थ किनाऱ्यावर उतरले.

हा त्यांचा बेत पाहून आमची मोठी निराशा झाली, आणि पुढें काय करावें हें सुचेनासें झालें. कारण, ती होडी जर आमच्या हातांतून निसटली तर हे किनाऱ्यावर आलेले सात असामी धरून तरी काय उपयोग? कांकीं आम्हीं ह्यांस धरिलें असें पाहिलें म्हणजे होडींतील तिघे असामी होडी झटदिशीं गलबताकडे नेतील; आणि मग गलबतावर बाकी राहिलेले लोक निःसंशय गलबत हांकारून चालते होतील; असें झालें म्हणजे तारूं आमचे हस्तगत होण्याचा मुळींच संभव उरणार नाहीं. असो, तथापि काय काय होईल तें स्वस्थ बसून पहावें, ह्याखेरीज आम्हांस दुसरा उपाय उरला नव्हता. पुढें ते सात असामी किनाऱ्यावर आले; व होडींत जे तिघे राहिले होते, त्यांनीं किनाऱ्यापासून बऱ्याच अंतरावर होडी नेऊन उभी केली, आणि किनाऱ्यावर गेलेल्या लोकांची

वाट पहात ते स्वस्थ बसले. तेव्हां अर्थात् ते तिघे आमच्या हातीं लागणें ही गोष्ट परम अशक्य होऊन गेली.

किनाऱ्यावर उतरलेले लोक, ज्या लहानशा टेंकडीच्या बाजूस माझें घर होतें तिच्या माथ्याकडे एका मेळ्यानें चालले. मग जेव्हां ते माथ्यावर जाऊन पोहोंचले, आणि तेथून ईशान्येकडील म्हणजे बेटाच्या सखल प्रदेशांतील मोठमोठाले दरे व जंगलें हीं लांब पर्यंत दिसूं लागली, तेव्हां त्यांनीं मोठ्यानें ओरडून घसे फुटत तोंपर्यंत हाका मारिल्या. शेवटीं किनाऱ्यापासून किंवा एकमेकांपासून दूर जाण्यास त्यांना धैर्य होईना; तेव्हां ते सारे एका झाडाखालीं एकत्र विचार करीत बसले. पूर्वींचे लोक जसे झोंप घेत पडले होते, तसे हेही जर झाडांखालीं पडते, तर आमचें मोठें काम झालें असतें; परंतु वास्तविक त्यांच्या मनांत भीतिच फार होती, तीमुळें त्यांस झोंप कोठून येणार?

ते लोक निघून जातील ह्या काळजीनें आम्हांस चैन पडत नव्हतें खरें, तथापि पुष्कळ वेळपर्यंत आम्हीं स्वस्थ बसून वाट पाहिली. शेवटीं ते एकदम उठून समुद्राकडे चालते झाले. हें पाहतांच मला वाटलें कीं निराशेस्तव शोध करणें टाकून देऊन हे परत जावयास निघाले आहेत. आणि खरोखर त्यांचा असाच विचार होता. हें कप्तानास कळतांच भीतीनें त्याची कंबर खचली; परंतु इतक्यांत त्यांना परत आणण्याची एक कृप्ति मला सुचली, तिनें आमचा हेतु सिद्धीस गेला.

ती कृप्ति अशी, फ्रैदे आणि कप्तानाचा दुय्यम ह्या दोघांस मीं असें सांगितलें कीं, बेटाच्या पश्चिम बाजूस जी लहानशी खाडी आहे तिच्या पलीकडे, ज्या ठिकाणीं पूर्वी मी फ्रैदे ह्यास रानटी लोकांच्या हातून सोडविलें, तिकडे जा; आणि सुमारें पाव कोसाच्या अंतरावर तुम्ही एखाद्या उंचवट्यावर चढलां म्हणजे असेल तितकें सामर्थ्य खरचून मोठ्यानें ओरडा; आणि त्या खलशांस ऐकूं गेलें असें तुम्हांस वाटे तों पर्यंत वाट पहा. नंतर तिकडून खलाशी लोक ओरडले असें तुम्हांस ऐकूं आलें म्हणजे तुम्ही ही पुनः ओरडून त्यांस प्रत्युत्तर द्या. आणि तुम्ही त्यांच्या दृष्टीस न पडाल अशा बेतानें गरका घेऊन, जेव्हां जेव्हां ते ओरडतील तेव्हां तेव्हां त्यांस प्रत्युत्तर देत देत, बेटाच्या मध्यभागीं जंगलांत

त्यांना जितकें दूर नेववेल तितकें न्या, आणि मग आमच्या मार्गानें तुम्ही मजकडे परत या.

पुढें ते खलाशी लोक होडीवर चढत आहेत इतक्यांत फ्रैदे व कप्तानाचा दुय्यम ह्यांनीं माझ्या हुकुमाप्रमाणें जाऊन आरोळी दिली. की तत्काळ त्या खलाशी लोकांस ऐकूं जाऊन त्यांनीं ही परत आरोळी दिली; आणि पश्चिम बाजूस जिकडून ह्या दोघांचा शब्द ऐकूं आला तिकडे ते समुद्राच्या कांठा कांठानें धांवत धांवत चालले. परंतु पुढें खाडी आडवी आली, तींत पाणी फार असल्यामुळें त्यांचा मार्ग खुंटला. सबब होडींत बसून पार जावें ह्या हेतूनें त्यांनीं होडी आणविली. ते असें करितील हें मला पूर्वींच वाटलें होतें. ते खाडी उतरून पार गेल्यावर, आपली होडी ह्या खाडींत बरीच वर आल्यामुळें सुरक्षित आहे, असें समजून त्यांनीं तींतील एक माणूस आपणांबरोबर घेतला; आणि तींत दोनच असामी ठेवून तिला किनाऱ्यावरील एका झाडाच्या खोडाशीं बांधून ठेविलें.

हें सर्व मला पाहिजे होतें तसेंच झालें सबब फ्रैदे आणि नाखव्याचा दुय्यम ह्यांचें काम चाललें होतें तसेंच चालूं देऊन, मी बाकीच्या मंडळीसहवर्तमान ती खाडी ओलांडून, ते होडींतील दोघे असामी गैरसाव ध असतां त्यांजवर चालून गेलों. त्या दोघांपैकीं एक किनाऱ्यावर होता व दुसरा होडींत होता. किनाऱ्यावरील मनुष्य अर्धा झोंपेंत व अर्धा जागा असा होता, तो दचकून उठला इतक्यांत, कप्तान आमच्या मंडळींत पुढें चालला होता, तो त्यावर चालून गेला, आणि त्यानें ठोसा मारून त्यास चीत केलें. नंतर होडींतील मनुष्यास कप्तानानें सांगितलें कीं, शरण ये, नाहींतर प्राणास मुकशील.

पांच असामी आपणावर चालून आले आहेत, व आपला सोबती ही पाडिला गेला, असें होडींतल्या मनुष्यानें पाहिलें, तेव्हां वस्तुतः शरण ये म्हणून त्यास सांगण्याची मुद्दां जरूरी नव्हती. ह्याशिवाय, जे तीन खलाशी ह्या दंग्यांत इतरांसारिखे मनापासून शिरले नव्हते, त्यांपैकीं हा एक होता, असें दिसलें. सबब शरण येणें सहज त्याचे मनास आलें इतकेंच नाहीं, परंतु पुढें तो अंतःकरणपूर्वक आमच्या मंडळींत मिळाला.

इकडे मैदे व कप्तानाचा कुष्मन ह्या दोघांनीं बाकीच्या खलाशांशीं अशी कांहीं धांदल उडवून दिली, कीं, ह्या टेंकडीवरून त्या टेंकडीवर, ह्या जंगलांतून त्या जंगलांत हाका मारीत व ओ देत, ते लोक अगदीं दमून जात तोंपर्यंत ह्यांनीं त्यांस फिरविलें, इतकेंच नाहीं, तर ह्यांनीं त्यांस अशा ठिकाणीं नेऊन सोडिलें कीं, तेथून रात्र होण्यापूर्वी त्यांच्यानें होडीजवळ जाववणारच नाहीं. हे दोघेही आम्हांजवळ आले तेव्हां अगदीं थकून गेले होते.

आतां अंधारांत त्यांजकरितां टपून राहून, ते खचीत आपल्या हातीं लागतील अशा संधीस त्यांच्यावर हल्ला करावा, एवढेंच काय तें आमचें काम राहिलें.

मैदे ह्या मजकडे आल्यानंतर पुष्कळ वेळानें ते आपल्या होडीजवळ आले, आणि ते होडीच्या अगदीं नजीक येऊन पोहोंचण्यापूर्वीं त्यांतला जो मनुष्य पुढें चालत होता, तो पाठीमागच्यांस, चला लवकर, चला लवकर, म्हणून हाका मारीत असे, तें आम्हांस ऐकूं येई. आणि मागचेही उत्तर देत कीं, आम्ही फार थकून गेलों आहों, व लंगडत आहों, आम्हांला ह्यापेक्षां जलद चालवत नाहीं, तेंही आम्हांस ऐकायास येई. हें त्यांचें सर्व बोलणें आम्हांस इष्टच होतें.

शेवटीं ते होडीजवळ येऊन पोहोंचले; परंतु भरती निघून गेल्यामुळें होडी त्या खाडींत जमिनीवर टेंकली आहे, व तींतील दोघे असामी ही नाहींतसे झाले आहेत, हें पाहून त्यांस किती विस्मय झाला हें सांगतां पुरवत नाहीं. ते अत्यंत खिन्न होत्साते मोठ्या करुण स्वरानें परस्परांस हाका मारून म्हणत कीं, आपण पिशाचांच्या बेटांत सांपडलों आहों असें दिसतें. कदाचित् येथें राहणारे कोणी लोक असून ते आपणांसर्वांस मारून टाकितील; अथवा येथें पिशाचांची वस्ती असून ते तरी आपणांस घेऊन जाऊन आपला नाश करून टाकितील. हें त्यांचें सर्व बोलणें आम्हांस चांगलें ऐकावयास आलें. पुढें कांहीं वेळानें असें दिसलें कीं, अगदीं निराश झाल्याप्रमाणें हात चोळीत इकडे तिकडे धांवावें, केव्हां केव्हां विश्रांति घेण्याकरितां होडींत जाऊन बसावें, पुनः किनाऱ्यावर येऊन इकडे तिकडे फिरावें, असा क्रम त्यांनीं पुनः पुनः चालविला.

अंधारांत एकदम त्या लोकांवर हल्ला करण्यास मीं परवानगी द्यावी

म्हणून माझे लोक फार उत्कंठित झाले होते; परंतु त्यांच्यापैकीं फारसे लोक जिवें मारण्याची जरूरी न पडून त्यांस धरितां यावें, अशी संधि मी पाहत होतों; आणि विशेषेकरून ते चांगले हत्यारबंद असल्यामुळें आमच्यापैकीं कोणी न मरावा, अशी माझी इच्छा होती. सबब ते निरनिराळे होतात किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां कांहीं वेळ दम धरण्याचा मीं निश्चय केला. नंतर आमचें काम न फसावें म्हणून आम्ही लपलों होतों तेथून उठून किंचित् त्यांच्या जवळच्या जाग्यांत येऊन लपलों; आणि फ्रैदे व कप्तान ह्या उभयतांस मीं सांगितलें कीं, बार सोडण्यापूर्वीं तुम्ही भुईवर जितकें वांकवेल तितकें वांकून त्यांचे दृष्टीस न पडतां, जितकें त्यांच्याजवळ जाववेल तितकें जा.

मीं सांगितल्याप्रमाणें ते दोघे जावयास लागून फार वेळ झाला नाहीं तोंच बंडाचा मुख्य पुढारी जो बोसन व जो हल्लीं त्या सर्व मंडळींत फारच खिन्न व निरुत्साह झाला होता, तोच आपल्या मंडळीपैकीं दोघांसहवर्तमान सहज फिरत फिरत हे होते तिकडेच येऊं लागला. हा मुख्य बंडखोर आपल्या ताब्यांत आला, हें पाहून कप्तान त्यास मारण्याविषयीं इतका उतावळा झाला कीं, आपल्या गोळीचा नेम न चुके इतका जवळ तो येई तोंपर्यंत देखील त्यास दम धरवेना. परंतु जेव्हां ते तिघे जवळ आले तेव्हां फ्रैदे व कप्तान ह्यांनीं उभें राहून त्यांजवर गोळ्या टाकिल्या. तो बोसन तर तत्काळच मेला; दुसरा एक मनुष्य जखमी होऊन त्याचे जवळच पडला; तो त्याच वेळेस मेला नाहीं, पुढें चार पांच घटकांनीं मेला; आणि तिसरा मनुष्य पळून गेला.

बंदुकीचा आवाज ऐकतांच मी आपलें सारें सैन्य घेऊन पुढें सरसावलों. मीं आपलें सैन्य म्हटलें तें बराबर आठ मनुष्यांचें होतें. त्यांचा तपशील येणें प्रमाणें:—एक स्वतः मी सेनापति, फ्रैदे माझ्या खालचा सेनापति, कप्तान व त्याचे दोघे सोबती, आणि लढाईंत बंदिवान केलेल्या ज्या तीन असामींवर आम्हीं विश्वास ठेवून त्यांस हत्यारें देऊन आपल्या चाकरींत घेतलें होतें ते तीन; एकूण आठ असामी झाले.

आम्ही अंधारांत त्या लोकांवर चालून गेल्यामुळें आम्ही किती असामी आहों हें त्यांस दिसेना. तेव्हां त्यांनीं जो मनुष्य होडींत ठेविला होता, व जो हल्लीं आमच्याबरोबर आला होता, त्याजकडून

मीं त्या लोकांपैकीं प्रत्येकास त्याच्या त्याच्या नांवानें हाका मारविल्या; कारण, कांहीं बोलाचाली करून ते सामोपचारानें मी सांगेन त्याप्रमाणें वागतील तर पहावें, असा माझा हेतु होता. हें सर्व आमच्या इच्छेप्रमाणें पुढें घडून आलें. कारण, सांप्रत जें महत्संकट त्यांस प्राप्त झालें होतें तें मनांत आणिलें असतां ते मोठ्या आनंदानें शरण येऊन वश होतील हें स्पष्ट दिसतें. सबब वर सांगितलेल्या मनुष्यानें जितकें मोठ्यानें ओरडवलें तितकें ओरडून, टॉम् स्मिथ्, टॉम् स्मिथ्, म्हणून त्यांपैकीं एकाजणास हांक मारिली, ती ऐकून टॉमस्मिथ् ह्यानें तत्काळ विचारिलें, कोण आहे तें? राबिन्सन? हा म्हणाला, होय, होय, टॉम्स्मिथ्, अरे तुम्ही सारे आपलीं हत्यारें टाकून लवकर शरण या; नाहीं पक्षीं ह्या क्षणीं प्राणास मुकल.

हें ऐकून स्मिथ ह्यानें पुनः विचारिलें, आम्ही कोणास शरण जावें? ते कोठें आहेत? ह्यानें उत्तर केलें, हे येथें आहेत. हा पहा आपला कप्तान ५० असामी सहित येथें उभा आहे. सुमारें पांच सहा घटकांपर्यंत हे एकसारिखे तुमचा पाठलाग करीत आहेत. आपला बोसन मारिला गेला, विल्फ्रै म्हणून आपला सोबती जखमी होऊन पडला आहे, आणि मीतर कैदी आहें. आतां जर तुम्ही शरण न याल, तर सारे मेलांच असें समजा.

टॉमस्मिथ म्हणाला, ते आम्हांस जीवदान देतील काय? देतील तर आम्ही त्यांस शरण येऊं. राबिन्सन ह्यानें उत्तर दिलें, खचीत शरण येण्याचें तुम्ही कबूल कराल तर मी जाऊन विचारितों. असें म्हणून त्यानें कप्तानास त्याप्रमाणें विचारिलें. तेव्हां कप्तान स्वतःच मोठ्यानें हांक मारून म्हणाला, अरे स्मिथ्, तूं माझा शब्द ओळखितोस. तुम्ही जर ह्या वेळेस आपलीं हत्यारें टाकून शरण याल, तर विल अत्किन्स शिवाय करून सर्वांस जीवदान मिळेल.

हें ऐकून विल अत्किन्स ओरडून म्हणाला, कप्तान साहेब, देवाकडे पहा आणि मला जीवदान द्या. मीं काय केलें आहे? जसा मी अपराधी आहें, तसे हेही सर्व आहेत (ओघास आलें म्हणून सांगतों, हें विल अत्किन्स ह्याचें भाषण खरें नव्हतें, कारण, पहिल्यानें दंगा झाला

तेव्हां जे लोक कप्तानास धरावयास गेले, त्यांमध्यें हा मुख्य होता.) तथापि कप्तानानें त्यास सांगितलें कीं, कांहीं करार वगैरे न करितां आधीं तुला हत्यारें ठेविलीं पाहिजेत. आणि येथील गवर्नरास (ते सारे मला गवर्नर म्हणत) दया आली तर तो तुला सोडील.

ह्याप्रमाणें कप्तानाचें भाषण ऐकून त्या सर्वांनीं आपलीं हत्यारें खालीं ठेविलीं, आणि, आमचे जीव वांचवा, म्हणून ते प्रार्थना करूं लागले. तेव्हां ज्या मनुष्याकडून मीं प्रथमतः सल्ल्याचें बोलणें आरंभिलें होतें, तो व दुसरे दोघे, असे तिघे असामी त्या लोकांस कैद करण्याकरितां मीं पाठविले. त्यांनीं त्या सर्वांच्या मुसक्या बांधिल्या. नंतर आमचें ५० मनुष्यांचें सैन्य, ज्यांत वास्तविक ह्या तिघांसुद्धां आठच मनुष्यें होतीं, तें पुढें येऊन त्यानें ते सर्व मुसक्या बांधिलेले लोक व त्यांची होडी हीं ताब्यांत घेतलीं. मी मात्र दुसरा एक असामी बरोबर घेऊन राजकारणानें त्यांच्या दृष्टीस न पडतां एकीकडे राहिलों.

ह्यानंतर होडी नीट करून तींत बसून जाऊन जहाज हस्तगत करून घेण्याचा विचार आम्ही करूं लागलों. इकडे कप्तानास त्या बंडखोरांशीं बोलावयास चांगला अवसर सांपडल्यामुळें, आपणाशीं जी त्यांनीं अति दुष्टपणाची वर्तणूक केली होती तीविषयीं त्यानें त्यांचे काम खूब झाडले, आणि शेवटीं त्यांस असें सांगितलें कीं, हें तुमचें दुराचरण तुम्हांस विपत्तींत पाडिल्याशिवाय, आणि कदाचित् फाशीं जाण्याचाही प्रसंग तुम्हांवर आणिल्याशिवाय राहणार नाहीं.

हें कप्तानाचें भाषण ऐकून त्या सर्वांस अतिशयित पश्चात्ताप झाला, आणि आमचें प्राणरक्षण तरी करा, म्हणून ते त्याची प्रार्थना करूं लागले. कप्तानानें त्यांस सांगितलें कीं, तुमचे प्राण घेणें किंवा राखणें हें आतां माझे स्वाधीन नाहीं; तुम्ही हल्लीं ह्या बेटाच्या गवर्नराचे कैदेंत आहां, सबब त्याच्या चित्तास येईल तसें तो करील. तुम्हांस वाटलें होतें कीं, आम्हीं ह्यास नापीक व निर्जन अशा बेटावर आणून टाकिलें आहे; परंतु परमेश्वराच्या कृपेनें असें घडून आलें कीं, जेथें वस्ती असून गवर्नरही जातीचा इंग्रेज आहे, अशा स्थळीं मला टाकण्याची तुम्हांस बुद्धि झाली. त्या गवर्नराच्या मर्जीस आलें तर तो तुम्हा सर्वांसही एकदम फाशीं देऊन टाकील; परंतु ज्यापक्षीं त्यानें तुम्हा सर्वांस

हल्लीं जीवदान दिलें आहे, त्यांपक्षीं अतूकिन्स शिवाय करून तुम्हां सर्वांस न्यायानुरूप तुमची योग्य तजवीज होण्याकरितां तो इंग्लंदास पाठविणार आहे असें दिसतें. अतूकिन्स् ह्याला मरणाची तयारी करावयास सांग, म्हणून मला गवर्नर साहेबांचा हुकूम झाला आहे; कारण तो उद्यां सकाळीं फाशीं दिला जाईल.

हें सर्व कमानाचें भाषण स्वकपोलकल्पितच होतें खरें; तथापि त्यापासून त्याला पाहिजे होतें तें निष्पन्न झालें. तें असें, अतूकिन्स् हा कमानाच्या पायां पडून, माझा प्राण वांचविण्याकरितां तुम्ही गवर्नर साहेबांजवळ मध्यस्थी करा, अशी त्याची विनवणी करूं लागला. बाकीचेही त्याची अशी प्रार्थना करूं लागले कीं, कृपाकरून आम्हांला इंग्लंदास न पाठवितील अशी तजवीज करा.

आमची मुक्तता होण्याचा समय जवळ आला आहे; आणि हे लोक तारूं हस्तगत करून घेण्याचे कामांत आम्हांस मदत करितील असें सहज कळून येईल, असें आतां मला वाटूं लागलें. आपला गवर्नर कोणत्या प्रकारचा मनुष्य आहे हें त्यांस न कळावें, म्हणून मी तेथून निघून काळोखांत गेलों, आणि कमानास आपणाकडे बोलाविलें. मी बऱ्याच अंतरावर आहें असें दाखविण्याकरितां दुसऱ्या एका मनुष्यास हुकूम केला कीं, कमानास बोलाविलें आहे म्हणून सांग. हें ऐकतांच कमानानें उत्तर दिलें कीं, हा मी आलोंच म्हणून गवर्नर साहेबांस सांग. हें कमानाचें उत्तर ऐकून तर ते लोक फारच फसले; आणि गवर्नर साहेब आपल्या ५० लोकांनिशीं जवळच आहेत असें त्या सर्वांस वाटलें.

कमान मजकडे आल्यानंतर तारूं हस्तगत करून घेण्याचा माझा संकल्प मी त्यास कळविला; तो त्यास फारच आवडून तो सिद्धीस नेण्याचा त्यानें निश्चय केला. परंतु हें कार्य निर्विघ्नपणें सिद्धीस जावें म्हणून मी त्यास सांगितलें कीं, आपण जे लोक कैद केले आहेत त्यांची आणखी [illegible] पाहिजे. सबब तुम्ही जाऊन तो अतूकिन्स् व अ दुसरे दोघे अति दुष्ट मनुष्य आहेत ते, ह्या तिघांस धरून त्यांच्या मुसक्या बांधाव्या आणि गुहेंत, कांकीचें केली ठेविलें आहेत तेथें त्यांस ठेवावें. हें काम [illegible], कमानाबरोबरचे दोघे, ह्या तिघांकडे मी सोंपून दिलें.

ह्याप्रमाणें हुकूम होतांच, कैदी लोकांस जसें तुरुंगांत नेतात तसें ते ह्या तिघांस मुद्देत घेऊन गेले. आणि खरोखर तें ठिकाण तुरुंगासारिखेंच भयाण होतें; त्यांत विशेषकरून ह्यांच्यासारिख्या स्थितींत असणाऱ्या लोकांस तर तें फारच भयाण वाटण्यासारिखें होतें. त्या तिघांची अशी तजवीज झाल्यावर बाकीच्या लोकांना मी आपल्या मंडपांत नेण्याविषयीं हुकूम केला. त्या मंडपाभोंवतीं मजबूद कुंपण असून त्यांच्या मुसक्या बांधिलेल्या होत्या, त्यामुळें ते पळून जातील ही भीति फारशी उरली नव्हती.

दुसरे दिवशीं सकाळीं मीं कप्तानास सांगितलें कीं, तुम्ही त्या मंडपांतील लोकांकडे जा, आणि (त्यांचें कसें कार्य आहे तें पाहून) त्यांच्याशीं कांहीं बोलाचाली करून, जहाज पकडण्याचे कामांत त्यांवर भरंवसा ठेवावा असें तुम्हांस वाटतें, किंवा नाहीं हें मला सांगा. माझ्या सांगण्याप्रमाणें तो त्या लोकांकडे गेला, आणि आपणास जे त्यांनीं क्लेश दिले होते त्यांविषयीं, व हल्लीं जी त्यांची दशा झाली होती, तीविषयीं पुष्कळ बोलून शेवटीं त्यानें सांगितलें कीं, जरी ह्या बेटाचे येथील गवर्नरानें तुम्हांस जीवदान दिलें आहे, तथापि जर तुम्हांस त्यानें इंग्लंदास पाठविलें, तर तेथें फाशीं जाणें हेंच तुमच्या कामाचें फळ येणार, असें आहे. तथापि, जर जहाज इंग्लंदांतून परत घेणें ह्या न्याय्य कृत्यांत तुम्ही मदत कराल, तर तुम्हांस क्षमा करण्याविषयीं मी गवर्नराजवळ मध्यस्थी करीन.

ते कैदी हल्लीं ज्या संकटांत होते, त्या संकटांत मनुष्य असतां, अशा प्रकारचें म्हणणें किती आनंदानें कबूल करील, हें सहज मनांत आणितां येईल. कप्तानापुढें गुडघे टेंकून त्यांनीं शपथ वाहून असें कबूल केलें कीं, आमच्या जिवांत जीव आहे तोंवर आम्ही तुम्हांशीं इमानानें वागूं, आणि आमचे प्राण तुम्हीच रक्षिले असें समजूं, व पृथ्वीवर पाहिजे तिकडे तुम्हांबरोबर येऊं; सारांश, जोंपर्यंत आम्ही तुम्हांस पित्याप्रमाणें मानूं.

हें ऐकून कप्तान म्हणाला, बरें तर, हें तुमचें म्हणणें मी गवर्नर साहेबांस जाऊन कळवितों; आणि त्यांजकडून तें कबूल करून घेण्याविषयीं माझ्यानें काय होईल तें करून पाहतों. असें बोलून तो मजकडे आ-

लां; आणि त्या लोकांच्या अंतःकरणाची स्थिति कशी काय दिसली ती मला सांगून ती म्हणाला, ते लोक इमानानें वागतील असें मला खचीत वाटतें.

तथापि ते लोक विश्वासघात करितील असें भय मुळींच न रहावें म्हणून मीं कमानास सांगितलें, "तुम्ही पुनः त्या लोकांकडे जा आणि त्यांपैकीं पांच असामी निवडून काढून त्यांस सांगा कीं, तुम्हा पांचांस मी आपल्या मदती करितां गलबतावर घेऊन जातों; आणि बाकीचे दोघे व गुहेंत कैदकरून ठेविलेले तिघे, अशीं पांच असामीस तुम्ही विश्वासानें वागावें ह्या हेतूनें गवर्नर साहेब आपणाजवळ ओलीस म्हणून ठेवणार आहेत; आणि काम बजावण्यांत जर तुमचा कांहीं अप्रामाणिकपणा दिसून आला, तर ते पांच असामी किनाऱ्यावर फांशीं दिले जातील.

हें बोलणें त्यांस मोठें कठीण वाटलें, आणि वास्तविकच गवर्नर साहेब ही व्यवस्था करणार अशी त्यांची खात्री झाली. तथापि तें कबूल करणें ह्याखेरीज त्यांस दुसरा मार्गच उरला नव्हता. तेव्हां त्यांपैकीं जे दोघे ओलीस ठेवावयाचे होते ते व कमान हे, त्या पांच असामींनीं आपलें काम इमानानें बजावावें, म्हणून त्यांचें आर्जव करूं लागले; कारण, त्यांनीं विश्वासघात केला म्हणजे ह्या बिचाऱ्यांचे जीव जाणार, व कमानासही क्लेश भोगावे लागणार.

जहाज पकडावयाकरितां जाण्यास आमचें सैन्य तयार झालें तें येणेंप्रमाणें:—कमान, त्याचा दुय्यम, व त्याच्या बरोबरचा उतारू मिळून तिघे; पहिल्या टोळींतील जे दोघे बंदिवान करून ठेविले होते व ज्यांस मीं हल्लीं मुक्त करून हत्यारें दिलीं होतीं ते; ज्या दुसऱ्या दोघांस मीं ह्या वेळेपर्यंत मुसक्या बांधून आपल्या मंडपांत ठेविलें होतें, व ज्यांस कमानाच्या सूचनेवरून हल्लीं मुक्त केलें होतें ते दोघे; आणि हे शेवटीं मुक्त केलेले पांच असामी; असे सर्व मिळून बारा असामी झाले. आणखी पांच असामी ओलीस म्हणून ठेविले होते ते निराळेच.

ह्याप्रमाणें तयारी झाल्यावर मीं कमानास विचारिलें कीं, हे लोक बरोबर घेऊन जहाज पकडण्याकरितां जाण्यास तुम्हांला धैर्य होतें किंवा नाहीं? मी आणि माझा चाकर फ्रैडे ह्या आम्हांविषयीं म्हणाल तर, आम्हांस येथून मुळींच हालतां कामा नये, असें मला वाटतें. कारण,

तुम्ही गेल्यावर येथें सात असामी कैदी मागें सहमार; त्यांस परस्परां-पासून दूर राखून एकमेकांची गांठ न पडूं देणें, व त्यांच्या खाण्यापिण्या-ची तजवीज राखणें, हें काम आम्हांस केलें पाहिजे.

जेव्हां मी त्या ओलीस ठेविलेल्या दोन कैद्यांच्या पहिल्यानें दृष्टीस पडलों, त्या वेळेस कमान मजबरोबर होता; त्यानें त्यांस सांगितलें कीं, तुमच्यावर देखरेख ठेवण्याकरितां गवर्नर साहेबांनीं ह्या गृहस्थास नेमिलें आहे; आणि त्यांचा तुम्हांस असा हुकूम आहे कीं, तुम्हांवर नेमिलेल्या मनुष्याचे आज्ञेशिवाय तुम्ही जागचे हालूं देखील नये; जर कदाचित् हाललां, तर तुम्हांस किल्ल्यांत टाकून तुमच्या पायांत बिड्या ठोकिल्या जातील. सारांश ह्यावेळेपर्यंत गवर्नर तो कोणता हें आम्हीं त्यांस सम-जूं दिलें नव्हतें; आणि आतांही मीच गवर्नर असें त्यांस न समजावें म्ह-णून मी दुसराच कोणी गवर्नरचे हाताखालचा मनुष्य आहें असें त्यांस दाखवून, प्रसंगवशात्, गवर्नर साहेब, शिबंदी, किल्ला, ह्या गोष्टी त्यांच्या-शीं बोलण्यांत आणीं.

आतां कमानाला दुसरी कांहीं अडचण म्हणून राहिली नव्हती. फक्त दोन होड्यांपैकीं एकीचें भोंक बंद करून त्या दोन्ही तयार कराव-याच्या, व त्यांत मनुष्यें बसवावयाचीं, एवढें मात्र राहिलें. त्यानें आ-पणा बरोबरच्या उतारूच्या ताब्यांत चार असामी देऊन त्याला एका होडीचा कमान केलें; आणि आपला दुय्यम व दुसरे पांच असामी हे घेऊन आपण दुसऱ्या होडींत जाऊन बसला. त्यांनीं आपलें काम मोठ्या युक्तीनें चालविलें, तें असें; मध्यरात्रीचे सुमारास ते गलबताजव-ळ आले; गलबतापासून एका हाकेच्या अंतरावर जेव्हां ते येऊन पों-होंचले, तेव्हां कमानानें राबिन्सन-ह्यास सांगितलें कीं, तूं जहाजावरील लोकांस हाक मार; आणि बेटावर गेलेलीं माणसें व त्यांची होडी आ-म्हीं आणिली आहे, परंतु त्यांस शोधून काढण्यास पुष्कळ वेळ लाग-ला वगैरे मजकूर त्यांस सांगून, आपल्या होड्या तारवाशीं भिडत तों-पर्यंत त्यांना बोलण्याच्या नादांत लाव. त्याप्रमाणें राबिन्सन ह्यानें त्यांस बोलण्याचे नादास लाविलें. इकडे होड्या जहाजास भिडतांच पहिल्यानें कमान व त्याचा दुय्यम हे दोघे आपलीं हत्यारें घेऊन जहा-जावर चढले, आणि तत्काळ दुसरा दुय्यम व सुतार ह्यांस त्यांनीं आप-

त्या बंदुकांच्या बुंध्यांनीं हाणून पाडिलें. ह्याप्रसंगीं त्यांच्याबरोबरच्या माणसांनींही त्यांस चांगली इमानानें मदत केल्यामुळें त्यांनीं वरचा मजला व मागचा मजला ह्यांवरील सारे लोक धरले; आणि खालच्या मजल्यांतील लोकांनीं वर येऊन दंगा करूं नये म्हणून ते दारें बंद करूं लागले. इतक्यांत दुसऱ्या होडींतील लोक नाळीकडून आंत शिरले, व त्यांनीं पुढच्या मजल्याचा बंदोबस्त केला; आणि तेथून स्वयंपाकघरांत जाऊन तेथें तीन असामी सांपडले त्यांस त्यांनीं कैद केलें.

ह्यानंतर मुख्य मजल्यावर चांगला बंदोबस्त झाला असें पाहून, कप्तानानें आपल्या दुय्यमाबरोबर तीन असामी देऊन त्यांस, ज्या खोलींत बंडवाल्यांचा कप्तान निजला होता, त्या खोलीचें दार फोडून आंत शिरण्यास हुकूम केला. इकडे नवा कप्तान ही सर्व गडबड ऐकून सावध झाला, आणि उठून आपणाजवळील दोन असामी व एक पोरगा ह्यांसह बंदुका वगैरे हत्यारें घेऊन तयार झाला. आणि जेव्हां दुय्यम ह्यानें लोखंडाची कांब घालून दार उघडिलें, तेव्हां तो नवा कप्तान व त्याचे जवळचे तिघे ह्यांनीं त्यांच्यावर बंदुका सोडिल्या; त्यामुळें दुय्यम व दुसरे दोघे असामी जखमी झाले; परंतु त्यांच्यापैकीं कोणी मेले नाहीं, दुय्यम जखमी झाला असतांही दुसऱ्या लोकांस मदतीस बोलावून आपण एकदम खोलींत शिरला, आणि आपल्या पिस्तुलानें नव्या कप्तानाच्या डोक्यांत गोळी घालून त्यानें त्यास चीत केलें. हें पाहून बाकीचे सारे लोक शरण आले. ह्याप्रमाणें आणखी कोणाची प्राणहानि झाल्यावांचून गलबत पूर्णपणें हस्तगत झालें.

जहाज हस्तगत होतांच, कार्य सिद्धीस गेलें हें मला कळविण्याकरितां, कप्तानाच्या व माझ्या ठरावाप्रमाणें, सात तोफा सोडण्यास त्यानें हुकूम केला. इकडे मीही तोफा केव्हां सुटतील म्हणून वाट पाहत पहाटेच्या प्रहर रात्रीपर्यंत एकसारिखा किनाऱ्यावर जागत बसलों होतों; त्यामुळें हे तोफेचे आवाज ऐकतांच मला मोठा आनंद झाला. नंतर मी निजलों, आणि त्यादिवशीं मला मनस्वी श्रम झाले होते, त्यामुळें मला गाढ निद्रा लागली. शेवटीं बंदुकीचे आवाजानें एकाएकीं जागा झालों, आणि दचकून उठलों तों कोणी गव्हर्नर, गव्हर्नर, म्हणून मला हाक मारीत आहे असें मीं ऐकिलें, आणि कप्तानाचा हा शब्द

आहे असें मीं तत्काळ ओळखिलें. इतक्यांत तोही गलबताकडे बोट दाखवून मला आलिंगन देऊन म्हणाला, हे माझ्या प्रिय मित्रा, हे माझ्या प्राणरक्षका, हें पहा तुझें तारूं. मी तुझें म्हणतों ह्याचें कारण हें तारूं, आम्ही सारे लोक, व तारवांत जें कांहीं असेल तें सर्व आतां तुझें आहे. हें त्याचें भाषण ऐकून मी तारवाकडे नजर फेंकिली; तों तें किनाऱ्यापासून सुमारें पाव कोसापेक्षां किंचित् ज्यास्त अंतरावर उभें आहे असें दृष्टीस पडलें. ह्यावेळीं तारूं इतकें जवळ दिसलें ह्याचें कारण, गलबत हस्तगत होतांच त्यांनीं नांगर उचलिला आणि वारा अनुकूळ असल्यामुळें हांकारून त्या लहानशा खाडीच्या मुखाजवळ तें आणून नांगरिलें होतें.

आपणास वाटेल तिकडे घेऊन जाण्यास एवढें मोठें जहाज तयार असल्यामुळें आपल्या मुक्ततेचा उपाय आतां आपल्या स्वाधीनचा झाला आहे, हें मनांत येऊन मला जो आनंद झाला, त्याच्या योगानें वायूच होण्याचा बेत आला होता. कप्तानास उत्तर देईन म्हटलें तर माझ्या तोंडांतून एकही शब्द निघेना; आणि त्यानें मला कवळून धरिलें होतें म्हणून त्याच्या आधारानें मी उभा तरी राहिलों, नाहीं तर जमिनीवर पडलोंच असतों. कप्तानालाही मजसारिखाच हर्ष झाला होता; परंतु मजसारिखा तो बेशुद्ध झाला नव्हता. मीं शुद्धीवर यावें म्हणून त्यानें नाना तऱ्हा केल्या. परंतु माझ्या अंतःकरणांत आनंदाचा असा कांहीं पूर आला होता कीं, त्याच्या योगानें माझें अंतःकरण स्थितीवर नाहींसें झालें. शेवटीं तो आनंदाचा भर अश्रुधारांच्या रूपानें बाहेर पडून कांहीं वेळानें मला बोलण्याचें सामर्थ्य आलें. तेव्हां मीं त्यास आपला वनवासापासून मुक्त करणारा मानून आलिंगन दिलें; आणि उभयतां आनंदांत निमग्न झालों.

ह्याप्रसंगीं मीं परमेश्वराकडे चित्त लावून त्याचे आभार मानण्यास विसरलों नाहीं. आणि वास्तविकच पहा कीं, ज्यानें अशा निर्जन वनामध्यें व विपत्तीमध्यें अत्यंत अद्भुत रीतीनें माझ्या निर्वाहाची सोय केली, इतकेंच नाहीं तर कोणत्याही विपत्तीपासून कोणाचीही मुक्तता होणें ती ज्याच्या इच्छेवांचून होतच नाहीं, अशा त्या परमेश्वराचे आभार मानण्यास मी कसा चुकेन बरें ?

कांहीं वेळ आम्हा उभयतांशीं संभाषण झाल्यानंतर, आपल्या कैदी लोकांची व्यवस्था कशी काय करावयाची ह्याविषयीं आम्ही विचार करूं लागलों. त्या सर्वांस व विशेषेंकरून जे दोघे अति दुष्ट व दांडगे होते, त्यांस आपण बरोबर न्यावें किंवा नाहीं, त्याचा विचार पडला; आणि कदाचित् नेलेंच तर गुन्हेगार लोकांप्रमाणें त्यांस पायांत बिड्या ठोकून नेऊन पहिल्यानेंच जेथें इंग्लिश लोकांची वसाहत दृष्टीस पडेल तेथें त्यांची चौकशी करण्याकरितां त्यांस अम्मलदारांच्या स्वाधीन करावें किंवा कसें, हा आम्हांस मोठा विचार पडला. शेवटीं मीं कप्तानास अशी एक कल्पना सुचविली कीं, जेणेंकरून तुम्ही सांगतां ते दोघे दुष्ट असामी आपण होऊनच, आम्हांला कृपाकरून येथेंच राहूं द्या, अशी तुम्हांस विनंति करितील, अशा प्रकारची कांहीं तजवीज केली पाहिजे. हें ऐकून कप्तान म्हणाला, वाहवा, तसें झालें तर मला फारच आनंद होईल.

मीं म्हटलें, बरें तर, मी आतां त्या कैदीलोकांस बोलावणें पाठवितों, आणि तुमच्या बद्दल मीच त्यांच्याशीं बोलतों. असें म्हणून मीं फ्रैदे व पूर्वी ओलीस ठेविलेले दोघे असामी (ह्यांचे सोबती आपल्या वचनाप्रमाणें वागल्यावरून ह्यांस आम्हीं मोकळें केलें होतें) अशा तिघां जणांस गुहेंत पाठवून तेथें मुसक्या बांधून ठेविलेल्या पांच असामींस आपल्या मंडपांत आणविलें; आणि मी मंडपाकडे जाई तोंपर्यंत त्यांस तेथेंच थांबविलें.

नंतर कांहीं वेळानें मी नवा पोषाख घालून तेथें आलों, ह्या वेळेस मला सारे पुनः गवर्नर गवर्नर म्हणूं लागले. कप्ताना सहित आम्ही सर्व तेथें जमल्यावर ते कैदी लोक मीं आपणा समोर आणविले, आणि त्यांस सांगितलें कीं, तुम्ही आपल्या कप्तानाशीं बे इमानानें वागून त्याचें जहाज कसें बळकाविलें, आणि पुढेंही आणखी लुटारूपणा करण्याची तुमची कसकशी तयारी चालली होती, ही सर्व कच्ची हकीकत माझ्या कानावर आली आहे; परंतु परमेश्वरानें तुमच्या हातानेंच तुमचा नाश करविला. पहा कीं, दुसऱ्यानें पडावें म्हणून जी तुम्ही खांच खणून ठेविली होती, तींत स्वतः तुम्हीच पडलां. आणि तुम्ही प्रत्यक्ष गुन्हा करीत असतां मीं तुम्हांस धरिलें आहे; सबब समुद्रांतील

लुटारू लोक समजून मीच तुम्हांस फांशी दिले असतां काय चिंता; आहे? कारण, मला फाशी देण्याचा अधिकार आहे हें तुम्हांस पक्कें ठाऊक असेलच. त्यास ह्यावर तुमचें काय म्हणणें आहे तें मला कळविलें पाहिजे.

हें ऐकून त्यांपैकीं एकजण सर्वांच्या वतीनें म्हणाला कीं, सरकार, आमचें दुसरें कांहीं म्हणणें नाहीं. आम्हांस पकडिलें त्या वेळेस, तुम्हांला जीवदान देऊं, असें कमान साहेबांनीं आम्हांस वचन दिलें आहे, त्यास आम्हा दीनांवर दया करून आमचे जीव वांचवा म्हणजे झालें. मी म्हणालों, तुम्हांवर दया तरी कोणत्या रीतीनें करावी हें मला समजत नाहीं. कारण, मी तर आपल्या लोकांसहवर्तमान हें बेट सोडण्याचा निश्चय करून कमाना बरोबर इंग्लंदास जाण्याची तयारीही केली आहे. आतां कमानानें तुम्हांला इंग्लंदास न्यावें म्हणाल तर, तुमच्या पायांत बिड्या ठोकाव्या लागतील, व तुम्ही बंड करून जहाज बळकाविलें ह्या गुन्ह्या बद्दल तेथें तुमची चौकशी करवावी लागेल. असें केल्यावांचून तो तुम्हांस बरोबर नेऊं शकत नाहीं. आणि त्या चौकशीचा परिणाम फांशीची शिक्षा हा होईल, हें तुम्ही जाणतच आहां. तस्मात् कोणत्या रीतीनें तुमचें बरें होईल हें मला सांगतां येत नाहीं. तथापि ह्या बेटावरच आपलें काय होईल तें होवो, असा तुमचा निर्धार असेल तर मात्र तुमचें बरें होण्याचा संभव आहे. कारण, येथेंच राहून आपला चरितार्थ चालवितां येईल असें तुम्हांस वाटत असेल तर तुम्हांस जीवदान द्यावें असें माझ्या मनांत आहे. हें भाषण ऐकून ते माझे मोठे आभारी झाले असें दिसलें. ते म्हणाले, इंग्लंदास जाऊन फांशीची शिक्षा भोगावी त्यापेक्षां येथेंच रहावें हें चांगलें. मग त्यांजवरच गोष्ट टेपली.

तथापि त्या लोकांना येथें ठेवण्यास आपणाला धैर्य होत नाहीं असें कमानानें दाखविलें; त्यामुळें त्याचा ह्या गोष्टीस प्रतिबंध दिसला. तेव्हां मीं किंचित् रागावल्या सारिखें करून त्यास म्हटलें, हे लोक माझे कैदेंत आहेत; आणि ज्यापक्षीं तुम्ही येथें राहिलां असतां तुम्हांस जीवदान देईन, असें तुमचें बरें करितों म्हणून मी त्यांस बोलून दाखविलें आहे, त्यापक्षीं मी आपलें बोलणें खरें करीन. जर माझ्या बोलण्या-

ला अनुमोदन देणें तुम्हाला योग्य वाटत नसेल; तर हे लोक ज्या स्थि-तींत मला सांपडले त्या स्थितींत मी त्यांस मोकळे सोडितों; आणि हे मोकळे असावे हें तुम्हांस आवडत नसल्यास तुमच्यानें त्यांना पकडवेल तर पकडा.

हें माझें भाषण ऐकून ते कैदी लोक माझे फार आभारी झाले. तें-व्हां मी त्यांस बंधमुक्त करून सांगितलें कीं, जंगलामध्यें ज्या ठिकाणा-हून तुम्हांस धरून आणिलें तिकडे जा. आणि मी त्यांस म्हणालोंकीं मी तुम्हांस कांहीं बंदुका वगैरे हत्यारें व दारूगोळा देतों, आणि तुम्हां-स योग्य वाटल्यास येथें कोणत्या युक्तीनें चरितार्थ चांगला चालेल हेंही तुम्हांस सांगतों.

ह्याप्रमाणें त्या कैदी लोकांची तजवीज लागल्यानंतर मी गलबतावर जाण्याच्या सिद्धतेस लागलों. पण मीं कप्तानास सांगितलें कीं, मी आपली तयारी करण्याकरितां आजची रात्र येथेंच राहणार आहें; तर तुम्ही प्रथम गलबतावर जाऊन सर्व यथास्थित व्यवस्था करून ठेवा; आणि उद्ईक प्रातःकाळीं मजकरितां होडी किनाऱ्यावर पाठवून द्या. मीं त्याला आणखी असा हुकूम केला कीं, बंडवाल्यांचा जो नवा क-प्तान तुम्हीं मारिला आहे, त्याचें प्रेत ह्या लोकांच्या दृष्टीस पडावयाक-रितां गलबताच्या काठीच्या आडव्या लांकडावर टांगून ठेवा.

माझ्या हुकुमाप्रमाणें कप्तान जहाजावर गेल्यानंतर मीं मुक्त केले-ल्या कैदी लोकांस आपल्या खोलींत बोलाविलें, आणि त्यांच्या स्थिती विषयीं त्यांच्याशीं संवाद आरंभिला. मी त्यांस म्हणालों, तुम्ही ये-थेंच राहण्याचें पतकरिलें हें फार चांगलें केलें, असें मला वाटतें. का-रण, जर कप्तानानें आपणाबरोबर तुम्हांला इंग्लंदास नेलें असतें, तर निःसंशय तुम्हांस फांशीची शिक्षा भोगावी लागती. बंडवाल्यांच्या क-प्तानाचें प्रेत जहाजावर टांगिलें होतें तें त्यांस दाखवून मी म्हणालों, तो पहा तुमचा कप्तान गलबतावर टांगला आहे, हेंच तुमच्या कपाळीं यावयाचें ह्यांत संशय नाहीं.

आम्ही येथें राहण्यास खुशी आहों, असें जेव्हां त्यांनीं स्पष्ट सां-गितलें, तेव्हां, येथें राहणें जेणेंकरून सुखावह होईल अशा मार्गास मी तुम्हांला लावितों, असें म्हणून मीं बेटाची इत्थंभूत माहिती त्यांस करू-

न दिली. मीं आपला तट त्यांस दाखविला; आणि मीं धान्यं कसें लावीत होतों, भाकरी कशा करीत होतों हें, व दुसऱ्या ज्या ज्या गोष्टी त्यांस सुखप्रद होतील असें मला वाटलें, त्या सर्व मीं त्यांस दाखविल्या. ह्या ठिकाणीं सोळा असामी स्पान्यर्द यावयाचे आहेत, असें त्यांस सांगून मीं त्या स्पान्यर्दांस एक पत्र लिहून ठेविलें; आणि आम्ही भाईबंदीनें त्या स्पान्यर्दांशीं वागूं, असें ह्या लोकांपासून कबूल करून घेतलें.

मीं त्यांस पांच मोठाल्या बंदुका, तीन शिकारीच्या बंदुका, आणि तीन तरवारी अशीं हत्यारें दिलीं. आणि बंदुकीच्या दारूचें एक दीड पिंप मजजवळ शिलकेंस होतें तेंही त्यांस दिलें. इतकी दारू मजजवळ शिलक राहिली होती ह्याचें कारण मी बेटावर आल्यानंतर पहिल्या दोन वर्षांतच दारूचा काय खर्च झाला तो झाला; त्यापुढें मीं फारशी ती खर्चिली नाहीं, आणि दुसऱ्या कोणत्या प्रकारें तिचा नाशही झाला नाहीं. असो, ह्यानंतर शेळ्यांची वगैरे व्यवस्था कशी ठेवावी, त्या पुष्ट होण्यास काय उपाय करावा, त्यांचें दूध कसें काढावें, त्या दुधाचें लोणी कसें काढावें, चक्का कसा तयार करावा, वगैरे सर्व गोष्टी मीं त्यांस शिकविल्या. आणखी मीं त्यांस सांगितलें कीं, कप्तानास सांगून त्याजकडून बंदुकीच्या दारूचीं आणखी दोन पिंपें व फुलझाडांचीं वगैरे बियें तुम्हांकरितां पाठवितों. ह्याखेरीज कप्तानानें मला खावयास देण्याकरितां एक पिशवी भरून वाटाणे आणिले होते, तेही मीं त्यांस दिले; आणि, हें बीं पेरून वाटाणे उत्पन्न करण्यास चुकूं नका, असें त्यांस सांगितलें.

ह्याप्रमाणें त्यांची व्यवस्था केल्यावर दुसरे दिवशी मीं त्यांना सोडून जहाजावर गेलों. नंतर लागलीच आम्हीं जाण्याची तयारी केली; परंतु त्याच दिवशीं आम्हीं नांगर उचलिला नाहीं. दुसरे दिवशीं पहांटेस बेटावर ठेविलेल्या पांच असामीं पैकीं दोघे पोहत पोहत जहाजाच्या बाजूजवळ आले, आणि रडत रडत बाकीच्या तिघांचें गाऱ्हाणें सांगून म्हणाले, कृपा करून आम्हांला जहाजावर घ्या; कारण, ते तिघे आम्हांस खचीत ठार मारणार आहेत. हें ऐकून कप्तानानें त्यांस सांगितलें, गवर्नर साहेबांचे हुकुमावांचून मी तुम्हांस वर घेऊं सकत नाहीं. तथापि त्यांनीं पुष्कळ विनवणी करून, आम्ही चांगल्या रीतीनें वागूं,

म्हणून, शपथ घेऊन सांगितल्यावरून त्यांस जहाजावर घेतलें; आणि पुढें कप्तानानें त्यांस फटक्यांची शिक्षा दिली. त्यानंतर ते फार प्रामाणिकपणानें व गरीबपणानें वागूं लागले.

हें झाल्यानंतर कांहीं वेळानें भरती आली, तेव्हां बेटावरील लोकांस जे जिन्नस पाठविण्याचें मीं कबूल केलें होतें, ते एका होडींत भरून किनाऱ्यावर पाठविले. आणखी माझ्या सांगण्यावरून कप्तानानें त्या लोकांच्या पेट्या व कपडे हेही होडींत घालून पाठविले. तें सर्व सामान घेऊन त्यांनीं माझे मोठे आभार मानिले.

मी बेट सोडून गलबतावर जावयास निघालों, त्या वेळेस आपली बोकडाच्या कातड्याची मोठी टोपी, छत्री, व पोपट, ह्या वस्तू आपल्या वनवासाच्या खुणा म्हणून मीं बरोबर घेतल्या. मजजवळ जो रोख पैसा होता म्हणून मीं पूर्वी सांगितलें व जो इतके पुष्कळ दिवसपर्यंत अगदीं निरुपयोगी होऊन पडला होता कीं, त्याला मनस्वी जंग चढून जाऊन, तीं नाणीं घांसून स्वच्छ केल्यापूर्वी, हीं रुप्याचीं नाणीं असें ओळखण्यास देखील कठीण पडे, तो पैसा आणि स्पानिश लोकांच्या फुटक्या जहाजांत मला सांपडलेलें द्रव्य हीं मी बरोबर घेण्यास विसरलों नाहीं.

असो, ह्याप्रमाणें तयारी करून मीं तें बेट सोडून सन १६८६ ह्या वर्षी दिसेंबर महिन्याच्या १९ व्या तारिखेस निघालों. (असें गलबतावरील लोकांच्या सांगण्यावरून समजण्यांत आलें.) तेव्हां अर्थात् त्या बेटामध्यें २८ वर्षे, २ महिने, १९ दिवस माझी वस्ती झाली. आणि पूर्वी सलीं येथून ज्या महिन्याच्या ज्या तारिखेस मीं आपली सुटका करून घेतली, त्याच महिन्याच्या त्याच तारिखेस ह्या बेटांतून माझी सुटका झाली.

त्या जहाजांत बसून पुष्कळ दिवस जलपर्यटन केल्यानंतर सन १६८७ ह्या वर्षी जून महिन्याच्या ११ व्या तारिखेस मीं सुमारें ३६ वर्षांनीं पुनः इंग्लंदांत पाय ठेविला.

मी इंग्लंदास आलों तेव्हां जसा कांहीं पूर्वी कधींच कोणास ठाऊक नव्हतों, अशाप्रमाणें मी सर्वांस नवा वाटूं लागलों. इंग्लंदांतून जाते-समयीं ज्या प्रामाणिक बाईजवळ मीं आपला पैसा ठेविला होता, ती

अद्यापि जिवंत होती खरी; परंतु तिला ह्या वेळेपर्यंत मोठमोठालीं संकटें भोगावीं लागलीं होतीं. तिला हल्लीं दुसऱ्यानें वैधव्य प्राप्त झालें असून दारिद्र्यही अठरा विश्वे आलें होतें. हें पाहून मीं तिला सांगितलें कीं, बाई, माझें जें तुम्ही देणें आहे, त्याविषयीं तुम्ही मुळींच काळजी करूं नका. मी त्याबद्दल तुम्हांस मुळींच त्रास देणार नाहीं; इतकेंच नाहीं, परंतु पूर्वी तुम्ही मजबरोबर मोठ्या विश्वासानें वागलां, आणि माझी पुष्कळ काळजी बाळगिली, ह्या तुमच्या उपकाराबद्दल हल्लीं मी आपल्या शक्तीप्रमाणें तुम्हांस साह्य करितों.

ह्यानंतर मी याकेशायरास गेलों, आणि तेथें पाहिलें तों माझीं मातापितरें स्वर्गवासी झालीं होतीं; आणि पुष्कळ दिवसांपूर्वी, आपला मुलगा नष्ट झाला, असें त्यांस वाटल्यावरून त्यांनीं आपल्या अंतकाळीं मजविषयीं मुळींच कांहीं तजवीज करून ठेविली नव्हती. सारांश, मला साह्य करण्यास ह्याप्रसंगीं कोणीच नाहीसें झालें. मजजवळ जो कांहीं थोडाथोडका पैसा होता, तोही गुजारा करून राहण्यास पुरेल इतका नव्हता.

अशा दुर्धर प्रसंगीं एका गृहस्थानें मात्र मीं केलेले उपकार स्मरून मला त्याजपासून कांहीं प्राप्त होण्याची आशा नसतांही, मजवर प्रत्युपकार केला. तो असा, मी ज्या गृहस्थास प्राणसंकटांतून मुक्त करून त्याचें जहाज व आंतील माल ह्यांचा बचाव केला होता, त्यानें त्या जहाजाच्या व मालाच्या धन्यांस, मीं जहाजावरील लोकांचे जीव वांचवून जहाजाचा बचाव केला हा वृत्तांत इतका सजवून सांगितला कीं, त्या जहाजाचे धनी व दुसऱ्या ज्या लोकांचा त्या जहाजांत संबंध होता, त्या सर्वांनीं मिळून मला भेटावयास आमंत्रण केलें, आणि मीं केलेल्या उपकारांबद्दल माझे मोठे आभार मानून मला रोख २००० रुपये बक्षीस दिले.

तथापि हे २००० रुपये तरी आपल्या प्रस्तुत स्थितीच्या संबंधानें पाहिलें असतां घरदार करून बसण्यास फारच थोडे आहेत, हा विचार मनांत येऊन मीं असा निश्चय केला कीं, पोर्तुगाल देशास जाऊन ब्राझिल प्रांतांत आपण जी शेतवाडी केली होती तिची कशी काय व्यवस्था आहे. व आपल्या भागीदाराचें कसें काय वर्तमान आहे हें समजेल व

पहावें. तो भागीदार जर मी मेलों असेंच समजत असेल, असें मला वाटलें.

ह्याप्रमाणें संकेत करून मी जहाजांत बसून लिस्बन शहरास जाण्यास निघालों, आणि पुढील एप्रिल महिन्यांत तेथें पोहोंचलों. ह्या सर्व कृत्यामध्यें माझा चाकर फ्रैदे हा एकसारिखा मजबरोबर होता; आणि हरएकप्रसंगीं मोठ्या इमानानें तो माझी चाकरी करीत असे. लिस्बन शहरास पोहोंचल्यानंतर, पूर्वी आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळ ज्या कप्तानानें मला आपल्या जहाजावर घेऊन माझें रक्षण केलें होतें, त्या माझ्या पुरातन मित्राचा मीं शोध लाविला; तो हल्लीं वृद्ध झाला होता, आणि व्यापाराचें काम आपल्या पुत्रावर सोंपवून आपण स्वस्थ घरीं बसला होता. त्याच्या पुत्रानेंही ब्राजिल देशाकडील व्यापार अद्यापि यथास्थित चालविला होता. त्या वृद्ध मनुष्यानें मला प्रथमतः ओळखिलें नाहीं; आणि वास्तविक मलाही त्यास ओळखणें मोठें कठीण पडलें. परंतु जेव्हां मीं आपलें नांव त्यास सांगितलें, तेव्हां तत्काळ परस्परांची ओळख पटली.

पूर्वीच्या स्नेहामुळें आमचीं उभयतांचीं कांहीं प्रेमयुक्त भाषणें झाल्यानंतर मीं आपल्या शेतवाडी विषयीं व भागीदाराविषयीं वर्तमान विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, आलीकडे ९ वर्षांत मी ब्राजिल प्रांतीं गेलों नाहीं; परंतु इतकें मात्र मला पक्कें ठाऊक आहे, कीं मी तेथून निघालों त्या वेळीं तुमचा सरकती जिवंत होता; आणि मला वाटतें कीं, तुमच्या शेतवाडीचाही हिशेब तुम्हांस चांगला मिळेल. कारण, तुम्ही आपली शेतवाडी ज्यांच्या स्वाधीन करून ठेविली होती, त्यांनीं, तुम्ही समुद्रांत बुडून मेलां, अशी बहुतेक लोकांची खात्री झाल्यावरून, सरकारी वसुला कडील अधिकारी ह्यास तुमच्या उत्पन्नाचा हिशेब दिला. त्या अधिकाऱ्यानें तुमच्या उत्पन्नाचा तृतीयांश सरकारचे खजिन्यास जमा केला; आणि बाकी दोन तृतीयांश सफिस्ते व सेंत आगस्तिन ह्या मठांतील अनाथ लोकांच्या खर्चाकडे व इंडियन लोकांना काथोलिक धर्म स्वीकारण्यास प्रवृत्त करण्याच्या खर्चाकडे नेमून दिले; परंतु त्यानें आणखी असा ठराव केला आहे कीं, प्रत्यक्ष तुम्ही किंवा तुमच्या तर्फेनें दुसरा कोणी उत्पन्न मागावयास येईल तर तें परत द्यावें; त्यांत इत

केंच कीं धर्मादाय खात्याकडे ज्या ऐवजाचा खर्च होऊन गेला असेल, तो मात्र परत मिळणार नाहीं.

तो आणखी असें म्हणाला, तुमच्या शेताची स्थिति कितपत सुधारली आहे, हें मला बरोबर सांगतां येत नाहीं; परंतु एवढें मी जाणतोंकीं, तुमचा सरकती त्या शेतांतील उत्पन्नाच्या अर्ध्याच हिश्शावर मला गबर होऊन बसला आहे. आणखी असें ऐकिल्यानें मला स्मरतें कीं, तुमच्या उत्पन्नाचा जो तृतीयांश सरकार खजिन्यास जमा झाला होता, व जो पुढें दुसऱ्या एका मठाकडे नेमून दिला होता, त्याचा आकार दरसाल २०० मायदोर (म्हणजे ३४०० रुपये) ह्यांपेक्षां ही जास्त होतो. आतां ही तुमची शेतवाडी तुम्हांस परत मिळेल किंवा नाहीं ह्याविषयीं तर शंकाच नको. कारण, तुम्हीच त्याचे मालक आहां ह्याबद्दल साक्ष देण्यास तुमचा सरकती अद्यापि जीवंत आहे, व तुमचें नांवही पूर्वीं गांवचे खात्यांत दाखल झालेंच आहे. दुसरें असेंकीं, तुम्ही आपला हिस्सा ज्या दोघां गृहस्थांच्या स्वाधीन केला होता, त्यांचे वंशज मोठे प्रामाणिक असून संपन्नही आहेत; सबब तुमचें उत्पन्न परत मिळवून देण्याचे कामांत तुम्हांस ते साह्य करितील; इतकेंच नाहीं; तर तुमचें उत्पन्न वर सांगितल्याप्रमाणें सरकारांत जाण्यापूर्वीं त्यांच्या वाडवडिलांच्या स्वाधीन होतें त्यावेळेस उत्पन्नाचा बराच पैसा त्यांच्याजवळ जमलेला असेल, तोही तुम्हांस देतील. तें उत्पन्न सरकारांत गेल्याला सुमारें १२ वर्षें झालीं असावीं असें मला वाटतें.

पुढें तो म्हणाला, परंतु तुम्हांस दुसरें एक वर्तमान सांगावयाचें आहे, तें कदाचित् इतक्या वेळ सांगितलेल्या वृत्तांताप्रमाणें तुम्हांस सुखप्रद होणार नाहीं. तें वर्तमान असें कीं, तुम्ही नष्ट झालां अशी बहुतेक सर्व लोकांची समजूत होऊन गेल्यामुळें, तुम्ही ज्यांचे स्वाधीन आपलें शेत केलें होतें ते व तुमचे सरकती हे, पहिल्या सात आठ वर्षांत झालेल्या नफ्याचा हिशेब तुमच्या तर्फेनें मला देऊं लागले; तेव्हां तो मीं घेतला. परंतु त्यावेळीं कारखाने सुरू करणें, गुलाम विकत घेणें, इत्यादि कामांकडे फार खर्च झाल्यामुळें तो सारा नफा मिळून, पुढें जें दरसाल उत्पन्न होऊं लागलें तितका झाला नाहीं. असो, तथापि मला एकंदर तुमच्या वांटचा कित[illegible] पैसा पावला आहे, व हल्लीं तुमचें मी

किती देणें आहे, ह्याचा बरोबर हिशेब तुम्हांस देईन.

हें हिशेबाचें कृत्य संपल्यावर, तुमचें शेत तुम्हांस परत मिळवून देण्याचें तजविजीस मी लागूं किंवा कसें म्हणून त्यानें मला विचारिलें. तेव्हां मीं उत्तर केलें, मींच स्वतः तिकडे जाण्याचा विचार केला आहे. तो म्हणाला, तुमची मर्जी असल्यास जा; परंतु जरी तुम्ही गेलां नाहीं तरी तुमची मालकी शाबूत करून तुमचें उत्पन्न तुम्हांस मिळेल अशी तजवीज करण्याला मार्ग आहेत. असें म्हणून त्या वेळेस ब्राजिल देशास जाणारीं गलबतें नदीमध्यें तयारच होऊन बसलीं होतीं, म्हणून सरकारच्या रजिस्तरामध्यें त्यानें माझें नांव घालविलें. आणखीं, ज्यानें लागवड करण्याकरितां पहिल्यानें ती जमीन ताब्यांत घेतली तो मनुष्य अद्यापि जिवंत आहे व तोच हा मनुष्य आहे, असा त्यानें शपथ घेऊन मला दाखलाही लिहून दिला.

ह्यानंतर जी एक गोष्ट घडून आली तींतील प्रामाणिकपणासारिखा प्रामाणिकपणा कोणी कधींच पाहिला नसेल. ती गोष्ट अशी, मीं ज्या दोघां गृहस्थांच्या स्वाधीन आपलें शेत केलें होतें, त्यांचे वारसां कडून (ते तर वारलेच होते) सुमारें ७ महिन्यांचे आंतच मला एक मोठासा लखोटा आला. त्यांतील कलमें येणें प्रमाणें :—

पहिल्यानें त्यांच्या वडिलांनीं ज्या वर्षी पोर्तुगाल देशांतील म्हाताऱ्या कप्तानास माझ्या उत्पन्नाचा हिशेब दिला, त्यापुढें सहा वर्षात जितकें उत्पन्न झालें त्याचा हिशेब लिहिला होता. त्यांत माझें येणें त्यांनीं ११७४ मायूदोर (म्ह० १५८४८ रुपये) काढिलें होतें. दुसरें, त्यांचे वडील वारल्यानंतर ज्या वेळेस मी नष्ट झाल्यामुळें माझी मालमत्ता बेवारशी झाली असें समजून सरकारानें ती जप्त केली, त्यापूर्वी ४ वर्षेपर्यंत माझें शेत त्या वारसांच्या ताब्यांत होतें, त्याबद्दलचा हिशेब त्यांनीं लिहिला होता; आणि त्या चार वर्षांत पिकांची किम्मत चांगली आल्यामुळें त्या हिशेबांत ३२४१ मायूदोर (म्ह० ४३७५७ रुपये) माझें येणें निघालें होतें. तिसरें सेंत् आगस्तिन येथील मठाधिपतीकडे सरकारानें नेमून दिलेलें उत्पन्न त्याला चवदा वर्षेपर्यंत पोहोंचलें होतें, त्याबद्दल त्यानें हिशेब लिहिला होता. त्यांत इस्पितळाकडे जी रकम खर्चिली गेली होती, तीबद्दल तो जबाबदार नव्हताच; परंतु ८७२ मायूदोर (म्ह०

११७७४ रुपये) शिलक राहिले आहेत; ती रक्कम मी तुमचें देणें आहे, असें त्यानें मोठ्या प्रामाणिकपणानें कबूल केलें होतें.

त्या लखोट्यांत माझ्या सरकत्यानेंही मला लिहिलेलें एक पत्र होतें; त्यांत तुम्ही सुखरूप असल्याचें समजल्यावरून मला मोठा आनंद झाला वगैरे मजकूर लिहून, माझ्या शेताचें उत्पन्न दरसाल किती होतें हेंही त्यानें मला कळविलें होतें, आणि तुम्हीं येथें येऊन आपलें शेत ताब्यांत घ्यावें असें त्यानें लिहिलें होतें. हा लखोटा ज्या गलबतांत आला त्यांतच मी मुखत्यार नेमिलेल्या व्यापाऱ्यांच्या वारसांनीं साखरेच्या पेट्या १२००, व तमाखूच्या पेंड्या आठशें पाठवून बाकीचा ऐवज रोख पाठविला होता.

ह्याप्रमाणें मी अकस्मात् रोख ५०००० रुपयांचा धनी झालों. ह्याखेरीज ब्राजिल देशांत माझें सालीना १०००० रुपयांचें उत्पन्न असून तेंही इंग्लंदांतील उत्पन्नाप्रमाणें अविच्छिन्न होतें. सारांश, इतकी संपत्ति एकाएकीं प्राप्त झाल्यानें माझ्या चित्ताची अशी कांहीं विलक्षण स्थिति झाली कीं, त्या संपत्तीचा उपभोग कसा घ्यावा हें मला मुळींच कांहीं समजेना.

प्रथमतः माझा मूळचा हितकर्ता जो हा वृद्ध कप्तान त्याचे उपकार फेडण्याचें मीं मनांत आणिलें. कारण, त्यानेंच पहिल्यानें मला संकटांतून उद्धरिलें, आणि शेवटीं तो मजबरोबर अत्यंत प्रामाणिकपणानें वागला. सबब ब्राजिल देशांतून जो कांहीं माल वगैरे आला होता तो मीं त्यास दाखविला, आणि म्हटलें, परमेश्वराच्या इच्छेनें सर्वगोष्टी घडून येतात हें खरें, पण तो विचार खेरीजकरून पाहिलें असतां, हेंसर्व केवळ तुमच्या कृपेनें मला प्राप्त झालें आहे. तस्मात् ह्याप्रसंगीं तुमचे उपकार फेडणें हें मला उचित होय; आणि माझी तर तुम्हांवर शतगुणित प्रत्युपकार करावा अशी इच्छा आहे. ह्याप्रमाणें बोलून प्रथमतः त्यानें आपणाकडे जें माझें येणें काढिलें होतें, तें मीं त्यास बक्षीस केलें. नंतर माझ्या शेताचें जें दरसाल उत्पन्न होईल, तें घेऊन ठेवण्यास मीं त्याला मुखत्यार नेमून आपल्या सरकत्यासही पत्र लिहिलें कीं, तुम्ही माझ्या उत्पन्नाचा हिशेब दरसाल ह्या गृहस्थास देऊन ऐवज त्याजकडे पाठवीत जा. अशी व्यवस्था करून मीं त्या कामाबद्दल त्यास हयातीपर्यंत आपल्या

उत्पन्नापैकीं दरसाल १०० मायदोर (म्ह.१३५० रुपये) व त्याचे मागें त्याचे पुत्रास ५० मायदोर (म्ह. ६२० रुपये) अशी नेणूक करून दिली.

हें झाल्यानंतर आतां आपण कोणता मार्ग स्वीकारावा व परमेश्वरानें आपणास दिलेल्या ह्या संपत्तीची व्यवस्था कशी करावी, ह्या गोष्टींचा मी विचार करूं लागलों. ब्राजिल देशांत माझी जरूरीचीं कामें असल्यामुळें तिकडे जाणें मला अवश्य दिसलें खरें, परंतु आपली मालमत्ता कोणा विश्वासुक मनुष्याच्या स्वाधीन करून सर्व कामांची नीट व्यवस्था लाविल्यावांचून मला तिकडे जातां येईना. सबब तो सारा माल व रोकड वगैरे बरोबर घेऊन पहिल्यानें इंग्लंदास जाणें मला प्राप्त झालें. हें माझें इंग्लंदास जाणें व दुसरी साहस कृत्यें ह्यांचा वृत्तांत मी वाचकांस पुढें विदित करीन.